# सर्जनशीलतेचा नवाविष्कार

शब्दवेल

नवा विचार नवी दिशा
जाई
फाउंडेशन



## दिवाळी अंक २०२३

# संपादक मंडळ



**प्रा.डॉ. वर्षा खडसे-रणदिवे**
(मुख्य संपादक)
बी.ए.(एमएलटी), एम.ए.(मराठी,अर्थशास्त्र)
एम.एड, पीएचडी.(शिक्षणशास्त्र)



**अंजली ढमाळ**
(अतिथी संपादक)



**रंजना कराळे**
(कार्यकारी संपादक)



**प्रविण बोपुलकर**
(व्यवस्थापक)



**अश्विनी अतकरे**
(व्यवस्थापक)



**देवेंद्र इंगळकर**
(उपसंपादक)



**अमोल चरडे**
(उपसंपादक)



**शितल राऊत**
(उपसंपादक)



**रामदास गायधने**
(सहसंपादक)



**विलास पुंडले**
(सहसंपादक)

## कार्यकारिणी सदस्य



नलिनी पवार



अश्विनी कोठावळे



योगिनी वैदू



अशोक उघडे



मनिषा शिरटावले



आबासाहेब कडू



यश इंगळे

# " आम्हांस आपला सार्थ अभिमान आहे! "




Congratulations to our GST Department of Maharashtra, for winning the prestigious **TIOL Award** for the second consecutive year! **Maharashtra has been awarded in the "Golden" category in the "Value Added Tax Administration" and the "Silver" award in the category of "Reforming State."** Gratitude to the citizens and entrepreneurs of Maharashtra for their dedication, authenticity, and transparency !





महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवाकर विभागास प्राप्त अत्यंत प्रतिष्ठेचा TIOL पुरस्कार स्विकारताना अप्पर राज्यकर आयुक्त श्री. रमेश भूमे साहेब, अप्पर राज्यकर आयुक्त श्री. धनंजय आखाडे साहेब व सहआयुक्त श्रीम. निधी चौधरी (IAS) मॅडम, श्री. तुकाराम गडदे साहेब, राज्यकर सहआयुक्त व सहआयुक्त श्री सुदाम गवळी साहेब, सहआयुक्त श्रीम. थोरात मॅडम !



महाराष्ट्र राज्याच्या राज्यकर विभागाचे सन्माननिय
आयुक्त श्री. राजीव मित्तल साहेब (IAS),
विशेष राज्यकर आयुक्त श्री. नितीन पाटील साहेब (IAS),
श्रीम. निधी चौधरी मॅडम (IAS), श्रीम. गीतांजली टेमगिरे मॅडम !



चित्र प्रदर्शन कार्यक्रमादरम्यान श्रीम. प्रेरणा देशभ्रतार मॅडम (IAS),
श्री. रंगानायक साहेब (IAS), श्रीम. निधी चौधरी मॅडम (IAS),
श्री. अरूण बिराजदार साहेब, श्रीम. गीतांजली टेमगिरे मॅडम !




चित्र प्रदर्शन कार्यक्रमा प्रसंगी राज्यकर विभागाच्या राजपत्रित अधिकारी
संघाचे अध्यक्ष श्री. प्रदिप रणपिसे साहेब व इतर संघटनेचे पदाधिकारी !



चित्र प्रदर्शन कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे
अध्यक्ष श्री. विनोद देसाई साहेब, राज्यकर सहआयुक्त श्री. अरुण बिराजदार साहेब
व राज्यकर राजपत्रित अधिकारी संघटनेचे सचिव श्री. राजेश बदर साहेब
आणि इतर पदाधिकारी व अधिकारीवृंद !




पदोन्नती नंतर पुणे येथील प्रशिक्षणा दरम्यान २०१३ बॅचचे अधिकारीवृंद !



अप्पर राज्यकर आयुक्त श्री. रमेश भूमे साहेब यांचा सत्कार करताना
राज्यकर सहआयुक्त श्री. डेव्हिड अल्वारिस साहेब व
मोठे करदाते कक्ष ४ चे अधिकारीवृंद.



अधिकारी प्रशिक्षण कार्यक्रमा दरम्यान श्री नितीन पाटील साहेब (IAS) विशेष राज्यकर आयुक्त,
श्रीम. राजश्री नाडगौडा मॅडम, श्री. पिचड साहेब व इतर मान्यवर !

# मुख्य संपादक मनोगत



**प्रा. डॉ. वर्षा खडसे-रणदिवे**
बी.ए.(एमएलटी), एम.ए.(मराठी,अर्थशास्त्र)
एम.एड, पीएचडी.(शिक्षणशास्त्र)

'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' हा दिवाळी अंक आपल्या हाती देताना अत्यानंद होत आहे ! मागील दिवाळी अंका बद्दल काही थोडक्यात सांगायचं म्हटलं तर त्या दिवाळी अंकास तब्बल एक दोन नव्हे तर चार राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले ! शिवाय इतका दर्जेदार दिवाळी अंक आम्हास उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभाराचे अगणित निरोप प्राप्त झाले व कितीतरी वाचकांनी आपलं मन त्याचं कौतुक करताना रीतं केलं. असो !!

मराठी भाषिक दर्जाच्या उत्तविकासाचे व्रत घेतलेल्या व मराठी भाषेस अभिजात भाषा अशा दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी सतत आपली बाजू अर्थात 'मायं मराठीची' बाजू लावून धरणारा आपला दिवाळी अंक सर्वाथाने सांस्कृतिक दर्जाचं अमीट लेणं आहे असं साभिमानाने नमूद करावसे वाटते ! या दिवाळी अंकाच्या प्रत्येक पानापानात मराठी भाषेच्या विविध रंगछटांसोबतच संपूर्ण महाराष्ट्रातील गुणी व सर्जनशील व्यक्तिमत्त्वांच्या सुंदर आणि सुरेख कल्पना छटा उमटल्या आहेत. हा दिवाळी अंक खऱ्या अर्थाने सप्तरंगी झाला असून हा मराठी भाषेचा निर्मळ प्रवाह साहित्य रसिक मंडळींची तहान भागवण्यासाठी अखंड प्रवाहीत होत आहे यात आनंद वाटतो आहे. मानवतेचा अखंड प्रवास या दिवाळी अंकाद्वारे मुखपृष्ठ ते मलपृष्ठापर्यंत सदैव स्मरणात राहील व आनंदाच्या क्षितिजावर तो सप्तरंगांची बेधुंदपणे उधळण करीत राहील असा ठाम विश्वास रसिक वाचनकर्त्यांप्रती व्यक्त करत या दिवाळी अंकाद्वारे दिवाळी सारख्या पवित्र सणात हे वाचन पुष्प आपला आनंद द्विगणित तर नक्की करेलच!

या प्रकाशोत्सवाच्या खूप खूप शुभेच्छा!



# अतिथी संपादक मनोगत

अंजली ढमाळ

‘नवे नवे ते हरखुनी यावे।
जुनेही त्यासह जोडुनी घ्यावे।
प्रेमळ अनुभवी मृदू मांडीवर
काव्य–तान्हुले बाळ हसावे ।।’

या काव्यपंक्तींतून ज्या साहित्यकुंटुंबाचे आणि त्याच्या विविध उपक्रमांचे वर्णन करता येईल अशा शब्दवेल साहित्य मंचचा चौथा दिवाळी अंक वाचकांसमोर ठेवताना ठेवताना अतिशय आनंद होत आहे. शुक्ल पक्षातल्या चंद्राप्रमाणे या साहित्यसंस्थेच्या कार्याचा आणि त्यांच्या दिवाळीअंकाचा दर्जा आणि लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत आहे, ही अतिशय आनंदाची व समाधानाची बाब आहे. ‘शब्दवेल’ या लोभस नावाने अतिशय उत्साहाने मराठी साहित्य विश्वात दाखल झालेल्या या संस्थेने अक्षरश: असंख्य नवोदितांना अक्षरमाध्यमातून व्यक्त होण्याची संधी दिली. एवढ्यावरच न थांबता या सर्व लेखक कवींना आपल्या साहित्य परिवाराशी स्नेहाने जोडून ठेवले. गझलविहार, गुजगोष्टी, युवकांसाठी ‘काळजातल्या कविता’ तर बालकांसाठी 'इटुकले–पिटुकले' अशा वर्षभर चालणाऱ्या विविध उपक्रमांतून कार्यरत असणारा शब्दवेल समूह म्हणजे साहित्यिकांसाठी खऱ्या अर्थाने एक विसाव्याची ‘देवराई’ आहे; आपल्या साहित्याला नवनवे अवकाश मिळवून देणारा हक्काचा पैस आहे. 'वारी मराठीची' या मराठीच्या बोलीभाषांवरील कार्यक्रमाने अवघ्या मराठी मनाला, आपलेसे केले.

शब्दवेल समूहाने अल्पावधीतच ‘ऑनलाईन’ माध्यमातून तसेच प्रत्यक्ष होणाऱ्या विविध सत्रांतून आपल्या कार्याचा विस्तार अनेक जिल्ह्यांमध्ये केला, आणि मानवतेची एक सुंदर चळवळ आकाराला आली. या चळवळीतून चालणाऱ्या विविध उपक्रमांचा, स्पर्धांचा कळसाध्याय म्हणजे हा दिवाळीअंक होय. कविता, कथा, अलक, चारोळी असा बहुरंगी साहित्यफराळ घेऊन ‘सर्जनशीलतेचा नवविष्कार’ हा दिवाळीअंक आपल्या भेटीस आलेला आहे. यामध्ये आणखी एक सुखद बाब म्हणजे चित्रे आणि बालकवितांचा समावेश असणारा बालकांसाठीचा खास विभाग या अंकामध्ये आहे. कवी प्रविण बोपुलकर आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे, एकोप्यामुळे आणि साहित्याविषयीच्या तळमळीमुळेच त्यांना हे शिवधनुष्य पेलणे शक्य झाले आहे.

खऱ्या अर्थाने समानतेची द्वाही फिरवणारा, उत्साहाचा अखंड खळाळ असणारा हा दिवाळीअंक नक्कीच वाचकांच्या मनातही आनंदाचे दीप उजळणारा ठरेल याबद्दल खात्री आहे. सर्व रसिक वाचकांना तेजोमयी दिवाळीच्या हृद्य शुभेच्छा!



# कार्यकारी संपादक मनोगत

**रंजना कराळे**
अमरावती
कार्यकारी संपादक तथा
उपाध्यक्षा, शब्दवेल साहित्य मंच, मुंबई

सस्नेह नमस्कार....

सर्व रसिक, सारस्वतांना दिपावलीच्या लखलखत्या व आरोग्यपूर्ण शुभेच्छा.

**दीप उजळो उजळो, घरी दारी मांगल्याचा**
**संस्कारांच्या तेलवाती, सण स्नेह जिव्हाळ्याचा**

दिपावली आपल्या तेजोमय प्रकाशात प्रत्येक हृदय उजळवित असते. जल्लोष व अपरिमित आनंदाचा हा उत्सव. निसर्गाच्या कणाकणातून प्रसवणारी सोनेरी, चंदेरी लावण्यखणी आभा व चिरंतन कृतार्थतेच्या लकेरी मन गाभाऱ्यात आतवर मुरवणारा.. सारं सारं चराचर कसं प्रफुल्लित होत असतं. शब्दांमधून ते कसं व्यक्त व्हावं ?...

तरिही शब्दच असतात जादूगार... शब्दांची गुंफण विविध साहित्य प्रकारांस जन्मास घालते. प्रतिमा, प्रतिके, रुपके ह्यांच्या सहजसुंदर संयोगातून साहित्याची जडणघडण होते.

एक शब्द असाच अंकुरला आणि बघताबघता त्याची वेल नभाशी सलगी करु लागली. शब्दवेल साहित्य मंचाचे सन्माननीय अध्यक्ष मा. प्रविणदादा बोपूलकर (राज्यकर निरीक्षक, मुंबई) ह्यांच्या संकल्पनेतून साकारलेलं एक सुंदर विश्व म्हणजेच हा मंच. अगदीच थोड्या कालावधीत राज्यभरात हा परिमळला. अनेक मान्यवरांचा वरदहस्त येथे लाभत गेला. राज्यभरातून असंख्य साहित्यिक जुळत गेले. आपलं काव्य, लेख, कथा, ललित, मुलाखती.. इ. माध्यमामधुन त्यांचे ह्या मंचाशी कायमस्वरुपी घट्ट अनुबंध निर्माण झाले.

ह्या भक्कम व्यासपीठाने अनेक लिहित्या हातांना अतुलनीय बळ दिले. कल्पनांची भरारी दिली. एका नव्या आभाळाशी गाठभेट घडवणारी अशी ही शब्दवेल किमयागार ठरली. शब्दवेलीचे सिंचन करणाऱ्या हातांमध्ये मा. अध्यक्ष प्रविणदादा बोपूलकर, व्यवस्थापक मा. अश्विनी अतकरे, उपाध्यक्षा मी व मा. शीतल राऊत, प्रमुख कार्यवाह प्रविण सोनोने, व्यवस्थापक मा. नरेंद्र लोणकर, मार्गदर्शक मा. आबासाहेब कडू तसेच शब्दवेल युथ विंगचे अध्यक्ष मा. अमोल चरडे, मा.यश इंगळे, मा. आचल काळे ह्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

सर्वांच्या अथक प्रयत्नांनी ही वेल फुलली आहे. सन्माननीय सल्लागार मा. अंजलीताई ढमाळ, उपायुक्त ज्येष्ठ साहित्यिका मा. प्रतिभाताई सराफ, ज्येष्ठ साहित्यिक मा. अरुणजी म्हात्रे ह्यांचा त्यात मोलाचा वाटा आहे. गेल्या चार वर्षात ठाणे, अमरावती व पुणे येथे राज्यस्तरीय संमेलनाचे यशस्वी आयोजन झाले.

शब्दवेल फक्त साहित्य मंच नाही तर तो एका दिपस्तंभाप्रमाणे ठरला आहे. ज्याने अनेक साहित्यिकांमध्ये उर्जा भरली. नवी दिशा प्रदान केली. कल्पनाशक्तीला वाव दिला.

सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३ हा मुकूट धारण करुन येत असलेला हा आपला द्वितीय दिवाळी अंक. कसदार, दर्जेदार साहित्याची लयलूट असलेला हा अंकरुपी ठेवा आपल्या हातात देतांना आम्हाला अत्यंत आनंद होतो आहे. साहित्य वाचनाने ज्ञानाची कवाडं तर खुली होतातच सोबतच एक संपन्न रुचि निर्माण होते. हा एक आगळावेगळा, सौंदर्याने नटलेला तसेच मानवी जीवनाचा एकेक पैलू उलगडत जाणाऱ्या विषयांचे भांडार घेऊन असलेलं एक सुगंधी साहित्यपुष्प म्हणजे हा दिवाळी अंक. आपणास तो खात्रीनं आवडेल.

दिपावली.. आनंदाचं निधान.. नवचैतन्याची खळखळ.. काळोख दूर सारत आशा, दिशा उजळविणारा.. माणुसकीच्या ज्योती लावणारा सण. ही दिवाळी आपलं आयुष्य आनंद, उत्साह, जल्लोषानं भरून जावी. समाजपुरक, वैचारिक साहित्यबळ निर्माण व्हावं. सुखसमाधानानं प्रत्येकाची झोळी भरावी हिच ईशचरणी कामना.

दिपावलीच्या आपणा सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा.



# उपसंपादक मनोगत

**देवेंद्र शं. इंगळकर**
उपसंपादक तथा केंद्रिय संघटक
शब्दवेल साहित्य मंच मुंबई

नमस्कार,

सर्जनशील शब्दवेल साहित्य मंच व जाई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' दिवाळी अंक आपणास सुपूर्द करताना आम्हांला मनापासून आनंद होत आहे.

ह्या सुंदर सृष्टीची निर्मिती करणारा खरा सर्जनशील हा परमेश्वर आहे, सृष्टीमध्ये मानवरुपाने जे जे नवनिर्माण किंवा नवविष्कार होत असते, ते नवनिर्माण करणारे कलाकार, साहित्यिक हे देवाचे प्रतिनिधीत्व करत असतात, त्यांच्याकडून त्या त्या काळानुसार त्यांच्या कलेचे, साहित्याचे नवविष्कार घडले ते देवांनी त्या त्या वेळच्या साहित्यिक कलाकाराकडून त्यावेळच्या परिस्थितीनुसार घडवून घेतले, जेणेकरून ते साहित्य, कला समाजाला दिशा देण्याचे, समाजाला प्रबोधन करण्याचे तसेच भविष्यात प्रेरणा देण्याचे काम करेल. साहित्याच्या बाबतीत बोलायचे तर उदाहरणादाखल ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास स्वामी, अलीकडच्या काळातील बहिणाबाई, राम गणेश गडकरी, बालकवी, कुसुमाग्रज असी कितीतरी नावे घेता येतील ज्यांचे साहित्य आपणास मार्गदर्शन देत असते, प्रेरणा देत असते, जगण्याचे सार सांगत असते. ज्ञानेश्वरांना तर आपण माऊली म्हणतो, माऊली म्हणजे माता आणि पोटातून येणारं साहित्य तसेच कल्पनाशक्ती ह्यांचा सुंदर मिलाप घडवून जे साहित्य साहित्यिकांच्या आकर्षक लेखनीतून आपल्याला विशाल अनुभूती देते तेचं खरे साहित्य, तीच नवनिर्मिती साधणारी खरी सर्जनशक्ती आणि ही वदवून घेणारा तो परमेश्वर आपला विठू माऊली तोच खरा सर्जनशील निर्माता, आपण निमित्त मात्र असे मी मानतो. ह्याच मूळ आधारावर आपला 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' दिवाळी अंकाचा मुखपृष्ठ बनला आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली पण त्यांना ज्ञानेश्वरी लिहिण्यास प्रवृत्त करणारा म्हणा किंवा त्यांच्याकडून लिहून घेणारा तो, म्हणजेच परमेश्वर विठू माऊली खरा सर्जनशील. ज्ञानेश्वरी ही आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान जीवनाला दिशा देणारी, जगण्याचं मुळ सांगणारा ग्रंथ आहे, म्हणून समाजाला दिशा देणाऱ्या ज्ञानेश्वरीला मला सर्जनशीलतेचा नवाविष्कार म्हणावे वाटते. खरं म्हणजे ज्ञानेश्वरी ही आम्हां साहित्यिकांचे प्रेरणास्त्रोत. साहित्यिक, कलाकार हा कोणत्याही कार्यशाळेत निर्माण होत नाही, मुळात तो असावा लागतो, त्याच्याकडून साहित्य घडवून घेणारा खरा कर्ता करविता तो सृजनशील परमेश्वर विठू माऊली आहे असे मला वाटते, त्या माऊलीच्या रुपाने साहित्यिक, कलाकारांकडून साहित्यकलेची निर्मिती होत असते, नवाविष्कार होत असते, म्हणून त्या परमेश्वराचे वरदहस्त लाभलेल्या साहित्यिक, कलाकार ह्याच्या साहित्य, कलेला आपण सर्जनशीलतेचा नवाविष्कार म्हणतो.

सर्जनशील दिवाळी अंकात आपल्याला आवडेल असे विविध वैचारिक, सामाजिक, विनोदी साहित्य, मुलाखत, कविता, गझल यांची रेलचेल आहे, तसेच लहान मुलांसाठी बालसाहित्य, हास्य तरंग हे सदर ठेवण्यात आले आहे, असा विविधतने नटलेला हा दिवाळी अंक आपणास देताना तो आपली दिवाळी नक्कीच गोड करेल अशी खात्री देतो.

ह्या दिवाळी अंकात ज्या ज्या साहित्यिकांनी आपले अनमोल साहित्य पाठवले तसेच सर्जनशील शब्दवेल साहित्य मंच व जाई फाऊंडेशनच्या पदाधिकार्यांनी दिवाळी अंक निर्मितीसाठी अथक परिश्रम घेतले त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

आपणास व आपल्या परिवारास दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा आणि येणारे वर्ष आपणास सुख समृद्धीचे भरभराटीचे जावो हीच सदिच्छा,



**अमोल चरडे**
उपसंपादक, अध्यक्ष–शब्दवेल युथ विंग

एखाद्या बियाणाला साऱ्या गोष्टी अनुकूल मिळाल्या की रोपटे, वेल बहरत जाते हा तर सृष्टीचा नियम..

पण प्रतिकूल परिस्थितीतही काही  वेली वटवृक्षाकडे वाटचाल करतात आणि स्वतःची ओळख निर्माण करतात. याच निकषावर पुरेपूर साधर्म्य साधणारी साहित्यिक वेल म्हणजेच ''शब्दवेल''. अनेक नामवंत साहित्यिक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्पकतेने नटलेले, घडलेले नवोदित साहित्यिक यांचा सुरेल संगम म्हणजेच आपला दिवाळी अंक ''सर्जनशीलतेचा नवाविष्कार''

प्रविण भाऊ बोपुलकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली एक अमोल साहित्यिक कलाकृती म्हणजेच ''शब्दवेल''

अनेक गोड, हव्याहव्याशा साहित्यिक कलाप्रकाराची एक परिपूर्ण थाळी खास दिवाळी निमित्त आपल्यासमोर ठेवतांना आम्हाला भरपूर आनंद होत आहे.

मागील वर्षी आपण आपला पहिला छापील दिवाळी अंक प्रकाशित केला, त्यावर अनेक नामवंत लेखकांनी, कवींनी कौतुकाची छाप दिली, तसेच साहित्यिक क्षेत्रातून पुरस्काराचा वर्षाव आपल्या दिवाळी अंकावर झाला. त्यामुळे निश्चितच एक जबाबदारी, दायित्व होतं की यावर्षी देखील आपली ही दिवाळी अंकाची भेट साहित्य प्रेमिंच्या काळजात घर करणारी असावी.

शब्दवेल साहित्य समूह, संपूर्ण कार्यकारिणी मंडळ यांनी आपली कामगिरी चोख बजावली यात तिळमात्र शंका नाही.

आता रसिक मायबाप हो आपली भूमिका जी आमच्या साठी लाखमोलाची आहे आणि भावी वाटचालीसाठी एक ऊर्जास्रोत म्हणून आशीर्वाद रुपी वरदहस्त असेल.

आपण सर्वांना दिवाळीच्या खास खास शुभेच्छा आणि दिवाळी अंकाची सस्नेह भेट.



**शीतल राऊत**
उपसंपादक, उपाध्यक्षा शब्दवेल साहित्य मंच

नमस्कार,

रसिक सारस्वतांनो

आपल्या शुभाशीर्वादाने दिवाळीच्या मंगलमय, चैतन्यमय, वातावरणात सर्जनशीलतेचा नवा अविष्कार २०२३ हा शब्दवेल साहित्य मंचाद्वारे प्रकाशित होणाऱ्या या अलौकिक दिवाळी अंकाचे उपसंपादकीय लेखन करताना मनापासून आनंद होत आहे.

हा दिवाळी अंक म्हणजे फक्त शब्दांचा संग्रह नसून वैविध्यपूर्ण साहित्यप्रकारांनी सजलेला, समृद्ध झालेला, कलागुणांना वाव देणारा एक अमूल्य नजराणाच आहे.

अथपासून इथपर्यंत साहित्य, कला, छंद, आवडी–निवडींच्या आठवणींचा खजिना हा अंतर्मनातल्या खोल गाभाऱ्यामध्ये जपून ठेवलाय, तप्त उन्हात तापल्यावर एखाद्या पावसाचा थंडगार थेंब मातीत रुजणाऱ्या अंकुराला फुलवते, रुजवते, वाढवते, शिकवते, मोठं करते त्याच प्रकारे शब्दवेल लिहिणाऱ्यांना बोलकं करणारं हक्काचं व्यासपीठ आहे.

अंधाराचा नाश करून, प्रकाशाच्या तेजाकडे नेणारा हा दीपोत्सव साहित्यिकांसाठी सात्विक खुशखुशीत, खमंग, आंबट गोड, चरमरीत, चमचमीत कलाकृतींची निर्मिती करणारा अंक आहे.

गेल्या काही वर्षापासून शब्दवेल साहित्य मंचाची गाठलेली उंची बघता त्यासाठी अतिशय कर्तव्य तत्पर असणारे आमचे बंधू अध्यक्ष मा. श्री. प्रवीण बोपुलकर, सचिव मा. अश्विनी अतकरे, उपाध्यक्ष मा. रंजना कराळे, व्यवस्थापक मा. नरेंद्र दादा लोणकर, प्रमुख कार्यवाहक मा. प्रवीण दादा सोनवणे, मा. अमोल चरडे, आम्हाला मार्गदर्शन करणाऱ्या अधिकृत सन्माननीय सल्लागार मा. अंजलीताई ढमाळ, ज्येष्ठ साहित्यिक मा. अरुण म्हात्रे सर, मार्गदर्शिका मा. प्रतिभा सराफ मॅडम, मा. अशोकजी नायगावकर सारख्या दिग्गज लोकांचे मार्गदर्शन शब्दवेलीला सदैव लाभते, हे आमचे भाग्य.

शब्दवेलचा परिवार आता मोठा असल्यामुळे सर्व जिल्हा कार्यकारिणी मंडळींचा मी आवर्जून उल्लेख करते.

कारण..

**''शब्दांनी कळते भावना, भावनांनी कळते जगणे**
**जगण्याने कळते नाते, नात्यांना कळते जन्म**
**जन्माने मिळते भाग्य, आणि भाग्याने मिळतो शब्दवेलीचा संग''...**

दिवाळीच्या उत्सवात सजलेली सप्तरंगी रांगोळी जशी मनाला मोहून टाकते. हा दिवाळी अंक साहित्यातल्या प्रत्येक जाणीवांना, भावनांना, संवेदनांना जागा करणारा, शब्दातून.... विविध पैलूंना एकत्रित घेऊन उत्सव करणारा हा दिवाळी अंक

म्हणजे अनेक दिग्गज लेखक, कवी, गझलकार, प्रसिद्ध अभिनेते अभिनेत्री, योगतज्ञ, चित्रकार, मोठमोठी कलाकार मंडळींचा मिळालेला शुभाशीर्वाद होय. नवचैतन्याने दरवळलेला, उत्साहाने धुंद झालेल्या, मनाच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारा हा दिवाळी अंक म्हणजे तुम्हा आम्हा सर्वांनसाठी मिळालेली दिवाळीची अमूल्य भेट होय, दारिद्र्याचा नाश करून ज्ञानाच्या तेजाकडे पोहोचवणारा हा अंक... सामाजिक जाणीवांना तृप्त करणारा.. असा साहित्यिक नवा अविष्कार आपल्यासमोर या दिवाळी अंकाच्या रूपाने येत आहे. अभिमानाची बाब म्हणजे शब्दवेल साहित्य मंच हा आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आखीव रेखीव नियोजनात्मक गोष्टींनी नटलेला आहे.

या शब्दवेलीचा एक भाग आपल्याला होता आलं यासाठी मी आजन्म ऋणात राहू इच्छिते.

ज्याच्या शीर्षकातूनच एक नवी सकारात्मकता, नवी दिशा समाजाला देण्याचा एक मानस, निसर्ग नियमानुसार बदलत्या काळानुसार या सुपीक बुद्धिमत्तेला सकस आहार व दिवाळीच्या फराळा प्रमाणे चमचमीत विचारांची मेजवानी देण्यासाठी लेखक, साहित्य, कथा, कविता, ललित अशा विविध अंगी साहित्याचा समावेश या अंकामध्ये केलेला आहे. रसिक मनाच्या मनाला ठाव घेणारा साहित्य दर्जेदार साहित्याने नटलेला सुंदर मुखपृष्ठ व आत्मिक निरक्षणातून साकारलेला अप्रतिम अंक आहे.

शब्दवेल म्हणजे भेगाळलेल्या मातीतून स्वकष्टाने उपजलेला शब्दांकुर होय.

त्यासाठी राबणाऱ्या त्या शब्दांना, हातानां, अतिशय व्यस्त जीवनातून वेळ देणाऱ्या सर्व महामानवांना नमस्कार......

गेल्या चार वर्षापासून महाराष्ट्राच्या कोपऱ्यातून शब्दवेल साहित्य मंचा सोबत जुळलेल्या सर्व साहित्यिकांच्या प्रेमामुळे शब्दवेल पुन्हा नव्याने एका यशाच्या पायरीवर पाऊल टाकत आहे. आपण सर्व साहित्यिक वाचक मंडळी याचे साक्षीदार आहात तसेच मुख्य संपादक मा. डॉ. वर्षा रणदिवे मा. श्री मारुती रणदिवे सर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले, व डीटीपी ऑपरेटर दळवी सर यांनी सहकार्य केले, तसेच सर्जनशीलतेचा नवा आविष्कार या दिवाळी अंकासाठी सहकार्य करणाऱ्या संस्था, समित्या, संघटना, सर्व कार्यकारिणी मंडळींचे मनःपूर्वक आभार व्यक्त करते.

शब्दवेल साहित्य मंचातर्फे सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा......



# सहसंपादक मनोगत

**रामदास गायधने**
सहसंपादक तथा केंद्रिय कार्यकारिणी सहसचिव
बेनोडा, जिल्हा अमरावती

**''शब्दवेलचा सुगंध दरवळला, आसमंतात पसरला सारा**
**बाग फुलली शब्दफुलांची, मंच कसा गंधाळुनी निघाला''**

दिवसेंदिवस शब्दवेल साता समुद्रपार पसरत चाललेला आहे. ज्याप्रमाणे वेलीला खतपाणी मिळाले तर ती हरितपर्ण होऊन बहरत जाते तद्वतच शब्दवेलच्या या वेलीला शब्दरुपी साहित्याचे उत्कृष्ट खतपाणी लाभत असल्यामुळे तिचे पाळेमुळे खोलपर्यंत रुतत चाललेले आहे.हा शब्दवेल दिवाळी अंक याचाच साक्षीदार ठरणार आहे.

**''शब्दवेल साहित्य मंच माझा, घर करुनी बसला मनी सारा**
**मित्र परीवाराशी नाते जुळले, शब्दवेल समुह उगवता तारा''**

**''आता चतुर्थ वर्धापन दिन, आनंदाने मन आले भरुन**
**देऊया शुभेच्छा शब्दरुपानं, वाढे वेल गगनी भरभरुन ''**

**'' पाहता ताजी फुले प्राजक्ताची, सुगंध माझ्या रंध्रारंध्रात शिरतो**
**शब्दवेल दिवाळीअंकास माझ्या, ओंजळीतील शब्दफुले वाहतो''**

**वाऱ्याच्या झुळकेन मन सुखावते, झाडाच्या सावलीत मन विसावते,**
**सुर्याच्या सोन किरणांनी मन प्रसन्न वाटते,**
**तसच शब्दवेलचा दिवाळी अंक, वाचकांच्या हाती पडताच भान हरपते.**

शब्दवेलचा दिवाळी अंक ''सर्जनशीलतेचा नवाविष्कार'' आगवेगळ रंगरुप पाहतांनी वाचकवर्ग त्याच्या प्रेमात पडल्याशिवाय राहणार नाही.

मागच्या वर्षीच्या दिवाळी अंकास राज्यस्तरीय तीन बक्षीसे मिळाली व एक जिल्हास्तरीय यावर्षीच्या दिवाळी अंकाचीही चांगलीच वाहवा होईल हे निश्चित.. या वर्षीच्या अंकात सौ. प्रतीभाताई सराफ यांनी अखिल भारतीय नाट्य परीषदेचे माजी ९९ वे अध्यक्ष श्री प्रेमानंद गज्वीसर यांची घेतलेली मुलाकत, तसेच बर्याच नामवंत लेखक वा कवी यांच साहित्य, अलक, विनोदी कविता तसेच काही बोली भाषेतील कविता अशा सर्वांगानं नटलेल्या या शब्दवेल दिवाळी अंकाचे रंगरुप वेगळेच पहायला मिळणार आहे.

अल्पावधीत शब्दवेलच्या दिवाळी अंकाने चांगलीच भरारी मारलेली आहे. एकंदरीत हा दिवाळी अंक वाचकांच्या पसंतीस उतरेल यात शंकाच नाही

मी शब्दवेलच्या दिवाळी अंकास मनापासून शुभेच्छा देतो व ''शब्दवेल समूह'' असाच हरितपर्ण रुपाने नित्य बहरत राहो हीच सदिच्छा व्यक्त करतो.



**अश्विनी निलेश अतकरे,**
व्यवस्थापक तथा सचिव
शब्दवेल साहित्य मंच मुंबई

# व्यवस्थापक मनोगत

सस्नेह नमस्कार....

सर्वांना लखलखत्या, चमचमीत, चटपटीत आणि खमंग अश्या दिवाळीच्या वाचनीय शुभेच्छा!!!

दिवाळी म्हटली की दिव्यांची रोषणाई, फटाके, चटपटीत आणि आंबट, गोड, तिखट असा फराळ, नवीन कपडे यांची मेजवानी असतेच आणि या मेजवानीला पूर्णत्व देतात ते दिवाळी अंक.

दिवाळी आली की आपसूकच साहित्यिकांना आणि वाचकांना ओढ लागते ती दिवाळी अंकाची. महाराष्ट्रामध्ये फार पूर्वीपासून सुरू असलेल्या या परंपरेला पुढे नेण्यासाठी शब्दवेल साहित्य समूहाच्या अथक प्रयत्नातून जन्मलेला दिवाळी अंक 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' आपण सर्वांना देताना अतिशय आनंद होतो आहे.

शब्दवेल साहित्य समूह हा केवळ साहित्यिक मंच नसून जणू एक कुटुंब असल्याचे जाणवते. कोणत्याही क्षेत्रात जागृती करायची असेल तर त्या विषयावरील साहित्य हे उत्तम माध्यम उत्तम आहे. साहित्य समाज जीवनाचा एक आरसा असतो. समाजातील अनेक बदलांचे, परिवर्तनाचे पडसाद साहित्यामध्ये उमटत असतात. म्हणूनच दर्जेदार साहित्य निर्मिती आणि नव लेखकांना, नव कवींना संधी या जाणिवेतून 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' ची निर्मिती झाली. 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२२' ने अगदी कमी कालावधीमध्ये अवघ्या महाराष्ट्रात आपली कीर्ती मिळवून तब्बल चार पुरस्कार प्राप्त करून सर्वांचा उत्साह वाढविला. नक्कीचं आपल्या सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३' मध्ये विविध मान्यवर, लेखक, विचारवंत, कवी, कवयित्री, एवढेचं नाही तर इटुकल्या पिटुकल्यांची मांदियाळी या साहित्य वारीत भेटणार आहे. या अंकासाठी नवीन वाचकाला, नवोदितांना रुचेल पटेल असे विषय असावेत या हेतुसह अगदी त्याप्रमाणेच कथा, कविता, ललित एवढेच नव्हे तर नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या दिलखुलास मुलाखतीचा आस्वाद आपली दिवाळी आणखी आनंदी करेल यात शंकाच नाही.

आदरणीय प्रवीण बोपुलकर यांच्या सुदृढ कल्पनेतून जन्मलेला 'शब्दवेल साहित्य समूह' सुरवातीला केवळ व्हॉटअप समूह होता. 'तू चाल पुढं' असे म्हणत ५००० फॉलोवर सह फेसबुक समूह निर्माण झाला. आता तर महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या, वाचकांच्या प्रेमामुळे जिल्हा कार्यकारिणी बनून आपल्या कार्याची पावती देऊन सर्वांना प्रेरणा देत आहे. सन्माननीय सल्लागार मा.अंजलीताई ढमाळ, ज्येष्ठ साहित्यिका मा. प्रतिभाताई सराफ, ज्येष्ठ साहित्यिक मा. अरुणजी म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्यक्रम राबविताना मिळणारे प्रोत्साहन त्याचबरोबर शब्दवेल साहित्य समूहाच्या उपाध्यक्षा मा.शीतल ताई राऊत व मा. रंजना ताई कराळे, प्रमुख कार्यवाह मा. प्रविणदादा सोनोने, व्यवस्थापक मा.नरेंद्र दादा लोणकर, मार्गदर्शक मा. आबासाहेब कडू, मा. विद्याताई बनाफर तसेच शब्दवेल युथ विंगचे अध्यक्ष मा.अमोल चरडे, उपाध्यक्षा मा. माधुरी साबळे, मा.यश इंगळे, मा. आचल काळे आणि समस्त सदस्य मंडळींच्या सहकार्यामुळे प्रत्येक कार्यक्रम उत्कृष्टरीत्या संपन्न होतोच हे याची खात्री असते.

'सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३' आपल्या हाती सुपूर्त करण्यामागे डॉ.वर्षा खडसे (मुख्य संपादक), अंजली ढमाळ (अतिथी संपादक), रंजना कराळे (कार्यकारी संपादक), देवेंद्र इंगळकर, अमोल चरडे, शितल राऊत (उपसंपादक), रामदास गायधने, विलास पुंडले (सहसंपादक), प्रविण बोपुलकर (व्यवस्थापक), कार्यकारिणी सदस्य नलिनी पवार, अश्विनी कोठावळे, योगिनी वैदू, अशोक उघडे, मनिषा शिरटावले, आबासाहेब कडू यश इंगळे यांचा मोलाचा वाटा आहे. मा. देवेंद्रदादा इंगळकर यांच्या संकल्पनेतून बनलेले अंकाचे मुखपृष्ठ तसेच मांडणी, रेखाचित्र, फोटोग्राफ्स या सर्वच बाबतीत उत्तम ते उत्तम देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३' च्या निमित्ताने सर्वांचे मी मनापासून आभार मानते. वेळोवेळी सहकार्य करणारे मा. मारुती रणदिवे सर यांचेही विशेष आभार तसेच डी.टी.पी. ऑपरेटर दळवी सर यांचेही मन:पूर्वक आभार!!!



# व्यवस्थापक मनोगत

**प्रविण ज.बोपुलकर**
व्यवस्थापक तथा
अध्यक्ष शब्दवेल साहित्य मंच मुंबई

सर्व प्रथम शब्दवेल परिवारातील सर्व सदस्यांना दिवाळीच्या मंगलमय शुभकामना....!!!

**उगवेल तोच चंद्र उद्या ही पहाटे,**
**तोवर परि काळरात चालणेच आहे,**
**तीच चांदणी पुन्हा लखलखेल नभांगणी,**
**तोवर परि काळजास जाळणेच आहे**

–अंजली ढमाळ

खरंतर दिवाळी हा सण तेजाचा, मांगल्याचा उत्सव असतो या उत्सवामध्ये आपण दीव्याच्या प्रकाशाने चोहीकडचा अंधार नाहीसा करत सकारात्मक तेज पसरवत असतो अगदी याच मौलिक कार्यात एक दीप लावण्याचे कार्य आपण शब्दवेलच्या सर्जनशीलतेचा नवाविष्कार दिवाळी अंकामार्फत सकारात्मक साहित्य जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य गेले तीन वर्ष आम्ही करत आहोत. यावर्षी सुद्धा प्राप्त झालेल्या साहित्यामधून सकारात्मक व प्रेरणादायी साहित्याची निवड करून सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३ या अंकाची निर्मिती केली आहे.

प्रत्येक बाब ही संघशक्तीच्या जोरावर निर्विवाद यशस्वी करून दाखवता येते हे टीम शब्दवेलने वेळोवेळी सिद्ध केले आहे, दिवाळी अंकाचे साहित्य मागविण्यापासुन ते अंतिम स्वरूप देईपर्यंत संपादक मंडळातील प्रत्येक सदस्याने जिवापाड मेहनत घेतली आहे.

या दिवाळी अंकासाठी साहित्याची निवड करण्याची मौलिक व महत्वाची जबाबदारी कार्यकारी संपादक मा. रंजनाताई कराळे यांनी वेळेत व दर्जेदार साहित्य निवड करून पुर्ण केली नंतर साहित्याची विभागणी व अंतिम रूप देईपर्यंतची सर्वात महत्वाची भुमिका अमोल चरडे सरांनी अगदी उशिरापर्यंत जागून पुर्ण केली खरचं त्यांच्या या उत्साह आणि चिकाटीला टीम शब्दवेलचा सलाम, शब्दवेलच्या सन्माननीय सचिव अश्विनीताई अतकरे यांनी नेहमीप्रमाणे व्यवस्थापनाची भुमिका चोख आणि वेळेत पुर्ण केली.

गेल्या दोन वर्षाच्या दिवाळी अंकांचा अनुभव आणि आपणा सर्वांच्या सहकार्याने यावेळेस जास्तीतजास्त साहित्यिकांच्या साहित्याला दिवाळी अंकामध्ये कसे अंतर्भूत करता येईल याचा विचार आम्ही आवर्जून केला आहे नकळत नजरचुकीने वा अनवधानाने कुणाचे साहित्य निवड होऊन देखील प्रकाशित करता आले नसेल तर त्यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. शब्दवेलचे केंद्रिय संघटक व नेहमी अफलातून कल्पना सुचविणारे मा. देवेंद्र इंगळकर यांच्या संकल्पनेतुन साकार झालेले मुखपृष्ठ तर अतिशय समर्पक झालेले आहे कारण, सुंदर सृष्टीची निर्मिती करणारा खरा सर्जनशील परमेश्वर असून सृष्टीमध्ये मानवरुपाने जे जे नवनिर्माण किंवा नवविष्कार होत असते, ते नवनिर्माण करणारे कलाकार, साहित्यिक हे परमेश्वराचे प्रतिनिधीत्व करत असतात, त्यांच्या कडून त्या त्या काळानुसार त्यांच्या कलेचे, साहित्याचे नवविष्कार घडले ते देवांनी त्या त्या वेळच्या साहित्यिक कलाकारा कडून त्यावेळच्या परिस्थिती नुसार घडवून घेतले, जेणेकरून ते साहित्य, कला समाजाला दिशा देण्याचे, समाजाला प्रबोधन करण्याचे तसेच भविष्यात प्रेरणा देण्याचे काम करेल.

ज्ञानेश्वरांना आपण माऊली म्हणतो, माऊली म्हणजे माता आणि पोटातून येणारं साहित्य तसेच कल्पनाशक्ती ह्यांचा सुंदर मिलाफ घडवून जे साहित्य साहित्यिकांच्या प्रगल्भ लेखनीतून आपल्याला विशाल अनुभूती देते तेचं खरे साहित्य, तीच नवनिर्मिती साधणारी खरी सर्जनशक्ती आणि ही वदवून घेणारा तो परमेश्वर आपला विठू माऊली तोच खरा सर्जनशील निर्माता, आपण निमित्त मात्र असे मी मानतो. याच मुळ आधारावर 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ आधारित आहे या सुंदर मुखपृष्ठ निर्मितीबद्दल त्याबद्दल सरांचे मनःपूर्वक अभिनंदन व मनस्वी आभार..

यावेळेस दिवाळी अंकात असलेले खास आणि मुख्य आकर्षण म्हणजे ९९ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय प्रेमानंद गज्वी यांची प्रा. प्रतिभा सराफ यांनी घेतलेली मुलाखत होय.

ही मुलाखत जेव्हा प्रत्यक्षात घेण्यात आली त्यावेळेस अगदी भर पावसात श्रोत्यांनी गज्वी सरांच्या बालपणापासुन ते आतापर्यंतच्या प्रवासाचा मनसोक्त आस्वाद घेतला तोच आस्वाद ही मुलाखत वाचतांना सर्व श्रोत्यांना मिळणार आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे.

याव्यतिरिक्त विविधांगी विषयाने नटलेले साहित्य त्यामध्ये कथा, कविता,ललित लेख,बालसाहित्य, हास्यरंग असे वैविध्यपूर्ण दिवाळीच्या निमित्ताने सर्व फराळ या अंकाच्या निमित्ताने सर्व वाचकांना आम्ही उपलब्ध करून दिलेले आहे.

सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३' आपल्या हाती सुपूर्त करण्यामागे जाई फाउंडेशनचे आधारस्तंभ मा. मारुती रणदिवे साहेब, शब्दवेल साहित्य मंचचे मार्गदर्शक मा. पुष्पराज गावंडे (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई), मा. प्रतिभाताई सराफ (ज्येष्ठ साहित्यिका), मा. अरुण म्हात्रे (जेष्ठ साहित्यिक), मा. डॉ. वर्षा खडसे (मुख्य संपादक), मा. अंजली ढमाळ (अतिथी संपादक ), मा.रंजना कराळे (कार्यकारी संपादक), मा. देवेंद्र इंगळकर, मा अमोल चरडे, मा. शितल राऊत (उपसंपादक), मा. रामदास गायधने, मा. विलास पुंडले (सहसंपादक), अश्विनीताई अतकरे (व्यवस्थापक) कार्यकारिणी सदस्य मा. नलिनी पवार, मा. अश्विनी कोठावळे, मा. योगिनी वैदू, मा. अशोक उघडे, मा. मनिषा शिरटावले, मा. आबासाहेब कडू, यश इंगळे या संपादक मंडळाचे दिवाळी अंकाच्या यशस्वीतेबद्दल मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

दिवाळी अंकाच्या पहिल्या मीटिंगपासुन उपस्थित राहुन नियोजनात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या शब्दवेल साहित्य मंचच्या अधिकृत सल्लागार मा. अंजलीताई ढमाळ, सन्माननीय सचिव अश्विनीताई अतकरे, सचिव उपाध्यक्षा मा. शीतलताई राऊत व मा. रंजनाताई कराळे, प्रमुख कार्यवाह मा. प्रविणदादा सोनोने, व्यवस्थापक मा.नरेंद्र दादा लोणकर, केंद्रिय सहसचिव रामदासदादा गायधने, केंद्रिय संघटक देवेंद्र इंगळकर सर, मार्गदर्शक मा. आबासाहेब कडू, मा. विद्याताई बनाफर सातारा कार्यकारिणी अध्यक्षा मनिषाताई शिरटावले व अश्विनीताई कोठावळे लताताई चव्हाण, शुभांगी वाघ व सातारा कार्यकारिणी सदस्य, नाशिक जिल्हा उपाध्यक्ष वाल्मिक दादा सोनवणे व सर्व कार्यकारिणी सदस्य, अमरावती जिल्हाध्यक्ष अशोक उघडे सर व सर्व सदस्य, मुंबई कार्यकारिणी सल्लागार जयश्रीताई चौधरी, पुणे कार्यकारिणी जिल्हा उपाध्यक्षा नलिनीताई पवार, संघटक रश्मीताई थोरात व इतर सर्व सदस्य, रायगड जिल्हा अध्यक्ष विलासदादा पुंडले, उपाध्यक्षा योगिनीताई वैदू, संघटक प्रतिभाताई मंडले, शब्दवेल युथ विंगचे अध्यक्ष मा. अमोल चरडे सर, सचिव माधुरी साबळे, उपाध्यक्ष यश इंगळे व आचल काळे डी.टी.पी. ऑपरेटर शंकर दळवी सर आपल्या अमुल्य सहकार्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

'सर्जनशीलतेचा नवाविष्कार २०२३' दिवाळी अंकाच्या निमिताने सहकार्य करणाऱ्या सर्व निमित्ताने सर्वांचे मी मनापासून आभार व आपणास पुनश्च दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा !



# मार्गदर्शक मनोगत

**पुष्पराज गावंडे**
बहिरखेड, अकोला
युवा कादंबरीकार स्तंभ लेखक तथा
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ सदस्य, मुंबई.

मायबोली व मातीशी इमान राखणारा माणूस !!

महाराष्ट्राला दिवाळी अंकांची खूप समृद्ध अन् संपन्न परंपरा आहे. ती जशी पुरातन आहे तशीच पावन सुध्दा आहे. याच समृद्ध व संपन्न परंपरेचा पाईक होण्याची पात्रता अंगी बाळगून शब्दवेल साहित्य संघाचे संयोजक कविवर्य प्रविण बोपुलकर हे गेली तीन वर्षे झाली आपला, 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' नावाचा बोली भाषेचा पोषाख ल्यालेला दिवाळी अंक चक्क मुंबई मधून प्रकाशित करत आहेत. आता तुम्ही म्हणाल की राज्याची राजधानी अन् देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईतून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकाचं तुम्ही बहिरखेडमध्ये वावरात उन्हातान्हात फिरून कशाला कौतुक करता? मुंबई आहे ती, तिथं खूप एकशे एक हुशार अन् पैशावाले तीसमारखा बसले आहेत ! तुम्ही तुमची वऱ्हाडी कशाला पणाला लावता बापा? तुम्ही कशाला इथं बहिरखेड मध्ये बसून 'लमकान'च्या उड्या मारत आहात? तुम्हाला कशापायी एवढा पुळका आला? तुमचा कसा काय एकदम उर भरून आला? तं त्याचं कारण असं आहे तुईशीराम बॉ, की हे जे कविवर्य प्रविण बोपुलकर आहेतना ते आपल्या खेटरीचे आहेत हो! हे आपलं खामगाव शेजुळं, बुलढाणा जिल्ह्यातील खेटरी शहापूर गाव, तिथल्या एका गरीब शेतमजूर कुटुंबात जन्मलेल्या या पोरानं मोलमजुरी करून, रोजंदारीवर शेतात राबून, राज्यसेवा परीक्षा अव्वल स्थान प्राप्त करून पास केली अन् तो पोरगा जीएसटी मध्ये मुंबईत नोकरीला लागला. आता नोकरीला लागला, अधिकारी बनला म्हणूनही हे कौतुक नाही. तर मुंबईत राहून, चकाचक रस्त्यांवर फिरून, हा पोरगा आपल्या मायबोली वऱ्हाडीला विसरला नाही, आपल्या निरक्षर, गरीब, मोलमजुरी करणाऱ्या मायबापांना टाकून मुंबईत गेला नाही तर तो इथली माती, इथली माया, इथली ममता, इथले आमच्या सारखे वऱ्हाडी बोलीत अभिव्यक्त होणारे शेकडो नवोदित सोबत घेऊन सर्जनशीलतेचा नवाविष्कार करत आहे! आमच्या सारख्या नवोदितांना उजेडात आणत आहे. आम्हाला लिहायला मंच उपलब्ध करून देत आहे. म्हणून हा कौतुकाचा सोहळा, म्हणून हा कौतुकाचा अट्टाहास !

प्रविण बोपुलकर दरवर्षी साहित्य संमेलन घेतात, दिवाळी अंक काढतात अन् त्यानिमित्ताने आमच्या सारख्या खेडवळ, नवथर साहित्यिकांना अगीनगाडीत बसवून मुंबई, पुणा, नागपूर, औरंगाबाद असं मोठमोठ्या शहरांत नुसताच फिरवून आणत नाहीत तर विचारपीठ उपलब्ध करून देतात. आम्हाला साहित्याचं दालन उपलब्ध करून देतात ही खूप मोठी बाब आहे. हे त्यांचं साहित्यातलं मोठंच योगदान आहे व बलस्थान सुध्दा आहे.

शब्दवेल साहित्य संघाची चळवळ अगदी दोन तीन वर्षांत त्यांनी खूप पुढे नेली. नावारूपाला आणली. वर्षभर ते सतत नवनवीन उपक्रम साहित्यात राबवीत असतात. नव्या साहित्यिक सवंगड्यांचं ते बारोमास कौतुक करत असतात. त्याला मंच उपलब्ध करून देत असतात. त्याला उजेडात आणण्यासाठी प्रयत्न करत असतात. ही खूप मोठी गोष्ट आहे. तथा खूप कौतुकास्पद बाब आहे.

शब्दवेल साहित्य संघाचे सर्व पदाधिकारी, सदस्य गण यांचे आभार मानतो तथा दिवाळी अंकांच्या मुख्य संपादिका वर्षा खडसे व कार्यकारी संपादिका रंजना कराळे या माझ्या दोन्ही लाडक्या अन् धाकट्या भगिनींचे अभिनंदन करतो, सर्वांना शुभेच्छा देतो, समस्त साहित्य जणांना सुयश चिंतितो व माझे शुभेच्छा पर दोन शब्द इथं थांबवितो, धन्यवाद !



# मान्यवरांचे मनोगत

प्रतिभाताई सराफ

आजकाल मराठी भाषिक तरुणांना 'मराठी भाषा बोलता येणे' किंवा ती 'बोलावीशी वाटणे' हे कमी झाले आहे मग लिहिता- वाचता येणे ही फार दूरची गोष्ट! या पार्श्वभूमीवर 'शब्दवेल साहित्य मंच, मुंबई' हा असा समूह आहे की यात महाराष्ट्रातूनच काय पण संपूर्ण भारत आणि विदेशातूनही मराठी भाषिक तरुण सामावलेला आहे. हा समूह 'मराठी भाषे'साठी आपल्या परीने वेगवेगळे उपक्रम राबवून निश्चितपणे काहीतरी करू पाहत आहे, ही गोष्ट कौतुकास्पद आहे.

'मराठी भाषा संवर्धन' हे कार्य सुलभपणे व्हावे यासाठी त्यांनी आपला व्हाट्सअप ग्रुप, फेसबुक ग्रुप याशिवाय आपले स्वतंत्र पेज तयार केले आहे, जेणेकरून जागतिक स्तरावर वैचारिक देवाण-घेवाण सुलभ व्हावी. या समूहाद्वारे 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' या दिवाळी अंकाची निर्मिती केली जाते.

'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' या नावातच कितीतरी अर्थ सामावलेले आहेत. सर्जनशीलता (Innovative) म्हणजेखूप आगळे-वेगळे, स्वतंत्र असे काहीतरी सुचणे. मग ती गोष्ट म्हणजे एखादा एकदम कोरा ताजा नवीन विचार असेल, नवीन प्रतिभेचा अविष्कार असणारी कृती असेल किंवा अनोखा कला-अविष्कार असेल. नवाविष्कार( New Invention) म्हणजे नवीन माहिती किंवा ज्ञान मिळवणे. इथे नाविन्याचा 'शोध घेणे' हेही अपेक्षित आहे.

एकंदरीत काय तर या तरुणांनी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अनुभवी वयस्करांनीही या अंकासाठी खूप काही वेगळे लिहिण्याचा, साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याचा अनुभव हा अंक वाचताना आपल्याला येईलच!

उंबरठ्यावर लावलेला दिवा जसा घरात आणि अंगणातसुद्धा सारखाच प्रकाश पसरवतो त्याचप्रमाणे हा 'दिवाळी अंक' साकारताना शब्दवेल समूहातील सदस्यांनी अनुभवलेले, चितारलेले विश्व वाचणाऱ्यांना तेवढाच आनंद देणार आहे, त्यांच्या ज्ञानात भर घालणार आहे याची मला खात्री आहे.

सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!

वर्ष : ३ रे, अंक : तिसरा
साप्ताहिक मानगंगा
**सर्जनशीलतेचा नवाविष्कार**
**दिवाळी अंक २०२३**

मुखपृष्ठ :–
**देवेंद्र इंगळकर, पनवेल**

व्यंगचित्रे :–
**प्रदिप म्हापसेकर, गिरगाव**

अक्षर जुळवणी :–
**शंकर दळवी डोंबिवली**
मोबा. ९३२४१२२५९९

मुद्रण :–
**निशाणी प्रिन्ट, घाटकोपर (पूर्व)**
मोबा.  ९८६९३७३११९

प्रकाशन समन्वय पत्ता:–
**शॉप नं. ४, प्लॉट नं. ५०,**
**सेक्टर – १८, गोकुळ डेअरी जवळ,**
**सिल्वर स्टार सोसायटी, कामोठे,**
**रायगड, नवी मुंबई**
**वेबसाईट** : jaifoundations.com
**ई–मेल** : editordrvarsha@gmail.com
pravinbopulkar@gmail.com

**व्यवस्थापन संपर्क :–**
प्रविण बोपुलकर –७७२०९४५००२
देवेंद्र इंगळकर –७७३८७६०९६५

**मूल्य : ₹ २००/-**

# सर्जनशीलतेचा नवाविष्कार

## दिवाळी अंक २०२३

मुख्य संपादक
## प्रा. डॉ. वर्षा खडसे-रणदिवे
बी.ए.(एमएलटी), एम.ए.(मराठी,अर्थशास्त्र)
एम.एड, पीएचडी.(शिक्षणशास्त्र)

---

हा दिवाळी अंक पनवेल जिल्हा रायगड येथून प्रकाशित केला आहे.

अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखकांच्या मताशी, कल्पनाशी व मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही त्या संदर्भात सर्वस्वी जबाबदारी संबधीत लेखकांची असेल.

अंकातील सर्व लेख, कथा, कविता, या सर्वाचे हक्क त्या त्या मूळ  साहित्यिकाचे आहेत. अंकातील कोणत्याही साहित्यकृतीचा इतर कारणांसाठी उपयोग करायचा असेल तर मूळ लेखकाची परवानगी आवश्यक आहे

# अनुक्रमणिका

## एक खास मुलाखत



रंगनिरंगच्या निमित्ताने

**मा. प्रेमानंद गज्वी यांची मुलाखत**

मुलाखतकार :- प्रा. प्रतिभा सराफ

## पद्य विभाग


**०१) काजळडोह**
कवीयित्री-रंजना कराळे ................................ २४

**०२) कसे आहात हो तुम्ही**
कवीयित्री-अश्विनी अतकरे ............................ २५

**०३) देवा**
कवी-देवेंद्र इंगळकर ................................. २५

**०४) आनंदकंद**
कवी-अमोल प्रभाकरराव चरडे ...................... २६

**०५) दिपावली**
कवयित्री-अश्विनी कोठावळे ......................... २६

**०६) जिंदगी**
कवयित्री-नलिनी पवार ............................... २७

**०७) दिंडी**
कवयित्री-रश्मी थोरात ............................... २७

**०८) मी गेल्यावर**
कवयित्री- विद्या बनाफर ............................. २८

**०९) चारोळी**
कवी विलास पुंडले .................................... २८

**१०) अस्तित्व**
कवयित्री-माधुरी साबळे .............................. २९

**११) कामगार**
कवयित्री-आचल काळे ................................ ३०

**१२) येता पावसाच्या सरी**
कवी-यश इंगळे ........................................ ३०

**१३) गझल**
कवी वसंत शिंदे ....................................... ३१

**१४) मलम**
कवी-बाळासाहेब गिरी ................................. ३१

**१५) कोंदणं**
कवयित्री-योगिनी वैदू ................................. ३२

**१६) गोधडी**
कवयित्री-छाया वांगडे ................................. ३३

**१७) मौनातील इशारे**
कवयित्री-छाया वांगडे ................................. ३३

**१८) बाईपण भारी देवा**
कवी-माणिकराव गोडसे पाटील ....................... ३४

**१९) विधवा एक शाप**
कवयित्री मंगलताई माने .............................. ३५

**२०) काजवा**
कवयित्री-लता चव्हाण ................................. ३६

**२१) मनीची पिकनिक**
कवयित्री-शुभांगी वाघ ................................. ३७

**२२) पोशिंदा**
कवी-वाल्मीक सोनवणे ............................... ३७

**२३) का ग ती कोपऱ्यातली**
कवयित्री-नीलू मानकर ................................ ३८

**२४) कवितेची कविता**
कवयित्री-सविता पाटील ............................... ३९

२५) **चिमणी**
कवयित्री–वर्षा सडकर ..................................... ३९

२६) **परतीचा पाऊस**
कवी–दत्ता वालेकर ..................................... ४०

२७) **देवी शारदा**
कवी दिलीप जोशी ..................................... ४०

२८) **अनलज्वाला गझल**
कवयित्री–सविता म्हात्रे ..................................... ४१

२९) **अधोगती**
कवयित्री–अनुराधा धामोडे ..................................... ४१

३०) **नसतोस घरी तू**
कवयित्री–अस्मिता इनामदार ..................................... ४२

३१) **निसर्ग**
कवयित्री–श्रावणी राऊत ..................................... ४२

३२) **पंढरी**
कवी–शंकर घोरसे ..................................... ४३

३३) **अशी बनते कविता**
कवयित्री–कविता दाते ..................................... ४३

३४) **तू गेल्यावर**
श्री. शिशिर ..................................... ४४

३५) **भांडण**
कवयित्री–अश्विनी चौधरी ..................................... ४४

३६) **विरक्तिकडे झुकताना**
कवयित्री–माधुरी चौधरी ..................................... ४५

३७) **हेवा**
कवयित्री–दुर्गा जोशी ..................................... ४६

३८) **महती प्रेमाची**
कवयित्री–रेखा देशमुख ..................................... ४७

३९) **पर्यावरण**
कवयित्री–नीता कचवे ..................................... ४७

४०) **सुमी**
कवयित्री–दुर्गा देशमाने राऊत ..................................... ४८

४१) **सुख लाभो तुला**
कवयित्री–मृणाल ठाकूरदेसाई ..................................... ४८

४२) **अर्थ नाही**
कवी–अंकुश माला डिगांबर ..................................... ४९

४३) **माझे माहेर**
कवी–कपिल सावळेश्वरकर ..................................... ४९

४४) **मायबाप**
कवी–अनुरत्न वाघमारे ..................................... ५०

४५) **दीप मालवलेला**
कवयित्री–वंदना इन्नाणी ..................................... ५०

४६) **प्राक्तन**
कवयित्री–नंदिनी चांदवले ..................................... ५१

४७) **कोंदण**
कवयित्री–सुचिता कुनघटकर ..................................... ५१

४८) **साखळी**
कवी–विशाल कुलट ..................................... ५२

४९) **आग्र्याहून सुटका**
कवी–बाळासाहेब पाटील ..................................... ५२

५०) **तारणहारी काळी आईचं**
कवी–रत्नाकर उपासे ..................................... ५३

५१) **मया बाप म्हणते**
कवयित्री–भाषा जामनिक ..................................... ५३

५२) **जगण्याचा अर्थ**
कवी–अविनाश चरडे ..................................... ५४

५३) **स्वच्छ गाव**
कवयित्री–छाया शहाणे ..................................... ५४

५४) **मनाची गोष्ट**
कवयित्री–डॉ. शोभा पोटोडे ..................................... ५५

५५) **गझल – त्यांनी**
कवी–अनिल रुक्मिणी पांडुरंग साबळे ..................................... ५५

५६) **स्मृती पाखरे**
कवी–मारोती कुळसंगे ..................................... ५६

५७) **माय**
कवी–मयुरेश कुलकर्णी ..................................... ५६

५८) **हिशोब या जगाचे**
कवी–प्रविण काळे ..................................... ५७

५९) **राधा**
कवयित्री–अनघा कुलकर्णी ..................................... ५७

६०) **सत्ता**
कवयित्री–प्रतिभाताई मंडले ..................................... ५८

६१) **निळ्या नभाचे गाऊ गाणे**
कवी–गणेश आघाव ..................................... ५९

६२) **कवडसा**
कवी–विलास पुंडले ..................................... ६०

# शब्दवेल ही

अशी फुलावी अन् बहरावी शब्दवेल ही
की आभाळी स्पर्शत जावी शब्दवेल ही

येथे जमले साहित्याचे पूजक सारे
सरस्वतीसह त्यात रमावी शब्दवेल ही

किती सलोखा साहित्याचा रंगबिरंगी
इंद्रधनूवर नभी चढावी शब्दवेल ही

गझलमेघही उचंबळोनी बरसत गेले
भरभरून त्या जली नहावी शब्दवेल ही

गुंफण इथल्या मनामनाची हळवी कोमल
पण बदलास्तव प्रहार व्हावी शब्दवेल ही

मुक्त लेखणी काव्यमैफिली कथा अलकही
शब्दसुमांचा मधुरस प्यावी शब्दवेल ही

उत्साहाचा पाऊस पडतो रोजच येथे
मातीसोबत धुंद हसावी शब्दवेल ही

जणू सोहळे पर्णोपर्णी शब्दचांदणे
कुपी सुगंधी शिंपुन घ्यावी शब्दवेल ही

चला चढूया अवघे आपण गड प्रतिभेचा
राष्ट्राचे हित नित्य जपावी शब्दवेल ही



कवयित्री
रंजना कराळे
अमरावती




# सर्जनशीलतेचा नवाविष्कार

## दिवाळी अंक २०२२

# प्राप्त पुरस्कार



स्वदेशी उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार २०२२




मुंबई मराठी पत्रकार संघ व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ उत्तेजनार्थ दिवाळी अंक पुरस्कार २०२२



मायबोली मराठी उत्तेजनार्थ दिवाळी अंक पुरस्कार २०२२



स्पंदन उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार २०२२

## हास्य-तरंग


१) मायी अधुरी दास्तान
कवी–प्रविण जगन्नाथ बोपुलकर ........................ ६१
२) ढिला झाला स्कू
कवी–अमोल चरडे ..................................... ६२
३) दुखकथा
कवी–रामदास गायधने .................................. ६२
४) हझल
कवी–देवेंद्र इंदळकर ................................ ६३
५) समाज सुधारक
कवी–नितिन वरणकार ................................ ६३
६) माहय वाळलं वजंन
कवी–संजय कावरे ..................................... ६४


## गद्य विभाग

### कथा विभाग / लेख


१) बिरुदाची जत्रा
लेखिका–अंजली ढमाळ ................................ ६५
२) ईदी
लेखक–प्रविण बोपुलकर .............................. ७०
३) घुसमट
लेखिका–रंजनाताई कराळे ............................. ७२
४) भामटे साधू
लेखक–प्रविण सोनोने ................................ ७४
५) स्वप्न
लखिका–शीतलताई राऊत ........................... ७६
६) संतदृष्टितून साधुत्व व बुवाबाजी
लेखक–आबासाहेब कडू ............................. ७७
७) मुलगी पसंद आली
लेखक–अशोक उघडे ................................ ८०
८) माझी शाळा माझा गाव
लेखक–नरेंद्र लोणकर ............................... ८३
९) कपिराज
लेखक–रामदास गायधने ............................ ८६
१०) पोटच्या गोळ्यास रुतलो
लेखिका–विद्याताई बनाफर ........................... ८९
११) खरंच ती बदलली आहे का ?
लेखिका–मनिषा शिरटावले .......................... ९२
१२) जीवन कथा
लेखिका–अश्विनी कोठावळे ........................... ९६
१३) हितगुज निसर्गमित्राशी
लेखिका–कांता भोसले ............................. १०१
१४) दिसणं नि असणं
लेखिका–राजेंद्र कणसे .............................. १०४
१५) काजवे
लेखिका–गीता रक्ताडे ................................१०५
१५) आम्ही समजूतदार
लेखिका–वर्षा हेमंत काटक ..........................१०७
१७) पाऊस आणि संगीत
लेखिका–वंदना पांडे ................................ १०८
१८) सहचारिणी
लेखिका–वीणा मुळे .................................११०
१९) हो सर्वात मौल्यवान भेट
डॉ. उज्वला देशमुख ............................ ११३
२०) लोखंडी कपाट
प्रा. मोहन काळे ................................. ११४
२१) मी पाहिलेले ताडोबा जंगल
लेखिका–सीमा देशमुख ............................ ११६
२२) कृषी शिक्षणाचे महत्त्व व तंत्रज्ञानाची गरज...
लेखिका–सुनीता तिकोने ............................ ११९

२३) **जत्रा**
लेखिका–शिल्पा चऱ्हाटे ............................ १२०

२४) **परडी**
लेखिका–जयश्री गीते ................................ १२२

२५) **मैत्री म्हणजे प्रेमाचा झरा**
लेखिका–मयुरी कोरे ................................ १२४

२६) **पांघरूया थंडी गुलाबी**
लेखिका–भारती सावंत ............................. १२६

२७) **लढाई**
लेखिका–नितेश राऊत ............................ १२९

२८) **आकाश कंदील**
लेखिका–डॉ. शैलजा करोडे ........................१३२

२९) **पारिजात**
लेखिका–मनिषा कडव ..............................१३४

३०) **चिरविश्रांती**
लेखिका–कल्याणी मादेशवार ...................... १३८

३१) **ऋतुगंध वसंताचा**
लेखिका–मीरा घोगे ................................. १४१

३२) **हाऊ इज डॉग**
लेखक–प्रकाश पाटील ............................. १४२

३३) **अंतर्नाद**
लेखिका–शालिनी बेलसरे ........................... १४५

३४) **ग्रीष्मसखा**
लेखिका–डॉ. योगिता राजकर ...................... १४७

३५) **ज्ञान रचनावाद शिक्षणातील बदलती भूमिका**
लेखिका–डॉ. शुभांगी कुंभार ........................ १४९

३६) **रोमच्या वाटेवर**
लेखिका–जयश्री चौधरी ............................ १५२

३७) **किलोकभर हरबऱ्याईची गोठ**
लेखिका–विद्या भगतसिंग राणे ......................१५४

३८) **जिव्हाळा**
लेखिका–प्रेरणा वाडी ............................... १५६

३९) **मी पाहिलेली माझी मुंबई**
लेखिका–ललिता गवारी ........................... १५८

४०) **काळजातली आठवण**
लेखिका–प्रणिता पापलकर ......................... १६०

४१) **अहंकार**
लेखिका–शंकर गोपाळे .............................. १६१

४२) **केपलर शोध नव्या जीवसृष्टीचा**
लेखक–राहुल बोर्ड .................................. १६२

४३) **मोठ्ठा गूळ**
लेखिका–अनुराधा उपासे मस्के ........... १६४

४४) **आदिवासी सभ्यता संवर्धन काळाची गरज**
लखक–मारोती मोतीराम ........................... १६७

४५) **सुगंधी जादू**
लेखिका–अनुराधा उपासे मस्के .................... १७१

४६) **चादर ट्रेक** .......................................... १७२
श्री. गिरीजाशंकर पोपळघट

## बालविश्व

१) **माझा अनुभव**
ईश्वरी निलेश अतकरे ............................. १७८

२) **माझा लाडका भाऊ**
श्रृतिका आशिष राऊत .............................१७८

३) **आवाजाचे गाणे**
कवयित्री–मनिषा शिरटावले.......................... १७९

४) **असे असावे शेजारी**
कवी–देवेंद्र इंदळकर ................................. १८०




# एक खास मुलाखत

रंगनिरंगच्या निमित्ताने

**मा. प्रेमानंद गज्वी यांची मुलाखत**

मुलाखतकार :– प्रा. प्रतिभा सराफ

प्रतिभा : प्रेमानंद गज्वी सर, नमस्कार. शब्दवेल साहित्य मंच, मुंबईचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर, सचिव अश्विनी अतकरे आणि शब्दवेलचे सर्व कार्यकर्ते आणि रसिक याशिवाय मी आणि तुम्ही स्वतःसुद्धा कवी आहात, त्यामुळे शब्दवेल दिवाळी अंकासाठी ज्याचे नाव आहे, 'सर्जनतेचा नवाविष्कार' आम्ही आपली खास मुलाखत घ्यायचे ठरवले आहे. तर याप्रसंगी आपल्या मुलाखतीची सुरुवात २०२० साली आपण संपादन केलेलं, 'बोधीशतक' (संपादक : प्रेमानंद गज्वी आणि भगवान हिरे) या कविता संग्रहातील कविता मला आठवत आहे ज्या कवितेचं नाव आहे– 'बुद्धवर्तुळ'

बुद्धः शांततेचे प्रतीक/बुद्धः ज्ञानाचे प्रतीक/बुद्धः सुखाचे प्रतीक/बुद्धः करुणेचं प्रतीक/बुद्धः प्रतिकांचंही प्रतीक/बुद्धः नसतो डावा/बुद्धः नसतो उजवा/बुद्धः असतो माणूस/बुद्धः असतो जगणं/बुद्धः निरामय/बुद्धः निरागस 'बोधीशतक' या प्रतिनिधिक काव्य संग्रहात आपण, 'बोधी काव्यकण वेचताना' अशा नावाने मनोगत लिहिले आहे, तर या बोधीशतकातून आपण काळाचा वेध कसा घेतलात? आपल्याला तो का घ्यावासा वाटला? यावर भाष्य करावं.

प्रेमानंद गज्वी : काव्यकार प्रतिभा सराफ आपण 'शब्दवेल साहित्य मंच' या संस्थेद्वारे माझी मुलाखत घेत आहात यासाठी सुरुवातीलाच मनापासून आभार मानतो. मी कोणत्याही कवीला, मी 'काव्यकार' असं म्हणतो. जसे की 'शिल्पकार' 'नृत्यकार', 'कादंबरीकार' तसा 'काव्यकार' हा शब्द मी वापरतो. 'काव्यकार' शब्द वापरला की लिंगभेदाचा प्रश्न निर्माण होत नाही. स्त्री– पुरुष समानता आणली पाहिजे, असे आपण म्हणतो त्यामुळे असे काही शब्द आपण निर्माण केले पाहिजेत जेणेकरून हा भेद मिटेल. म्हणूनच कवी/ कवयित्री ऐवजी, 'काव्यकार' हा शब्द मी वापरतो.

'बोधी नाट्य परिषद' ही संस्था वीस वर्षांपूर्वी आम्ही स्थापना केली. याद्वारे आम्ही विविध उपक्रम राबवतो.

त्यातीलच हा एक उपक्रम, 'बोधीशतक'ची निर्मिती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली धर्मांतर केले. एक मोठा जनसमुदाय त्याप्रसंगी एकत्र जमला. या ६७ वर्षाच्या कालखंडामध्ये ज्यांनी धर्मांतर केलं त्यामध्ये विविध क्षेत्रातील माणसं होती. १९५६ साली बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितेपासून अगदी अलीकडच्या कालखंडामध्ये ज्यांनी 'बुद्ध'विषयक कविता लिहिल्यात, याचा शोध घेऊन या सर्वांचा बुद्धाकडे पाहण्याचा काय दृष्टिकोन होता, हे जाणून घेतलं. प्रत्येकाच्या कवितेमधून तो वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त झालाय, तो या 'बोधीशतक'मध्ये पाहायला मिळतो. आत्ताच आपण ज्या कवितेचा उल्लेख केला ती माझी या पुस्तकातील शेवटची कविता, 'बुद्धवर्तूळ'.

'बोधी' म्हणजे ज्ञान, ज्ञपेश्रशवसश आणि 'शतक' म्हणजे १०० वर्षाचा कालावधी. या पुस्तकात बौद्ध धर्मावरच्या कविता नाहीत तर वेगवेगळ्या काव्यकारांनी, 'बुद्ध' कसा अनुभवला हे 'बोधीशतक'मधून आपणही अनुभवू शकतो. एकंदरीतच काय तर १९५६ ते २०२० या दीर्घ काळाचा वेध या कवितासंग्रहातून घेतला आहे.

प्रतिभा : कथा सांगणारे, ऐकणारे, रचणारे, वाचणारे जे कोणी, त्या सर्वांना, 'ढीवर डोंगा' हे पुस्तक आपण अर्पण केलं आहे. विविध विषयांवरील कथा यात आहेत पण कवितारुपी कथाही यात आहेत. 'स्मृती', 'तडा', 'महाराज', 'बिंदुरेषा' इत्यादी. तर हा साहित्य क्षेत्रात आपण केलेला पहिलाच प्रयोग आहे का? हे करण्यामागचे कारण काय? कवितांमधल्या कथा किंवा कथाभाग हे अनेकदा वाचलेले आहेत परंतु कथा संग्रहात, 'कवितारूपात कथा' प्रथमच वाचल्या, तर याविषयी...

प्रेमानंद गज्वी : आपण कथा लिहितो तेव्हा प्रसंगांची सविस्तर वर्णनं करतो. पण तिच गोष्ट जर कवितेच्या फॉर्ममधून लिहिली तर ते कथानक कमीत कमी शब्दांमध्ये बसतं म्हणजे कथा लिहायला घेतली तर कमीत कमी हजार –बाराशे शब्द लागतात. तेच कवितेमध्ये मांडलं तर शंभर दीडशे शब्दांमध्ये बसू शकते असा माझा अनुभव. शब्दांचं नियोजन योग्य प्रकारे करण्यासाठी आणि स्वतः ला योग्य सवय लावून घेण्यासाठी 'काव्यकथा' मी लिहिल्या. 'ढीवर डोंगा' या कथेच्या पुस्तकात पाच 'काव्यकथा' मी समाविष्ट केल्या.काव्यकथा खरंतर नाटकातूनही मला आणता आल्या असत्या परंतु तो प्रयोग मी केला नाही याचे कारण नाटकाच्या रसिकाला नाटकातून केवळ थेट मनोरंजन अपेक्षित असतं. मेंदूला त्रास नको असतो. पण काव्यकार आपल्या कवितांमधून मेंदूला त्रास द्यायचे काम करतात. हे जरी मी गमतीने म्हटलं तरीही मला सांगायला आवडेल की माझ्या नाटकांमधूनही 'कविता' पात्रांच्या तोंडी आलेल्या आहेत.

प्रतिभा : 'गांधी आणि आंबेडकर' तसेच 'छावणी' या आपल्या नाटकाला सेन्सॉर बोर्डाने सुरुवातीला परवानगी नाकारली होती. त्या अनुषंगाने, 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सेन्सॉर बोर्ड' यावर चर्चा झाली. त्यानंतर आपण मांडलेली बाजू याविषयी खूप काही वर्तमानपत्रांमधून छापून आले. आपण या नाट्यकृतींविषयी आणि एकंदरीतच पूर्वापार ते आजतागायत एकूणच 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' यावर आपण भाष्य... करावं.

प्रेमानंद गज्वी : महाराष्ट्रामध्ये 'रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ' ( सेन्सॉर बोर्ड) आहे. ही शासनाची संस्था आहे. नाटकामध्ये एखाद्या व्यक्तीविषयी बदनामी असेल, शिवीगाळ असेल, किंवा असंविधानिक काही असेल तर ते समाजापर्यंत जाऊ नये, यासाठीच या सेन्सॉर बोर्डाची स्थापना करण्यात आलेली आहे. हा शासनाचा दृष्टिकोन आहे. परंतु लेखक... सुबुद्ध आणि विवेकशील असतो. तशी अपेक्षा असते. त्यांना काहीतरी सांगायचे असते ते त्यांच्या पद्धतीने सांगतात. म्हणजे इथे आपण 'छावणी'चेच उदाहरण घेऊया. आपण साहित्यकृतीमध्ये (पुस्तकात) आपल्या पद्धतीने काहीही मांडू शकतो परंतु रंगभूमीवर ती कलाकृती सादर करताना मात्र बंधनं असतात. विचार स्वातंत्र्य ही महत्त्वाची गोष्ट आहे. 'छावणी' मध्ये स्वातंत्र्य मिळून सात दशकं लोटली तरी सामान्य माणसाला न्याय मिळाला नाही. अन्न, वस्त्र, निवारा, किंवा आर्थिक प्रश्न सुटला नसेल कुणी हे सरकारच्या निदर्शनास आणून दिले तर किंवा नाटकातून कुणी बंड केले तर... आणि हेच

सरकारला नको असते आणि सेन्सॉर ह्या माध्यमातून सरकार अशा नाट्यकृतीवर बंधनं घालते. 'गांधी – आंबेडकर' या नाटकांमध्ये जेव्हा माझ्या नाटकातील काही भागावर बंदी आणली गेली तेव्हा मी 'गांधी' आणि 'आंबेडकर' यांच्या संदर्भातील जेवढी पुस्तकं मी वाचली होती, ती सोबत घेऊन मी गेलो आणि तेव्हाचे सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष शांताराम नांदगावकर यांच्यासमोर ठेवली आणि आधी या ग्रंथावर बंदी घाला आणि मग नाटकावर' असे सरळ सांगितले. गांधी आणि आंबेडकरांचे यांचे विचार फक्त मी या पुस्तकातून घेतले आहेत. असे म्हणताच सेन्सॉर बोर्डाने ते आक्षेप मागे घेतले आणि नाटक मान्य केले.

समाजामध्ये असणारी 'कुरूपता' नष्ट करण्याचे काम साहित्यिकांचे आहे. जग सुंदर करण्यासाठी साहित्यिकांनाच कुरूपतेविरोधात लढले पाहिजे.

'छावणी'बद्दल मला अजून काही सांगितले पाहिजे. नाटकात कोणीतरी माणूस येतो. छावणी निर्माण करतो. अन्याय झालेल्या माणसांना गोळा करतो. अन्यायाविरुद्ध लढण्याला भाग पाडतो. तर सेन्सॉर बोर्डाने सांगितलं की, 'हे नाटक तुम्ही घटनेच्या विरुद्ध लिहिलेले आहे. तुम्हाला हे नाटक सादर करायचे असेल तर कोर्टाकडून परवानगी घ्या.' मी म्हणालो, 'मी कोर्टाकडून परवानगी घ्यावी असे सेन्सॉर बोर्डाने लिहून द्यावे'. त्यांनी लिखित स्वरूपात असे लिहून दिले नाही. त्यानंतर जयंत पवार या पत्रकाराने 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये याविषयी लेख लिहिला. अतुल पेठे यांनीही लेख लिहिला. मीही लेख लिहिला. 'महाराष्ट्र– वन' चॅनेल वर निखिल वागळे यांनी याच विषयावर परिसंवाद ठेवला. त्यामुळे हे प्रकरण खूप गाजलं. याचा परिणाम असा झाला की शिवाजी मंदिरमधल्या एका कार्यक्रमात सहभागी असलेल्या सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षांनी 'छावणी' या नाटकाला तिथंच जाहीर परवानगी दिली. यावर मी मत मांडले की 'मी जे काही लिहिले ते माझ्या मनाचे लिहिले नाही तशीच या देशाची स्थिती आहे.'

'भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही हे देशाचे शत्रू आहेत' असे विधान नाटकातील पात्राच्या तोंडी आहे. नाटकातील ही, 'छावणी' चंद्रपूर जिल्ह्यात आहे. बांगलादेश, चायना, पाकिस्तान आणि या छावणीतील सर्व माणसं एकाच वेळेस दिल्लीतील संसदेवर हल्ला करतात, असेही या नाटकात दर्शविलेले आहे. त्यामुळे सेंसॉर बोर्डाचा आक्षेप बरोबरच होता... आणि त्याला माझे उत्तर होतं, 'लोकांना न्याय मिळाला नाही तर लोक असंच बंड करतील आणि सरकार उलथवून टाकतील.' सरकारला जाग करण्याचं काम हे नाटक करते.

प्रतिभा : किती प्रांजळपणे सर, आपण सरकारचीही बाजू बरोबर आहे हे सांगितले आहे, आपल्या मनाचा मोठेपणा आहे. 'प्रेमानंद गज्वी' हे नाव उच्चारताच त्याला लागूनच 'किरवंत' हा शब्द आठवतो आणि किरवंत म्हटलं की 'प्रेमानंद गज्वी' तर हे दृढ झालेले समीकरण सर्वांना माहीत आहे. एकंदरीतच 'किरवंत' या नाटकाचा विषय, नाट्यनिर्मितीचे कथा– किस्से, नाटकावर छापून आलेली परीक्षणं, रसिकांचा याला मिळालेला उदंड प्रतिसाद, या नाटकाचा हिंदी, इंग्रजी, रशियन भाषेत झालेला अनुवाद याशिवाय या नाटकाकडे मागे वळून पाहताना वाटणारे समाधान याविषयी काही...

प्रेमानंद गज्वी : 'कुणाचे ओझे' ही माझी एकांकिका, सुहास व्यवहारे, हा दिग्दर्शक एका स्पर्धेसाठी करीत होता. मी त्याची तालिम बघायला म्हणून त्याला भेटायला त्याच्या घरी गेलो होतो. तेव्हा तो म्हणाला, 'तालमीसाठी वेळच मिळत नाही.' मी कारण विचारले तर म्हणाला, 'मला स्मशानात जावं लागतं' मी त्याविषयी विचारलं तर म्हणाला, 'मी दमलेलो आहे. आत्ताच स्मशानातून आलोय . दोन दिवसांनी या. सगळं सांगेन.' दोन दिवसांनी घरी गेलो. सोबत सुधाकर कानडे नावाचा मित्र होता. मी त्यांचा एकमेकांशी परिचय करून दिला आणि म्हणालो, सांग आता, तू स्मशानात जाऊन काय करतो?' तर त्याने उत्तर दिले की, 'मी नाही जात स्मशानात.' आम्ही चकित...'मी स्मशानात जातो' आणि 'मी नाही जात स्मशानात'....' या दोन विधानाच्या मध्ये हे, ''किरवंत'' नाटक आहे. सुहासनं काहीही बोलण्यास नकार दिल्याने मग मी मालाडच्या स्मशानभूमीत स्मशानकाम करणाऱ्या अशोक जोशी यांना भेटलो, अगदी टेप रेकॉर्डर वगैरे घेऊन! जोशी

म्हणाले, 'स्मशान काम करणाऱ्या माणसाला एखाद्या अस्पृश्यासारखे आमच्या समाजात वागवले जाते.' मी ब्राह्मण सभेमध्ये गेल्यावर तिथल्या ब्राह्मणांनी मला चक्क हाकलून दिले.' गरूड पुराण, अंत्येष्टी संस्कार, रामविजय कथासारं अशा ग्रंथांची माहिती दिली. जोशींनी सांगितले ते खरे आहे का म्हणून सावंतवाडीला जाऊनही मी याविषयीची अधिक माहिती घेतली.

गरुड पुराण आणि काही पुराणकथा मी वाचलेल्या ज्याचा उपयोग मी या नाटकामध्ये केलेला आहे. माणूस मेल्यावर त्याच्या पिंडाला कावळा शिवला पाहिजे. कसाही करून शिवला पाहिजे मग आपण तो दर्भाचा कावळा करून त्याला पिंडाला शिवायला लावतो. पिंड हे स्तनाच्या आकाराचे असते. त्यावर दही टाकले जाते. दही म्हणजे कुजवलेले दूध जे कावळ्याला अत्यंत आवडते त्यामुळे ते खाण्यासाठी तो येतो. या सर्व क्रिया सकाळच्या वेळेस केल्या जातात जेव्हा कावळा भुकेलेला असतो. यात अजून मला वेगळे असे सांगायचे आहे की माणसं भितात म्हणून काही धूर्त माणसं त्यांना अजून घाबरवतात आणि अशा सगळ्या विधी करायला भाग पाडतात.

ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचा पिंड हा वेगळ्या पदार्थांचा असतो. पुरुष आणि स्त्रीला अग्नी देताना वेगळ्या अवयवांपासून दिला जातो. या सर्व चुकीच्या प्रथांविषयीचे विचार 'किरवंत'मध्ये आहेत. नाटकाद्वारे लोकांच्या मनात 'विचार' निर्माण करण्याचे कार्य मी करण्याचा प्रयत्न केला आहे, जे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मला जास्त महत्त्वाचे वाटते.

प्रतिभा : आत्तापर्यंत आपण 'कलेसाठी कला', की 'जीवनासाठी कला' हा वाद ऐकलेला आहे. त्या प्रत्येकाची आपापली बाजू आपल्याला माहीत आहे.. परंतु बोधी नाट्य परिषदेने 'ज्ञानासाठी कला' अशी वेगळी भूमिका घेतलेली आहे, तर ती भूमिका नेमकी काय?

प्रेमानंद गज्वी : लेखकांनी काय घडलं एवढंच सांगावं, असं 'कलेसाठी कला'वाल्यांचं म्हणणं आहे. उपाय किंवा वेगळं भाष्य या भानगडीत त्यांनी पडू नये. लेखकांनी आणि कलावंतांनी काय घडले हे तर सांगितलंच पाहिजे आणि त्यावर उपायही सुचवला पाहिजे, असे 'जीवनासाठी कला'वाल्यांचे म्हणणे आहे.

उदा. घराला आग लागल्यावर कलेसाठी कलावाद्यांचं म्हणणं आहे की फक्त त्या आगीचे वर्णन करायचं पण जीवनवाद्यांचं म्हणणं असं की पाणी मारून आग विझवता येते, हेही सांगायला पाहिजे... पण ज्ञानासाठी कला....या तत्वानुसार कलेनं आग लागली हे सांगून ती पाणी मारून वाजवता येते हे तर सांगितले पाहिजेच पण ती कशी विझवावी हेही सांगितले पाहिजे. झोपडीला लागलेली आग आणि २५ माळ्याच्या इमारतीला लागलेली आग एकाच पद्धतीने विझवता येत नाही.

'देवनवरी' या नाटकाचे उदाहरण उपयुक्त ठरेल. 'यल्लम्मा देवी'ला नवसासाठी मुली देवीला सोडल्या जातात. मुलींचं शोषण होते. या नाटकात अशीच एक मुलगी या शोषणाविरोधात बंड करते, ज्या देवीसाठी मुली सोडल्या जातात ती देवीच नको, या विचाराने ती देवीची मूर्ती तोडते.

आकाशवाणीच्या राष्ट्रीय कार्यक्रमासाठी 'देवनवरी' हे नाटक निवडले गेले. परंतु त्यासाठी नाटकात काही बदल करण्यास दिल्ली केंद्रानं सुचवले. आम्ही त्यास नकार दिला. आणि मी त्यांना सांगितले की चौदा भाषेतच काय पण जगभरातील सर्व भाषांमध्ये होत असेल तरीसुद्धा मी माझ्या नाटकात एकही बदल करणार नाही. इथे मला हेच सांगायचे आहे की तुम्ही तुमच्या भूमिकेशी लेखक म्हणून प्रामाणिक असलं पाहिजे, ठाम असलं पाहिजे. तत्त्वाचा बळी देऊन मला काहीही मिळवायला आवडत नाही. कला कुणाचीही बटीक नसते आणि बटीक असते ती कला नसते! हे मूल्यही लेखकानं जपलं पाहिजे.

प्रतिभा : 'नाट्यकलेमध्ये सगळ्या कला सामावलेल्या आहेत' हेही आपलेच विधान आहे, सर आणि म्हणूनच आपण नाट्यकलेकडे वळलात आणि स्थिरावलात. अलीकडेच आपले 'अमृत महोत्सवी वर्ष' चाहत्यांनी उत्साहात

साजरे केले. दरम्यान चार पिढ्यांच्या लेखनाचे आपण साक्षीदार आहात. पूर्वसुरींनी जे लिहिले, त्या अभ्यासातून आपण लिहिते झालात ती पिढी, तुमच्या बरोबरीचे लिहिणाऱ्यांची पिढी, त्यानंतर पंचवीस वर्षानंतर लिहिणारी पिढी आणि आत्ता जी पंचवशीत आहे, ती पिढी. तर साहित्यक्षेत्रातील हा संपूर्ण प्रवास, प्रचार आणि प्रवाह याविषयी अधिकारवाणीनं मार्गदर्शन करावं.

प्रेमानंद गज्वी : मी नाटकं लिहू लागलो तेव्हा...विजय तेंडुलकर,वसंत कानेटकर, जी.ए. कुलकर्णी, असे लेखक लिहित होते. त्यांचं लेखन मी वाचत होतो. अनुभवत होतो. माझ्या पिढीत... माझे समकालीन शफाअत खान, संजय पवार, जयंत पवार, इत्यादी. माझ्या पिढी नंतर नाव घ्यावं असे मकरंद साठे, ज.रा. फणसळकर पुढे तर मुलींची एक टोळीच रंगभूमी गाजवताना दिसते. मनस्विनी लता रवींद्र, इरावती कर्णिक, उर्मी, श्वेता पेंडसे ... आदी नाटककार लिहिताना दिसतात. आणि प्रायोगिक/व्यावसायिक रंगभूमीची गरज भागवतात.

माझ्या सुरूवातीच्या काळात माझ्या बरोबरीने लिहिणाऱ्या इतर साहित्यिकांचे साहित्य मी दिवाळी अंकातून वाचत असे. माझ्याही कथा वसुधा, अनुराधा नवल अशा अंकातून छापून येत. त्या काळात 'सत्यकथे'तून आपले साहित्य छापून येणे, हे प्रतिष्ठेचे समजले जायचे. मीही स्वाभाविकपणे सत्यकथेसाठी कविता पाठवली आणि राम पटवर्धनांना भेटण्यासाठी गेलो. मला माझ्या कविते विषयी बोलायचे होते .तिथे एका साहित्यिकांबरोबर त्यांची आधीच चर्चा चालू होती. पटवर्धन बोलत होते, '' एक महिन्यापूर्वी मला एक कविता अत्यंत उत्कृष्ट दर्जाची वाटली, काही महिन्यांनी मी ती पुन्हा वाचली तर ती मला अतिशय निकृष्ट दर्जाची वाटली.'' यातून एका क्षणात साहित्य शास्त्र आकळून गेलं. साहित्याचा दर्जा वाचणाऱ्याच्या मानसिक स्थितीवर अवलंबून असतो. साहित्य आणि कलेचा एकच एक असा एकही मानदंड नाही, त्यामुळे साहित्याच्या व्याकरणात पडण्याचा मी कधी प्रयत्न केला नाही.

प्रतिभा : 'रंगनिरंग' हे आपले आत्मचरित्र अलीकडेच प्रसिद्ध झालेले आहे. ते आत्मचरित्र फार वेगळ्या प्रकारचं आहे– ज्यात नाट्य आहे, कविता आहे, छोटी छोटी कथानकं आहेत, नातेसंबंध आहेत, साहित्यिक वाटचाल आहे. आपण पूर्णतः गुंतून जाऊ असा त्याचा एकंदरीतच वेगळा आशय आहे, यासाठी मी सर्वप्रथम आपल्या अभिनंदन करते.

आपण साहित्यात नेहमीच वेगवेगळे प्रयोग केलेत त्याप्रमाणे हे वेगळ्या प्रकारचं आत्मचरित्र लिहिण्याचाही एक प्रयोग आहे तर याविषयी आपण आपलं मत मांडावं.

प्रेमानंद गज्वी : 'रंगनिरंग' मध्ये एक प्रेमकथा आहे. टीनेज वयातली. एक मुलगा एका मुलीला पत्र लिहितो. 'माझं तुझ्यावर प्रेम आहे ' असंच पत्रं मुलगी मुलाला लिहिते. पण प्रत्यक्षात ती पत्र त्यांनी लिहिलेलीच नसतात. ती पत्र वेगळ्याच मुलानं त्या दोघांच्या नावानं लिहिलेली असतात. ते प्रेमपत्रं मुलीच्या वडिलांच्या हाती लागतं आणि तिची शाळा कायमची बंद होते. एका मुलीचं शिक्षण तर बंद होतचं पण मला हेही दाखवून द्यायचे आहे की ती मुलगी नृत्यकलेत निपुण असल्यामुळे महाराष्ट्र एका चांगल्या नृत्यांगनेला मुकला, हे या आत्मचरित्रात आहे. हे खूप थोडक्यात मी सांगितलं आहे पण विस्तृत असे 'रंगनिरंग' मध्ये आहे, ते आपण पुस्तकातूनच वाचावं. लेखकांचं आयुष्य, लेखक लिहितो म्हणजे काय करतो, वाचन, मनन चिंतन, संशोधन असं बरंच काही रंगनिरंग मध्ये आहे.

प्रतिभा : सर, आपण अत्यंत अभ्यासवृत्तीचे, सिद्धहस्त, प्रतिभावान तसेच प्रतिष्ठित लेखक आहात आणि मुख्य म्हणजे ऋजू स्वभावाचे आहात, हे मला ही मुलाखत घेताना जाणवले. सामाजिक प्रश्न जसे की 'अंधश्रद्धा', 'धर्मांधता', 'विषमता', 'शोषण' याविरुद्ध आपल्या नाटकातून समस्या मांडून त्यावर यथायोग्य प्रबोधनही आपण केले आहे. आपण कायमच नाटकांकडे फार गंभीरपणे पाहिले आहे. वास्तववादी काळाचा थेट वेध घेणारे आपले लेखन आहे... आपल्याला खूप खूप शुभेच्छा.धन्यवाद.

# काजळडोह

आभाळाच्या रंगमहाली
धुंद थिरकते मत्त दामिनी
मेघ उजळतो उलते आभा
काजळडोही रमे मानिनी

गात्र गात्र मोहरून येते
पाउस नाजुक विणतो नक्षी
मयूर होते काळीज ओले
फांदीवर थरथरतो पक्षी

सावळमेघाची दाटीही
आठवणींशी स्पर्धा करते
कुठेतरी मग गाभाऱ्याशी
अस्फुट कलिका उमलुन येते

यौवनातल्या सरी गुलाबी
निसर्ग वेडावून बहकतो
विहरत प्रियतम मृग सोनेरी
प्राणप्रियेच्या प्रणयी रमतो

खोडी करतो अवखळ वारा
परिमळते मग फूल चंदनी
हळू स्पर्शतो मुग्ध पाकळी
वेगाने झेपावत गगनी

आल्या धारा भिजे मृत्तिका
तृप्त होत जाहली सुवासिक
ढेकुळ विरले हास्य विखुरले
उगवुन आले पाचू माणिक

तृष्णा अवघी विरून गेली
वीण घालता थेंबोऱ्यांची
रंग वेचले इंद्रधनूतुन
किमया फुलली गालीच्याची

ओलेती पाहते सावरू
हरीत वसना वसुधाराणी
वात्सल्याने मुक्त उधळते
कैवल्याच्या सुगंधखाणी

कोंदणात ठेवावा जपुनी
ठेवा हा स्वर्गीय बिलोरी
चातकापरी प्राशुन घेऊ
युगायुगाची सुप्त शिदोरी



कवयित्री रंजना कराळे
अमरावती

# कसे आहात हो तुम्ही



कपदादा, कपदादा
कसे आहात हो तुम्ही
कान तुमचा पकडला
तरी रागवत नाही तुम्ही

घड्याळदादा, घड्याळदादा
कसे आहात हो तुम्ही
काटे बोचत असूनही
कधी रडत नाही तुम्ही





कंगवेदादा, कंगवेदादा
कसे आहात हो तुम्ही
इतके सारे दात तुमचे
कधी घासता हो तुम्ही

खुर्चीताई, खुर्चीताई
कश्या आहात हो तुम्ही
पायावर उभ्या सतत
थकत नाही का हो तुम्ही





कवयित्री अश्विनी अतकरे

# देवा



तुझ्या लोचनी भाव पाहून देवा
तुला वंदतो हात जोडून देवा

असे सांगणे आज माझे तुला रे
निघावेस देऊळ सोडून देवा

फिरावेस बाहेर ताडून यावे
चुकीच्या प्रघातास गाडून देवा

गळावा जनांच्या मनातील ताठा
तयांचा अहंकार मोडून देवा

नको रे गराड्यात कोंडून घेऊ
सुटावा खुळ्या तावडीतून देवा

जनांचा जनाशी सलोखा टिकावा
दुरावा मनातील काढून देवा

तुला मागणे एवढे आज आहे
रहावेस नावास खोडून देवा



कवी देवेंद्र इंगळकर



# आनंदकंद

गागाल गालगागा गागाल गालगागा

धावू नकोस मित्रा वेगात फार येथे
सांभाळ तू स्वतःला अपघात फार येथे

असुनी जवळ मनाने झाले असे कसे हे
आला कसा दुरावा दोघात फार येथे

कैदेत माणसे अन् मोकाट जीवजंतू
झाले किती बदल हे रोगात फार येथे

काटे न टोचले पण झाली इजा मनाला
नाजूक पाकळ्यांचे आघात फार येथे

हकनाक तोल जातो प्रेमात पावलांचा
पडतात लोक येथे रडतात फार येथे



कवी अमोल प्रभाकरराव चरडे

# दिपावली...

आली आली दिवाळी
आली आली दिवाळी
या उस्तवाची रंगत न्यारी
दिव्यांची आरास भारी...

झेंडूचे तोरण दारी
रांगोळी सुरेख अंगणी
आकाश दिव्यांची रोषणाई
फटाक्यांची आतषबाजी

नवचैतन्याची पहाट सारी
लक्ष्मीचं आगमन घरी
सुख समृध्दी,यश वृध्दी
आंनदांचा दीप तेवती

सारी मनं हर्ष उल्हासती
तेजोमय प्रकाश पाविती
सुवासित मंगलमय दिनी
धनधान्य समृध्दी लाभती.



कवयित्री अश्विनी कोठावळे
परळी, सातारा



# जिंदगी

सावळ्याची बावरी राधा बनावी जिंदगी
सांग कृष्णा एकटीने का जगावी जिंदगी

दीन-दुबळ्या द्या सहारा व्हा तयांचे सोबती
रंजलेल्या त्या अनाथांची फुलावी जिंदगी

स्वर्ग सौख्याचा मिळावा त्यास आनंदी वसा
हर्ष सारे दान देण्यास्तव झुलावी जिंदगी

साधतांना स्वार्थ तुमचा सोडता अभिमान का
एवढी लाचार होणारी नसावी जिंदगी

देत जावे वंचितांना साथ मोठी जीवनी
जीवनाला सार्थकी करणे असावी जिंदगी

हो विवेकी वागतांना अन् घमेंडी टाळ तू
सावली होऊन त्यांची तू बघावी जिंदगी

बेघरांना अन पिडीतांनाच ठेवा आश्रयी
दुःख सारा दूर अन् सोपी करावी जिंदगी



कवयित्री नलिनी पवार
पुणे



# दिंडी

विठ्ठल विठ्ठल नाम मुखी जयघोष असा हृदयी भिनला
टाळ मृदंग सवे चिपळ्या हर वारकरी भजनी रमला
गाव नसे अन् नाव नसे अवघा जमला समुदाय तिरी
एकच ताल लयीत धरी गिरकी फुगडी जपी नाम हरी

केशर चंदन गंध टिळा तुळशीसर कंठमणी सजला
चालत नाचत वाट सरे दिनरात विठू स्मरणी वसला
रिंगण घालत अश्व फिरे नमती सगळे जणु देव दिसे
मैल किती सरले असले वदनावरती शिणभाग नसे

गर्व सरे भवताप हरे विसरून व्यथा जखमा भरती
नेत्र सलील झरे बघता दुरुनी कळसास जरा वरती
सार्थक भाव कृतार्थपणा नमिता प्रभुला शुभ जाणवतो
श्यामल रंग मनावरती अधिराज्य अनाहत गाजवतो



कवयित्री रश्मी थोरात

# मी गेल्यावर



मित्रासम ते रिपू वागतील मी गेल्यावर
पार्थिव माझा ओला करतिल मी गेल्यावर

सालांपासुन अबोल होते ओठ जयांचे
पुळका येऊन ते बडबडतिल मी गेल्यावर

दीड विकीच्या जागेसाठी वैर  जन्मभर
माझी चर्चा भलती होईल मी गेल्यावर

मानाअपमानाचे फटके किती झेलले
होती प्रेमळ नक्की म्हणतिल मी गेल्यावर

त्यांचा करुनी विचार जगले उंबरठ्या तच
दारे दाही  दिशा उघडतिल मी गेल्यावर

कुचकामी हे जगणे होते रोज परीक्षा
जीवन म्रुत्यू मिठी मारतिल मी गेल्यावर

महत्त्व येईल अमाप माझ्या  डायरीस त्या
अक्षरलेणे माझे उरतील मी गेल्यावर

सावित्रीच्या देण्याचे मी सार्थक केले
एक समिधा मीही अर्पिल मी गेल्यावर

हा तर होता मतला यारो जगण्याचा
या शेरांच्या रूपाने येइल मी गेल्यावर

तेरा दिवसांनी वा तेरा महिन्यानंतर
उपचारही ते सारे सरतिल मी गेल्यावर



कवयित्री विद्या बनाफर

## चारोळी



जागतिक पर्यावरण दिवस
त्याने साजरा केला झाडं लावून
तो हाच नेता ज्याने काल अख्या
बांधावरील झाडे आला तोडून



– कवी विलास पुंडले

# अस्तित्व



हुंडा नको देऊ..
आधी मुलीला शिकव
काय सांगता येइल की
तो तिला चांगलच ठेवेल.

आहे मोह त्या लोकांना एवढा पैशांचा
काय शाश्वती ? की
तो तीला उद्याही चांगलच ठेवेल.

नको स्वाधीन करू सर्वस्व
त्या व्यक्तीला
जो मोजतो तुला पैशामधे
पाहतो तुला पैशाच्या रूपाने

भेटतील तुला ही कावळे चोच मारणारे
नाही बाहुली तु तालावर नाचायला
तू आहेस कणखर,
पण नको बळी पडूस कुणाच्या आमिषाला
सर्व इथे मृगजळा सारखे ,

बदक आणि कावळ्यांच्या या समाजात
तुला जगायचं आहे
स्वतःचे अस्तित्व टिकवायचे आहे

लक्षात ठेव....
तुला स्वयंसिद्धा होऊन
स्वतःला सिद्ध करायचे



कवयित्री माधुरी साबळे
अकोला



# कामगार

रात्र, दिवस काम करून
रक्त गाळून राहिला,
तरी का? माझा बाप आज
उपाशी निजून राहिला ।।१।।

व्यथा तुझी पाहुन
काळीज भेगाळल सारं,
अंधारलं जीवन तुझं
दिवा होऊन यावं कार ।।२।।

फाटके कपडे तुझ्या अंगावरचे
मला बरच काही बोलले होते,
भगदाड कर्जाचं शिवण्यासाठी
तू काय-काय केले होते ।।३।।

रात्रीची चूल पेटवायला जे
लाकडं जमा करून राहिला,
त्याच्याच आगीत तुझा तू
देह जाळून राहिला ।।४।।

कष्टाच्या इंधनान चूल तुझी पेटते
रक्त हि आटते रे घाम गाळताना,
लाज कशी प्रस्थापितांना वाटत नाही इथल्या..
धोरणं नेहमी बदलून लचके तोडताना ।।५।।

मरणार तो असाच नेहमी
ज्यानं आसवांचा कडेलोट वाहिला,
तो दुसरा-तिसरा कोणी नसून
कष्टकरी कामगार बोलून राहिला ।।६।।



कवयित्री आचल काळे

# येता पावसाच्या सरी

येता पावसाच्या सरी
हर्ष होतसे मनाला
येई बहर जगण्या
नवं चैतन्य सृष्टीला...१...

अशा रिमझिम धारा
आता सुखावते मना
नित्य असाच पाझर
राजा तूचं दयाघना...२...

फुटे पालवी झाडाला
होई निसर्ग हिरवा
आला वरूण सजून
जसा प्रेमाचा गारवा...३...

दिसे इंद्रधनू नभी
रूप मनोहर भासे
रंग पाहुनी सुंदर
मन मुक्तपणे हासे...४...

येता पावसाच्या सरी
वना मयूरही नाचे
रुक्ष झालेल्या शेतात
तळे पाण्याचे रे साचे...५...



कवी यश दिवाकरराव इंगळे
मंगलमुर्ती नगर, चांदूर रेल्वे, अमरावती.

# गझल

कशास करतो वार जिव्हारी पाठीवरती
आयुष्या तू खूपस भाला छातीवरती

एक तरी धड लिहावयाचे होते अक्षर
किती गिरगुटा केला नशिबा पाटीवरती

येवुन गेली तू माघारी दारावरूनी
अजुन ठसा तो दिसतो आहे मातीवरती

दिसतो आहे कागद जो हा डबडबलेला
लिहिली होती त्यावर कविता आजीवरती

वठलेले ते झाड बहरले पुन्हा एकदा
बसली जेव्हा दोन पाखरे फांदीवरती

घरटे सोडुन दाणे टिपण्या आली चिमणी
लक्ष तिचे पण होते उडत्या घारीवरती

सूर कसे हे थबकुन गेले खिडकीमधले
चढून गेला आत्ता कोणी माडीवरती ?

तोच स्वतःच्या कैफामध्ये बडून होता
आळ तरीही आला नाहक साकीवरती





कवी वसंत शिंदे
सातारा



# मलम

जगता जगता बनते कविता
साऱ्यांचे मन टिपते कविता
ती तर असते जवळच आपल्या
मना मनातच लपते कविता

शब्द नेमके पेरत असते
हसता हसता रडते कविता
संघर्षाच्या वाटेवरती
रोज नव्याने लढते कविता

गोड गळ्याची असते कविता
मुखात असते स्पष्ट कविता
नव्या युगाची नवी कहाणी
सांगत असते गोष्ट कविता

शब्दा शब्दा मधले अंतर
आतंरयामी गुण गुणते कविता
वाल्मिकीच्या कुळातील ती
रामायण मग बनते कविता

व्याधीचे ते औषध असते
जखमावरची मलम कविता
दुखा वरची हळूच फुंकर
एवढी असते तलम कविता



कवी बाळासाहेब गिरी

# कोंदणं

मी का म्हणून घेवू
स्वतः ला स्त्री म्हणून
माणसाच्या योनीतून
जन्म घेवून स्त्रीपणाचे कोंदण
कशाला बंधन म्हणून

थांबला पाहिजे...
माझ्या कहाणीचा प्रवास
स्त्री पुरुष लिंगभेदाचा आक्रोश
मुक्तपणे अविरत चाललेला
सोशिकतेचा मूक जयघोष

काटेरी उंबरठ्या पलिकडेही
निखारेच सांडलेले अंगणात
विषमतेच्या धगधगत्या ज्वालांनी
होरपळलेल्या पाकळ्यांना
मायेचा गारवा होता सुखावत



स्त्रीपणाची कात टाकते
सामर्थ्याची ढाल उचलते
निखाऱ्यांनी तेंव्हाच का गं
उंबरठ्याच्या आत बाहेर करपते
तुझेच का गं माणूसपण हरवते ?

माणूस म्हणून जगताना
नग्न तुलाच का व्हाव लागतं गं ?
स्वार्थापायी शस्त्र म्हणून
तुलाच का वापरलं जातं गं?

रक्ताळलेल्या पावलांचे
मातीवरचे नग्न ठसे
माणूसपणाची धिंड अन्
हिंस्त्रप्राण्यांचे तांडव जसे

तूच पैंजण तूच शस्त्र
तुझे तूच पून्हा नेसून वस्त्र
घूमू दे.... आवाज आता
ब्रम्हांडाच्या क्षितिजापर्यंत
होवू दे ... तांडव आता
मानवतेच्या शिखरापर्यंत
तिसरा डोळा उघडे पर्यंत....



कवयित्री योगिनी वैदू

# गोधडी

लुगड्याचं मऊ सूत, त्याला ऊब ती मायेची
धाग्या धाग्यात वसली, जन्म कथा गोधडीची..।।१।।

गुजगोष्टी मनातल्या, सांगायला साऱ्याजणी
पासोडीला शिवण्यास, जमायच्या गं मैत्रिणी..।।२।।

धोतराचं ते अस्तर, नक्षी पदर काठाची
आई आजीच्या साडीत, आठवण ती लाखाची..।।३।।

माहेराच्या वाकळीत, शीण जातो पटदिशी
पांघरूण अंगी घेता, थोपटते माय जशी..।।४।।

वीण नात्याची जोडाया, ठिगळांची शाल भारी
वात्सल्याचा फिरे हात, गोधडीचा अंगावरी..।।५।।

साऱ्या दुनियेत नाही, ऊब प्रेमाची जादुई
गोधडीच्या रूपाला गं, जुन्याचीच नवलाई..।।६।।





कवयित्री छाया सुभाष वांगडे
सातारा



# मौनातील इशारे

मौनातील इशारे... कळले मजला सारे,
तुझे मौनातले इशारे.
अंतर्मुख होऊन बोलणे मी वाचत गेले सारे,

का साहते मनी मी अजूनही तुझा दुरावा,
ते भास की आभास सारे
नयनात वाचलेले.

अजूनही प्रीत माझी कळली न  तुजला,
समजावून व्यथेला मी
गहिवरले अंतरंग सारे, शब्दाशब्दात...
कवितेच्या ओळीत अर्थ शोधताना,
ते दाटलेले उमाळे अश्रूतून वाहिलेले.

आठवतोस तू जेव्हा
सागऱ्याच्या किनाऱ्यापरी,
लाटेतील हेलकावे मी मोजित गेले सारे.

दवबिंदूच्या थेंबातील गूज उकलताना,
अर्थ सारे दाटलेले मी आधीच वाचलेले
कळले मलाच सारे,  तुझे मौनातले इशारे,
अंतर्मुख होऊन बोलणे मी वाचत गेले सारे



कवयित्री वीणा कुलकर्णी

# बाईपण भारी देवा



बाई पण भारी देवा
फक्त तिनं सांभाळावं
सोपं नाही बाई पण
कधी आम्हाला कळावं...१

कष्ट तिचं चालू असे
नाही पुरेशी उसंत
स्वप्न पूर्ती होत नाही
तिचा फुलावा वसंत...

उंबरठा ओलांडून
आज बाहेर पडली
दिसे विविध क्षेत्रात
भीती मनाची गाडली...

पापी नजरा टाळते
कधी होते ती शिकार
लढा - संघर्ष करुन
कर आता प्रतिकार..

घर, शेती, नोकरी
सर्व क्षेत्रात दिसते
तिचे अस्तित्व म्हणजे
झेप यशाची असते

ठराविक मक्तेदारी
धैर्य, जिद्दीने मोडली
चुल मुल, अंधश्रद्धा
यांची शृंखला तोडली...

दुःख बाईचं माणसा
बाई झाल्यावर कळे
झेले प्रसुती वेदना
तरी तिला का तू छळे?..

कशी सांभाळते बाई
संसाराच्या डोलाऱ्याला
तिचं कर्तृत्व पाहून
आहे सलाम धैऱ्याला..



कवी माणिकराव गोडसे पाटील,
देवळाली कॅम्प-नाशिक

# विधवा एक शाप



काय अपराध असतो सांगा
विधवा झालेल्या महिलांचा?
मग का खेळ सुरू होतो,
मोकाट सुटलेल्या बैलांचा?

मन तिचे दुःखात बुडालेले असते,
याचे भान समाजाला का नसते?
सगळ्यांना ती वाटते सरकारी संपत्ती,
मग रोज येते तिच्यावर आपत्ती.

दुःखांवरती तिच्या ती करते मात
संकटाशी करते मग दोन हात
उभी राहते मग ती होऊन खंबीर
मुलांना तिच्या तीच देते धीर.

विधवा म्हणून साऱ्यांनी
वाईट नजरेने बघायचं...
हळदीकुंकूच्या समारंभातून,
तिनं गुपचूप निघायचं.

विधवा नावाचा शाप
तिनं जन्मभर भोगायचा
घरच्यांनी तिच्या
फक्त तमाशा बघायचा...

साथीदाराने हा डाव
अर्ध्यावर सोडलेला असतो
तिच्या तर आयुष्याचा
कणाच मोडलेला असतो.

जगायचं असतं तिला पण
समाजात मानानं
समजून घेऊ तिच्या भावना
साथ देऊ मोठ्या मनानं.



कवयित्री मंगलताई माने

# काजवा



काजळ काळया अंधारात
अनामिक भीतीने उर धपापत असताना
हलकेच एखादा काजवा चमकावा
आणि मनाला धीर यावा,
इतकंच काय ते तुझं
माझ्या आयूष्यात असणं .....

त्याच एका प्रकाशबिंदूने
माझे जीवनच बदलून जावे..
ओंजळीत काजवा घेऊन मी
प्रकाशाची दिशा शोधत गेले ..

अन् तिथेच चुकले ....
झगमगत्या दुनियेत मी
चमकता तारा झाले.

पण हातातला काजवा .....
झगमगाटात विरून गेला
माझी ओंजळ रिकामी करून ...

परिसस्पर्शाने जीवनाचं सोनं झालं .....
पण हाती आलेला परीस मी हरवून बसले!
पुन्हा कधी दिसेल ही आशाही नाहीच...
झगमगाटात तू येणार नाहीस ...

माझ्यात अंधारात वाटा
तुडवण्याचं बळ उरलं नाही ...
मनात मात्र तो प्रकाशबिंदू तसाच आहे ..
असेल..कायम..प्रकाशमान..
जीवनाच्या अंतापर्यंत.....!



कवयित्री लता चव्हाण
सातारा



# मनीची पिकनिक

मनूने एकदा नेले सर्वांना फिरायला
उंदीर मामा बनला चालक वाला

पोपटाने आणले डाळींबाचे दाणे
कोकिळेने गायिले मधुर गाणे

मयूर आला फुलवून आपला पिसारा
त्याच्या तालावर नाचे पक्षीगण सारा

ससोबा आले मारत टुन टून उड्या
चिऊताई गोळा करते घरट्यासाठी काड्या

मऊ मऊ गवतावर खारुताई लोळे
तिला बघताच खाली आले माकड काळे

मनी माऊने केली पिकनिक ची गंमत
उंदीर मामाने वाढविली पिकनिक ची रंगत



कवयित्री शुभांगी महादेव वाघ

# पोशिंदा



पिकवितो शेतकरी
कष्ट करून अन्नधान्य
विश्वामध्ये तोची धन्य
कृषी पंढरीचा वारकरी

पोशिंदा पिकवून शेती
गाळतो घामाच्या धारा
अंगाला झोंबतो वारा
दुःखात जोडतो नाती

रात्रंदिन लढतो शेतात
कोवळे कोंब शाळकरी
हाल तयाचेच होतात
पिक जपमाळा वारकरी

राजा तयास म्हणतात
लेकरे उपाशी झोपतात



कवी वाल्मिक सोनवणे
दहिवड, ता. देवळा जि. नासिक

# का ग ती
# कोपऱ्यातली



का ग ती कोपऱ्यातली खिडकी बंद ठेवतेस
येऊ दे थोडा उन, वारा, पाऊस..
कळू दे त्याला तुझी आतली हौस..

उघड खिडकीची दारं घे मोकळा श्वास
एक एक करून आठवेल तुला
तो काळ आणि लागेल त्याची आस ..

बैस खिडकीत लागू दे थोडे चटके उन्हाचे
सहन कर.. येईल झुळूक आणि
स्पर्शुन जाईल हिंदोळे गार वाऱ्याचे ..

थोडं गार वाटेल आठवांचा कप्पाही उघडेल
झिरपत झिरपत ओठी गाली पाऊसही पडेल ..

बघ झाले असेल ना मन शांत
आणि आता खिडकीत बैस असेच निवांत ..

संपली असेल ना जीवाची घालमेल
असाच असतो ग आयुष्याचा ताळमेळ..

नुसते स्पर्शानीच मोहरलीस
आणि सुगंधाने बरीच बहरलीस ...

बघ जरा तू एक पाऊल पुढे आलीस
आणि आतले मळभ दुर होऊन आनंदी झालीस ..



कवयित्री निलू मानकर
(नवी मुंबई)

# कवितेची कविता

काळजातुनी कळ ती उठते
कातळातुनी कळी उमलते
जणू चांदणे उन्ही हासते
तेव्हा कविता स्फुरू लागते

भवताली जन परि मी एकटा
शोधत जातो अनवट वाटा
मनात उठती अवघ्या लाटा
आणि कविता झरू लागते

डोंगर पाऊस हिरवळ वारा
झाडे पक्षी निसर्ग सारा
रचतो कवने झेलित मारा
आणि कविता स्मरू लागते

वादळात ही ज्योत लाविते
व्यंगावर ती बोट ठेविते
निर्भयतेचे कवच लेवून
विचार कविता पेरू लागते



कवयित्री सविता अभय पाटील
पनवेल



# चिमणी

स्वप्नात आली चिमणी हितगुज करायला
तिच्यासाठी ईवलंस घरटं मागायला!!

सिमेंटच्या जंगलात वण वण फिरली
बागेतल्या परसात येऊन विसावली!!

नजरेतून तिचा एकच सवाल म्हणे
दवबिंदूला मिळे पात्याचा कवडसा
कुठे शोधू मी माझ्या पिल्लांना आडोसा!!

तिच्या प्रश्नाने मी निरुत्तर
पाने फुले झाली आतुर झाली ऐकावया उत्तर !!

वाटते पसरून ओंजळ मागावे दान,
सिमेंटचे ईमले बांधा पण झाडालाही द्या मानाचे स्थान!!

कारण निसर्गाच्या उदरात आणि वृक्षांच्या
ह्रदयात आहे पिलांचे उगमस्थान!!



कवयित्री वर्षा विलास सडकर



# परतीचा पाऊस...

आल आभाळ भरून
काळकुट्ट पावसानं
मनी झाला गलबला
गेलं सारं आवसान

परतीच्या पावसानं
सोयाबीन हे भिजलं
कशा ह्या पाऊसधारा
धान्य रानात कुजलं

पीक झोपले रानात
झाली यंदा अतिवृष्टी
उभ बोलणारं पीक
कोणी केली वक्रदृष्टी

फाटलेल्या आभाळाला
कसं लावू मी ठिगळ
पाहू मी स्वप्न कसले
गेल वाहून सगळं

दिवाळीचा आला सण
काय देवू लेकरांना
सुगी गेलीय वाहून
कसं सांगू पाखरांना



कवी दत्ता वालेकर
अंबाजोगाई ,जि बीड



# देवी शारदा

ओंजळीने बकुळफुले
वाहतो शारदे तुला
हे वीणावादिनी दे
दे सन्मती दे मजला

हे श्वेतवसन धारिणी
हे हंसारूढवाहिनी
वामकरी ग्रंथ धरी
दक्षिणकरी धरी स्मरणी

हे विद्येच्या देवते
हे मंगलकारिणी
वरदहस्त ठेवी शिरी
हेच मागणे चरणी

कमलेशी वाद तुझा
ठाऊक आहे जनी
श्रीगणेश असता समीप
वाद जातसे विरूनी

हे वागीश्वरी हे सरस्वती
हे मंगले हे सुमुखी
श्रीगणेश कमलेसव
करी या जगतास सुखी



कवी दिलीप जोशी
कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड

# अनलज्वाला...

कधी बदलले रंग जगाने कळले नाही
भेटत नाही ज्याला कोणी छळले नाही

परिस्थितीने बने बाहुले क्षणात येथे
दैवयोग ते जीवनातले टळले नाही

वाट पाहिली घोर निराशा पदरी पडली
कष्ट करूनी भाग्य कधी का फळले नाही

कैकजणांनी कांगावा पण केला इतका
ध्रुवासारखे अटळ राहिले ढळले नाही

जरी कळेना ऋतु आलेला स्थळकाळाने
वादळातही फुल झाडाचे गळले नाही



कवयित्री सविता म्हात्रे
मुंबई





# अधोगती

जगण्याच्या धडपडीत माणूस
माणुसकी विसरत चाललाय
पैश्याच्या हव्यासापोटी साऱ्या
नातलगांना गमावत बसलाय..

माणूस मानवतेच्या धर्मात
माणुसपण चाललाय हरवत
नितिधर्माचं आचरण सोडून
समाजाला चाललाय विसरत..

फॅशनच्या दिखाव्यात आज
संस्कृतीला विसरत चाललाय
प्रगतीच्या मागे धावता धावता
अधोगतीच्या मार्गी लागलाय...

फॅशनच्या दिखाव्याला आता
सर्वांनी नक्कीच टाळावं
अडल्या नडल्यास मदत करत
समाजकार्याकडे मन वाळावं...

आता तरी माणूस म्हणून जगा
अन मुलाबाळाचं रक्षण करा
मायबापाची काळजी घेवून
मिरवा खरा श्रीमंतीचा तोरा.



कवयित्री अनुराधा कृष्णा धामोडे
वाणगाव (पालघर)



# नसतोस घरी तू

नसतोस घरी तू जेव्हा
घर शांत शांत भासते
कमाचाही नसतो रेटा
मी स्वातंत्र्यात विहरते...

खाण्याची नसते घाई
ना देण्याची मागणी
मनमानी असते नुसती
मग मीच मनाची राणी...

जमवूनी सख्यांचा अड्डा
उत्साह भरतसे खेळा
गाणी, गप्पा, गोष्टी यांचा
सुरेख जमवी मेळा...

सरूनी जातो दिवस
फिटते मग सारी हौस
येताच संध्या समय
मग आठवते नवर्यास...

बघ, ऐक सांगते एक
मी अशांत असते तेव्हा
भोगते सजा एकांताची
नसतोस घरी तू जेव्हा....



कवयित्री अस्मिता इनामदार
सांगली



# निसर्ग

आज हरवले आकाशी ऐसे मन मोकळे,
छेडतो गार वारा हा ऐसे क्षण कोवळे.

उघड्या नयनी पडती स्वप्ने श्रावण आगमनाचे,
रिमझिम झरत्या अमृतधारा खेळ पावसाचे.

अवतीभवती आकाशाच्या प्रतीबींबाचे तळे,
छम छम थेंबांनी भरकटते का जलशीष न कळे.

सारुन बाजुला आभाळा जैसे सुवर्णकिरणे पडती,
तैसे तेज या दवबींदुंतुन चोहीकडे पसरती.

तहानलेली माय अपुली नभी इशारा करते,
हळवा होतो श्यामही तेंव्हा तैसे जल सरसरते.

नटते सृष्टी हिरवा शालू सजवी चोळी सुमने,
तेज तिचे ही सुवर्णकिरणे दवमोत्यांचे दागीणे.

भरुन पावते मन नी फिटते डोळ्यांचे पारणे,
ऐसा श्रावण दे गा देवा हेच आज मागणे....



कवयित्री श्रावणी नितेश राऊत
अमरावती



# पंढरी

पुढारले किती । विज्ञानाचे भक्त ।।
प्रयोगाने रक्त । निघेच ना ।। १।।

सज्ञनाच्या आता । मनातील पाप ।।
एक्सरेचा बाप । दाखवे ना ।। २।।

निर्जीव शरीर । सजीव तो आत्मा ।।
धन्य परमात्मा । दिसेच ना ।। ३।।

एकची श्रीमुख । परि दोन कान ।।
ऐकण्याचे भान । नाही कुणा ।। ४।।

विसावा न मागे । काळीज देहात ।।
चाले दिनरात । सेवेसाठी ।। ५।।

समजले नाही । कितीही जगून ।।
आयुष्य भोगून । तत्त्वज्ञान ।। ६।।

शरीर पंढरी । आत्मा पांडुरंग ।।
जीवन अभंग । ज्ञानाचाच ।। ७।।



कवी शंकर घोरसे
खापरखेडा (नागपूर)

# अशी बनते कविता

पानांवर अलगद ओघळे
जेव्हा दवबिंदू निसटता
कळ्यांशी होते हितगुज
फुलांची बनते कविता

क्षितिजास चढते रक्तीमा
दूर तिथे आकाश झुकता
मनात उठते वादळ
अन वादळाची बनते कविता

शांत त्या नदीकिनारी
बासरी अलगद वाजता
डोहात त्या आर्तता सुरांची
अन सुरांची बनते कविता

बीज इवल्या रोपाचे
मातीतून अलगद रुजता
होते धरती हिरवी
अन हिरवाईची बनते कविता

संध्या समयी कातरवेळी
वाट प्रियाची बघींा
नेत्रात दाटते काहूर
अन काहूर बनते कविता

अलगद मिटते पापणी
निज डोईवर येता
मनी स्वप्नांचा तो ध्यास
अन ध्यासाची बनते कविता



कवयित्री कविता अजय दाते
पुलगाव-वर्धा



# तू गेल्यावर..

तू गेल्यावर उगाच छळते..
हृद्यामधली ती आठवण..
तू गेल्यावर मागे उरतो..
मिठीत गेला हरेक क्षण..

तू गेल्यावर कितीक पाने..
भरून गेली कवितांनी..
तू गेल्यावर मी एकाकी..
सोबत केली शब्दांनी..

तू गेल्यावर गळून पडली..
झाडांवरची हिरवी पाने..
तू गेल्यावर कविता कसल्या ?
मी तर भरले रिक्त रकाने..

तू गेल्यावर मनात म्हटले..
जाऊ दे ना गेली तर..
तू गेल्यावर कशास ठेवू..
तुझ्या स्मृतींची ती घरघर..

तू गेल्यावर ऋतू बदलले..
वसंत सुद्धा आला नाही..
तू गेल्यावर वैशाख जाईना..
शिशिर,शिशिर राहिला नाही..



कवी शिशिर - जयेश मोरे
बदलापूर..

# भांडण

कधी कधी काय होतं
एखाद्या ऊकारागत
आपल्यातलं अंतर वाढत जातं
भांडण आपल मग दीर्घ दीर्घ होत जातं
आबोलयाचा स्वल्पविराम येतो
प्रश्नचिन्ह आठ्यांवर फिरतं
कधी हळूच वेलांटीगत
डोक्यावर ते चढून बसतं
कधी मात्रांचे उसासे
शब्दातल्या जागा शोधतात
कधी आबोल्याचे अर्धविराम
आपापले काम करून जातात....
त्यानंतर मात्र परिच्छेद बदलतो,
कंसातल्या वेगळ्या अर्थागत
तुझ्या हाताचा विळखा पडतो
तर कधी एखादा अनुस्वार
हळूच गालावर लाली वाढवतो
कधी एकमेकांचे उष्ण श्वास
जोडाक्षरागत एकमेकात मिसळतात.
तर कधी भावनांचे विसर्ग
टिंबांच्या रांगेत लपतात.
आपल्याच डोळ्यांच्या भाषेतून
शब्दांचे वेगळे अर्थ निघतात.
आपलं भांडण मग
तिथेच संपून जात...
एक मात्र लक्षात ठेव
पूर्णविरामाच टिंब मात्र
आयुष्यभर भाळी सजू दे
तुझ्यामाझ्यातलं भांडण
असंच अलगद मिटून जाऊ दे.



कवयित्री अश्विनी चौधरी

# विरक्तिकडे झुकतांना

गंगेच्या पाण्यात उभे राहून
सुर्याला अर्घ्य देतांना
आठवतात तिला दुर्योधनाचे हात...
रजस्वलेच्या केसांना मुठीत धरून
फरफटत राजदरबारात आणणारे....
क्षणभर तरळून जातो डोळ्यासमोर
स्वसंरक्षणासाठी कवचकुंडले परिधान केलेला
सुर्यपुत्र कर्णही....

पाण्यात तरंगणाऱ्या नाजूक पायांना डसणाऱ्या
मत्सकन्या....
आठवण करून देतात पायातील बेड्यांची
हळूच पाण्यात डुबकी मारतांना
ढवळला जातो तळ अन्
ऐकत राहते ती अनादी काळापासून
नविन श्वास जन्माला घालतांना
वेणा देणाऱ्या नाजूक देहाच्या किंकाळ्या...

पाण्यात पडलेल्या मंदीराच्या कळसाचे प्रतिबिंब
खुणावते तिला विरक्तिकडे....
तोच घाटावरून तरंगत आलेला मृतदेह
विस्कटून टाकतो ते प्रतिबिंब ...
तिचे अवघडलेले श्वास डोलत राहतात
आईपण, बाईपणाच्या दोलकावर ...

उगम अंतांची पर्वा सोडून देते ती प्रवाहात...
अन् वेदनेची पंढरी झालेला तिचा देह...
उसळी मारत वर येतो....
पाण्यावर पसरलेल्या केसांना मुठीत घेत
जुडा बांधत माळते एखादी मोगऱ्याची माळ...
हातात रूद्राक्षमाळ घेऊन वळते ती
राममंदीराकडे....
सीतेशी वनवासातील गप्पा मारण्यासाठी ...



कवयित्री माधुरी चौधरी
संभाजीनगर



# हेवा

शून्यातून केला सुरु
माझ्या प्रवास आयुष्याचा
रक्ताळून गेला पाय
मार्ग कठीण काट्याचा....

मीच घातली फुंकर
माझ्या जखमांवरती
जो तो गेला पाठ फिरवूनी
वाटला जरी हक्काचा...

पैका पैका जमवून केले
हक्काचे घरकुल छोटे
पाहून जाती जळूनी
जे होते पुरते खोटे
आशेच्या पैलतीरावर
खळखळाट उथळ पाण्याचा....

नाही भाकीत कळले
तरी खचल नाही
काट्यातून उमले गुलाब
हे कुणा रुचले नाही
दुःखातून होई
सूर्योदय नवा उद्याचा....

कळले मजला आज
स्फुंदण बरे नाही
डोळे पुसूनीउठले लढण्या
लढा हा संघर्षाचा....

संयम ठेवा जगात
काही खडतर नाही
आयुष्याचा मार्ग जिंकणे
अवघड नाही
पिठल्याला सुद्धा म्हणावा
गोड घास श्रीखंडाचा....

जे जे आहे नशिबी
म्हटले त्यास आनंदी
मिळाल उत्तर प्रश्नांच
जगणे झाले स्वच्छंदी
घेऊनी व्यथा सुखाच्या
पल्लवीत वृक्ष संघर्षाचा....

काय घेऊन जाणे आहे
वरती कुणास जाताना ?
दिला भाकर तुकडा
म्हणूनी भुकेल्यास खाताना
दानामधूनी निवून गेला
भुकेला वणवा संघर्षाचा....

झोपडीच ही बरी
ना चोरीची चिंता
सोडवूनही कधी न सुटतो
आयुष्याचा गुंता
कशास हेवा करावयाचा
महालातल्या लोकांचा..... ?



कवयित्री दुर्गा गंगाधर जोशी
सोलापूर

# महती प्रेमाची

प्रेम म्हणजे काय असतं,
नेमक्या व्याख्येत बसवायचं नसतं,
आई-वडिलांचे निस्वार्थी प्रेम,
प्रत्येकाला हवं हवंसं असतं...

प्रेमाची महती अपार,
प्रेम म्हणजे जीवनाचा आधार,
जोडीदाराच्या प्रेमाने,
अलगद उघडते हृदयाचे दार...

प्रेम म्हणजे मैत्री,
नाते रक्ताच्या ही पलीकडचे,
मित्रत्वाच्या नात्यांमध्ये,
रंग जणू इंद्रधनुचे...

प्रेम बहीण भावंडांचे,
रक्षाबंधनाच्या रेशमी धाग्यांचे,
भाऊबीजेच्या ओवाळणीचे,
अन् सदैव रूसव्या फुगव्याचे...

प्रेम करा स्वतःवरती,
जपून ठेवा नातीगोती,
प्रेमाने जग जिंकता येते,
हीच खरी प्रेमाची महती.



कवयित्री रेखा सतीशराव देशमुख,
सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षिका,
अमरावती.



# पर्यावरण

वाचवावं पर्यावरण माणसाने,
माणसासाठी !
स्वार्थापायी ओरबाडलेलं जपावं ,
स्वार्थासाठी !

धरतीच्या वस्त्राच्या करतोय,
चिंध्या धरतीपुत्र .
कळत नाही का त्याला जपावे,
धरतीचे वस्त्र?

जीर्ण वस्त्र धरती मातेचे सांगा ,
कुठवर पुरेल?
विटलेल्या वस्त्रातून का खरेच ,
संरक्षण मिळेल?

ऊन, वारा ,पावसाचं मानवा बिघडलंय,
सारं तंत्र .
झालय रंगहीन कसं धरतीचं,
हिरवकंच वस्त्र.

थांबव वृक्षतोड,प्रदूषण अन् ,
कर पर्यावरणरक्षण.
फुलेल धरतीच्या कुशीत तेव्हाच ,
सुखाचे नंदनवन .



कवयित्री ॲड. नीता प्रफुल्ल कचवे
अमरावती

# सुमी



स्वच्छंद सरितेप्रमाणे अवखळपणे खळाळणारी...
अनंत अत्तराच्या कूप्या लवंडाव्या तशी दरवळणारी...
स्वप्नातल्या परिसम लहानथोरांच्या ह्रुदयात विसावणारी...
सबंध गावाला सुमीचा अनामिक लळा...
कोकिळेला हि लाजवलं असा तिचा कर्ण मधुर गळा...
पण आताशा लुप्त झालं सुमीच
दरवळण, खळाळण, गाणं अन् विसावण...
काय बरं विपरीत घडलं...
सुमीच्या मायचं काळीजं धडधडलं...
बापाचं हि तोंड चिंतेन काळवंडलं...
बेधुंद पावलांना बंधनाने जखडलं
अल्लड निरागस खोड्यांना खुळचटतेनं रगडलं...
नियतीनं पुढे काय वाढून ठेवलं
बिचारी सुमी काय चुकलं तिचं कसला दोष तिचा...
दोष तो तर एवढाचं तिथे स्त्रीत्व सार्थ
झालं निसर्गानं तिला भरभरून बहाल केलं...
चार चौघी प्रमानचं सुनीला न्हानं आलं मात्र...
अज्ञानाच्या दलदलीत तिचं स्त्रीत्व, स्वत्व,
स्वातंत्र्य खुलेआम गाडलं गेलं गाडलं गेलं...



कवयित्री दुर्गा देशमाने राऊत

# सुख लाभो तुला



आई होण्याचे भाग्य मिळाया,
सोसल्या मी प्रसुतीच्या कळा.
जीव लागला माझा पणाला,
पाहण्या चेहेरा तुझा रे बाळा.

पाहता हळूहळू वाढतांना,
बोबडे बोल भावले कानाला,
बाळलीला तुझ्या पाहतांना,
आनंद दिलास तू मनाला.

हाती दिली पाटी शिक्षणाची,
शिकवाया जीवनाची शाळा,
बळ येता चिमण्या पंखाला,
गवसणी घाल तू आकाशाला.

खूप उदार हो तू मनाने,
जपण्यासाठी माणुसकी,
यश कितीही मिळाले तरी,
रहा नेहेमीच तू विवेकी.

सुसंस्कारित नागरिक हो,
सार्थ अभिमान वाटे मला,
दीर्घायुषी आयुष्यासह,
उदंड सुख लाभो तुला.



कवयित्री मृणाल ठाकूर देसाई



# अर्थ नाही

अस्तित्वहीन जगण्यात अर्थ नाही
जिंदगी भर  झुरण्यात अर्थ नाही...

हाल झाले माझे माझ्याच हातांनी
दोष दुसऱ्यांना देण्यात अर्थ नाही...

देश कोरला इथल्याच वाळविणे
लुटारू नेते निवडण्यात अर्थ नाही...

आजार पोखरतो आतून शरीराला
वर मलमपट्टी करण्यात अर्थ नाही....

हृदयात रुतला काटा गुलाबाचा
म्हणुनी गुलाब तोडण्यात अर्थ नाही...

देवुनी पहिला मी हातात तुझ्या हात
दक्षा दिला मी म्हणण्यात अर्थ नाही....



कवी अंकुश माला डिगांबर



# माझे माहेर

सण येता-येता दिवाळीचा
बाई लेक वाट पाही
येता माहेरची बोलवण
तिला जाण्याची लई घाई

अंगी नेसूनिया नवी चोळी
नि पिवळ्या काठाचं ते नऊवार
हाती घेऊनी सोनेरी ताट
बहिणबाई झाली माझी दावेदार

ओवाळती भाऊराया
उभी टाकुनि भाऊबिजेला
ओवाळणी मागता मानाची
तिच्यापायी जीवही गहाण टाकला

फुललेले तिचे माहेर घर
कोमेजून गेले सारे बालपण
सासरच्या उंबरठ्यावर
येते माहेरची आठवण

मनात आठवण येता
येई डोळ्यातून पूर
माझ्या बहिणीला आज
झाले माहेर दूर.



कवी कपील सावळेश्वरकर
नांदेड



# मायबाप

लाजलीच नाही माय कधी
मोळी लाकडांची विकताना
अन् बघलोच नाही बापाला मी
कुणाही पुढं झुकताना ... !

हाता वरचं पोट आणि
पोटामध्ये आग तरी
दिसलेच नाहीत गरीबीचं
भांडवल कधी करताना ... !

खंगलेली गरीबी आणि
पांगलेली परिस्थिती
जुळलचं नाही जुगाड कधी
एका खुट्यावर आणताना ... !

बाप होतो दिवा माझा
आणि माय दिव्याची वात
दोघेही नितळ दिसतात
माझ्यासाठी जळताना ... !!



कवी अनुरत्न वाघमारे
नांदेड.

# दिप मालवलेला

सारा आसमंत उेळला
दिव्याने दिवा, चेतवून
वारा सुटला, ज्योत फडफडली
गेला दिव्यास, मालवून

मालवलेल्या दिव्यांत
वात, अधुरी जळलेली
रात्रभर खंत अंधाराची
वेदनेने होरपळलेली

हवा असतो प्रकाश
नेहमीच सगळ्यांना
थकतात ना दिवे ही
विसावा हवा ना, त्यांना....

अंधारात कळते, महत्त्व
सतत, जळणाऱ्यांचे
वेदनेच्या आसवांना
रात्री असते, ओघळायचे

आयुष्य म्हणजे मिश्रण
असे तिमिर न् उजेडाचे
झगमगाटानंतरच दुःख
पहावे, विझलेल्या दिव्यांचे...



कवयित्री वंदना इन्नाणी
भोसरी, पुणे

# प्राक्तन

दुपारनंतरच्या शांत वातावरणात
गल्लीत एक भिकारण शिरली
भिकारणीच्या डोक्यावर पाटी
पाटीत भाकरी गुंडाळायला
धोतराचा सोगा आणि.....

हातात कालवणासाठी लोटा
अंगावर ठिगळा ठिगळांचं
कुणीतरी दिलेलं इरकली लुगडं
कपाळावर मोठ्ठ कुंकू
उन्हानं रापलेला निर्विकार चेहरा

तर कडेवर पोरगं,भुकेलेलं
ती... प्रत्येक दाराशी थांबे
आणि घरातल्या लक्ष्मीला
मोठ्या आवाजात सूर लावून
शिळा भाकरतुकडा आणि
शिळं कालवण मागायची

गृहलक्ष्मी आधीच बाजूला काढून
ठेवलेलं आणून वाढायची
चेहऱ्यावर उपकारकर्तीचा भाव आणून !
मनात आलं.... ही बाई

प्रत्येक घरात शिळा भाकर तुकडा आणि
शिळं कालवणच का मागते ?
मला वाटतं..तेच तिचं प्राक्तन ! दुसरं काय ?



कवयित्री नंदिनी प्रभाकर चांदवले
औंधरोड पुणे.

# कोंदण

नात्याची हिरवळ सखया
प्रितबाग ही फुलली
भरली सुखाची ओंजळ
अन मीच माझी आनंदली

श्रावण सरी बरसल्या
पडलं सुखाचं चांदण
प्रफुल्लीत झाली अवनी
प्रकाशले रुपेरी आंगण

गोडीगुलाबीच्या संगतीची
जिवन परीक्रमा करते
नात्यांची सुदंर गुंफन
क्षणोक्षणी सांभाळते

सख्या तुझ्याच नावाच
मी रेखीयल गोंदण
साताजन्माची पुण्याई
आयुष्यभराच कोंदण

थोरामोठ्यांचे आशीर्वाद
घरास घरपण देते
प्रेमबंध अन जिव्हाळ्याचे
नाते उदयास येते...



कवयित्री सुचिता गोपाल कुनघटकर
नागपूर



# साखळी

तू सावली माझी मी तुझं रूप,,
फुलास विचार सख्खे
जीव लावतो खूप आज्ञेस पाळतो मी
विनतो आपुलकीचा धागा,,
बघ श्वासभर जगण्यात तुझी मोलाची जागा

आतुरता तुझ्या मिठीची जे मज जगण्याचे बळ,,
डोळ्यांत अश्रू तुझ्या लाखपट्टीची माझी झळ

कथा, कविता तू बनला बनलास तू माझा पाठ,,
खळखळ मी लाट शांतिप्रिये तू असतो काठ

तू कोवळ्या उन्हात तू रिमझिम सरी,,
ओठांवर गीत तुझे सख्खे ही बात खरी

शेत शिवारात सांगे पाखरे हिरवट तुझ्यात राखून,,
शब्द शब्द पाझरतो कंठातून
ठेवला अल्लाद कोरून

सरस ठरले रूप तुझे घायाळ जीवघेणी खेळी,,
होऊन जाऊ एकरूप
बनू साताजन्माची साखळी....



कवी विशाल कुलट



# आग्र्याहून सुटका

येई मिर्झाराजा । होऊनिया काळ
ग्रासावया चंद्र । स्वराज्याचा ।। १।।

राजाना ती चिंता । पडियेला गुंता
प्रार्थी भरवंता । तारावया ।। २।।

तोकडी साधने । दलही तोकडे
लढावे तो दिसे । सर्वनाश ।। ३।।

ताराया स्वराज्य । तथा स्वप्रजा
विवेकी राजा । शोधी मार्ग ।। ४ ।।

हित अहिताचा । करूनि विचार
करायासि तह । राजी झाला ।। ५ ।।

तहाच्या त्या अटी । अति सनसनाटी
तेवीस गडकोटी । सोडियेले जल ।। ६ ।।

तहाचिया पोटी । औरंग्याच्या भेटी
यमुनेच्या काठी । आग्रा जाणे ।। ७ ।।

ठेविले ओलीस । बाळ त्या शंभूस
होऊनि हताश । केला तह ।। ८ ।।



कवी बाळासाहेब पाटील

# तारणहारी काळी आईचं



मरत आहोत रात्रंदीस
स्वप्ने पाहणे ही दूर राहिले
ठेवली होती थोडी तुटपुंजी
तिही हे घेऊन गेले..

महागाईचा चढता आलेख पाहण्यातच
बऱ्याच पंचवार्षिका गेल्या
खळयातील एक एक कण गोळा करताना
बऱ्याच डोई रोजगारी बनल्या

शेती प्रधान आमचा देश
कणा आमचा शेतकरी
बळी जातोय सध्या शेतकरी
लबाडी का होतेय दरबारी

पहावे कुणा कडे ?
नजर दिसत नाही राजाची
सांगून गेले वाड वडिल
ओटी भर बाबा काळया आईची



कवी रत्नाकर उपासे

# मया बाप म्हणते

माया बाप म्हणते, ईमानदारीन राय
मेहनतीचं खाय, सरता सरत नाय
त्यातच खरं सुखं हाय...।

एकदा लागली, कोणाची हाय
मग डोयान पाय, जीवाचा सत्यानाश
झालाच समज माय...।

कायले करत, सगळं माय हाय
जवा तवा पाहिजे
खायले दुधावरची साय...।

फुकटचं खाल्ल्याने, पोट वाढते बाय
लागते बिमारी, दावखान्यात पाय...।

पापाचा घडा भरला की, सार खल्लास होते माय
किडे पडतात अंगात, अन वास लागते बाय..।

किर्ती मागे सोडून, जावा लागते माय
मग कोणाचे आसू, पुसून तरी जाय...।



कवयित्री भाषा प्रेमनाथ जामनिक
रा.लाखपुरी (अकोला)

# जगण्याचा अर्थ

माणसी गुणत्व
रज तम सत्व
जगण्याचे असे
प्रत्येकाचे तत्व ...१

सुख व दुःखाचा
आयुष्य डोंगर
कडू अन् गोड
फळातील गर ...२

ना येती अर्थाने
जगण्याला अर्थ
कर्तृत्वा शिवाय
जीवनच व्यर्थ ...३

जीवन सुंदर
समजुनी घ्यावे
हात एकमेका
मदतीचे द्यावे ...४

मनी अहंकार
नको करू आता
देह हा नश्वर
दान कर दाता ...५



कवी अविनाश चरडे
यवतमाळ



# स्वच्छ गाव

स्वच्छ ठेऊ गाव आपले
उचलून कचरा आणि घान
बंद करू वापर प्लॅस्टिकचा
वापरू कापडी पिशवी छान

ओला सुका कचरा
साठवू वेगळा वेगळा
घंटागाडी आल्यावर
त्यातच टाकू सगळा

रस्तावर थुंकणाऱ्याला
सांगू बजावून वारंवार
रोगराई पसरविण्यात
होऊ नकोस भागीदार

शौचास आता उघड्यावर
बसने करूया सारे बंद
हगणदारी मुक्त गाव
करण्याचा लुटूया आनंद

लावू झाडे हिरवी हिरवी
बनू पर्यावरणाचे सोबती
मिळेल आक्सिजन फळे फुले
होईल निसर्गरम्य धरती



कवयित्री छाया जगदीश शहाणे

# मनाची गोष्ट

मन हे सुंदर
मन हे कोमल
नाजुक मनाची, हसऱ्या मनाची गोष्ट!
मनाला नको आहे द्वेष
नको तो मत्सर
नको मनात ती चीड
लांब असू दे दुर्विचाराची किड!
मनाला हवे प्रेम
असावा मनात जिव्हाळा,
जोडीला उदारता
उदार मनाची भव्यता
भव्य मनाची दिव्यता!
मनात आहे रम्य कल्पना प्रेमाची
ओढ असावी प्रेमाची!
आपुलकी मनात जपावी
निरागस प्रेमाची ज्योत फुलवावी!
सशक्त मनाची अफाट शक्ती
फुलावी मनात ईश भक्ती
मनाला हवी परम शांती!
मन हाच आहे अंतरात्मा!
मिळेल का हो मनाला परमात्मा!



कवी डॉ. शोभा पोटोडे
अमरावती.

# त्यांनी.

ते दरिद्री लोक नाही पाहिला बाजार त्यांनी
ओपली माझ्या चितेची लाकडे ती चार त्यांनी.

माणसाचे चामडे हे सोलुनी उपकार केले
आपुले जोडे शिवाया तारला चांभार त्यांनी.

राखही त्यांचीच ज्यांनी साजरी केली दिवाळी
जाळले पणतीप्रमाणे आपुले घरदार त्यांनी.

बाटली नाही दुधाची आणि पाण्याची मिळाली
ओपली डोळ्यांतली ती आसवांची धार त्यांनी.

रक्त माझे टेकडीवर छानसा रस्ता कराया
बांधली गावात माझ्या डांबरी मलबार त्यांनी.

लेकरे नाही भिमाची पोळली नुसती कधीही
गरजुनी जयभीम! सारे जाळले अंगार त्यांनी.

माणसे चौकात जेव्हा लागली दंगा कराया
बुद्ध त्यांना भेटले अन टाकले हत्यार त्यांनी.



कवी अनिल रुक्मिणी पांडुरंग साबळे



# स्मृती पाखरे

दुरावली प्रित काय शिशिर नि वसंत
कोणताही ऋतू मज आता नाही पसंत ।। धृ ।।

ते गुलाबी हिवाळे नव्हतेच माझे साथी
ग्रीष्माच्या वावटळी मी कवटाळल्या छाती ।। १।।

क्षणिक रंगला होता तो खेळ सावलीचा
होतो वेडा मी जयाचा तो नूर बाहुलीचा ।। २।।

हुंदक्यासवे वाहती नासिकी उष्ण वारे
वेडावे जीवास ते लोभनीय स्वप्न सारे ।। ३।।

निशा दिनूची मज नलगे निकड आता
उमजे भास सारे वेळ पाठमोरी होता ।। ४।।

फाटो नभ जळो दुनिया मज काय खंत
उजाळले जग माझे विशादा नाय अंत ।। ५।।

स्मृती पाखरांनो शोधा तुम्ही नवा निवारा
प्रिती उद्यान आता झाले वाळवंट सारा ।। ६।।



कवी मारोती मोतीराम कुळसंगे
शेगांव.

# माय

वीज कडाडा कडाडा
भेग भूईला पडली
सय मायीची आठवे
उभ्या जीवाची काहिली

माय घराचे गोकुळ
नाही प्रेमाला कुंपण
घरा दारात शिंपले
मोरपिसांचे रोपण

घेत जरासा उसासा
मन माहेरा गुंतत
कडू सासरी खुपते
बोल साऱ्यांचे सतत

मायी संसारी नव्हता
ओल्या मायेचा निरि
कष्ट हातांनी उपसे
पाच पोरींचा पहारा

दु:ख अंतरी अफाट
आस पोराची अपार
परी शरीर गांजले
झाली संसारी दुपार

मुखी देवाचा अभंग
हाती तुळशीची माळ
भोग नाहीका सरले
हाती विठ्ठलाची टाळ



कवी मयुरेश अरुण कुलकर्णी
सोलापूर.



# हिशेब या जगाचे

जपून ठेवले मी
काही हिशेब या जगाचे..
काही अपमान या जगाचे
काही सन्मान या जगाचे

असे ओंजळीत शब्द आले
जणू हातात सूर्य आले
अत्त दीप भव: होवूनी
फक्त उजळणे मनाचे

काहींनी मिटवून पाहिले
काहींनी गिरवून पाहिले
जितके प्रयत्न तितके
करून पाहिले...

मी साहूनी सारे मात्र
ध्यानस्थ होत गेलो
एका काळोख्या रात्री
प्रज्ञा शील करूणेचा
बुद्ध घेऊन आलो



कवी डॉ. प्रवीण काळे
माजलगाव जि.बीड

# राधा



रूणझूण किणकिण तीरावरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।धृ।।

धून कुठूनसी ऐकू येई कानी
बावरी होतसे राधिका दिवानी
नौकेवरी स्वार सावळा श्रीहरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।१।।

पिवळे पितांबर मुखावर पावा
अंतरात फक्त राधेचाच धावा
मयूरपंख विराजे मुकूटावरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।२।।

उषाराणी हळूच हासे गालात
प्रभा उजळली सुवर्णवर्खात
प्रतिबिंब न्याहळी जलाशयावरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।

अनवाणी धावे भेटण्याची घाई
कृष्णसखा अंतरंगात ठाई ठाई
आतुरता दाटली नजर कावरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।४।।

रुणझुण किणकिण तीरावरी
घट घेऊन आली राधा कटीवरी ।।धृ।।



कवयित्री अनघा कुलकर्णी



# सत्ता...

हव्यास सत्तेचा
पाचारतो गुलामा
विश्वासास दुभंगतो
मुखवट्याचा मुलामा

स्पर्धेच्या युगात
स्वकर्तृत्वाची भेळ
फेकूनी डाव खोटे
सत्तेशी करतो मेळ

मिथ्या अराजकता
व्यवस्थेत पसरवी
सत्ताशाही लाळघोटे
शतरंजी डाव दावी

प्रामाणिक श्रमजीवी
अनभिज्ञतेत सर्व साही
करुनी गनिमी कावा
मर्मघाव घालू पाही

निवडक सत्तेधारीत
माहितीचा न अधिकार
स्वार्थाचाच बोल बाला
होई सचोटी बेजार



कवयित्री प्रतिभा कुमार मंडले
पनवेल



# निळ्या नभाचे गाऊ गाणे

निळ्या नभाचे गाऊ गाणे
उजेड, वारा, गाती राने ...

रान फुलांशी अमुचे नाते
पाणी नदीचे आम्हा सांगते
सुर्य केशरी वर येतो
थवा पक्षांचा नभी जातो ...

फुलपाखरे वनी फिरती
खळाळ नद्या दूर वाहती
सावलीसंगे ऊन खेळे
खूप पिकले सारे मळे ...

डोंगरझाडी हिरवी झाली
पक्षी सानुले हासती गाली
इंद्रधनुची रिघ पडे
किती जादू निसर्गाकडे ...

किती गोजिरा निसर्ग फुले
रानी मोराचा पिसारा झुले
हात पसरू खूप घेणे
निसर्गाचे हिरवे देणे ...



कवी गणेश आघाव



# कवडसा

नियतीच्या चक्रावर बसून
कवडसा आला तसा
चालता बोलता झाला,
ऋतु बदललेले, ठिकाणं बदलेली,
चक्र बदललेली, स्थिती बदललेली
बदलत बदलत स्थित्यंर होत गेलेलं
इकडून तिकडे आयुष्य
सरणाच्या वाटेवर चढलेलं,
माध्यांन्हीला 'कवडसा'
उग्र ठळक दिसतोय
जाणीवेतून न समजलेला
स्पष्ट उठावदार गोल
कंकणाकृती भुगोल
परिस्थिती ढळतानाचे
भान नाही ठेवत
आपलाही प्रकाश
कमी कमी होणार
आणि अंतसमयी
ठळक गोल रिंगणाचं
भुईसपाट लंब गोल
अस्पष्ट अदृश्य फिकट
दक्षिणोत्तर शय्येवर
आपल्याच पसरलेल कलेवर
आपण आपल्याच डोळ्यांनी पाहणार...
रडणारी माणसं, भुंकणारी कुत्री
सरणावरचा सारा हिशोब मांडणार
दिल्या घेतल्याचा लेखाजोखा
बेरीज वजाबाकी एकमेकांसह
जमलेल्या मंडळीत करणार
हे मात्र कुणालाच न उलगडलेलं कोडे आहे
प्रत्येक जिवात्माला हे समजेल तो दिन...
परग्रह मंडळात विसवण्याचा,
सामावण्याचाच येईल
कधीही न परतण्याचा आत्म्यातून
परमात्म्यात विलीन होण्याचाच येईल...



कवी विलास पुंडले
पनवेल रायगड

# हास्यतरंग

# मायी अधुरी दास्तान...

तिच्यावाला मेसेज पावून
मी बेज्या खुस झालो
एकटाच हासो गालात
कोनाशी नाई बोलो

गुलुगुलु मनात माया
लड्डु फुटत जाय
ते म्हने भेटू आपून
फक्त हू दे संध्याकाय

आनजो म्हने क्याडबरी
डेरी मिल्क,फाईव स्टार
तईच यीन रंगात पिल्लू
आपल्यावाला प्यार

घासू घासू निरमाश्रनं
म्या डरेस केला नवा
इस्तरी मारून टाईट
आज आपलीच हवा

शेकंद काटा मिनिट काटा
भल्ले आरामात फिरत जाय
घड्याळा इकळे पावून
जीव माया झुरत जाय

भेट्याचा वखद भाऊ
जसा जोळ आला
पैशे घेतले उसने
म्या पेशल याटो केला

सपन रंगोत रंगोत
मी ठीकानावर गेलो
तिले पावून कोपऱ्यात
मी बम खूस झालो

घसा खाकरून उलचाक
म्या इशारा तिले केला
ओढनी घेतली तोंडावर
सरमुन मले दुजोरा देला

दा मिनिट सामसूम
कोनीच कोनाशी बोले नाई
एकदम ओढनी हटव्याची
मायी हिंमत  झाली नाई

शेवटी हिंमत करून
म्या हातावर हात ठुला
वाटलं चोपळाखीर हात
खरबळ्ळा कसा झाला

खात्यापेत्या घरची हाय
म्हनून वाटलं सुदरली अशीन
काम करता करता कधी
फरशीवर घसरली अशीन

माहौल पावून मंग म्या
घेतली पुळची स्टेप
चेहरा पावून तिाा
बिघळला माया शेप

तिच्या जागी राजेहो
तिचा भाऊ आलता
असं कांडलं मले बेदम
माया पुरा घोयना केलता

साध्या भाध्या मानसासंग
अशी मज्याक कराव का?
पिरेम करतो म्हनून का
भलकुठी एप्रिल फूल कराव का?

तईपासून तसाच हावो
मी संट्या मस्तान
अदरकच्चं रायलं पिरेम
मायी अधुरी दास्तान



कवी प्रविण जगन्नाथ बोपुलकर
खेट्री. जि. अकोला



# ढिला झाला स्क्रू

हाय बायच्या जमान्यात
रामराम, नमस्कार गेले विसरून
अन् आता बाईभी गाडीवर बसते
खुशाल दोन पाय पसरून

फास्टफुडच्या जमान्यात राजेहो
वरणभात आता बोर झालं
आता हरिपाठाले रामराम
अन् झिंगाट ले वन्स मोर आलं

फॅशनच्या नव्या ट्रेंडमध्ये
काफीसुद्धा झाली कोल्ड
अन् तरण्या पोरीले लाजवेल
एवढी राजा म्हातारी बोल्ड

वेळ कुठलीभी येऊदे
दारू पेला का माणूस सटकते
अन् प्रसंग कुठला भी असो
बाई–माणूसत तेराव्यात सुद्धा मटकते

एकेकाळी कपड्याची
केवढी होती लांबी रुंदी
आता कपडा झाला सायलेंट
अन् उरली फक्त चींदी

जाऊदे बुवा ज्याचे त्याचे फंडे
ज्याचं त्यानं खुदचं भराचं
सगळ्यांचे स्क्रू ढिले झाले
साल कोणाचं टाईट कराचं

चार गोष्टी सांगितल्या त म्हणते
तू नको होऊ आता सुरू
अन् तुया पाहिले भी पायले
आम्ही महात्मा गांधीचे गुरू



कवी अमोल प्रभाकरराव चरडे



# दुखःकथा

काय सांगू बापा साहित्यिकाच्या व्यथा
लिहील तेवढ्या कमीच होईल दुःख कथा
झब्बाकुर्ता  घालुन जरासा कुठे निघे
ईकुनतिकुन टकामका अवघे जन बघे

घरधनीनची घरी राहे लयच भुनभुन
उठल सुटल की तिची चालु राहे तुनतुन
रिकाम टेकड्याचे मने हाये हे काम
तुम्हालाही नाई आता उरले कामधाम

जवा पाह्यल तवा उठसुट घेता मोबाईल
हे पन ईसरुन राह्यता तुमची हाये एक बाईल
फिरोत राह्यता  तुमी  त्याच्यावर बोट
वाटुन राहे देवा माह्य नशीबच खोटं

बायको मने मले,नोका वानवु सोताले
जिकडे तिकडे कवट्यानं कवी आता झाले
कवितेच्या नादापायी  तानभुक ईसरता
रातीले उठून चोरावानी मोबाईल हाती धरता

सन्मान पत्रासाठी कवी लयच हपापलेले
दाखौत सुटतात हेच सार्या लोकाईले
आयोजकाशीही चाले मोठी भांडाभांडी
कदीकदी याईचीच मंग गुल होते दांडी



कवी रामदास गायधने
पनवेल



# हझल

मला वाटते फुगलेल्या त्या
गालावरती हझल लिहावी
खोट्या लटक्या माझ्यावरच्या
रागावरती हझल लिहावी

नकोस वाढू जेवण इतके
तुला वाटले का मी भस्म्या
माझ्यावरच्या तुझ्या आंधळया
प्रेमावरती हझल लिहावी

डोळे मोठे करून एवढे
बोलतेस का या वेड्याशी
धाकात तुझ्या जगणाऱ्या
या जीवावरती हझल लिहावी

तुझ्याच प्रेमासाठी रानी
घरात झाडू पोछा करतो
मला पाहुनी तुझ्या खोडकर
हसण्यावरती हझल लिहावी

मला वाटले फिरकी घ्यावी
तुला सोडून जाण्याची मग्
गंगा यमुना पाझरणाऱ्या
डोळ्यावरती हझल लिहावी



कवी देवेंद्र शं. इंगळकर

# समाज सुधारक

एक दिवस अचानक माल्या डोक्यात इचार आले
समाज खूप बिघडला जरा आवर घालू त्याले ।।

भाषणातून दारूचे तोटे म्या सांगतले चटदिशी
माल्याच गाडीच्या डिक्कित सापळ्ळी नाईंटिची शिशी ।।

अंधश्रद्धेवर  मंग म्या केला भलताच प्रहार
माल्याच घरावर दिसला निंबू मिरचीचा हार ।।

ज्योतिष शास्त्र सांगो काही नसते असली
माल्याच  पोराची त्याईले कुंडली काढेल दिसली ।।

महिला  दिनाच्या रोजी बेजा गहिवरून बोललो
चारशे अठ्ठयानऊ आंगावर तरी बातनीबात भुललो ।।

संडास बांधा घरोघरी जोरात देला नारा
माल्या हाती टंबरेल पाहून सगळ्याईचा चढला पारा ।।

झाडे लावा झाडे जगवा सांगो जोराजोरात
सारी अमराई  कापून टाकली थोड्या पैशाईच्या घोरात ।।

सांगत  होतो लोकाईले स्वच्छता  मंत्र  आचरा
माल्याच  घरापूढे निंगाला पुरा खंडिभर  कचरा ।।



नितिन वरणकार
राजेश्वर कॉलनी शेगाव

# माह्य वाळलं वजंन....।



कामून माह्या तब्येतीचं, जमत नसंल भजंन
छटाकभरानं बी कमी, राजा होत नाई वजंन

रोज-रोज बायकोचे, आयकून कडू बोल
माह्याच म्या राजेहो, इच्यार केला खोलं
म्हटलं,सकायपासून रोजच, फिरणं करू सुरु
मंग झाकटीतच उठाची, सवय लागलो करू

हिवायात त् झाकटीत उठाचे, लयच येत काटे
गरम दुलई आंगावरची भाऊ, फेकाव ना वाटे
हिम्मत करुन शेवटी रोज चार मैल फिरलो
पन् घरी आल्यावर इचिभीन, दिवसभर चरलो

सकावूनचा नास्ता लयच, जब्बर देतो हानून
दुपारचं जेवन झाल्यावर, मस्त देतो तानून
संध्याकायी मात्र मी , बया-बयाच फिरतो
सांजच्याले धकाव म्हणून, पोटात जागा करतो
पोट कमी कराचं राज्या, म्या असं केलं माजोन
छटाकभरानं बी कमी, राजा होत नाई वजंन।।

लगनात जायाचचं नाइ, नियम मी पाळतो
गेलोच त् पंगतीत जेवाचं मंग होईतोवर टाळतो
सासरवाळीले गेलतो, तिथं होतं एक लगन
सासरा,साळू,साये सारे, जेवात होते मगन

मी कोपऱ्यात उभा, त्यायले पावो लवून लवून
एकही ना म्हणे सायाचा की, 'घ्या बाप्पू जेउन'
ढेरी पावून तेयले वाटे की, पोट माह्य भरलं
मलेच माहीत होतं की, माह्य सारं इंधन सरलं
उपास करुन बी पोटाचा, दिसते माह्या रांजन
छटाकभरानं बी कमी, राजा होत नाई वजंन ।।

जो तो देते बारीक व्हायचा, मले फुकट सल्ला
आयकुन त्यायाचा कवाकवा,राग येते भल्ला
कोणी सांगते आसनं , कोणी झाळते भाषणं
बायकोची बी चालू राह्यते, तेच क्यासेट घासणं

रोज सल्ले आयकुन माह्या, कटावून गेला जीव
असं वाटते देवा बाप्पा, तुलेच येवू दे रे कीव
उपास करून सायाचं, माह्य तोंड येते खुरी
शेवटी बायकोच्या हातावर, मंग देतो मी तूरी
सकावून तीले म्हटलं, येतो जरासा फिरून
बायको म्हणे खबरदार, 'येसाल भायरून चरून'

सकावून हाटेलीत मस्त गरम भजे,वळे,तयते
रस्त्यात असं दिसलं की,आपलं बी मन चयते
लय उपाय केले म्या की हरेक माणूस लाजंन
छटाकभरानं बी कमी राजा, होत नाई वझंन
कावून माह्या तब्येतीचं जमत नसंल भजंन
छटाकभरानं बी कमी राजा, होत नाई वजंन



कवी-संजय कावरे



# बिरुबाची जत्रा

लेखिका
**अंजली ढमाळ**

बिरुबाची जत्रा करायची असं खूप दिवस शिलुबाईच्या मनात येत होत. गजराची फरफट, धनसिंगचा ॲक्सिडेंट यांमुळं तर खूपच धोशा लावलेला तिनं. पण तिची तिन्ही लेकरं लिहीती-वाचली. प्रगत विचाराची. त्यामुळे तिचं म्हणणं कुणी मनावर घेईना. चतुरानं तर स्पष्टच सांगितलं ''हे बघ असं घटना आणि देव-देव यांचा संबंध जोडत जाऊ नकोस. गजराचं अन् धनसिंगचं कारण सांगतीयंस; पण त्याच काळात झुबिनला नोयडातली मोठी ऑर्डर मिळाली, नसरीनला ऑलिम्पियाडमध्ये झोनल प्राइज मिळालं, आपला गावाकडच्या जमिनीच्या दाव्याचा निकाल आपल्या बाजूने लागला हे काही चांगलं झालं नाही का? अगं देवाला माय-बाप मानतेस नं तू, मग माय-बाप कधी वेठीला धरतात का आपल्या लेकराला? तुला वर्षातून एकदा देवाची जत्रा करावीशी वाटते हे मी समजू शकते; पण आपल्याला नाही जमलं वर्ष-दोन वर्षं यायला म्हणून काय देव शिक्षा करतो होय? काहीतरी उगीच खूळ डोक्यात येऊन बसते.'' चतुराच्या बिनतोड युक्तिवादापुढं शिलुबाई गप्प बसली; पण गजराच्या मागं लागून तिनं गावाला जायचं निश्चित केलं. गावाकडचा माळ, बारव, साती-आसरा, चिंचेखालचा म्हसोबा, भगत आण्णाची देवराई आणि बिरूबा हे सगळं ओढत असायचं शिलुबाईला. इतकी वर्षं ती शहरात राहिली, तरी शहराची झाली नव्हती ती कधी.

खूप वर्षांनी सगळी गावाकडं आलेली चार दिवस सुट्टी काढून. आण्णा गेल्यापासून पोरांचं कुणाचंच मन होत नव्हतं गावाकडं जायला. आईच्या आग्रहाखातर बिरुबाची जत्रा केली. बिरुबाच्या देवळाच्या पटांगणात रात्री चांदण्यात सगळे एकत्र जेवले. भावकीला पण आवतण होतं. सगळी सख्खी-चुलत-मावस भावंडं, आत्या, माम्या, मावश्या अशा सगळ्या वेळ काढून आलेल्या. दोन दिवस घोळ्या-मेळ्यानं जेवणं-खावणं, भांडी-धुणी, गप्पा, हसणं-खिदळणं यांनी तुडुंब भरलेले. थोरली आत्या धुरपदा-राहून राहून परबती आण्णांची आठवण काढायची अन् डोळ्याला पदर लावायची. मधूनच तिनं धाकट्या

भावाच्या–गणपतच्या नावाने कडा–कडा बोटं मोडली, अन् लई बडबडली, तेच्या पायात संमदा इस्कुट झाला माझ्या आण्णाच्या संसाराचा...''

''आत्या, गप्प हो., गजराने पटकन् आत्याला कवळण घालत समजावलं. तिच्या आण्णासारखी दिसती म्हणून गजराबद्दल तिला विशेष जिव्हाळा होता. त्यामुळे गजरानं दटावलं की धुरपदा आत्या गप्प झाली अन् पडवीच्या पल्याड असणाऱ्या म्हाताऱ्याच्या (म्हणजे तिच्या वडिलांच्या) थडग्याजवळ जाऊन बसली. रात्री जेवल्यावर पडवीला आडवं झालं की चांदणं बघत बघत एकेकाला एकेक गोष्टी आठवत होत्या. धाकटी चिमणी मावशी सगळ्यांची लाडकी. तिनं लहानपणीच्या गंमती–जमती ऐकवून हसून हसून गडाबडा लोळायला लावलं. तर चिंधुआत्या चिंचेखालच्या भुताच्या अन् पाणंदीच्या भोकराच्या झाडाजवळ कित्तीजणांना झपाटल्याच्या हकीकती सांगायला लागली तेव्हा एकेकजण पांघरूण घट्ट ओढून अंगावर घेत शेजारी झोपलेल्याला आवळून धरु लागला. मध्यरात्रीनंतर गार वारा सुटला तेव्हा एकेकाचा डोळा लागला. गजरा एकटीच जागी होती. तंद्रीत गेलेली.

– 'माझ्या श्रीरंगाऽऽ, अस मध्यान्हरातीला उधाण येता विरहाच्या उष्ण लाटांना. आज तर चैत्री पुनव अन् तू हृदयात पावा घुमवत राहतोस. तुझी वेडी मीरा इकडं–तिकडं सैरभैर शोधत राहते तुला, त्या कस्तुरीमृगासारखी. अन् निष्ठुरा, तू मात्र माझे बावळेपण न्याहाळत हसत असतोस गुपचूप, माझ्या हृदयात बसून. खरंतर रात काय अन् दिवस काय, पुनव काय अन् अवस काय; तुझा पावा कधी थांबलाय का रे माझ्या रंगरायाऽऽ? समोरच्या आंब्याच्या गर्द घेऱ्यात दिवसभर कुहूकुहू करत बसतोस... कश्शाकश्शात लक्ष लागू देत नाहीस.... पण अजून थोडं उजळच असतं रे अवकाश, कसं यायचं सांग... म्हणून सारी असोशी कमरेशी खोचून चुपचाप सगळी पसरलेली घरकामं निगुतीनं आवरते... हळूहळू अगदी काळोखलं, म्हणजे मग चांदण्यांची कलमकारी केलेली चंद्रकळा लपेटून येते तुझ्या भेटीला... मग तुझ्या पाव्याचे सूर झुळझुळत असतात साऱ्या आसमंतात... चांदण्यांचा पदर विरघळून टाकतो आपल्यातली रंगांची विलगतेची रेषा.. अन् हृदय झालेलं असतंय कालिंदीचा अथांग डोह... असीम तृप्ततेचे, नीरव शांततेचे लयदार तरंग हलकेच स्पर्शत असतात अस्तित्वाला... अन् उरतं केवळ श्री–ब्रह्म!'

– श्रीरंगाची वेडी मीरा... श्रीरंगच्या कल्पनेनं शहारून गेलेली गजरा. पुन्हा वास्तवात आली. पुन्हा तिचं स्वगत सुरु– ' श्री, आयुष्यात पडलेला खड्डा नेहमीच वाईट किंवा धसवणारा असतो असं नाही रेऽऽ. कधी असंही होतं की वेगवेगळ्या आघातांनी आपण उकरले जात असताना अचानक एखाद्या घावानं काळजातला खोलवरचा उमाळा फुटतो अन् या उमाळ्यातून वाहतां झालेला जिवंत झरा– आयुष्याच्या खळग्याला जीवनानं भरुन टाकतो. असंख्य तहानल्या जीवांची तगमग शांतवणारा जिवंत झरा– असा वेदनेतून जन्माला येतो, माझ्या श्रीरंगाऽऽ!!'

सगळ्यांची गाढ झोप लागलेली. गजरानं उठून पडवीतल्या रांजणातलं पाणी प्यायलं. समोरच्या बोरीच्या झाडाखालचा पटांगणात चालू लागली. चालता चालता तंद्री लागली–

'लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीला आलं की या शेजारच्या पेरुच्या, कवठाच्या झाडावर आपण आख्खा दिवसच्या दिवस काढायचो. जांभळीच्या फांद्या कुडकन् मोडतात म्हणून त्या झाडावर तेवढी आजी कुणाही पोरांना चढू दयायची नाही. आपल्याला ओल्या बोरांपेक्षा सुकलेली बोरं खूप आवडायची. तीव्र आंबट रस सुकून थोडीशी आंबट–गोडसर झालेली बोरं फ्रॉकच्या खिशात भरून घ्यायचो. चघळत राह्यचो. नात्याचंही असंच आहे. ताज्या नात्यातल्या आंबटपणाने जीव आंबून जातो. नातं पक्क होईल तसं मधुर होत जातं, नंतर तुझं–माझंपणाचा सगळा गर आळून जातो. एकमेकांत मिसळलेल्या आम्ल–मधुर चवीसारखी पक्क नाती. श्री, आपलीही बोरं सुकलीत रे! सलग दहा वर्षांत किती उधाणलो, किती धुसफुसलो पण पुन्हा एकमेकांच्यात तितक्याच तीव्रतेने विरघळलोही. आता कसला रे रोष आणि कसला संदेह एकमेकांबद्दल. एकमेकांच्या कृतींचे काय अर्थ लावत बसायचे रे. शब्दही न उच्चारता कळतात आपल्याला एकमेकांच्या भावना आणि तू हे बोलणं–भेटणं बंद करून कुठं बरं चाललायंस आपल्या मीरेपासून तुटून. सगळी जग–दुनिया; नव्हे अगदी तू स्वतःही काहीही महणालास तरी मला माहीत आहे, तुझी मीरा तुझा अविभाज्य भाग आहे. प्रेमाचा गाभा काढून टाकल्यावर नुसता आगीचा लोळ राहशील तू – स्वतःलाही जाळून टाकशील. माझ्या

तेजःपुंज कर्तृत्वसूर्या, अरे आसपास बघ, भोवताली किती उलथापालथी चालल्यात, तुझ्या वाणीची, लेखणीची कधी नव्हे इतकी गरज आहे. आणि काय हे चौकश्या अन् सुनावण्या करत बसलोय आपण! तुला कसलीही तोशीस लागणार असेल तर त्याआधी ती मला लागलेली असेल श्री. तुली शपथ; तू माझ्या बाजूने निश्चिंत राहा. मला तुझ्याशी संपर्क साधायचे सगळे रस्ते बंद केलेत तू. काय करू रे! कसे सांगू तुला, आता ह्या आसमंताला, या वाऱ्याला, या चांदण्याला सांगते – तू डोळे मिटून हृदयावर हात ठेऊन ऐक. तुला सगळं खरं समजेल श्री. आपण दोघं मिळून खूप काम करु. सद्भावनांचे वारे पसरवू साऱ्या आसमंतात. प्रेमानं हृदयं शांतवू. भेदांच्या द्वेषांच्या अग्नीवर प्रेमाचं शिंपण करु.

अरे किती किती कृपा आहे चराचराची की त्याने आपल्याला भेटवलं! अरे किती लोकं आसपास पाहात असते, ज्यांना अगदी चपखल जोडीदार भेटलेला नसतो अन् मग हृदयात अखंड पेटता रहतो वणवा आत्मशोधाचा. अशावेळी तू अगदी तेजस्वी ताऱ्यासारखा लखलखत असतोस माझ्या हृदयाकाशात. तुझे तेज अन् करारीपणा अगदी उठून दिसतो इतरांपुढं. तुझं असं संदेहाच्या आगीत भस्म होणं मान्य नाही निसर्गालाही. तुझं लिखाण, तुझी व्याख्यानं, तुझं संशोधन, तुझं संपादन सारं सारं आठवत असतं सतत. तुझं बळ असणाऱ्या या आपल्या नात्याबद्दल, तू चालत असलेल्या रस्त्याबद्दल संदेह मनात आणून स्वतःला धसवत नेऊ नकोस सुमारपणाच्या गाळात. तुझी मीरा तुला साद घालतेय श्री'. – बोरीच्या बारीक गोल पानांतून अन् छोट्या छोट्या काट्यांतून दिसणाऱ्या चंद्राकडं बघत गजराची तंद्री लागलेली.

''गेरे ऽऽ! तिकडे काय करतीयंस?'' लघवीला उठलेल्या रजुमावशीनं हाक मारली; तशी गजरा दचकली.

''काही नाही; झोप लागेना म्हणून चांदणं बघत होते.''

'' तिकडं बोरीखाली गेलीयंस व्हंय येडयावानी. इच्चू–काट्याचं भ्या हाय का न्हाय तुला. चल झोप बघू.''

गजरा पडवीवर येऊन धुरपदा आत्याच्या कुशीत शिरली.

सकाळी अंघोळी, चहा, नाष्टा, दुपारची जेवणं आटपून सगळे पाहुणे निघाले. धुरपदा आत्याला पुन्हा रडू फुटलं, शिले, गज्या परागंदा झाला, चतुरीनं मनाचा दादला केला. गजरीचं पण लगीन रखडलंय. अगं, आता धनसिंगचं पण शिक्षण पुर्न झालंय, चांगला कमवतोय. आता तू जरा कंबर बांध आन् दोघांचं एकाच मांडवात उरकून टाक. मला नुसती हाळी दे, मी समदं करायला येते. माझ्या आण्णाच्या लेकरांचं जिथल्या तिथं झालेलं बघितलं म्हंजी डोळं मिटायला मोकळी झाले. बिरुबाऽऽ, तुझं लक्ष राहू दे रं बाबाऽऽ ! डोळे पुसत धुरपदा आत्या नातवाच्या गाडीत बसली. मामी, मावश्या सगळ्यांना उराउरी भेटून वाटेला लागल्या. धाकटी काकू निरोप घेताना शिलुबाईच्या पाया पडायला लागली. शिलुबाईनं झटकन् पाय मागं घेतेले अन् घरात निघून गेली. काकू लेकाच्या गाडीवर बसून गेली. सगळे पाहुणे कोपऱ्यावरुन वळेपर्यंत ही तिघं भावंडं हात दाखवत उभे होते. नंतर चतुरा घरात गेली, '' आई, का गं तशी निघून आलीस? बरं दिसतं का ते? तिला कसं वाटलं असंल?

तिच्या नवऱ्यामुळं आमच्या सगळ्या आयुष्याचा खेळखंडोबा झाला; अन् माझ्या पाया पडायला आलीय. काय आशीर्वाद देऊ तिला?''

आई, झालं गेलं, सरलं सगळं. ते दिवस तसेच राहिले का?? कशाला राग धरायचा. पुढे चालत राहायचं.''

'' कसं सरलं गं? २५– ३० वर्षं वणवा लागलेला माझ्या संसारात. सोन्यासारखा बाप तुमचा, पण माणसातनं उठला. पार त्याची बुद्धी फिरली त्या मुळं. पहिली पाच वर्ष सोन्यासारखा संसार होता. पण घरचं बघता येईल म्हणून गावाजवळ बदली करून घेतली तुझ्या आण्णांनी. आणि तेव्हाच हा गणप्या गोदीतनं आला. तिथं जाबर होता हा ढोकऱ्या. त्याची भिरभिर नजर सारखी काहीतरी शोधत असायची. भ्या वाटायचं. ह्याची नजर माझ्यावर पडली तशी अवदसा शिरली घरात. तू आता कळती आहेस, शंभर बायांत उठून दिसंल अशी होते मी तेव्हा. आपल्या सगळ्या पाव्हण्यात कुणी नव्हतं असं. ठसठशीत नाक–नक्शा, टचटचीत बांधा, शिवाय चार बुकं शिकलेली. तुझ्या बापाला कोण अभिमान वाटायचा माझा. पण ह्या डोमकावळ्याची वाईट नजर पडली, मी भीक घालत नाही असं दिसलं तसं ह्यानं भावाचे कान भरायला सुरुवात केली. अस्तनीतला निखारा आहे हा गणप्या. काहीही कारण नसताना नुसता संशय– नुसता संशय घेऊन घेऊन तुमच्या बापानी लई गं छळलं मला. प्यायला लागला. तुमचा बाप

काळा-सावळा, नाकी-डोळी बेढब. गणप्या देखणा पुतळा न् त्याची बायको ढबी!त्याला माझी हाव सुटली. काहीही करुन मी दाद देत नाही म्हटलं की रोज नवीन काडी टाकायचा, तुझ्या बापाच्या पुढं पुढं करायचा, त्याचा अहंकार कुरवाळायचा अन् माझ्याबद्दल नाही नाही ते विष त्याच्या मनात कालवायचा. इतका स्वच्छ मनाचा असून पण तुमचा आण्णा कसा त्या संशयाच्या भुताटकीला बळी पडला कुणास ठाऊक. हळूहळू घराचं सगळं वासं फिरलं. त्यांनी पिऊन शिव्या देणं, मारहाण करणं हे सवयीचं झालेलं मला. नंतर नंतर तर 'हीच साडी का नेसलीस, वेणीच अशी का घातलीस, इतका वेळ आरशापुढं का अभी राहिलीस', असा प्रत्येक गोष्टीत संशय घ्यायला लागले. जगणं मुश्किल झालं. स्वतःच्याच घरात कैदी झालेले मी अन् ते स्वतःच्याच मनातल्या संशयाच्या चिखलात रुतत चाललेले.

संशयानं संशयानं त्यांचं सोबत झोपणंही कमी कमी होत संपलं. सगळी कपडे काढून चाचपून चाचपून मारायचे मला. तुम्ही पोरं तिथंच झोपलेले असायचा. मला मेल्याहून मेल्यासारखं व्हायचं. डोळ्यांदेखत उध्वस्त होत चाललेलं सगळं अन् काही करु शकत नव्हते. जगण्याची उमेद संपत चाललेली. शेवटी आपलं काहीही झालं तरी लेकरांना झळ लागू द्यायची नाही एवढी खूणगाठ मनाशी बांधून माझं- आमचं नवरा-बायकोचं जगणं- मरणं बाजूला ठेऊन नेटानं तुमच्या शिकवलं. पुस्तकांशी जोडून दिलं. तुमचा बाप शुद्धीत असला म्हणजे तळमळत राहायचा तुमच्या विचारानी पण त्याच्यात कसलीच ताकद राहिली नव्हती. त्याचं कामातलं लक्ष उडालं. खंगत गेला. त्यातंच गाव सोडलं. तुला मामा स्वतःकडं शिकायला घेऊन गेला. धनुची नवोदयला निवड झाली. गज्या शिकला पण सतत सैरभैर असायचा. गजरी गप गप होत गेली. सगळी पांगली, मुळाचा सांधा निखळल्यासारखी. तुम्ही मुलं मोठी झाल्यावर एका वर्षी जत्रेला गावी आलेला तेव्हा कुणाकडनं तरी तुमच्या आण्णांना गणपतचं खरं रुप कळलं. तेव्हापासून स्वतःला कोसायला लागले. आणखी नशेच्या आहारी गेले. मग गणपतची एकेक कारस्थानं त्यांनी उघड्या डोळ्यांनी तपासली. गणपतने जमिनीचे रेकॉर्डचे घोळ घातलेले पाहून ते त्याच्या अंगावर धावून गेलेले. पण त्या धट्ट्या-कट्ट्या दांडगटापुढं तुमच्या खंगलेल्या बापाचं काय चालायचं. तेव्हा लई मुक्का मार बसलेला त्यांना. तिरमिरीत येऊन त्यांनी गणपतच्या विरुद्ध दावा ठोकला. त्याचा निकाल लागला आपल्या बाजूनी, पण हे बघायला ते आहेत का?- शिलुबाईला रडू आवरेना.

आई, शांत हो, मला आणि धनसिंगला एवढं सगळं माहीत नव्हतं. गजरा लहान होती आणि आण्णांची लाडकी. तिनं हे सगळं खूप जवळून बघितलं. आई-बाप असूनही पोरकेपण भोगलं. कदाचित त्यामुळं भीती बसली तिला. लग्नाचं नावच टाकलं तिनं. त्या काळात पुस्तकंच तिचे सोबती होते . पुस्तकांच्या सान्निध्यात तिचं तिनं जगण्याचं तत्वज्ञान ठरवून घेतलं. प्रेमाला आसुसलेली पोरगी भरभरुन प्रेम देत राहिली सगळ्या नात्यांना. आणि तिच्याबाबतीत......'' चतुरान दीर्घ उसासा सोडला अन् उठून रांजणाजवळ जाऊन बसली. गजरा पिंपळाच्या झाडाखाली बसली होती आजी-आण्णांच्या थडग्याजवळ. धनसिंग वाड्यातल्या पोरांबरोबर विहीरीवर गेलेला. झुबिन नसरीनला थोपटत आंब्याच्या झाडाखाली बाजेवर आडवा झालेला.

'' गजरा, चल आवर. म्हसोबाच्या माळावर जाऊन येऊ. आडवणीच्या खोबऱ्या आंब्याच्या कैऱ्या पण आणू.''

गजरा आणि चतुरा चालू लागल्या. खूप दिवसांनी आई इतकी रडली. बरं झालं एका दृष्टीनं. मोकळी झाली. अगं, झोपेत पण दात खायची ती. खोलवर रुतलेलं काही-बाही झोपेत व्यक्त होतं असं शैली सांगत होती.''

''मलाही फार कधी बोलली नव्हती ती. अर्धं-मुर्धं कळायचं कुठल्या प्रसंगांनी. मला ही या गोष्टींत कधी खोलात जावंसं वाटलं नाही. त्या दोघांची भांडणं बघून तिडीक यायची डोक्यात. मामाकडे शिकायला असल्यानं असेल कदाचित, पण सुट्टीच राहिले मी त्या दोघांपासून.

'' तू मामाकडे, धनु नवोदयला. मी आणि गज्याआप्पाच इथं असायचो. गज्याआप्पा कळता होता. आणि तापट. आईचे हाल बघून भयंकर चिडायचा. 'त्या काकाचा जीव घालवीन' म्हणायचा. आण्णांशी पण वाद व्हायचा. आई त्याला गप्प बसवायची. अभ्यासात लक्ष दे म्हणायची. चिडीपोटी तो खूप अभ्यास करायचा. पण त्याचं घरातलं लक्ष उडालं. कुठल्याशा प्रोजेक्टवर काम करायला घरातून निघून जाण्याच्या आधी सारखं ते गाणं लावायचा आणि

मला अन् धनुला घेऊन नाचायचा, ‘आ चल के तुझे मैं ले के चलू ’. तो जिथं कुठं असेल तिथं त्याला त्या गाण्यातल्यासारखं प्रेमानं भरलेलं आभाळ मिळालेलं असू दे एवढीच प्रार्थना.

गजरे, असं प्रेमाच्या अन् शांततेच्या शोधात धावत राहून ते मिळत नाही गं. आग विझावी म्हणून पळत सुटलं की वाऱ्यानं कसा आणखी भडका होतो, तसा वणवा पसरत जातो मनात. हं! कोण यायचं शिंपायला भुकेल्याची पेटलेली झोळी. आपणच आपल्या ममतेच्या हातांनी द्वेषाची खडी–माती बाजूला सारुन निवळशंख काळजानी प्रेमाची दुनिया उभी करायची. रक्ताच्या न् जोडलेल्या अशा सगळ्यांना, आपल्या दुनियेत पाय ठेवलेल्या प्रत्येकाला मनापासून जीव लावत राह्यचं– कुठला हिशेब न करता. हृदयात प्रेम भरुन असलं की शांतता आपोआप येते. भले कुणी देऊ, नाहीतर नाही देऊ. हं! गजूआप्पा डोक्यात राख घालून घ्यायचा. झाला परागंदा, वाऱ्यावर आयुष्याचा चिंधा..

दोघी चालून चालून दमल्या. खाशाबा तात्याच्या बारवेपाशी पोहोचल्या. पाणी खोल गेलेलं. दोघी पायऱ्या उतरून आत पाण्याजवळ जाऊन बसल्या. जीव कोंडणाऱ्या धगीतनं एकदम गारव्याला आल्या. गजरा पुढे बोलू लागली, ‘‘आण्णांच्या त्रासानं व्यापलेली आई सगळा राग माझ्यावर काढायची, अभ्यासात जरा काही चुकले की मारायची. नंतर जवळ घेऊन स्वतःच रडायची. काकांचं खरं रुप कळल्यावर पश्चात्तापात ते स्वतःला जाळत राहिले. आईची क्षमा मागायचंही बळ त्यांच्यात राहिलं नव्हतं. ‘इट वॉज व्हेरी पेनफुल दॅट ही हॅड लॉस्ट द पर्पज ऑफ लाईफ. ही हॅड लॉस्ट द मीनिंग’. आपण आपल्याला बदलण्याइतकं लवचिक राहायला हवं असे खूप पोटातून वाटायचं आण्णांकडं बघून. शेजारी–पाजारी, पाहुणे , नातलग आई– आण्णांची मापं काढायचे. आई सारखी आजारी पडायची. मग खूप काम पडायचं. आण्णांच्या व्यसनापायी घरात चणचण असायची. मग शक्य तितकी काटकसर करायची. एकच ध्यास असायचा– नेटानं अभ्यास करायचा, आई– आण्णांना सुखात ठेवायचं. त्यांची दुभंगलेली मनं सांधायची. पण ती दोघंही तुकडे पडून विखरुन गेली. नैसर्गिकता हरवून बसली. त्यांच्याबरोबर त्यांच्या लेकरांचंही आयुष्य उजाड होत गेलं. लग्न, जोडीदार, सहजीवन आणि बंधनं या सगळ्या बाबतीत माझं मन बंड करून उठायचं. काहीही झालं तरी मी अशा रिजिड व्यवस्थेत प्रवेश करणार नाही आणि कुणालाही बांधून ठेवणार नाही, अशी खूणगाठ बांधली मनाशी. जोवर प्रेम जिव्हाळा आहे तोवरच सोबत राहायचं. जिव्हाळा आटला की बिनशर्त निघायचं. जिव्हाळा असेल तरच थांबावंसं वाटतं ना गं? ह्या बारवेत म्हणून तर आपण पायऱ्या उतरुन आलो नै? कोरड्या विहिरी न् कोरडी नाती काय कामाची.

खरंय गोऽऽ माझे गजरु–राणी! चतुरानं बारवेत पाय सोडून, पाण्यानं भरलेली ओंजळ उंच आकाशात उडवली. सूर्यकिरणं भरल्यानं खाली येताना हिऱ्यांसारख्या दिसणाऱ्या त्याच्या टपोऱ्या थेंबांकडं पाहात म्हणाली, सगळ्या दुनियेत जिव्हाळा पसरु दे रे बाप्पा बिरुबाऽऽ!‘‘

गजरानं की कुर्तीच्या खिशातला बंदा रुपया बारवेत सोडला आणि बारवेतली ओंजळ भरुन डोळ्यांना लावली. ‘‘सगळ्यांचं आयुष्य जिव्हाळ्याच्या गारव्यानं भरुन राहू दे बारव–मायेऽऽ. संदेहाचा पाचोळा अन् गाळ निघून जाऊ दे. निवळ निवळ होऊ दे प्रत्येक हृदय गे मायेऽऽ

❖





# ईदी

लेखक
**प्रविण जगन्नाथ बोपुलकर**
खेट्री, जि. अकोला

उद्याचा दिवस खास होता, खूप स्पेशल कारण एक महिना अल्लाहप्रती व्यक्त होणारा भक्तीभाव काल ईदचा चंद्र दिसल्याने उद्या रमजान ईद म्हणुन सर्व मुस्लिम बांधव साजरा करणार होते. एक महिना सलग न चुकता रोज्यासाठी उठवणारा तो फकीर असो कि दिवसभर अन्न पाण्याचा एक कणही न खाता–पिता उपवास करणारे मुस्लिम बांधव आज उत्साहात ईद साजरा करणार होते.

संध्याकाळची मगरीपची अजान झाली आणि उद्या ईद साजरी होणार अशी घोषणा मशीदीच्या भोंग्यावरून कानावर पडताच दत्ताच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला.

त्याने आजोबाच्या धोपटी (सलून कारागीराची छोटी लोखंडी पेटी) काढली त्यातले जुने सामान बाजुला काढुन एक छोटा आरसा बाहेर काढला. तो ओल्या कपड्याने पुसला व त्यात चेहरा बघू लागला पुन्हा आनंदाने नाचत नाचत तो ग्रामपंचायतच्या ओट्यावर गेला. तिथे नीतू व रमश्या कांच्या खेळत बसले होते. त्यापैकी नीतू दत्ताचा शेजारी अगदी लहानपणापासून प्रत्येक गोष्टीत दोघेसोबतच आणि रमश्या हा दत्ताचा जिगरी दोस्त.

''ओय, नीतू ओय रमश्या आपल्या इकळून सकाय मुख्तारच्या हटेलीत पार्टी तुमाले, भजे खा, वळे खा जे म्हनसाल ते'' दत्ता आवाज देत बोलला,

''का रे बॉ, गठोळं–बिठोळं सापळलं की काय मळीत? का गळीवर गेलता अर्ध्याराती झामल्याले, दमळी नसते खिशात अन् उडया मारून रायला, घरी नाई दाना अन् बाजीराव म्हना अशी गत हाय, ये बस सत्ता लावनी खिऊ'', नीतूने उत्तर दिले,

''अबे तसं नाई एक आयडीया हाय मायाजोळ, सकाय ईद हाय सकाऊनच्या पायरी मुसलमान लोक नमाज पडून आले अन् आपुन त्यायले आरसा दाखोला की ते ईदी म्हनून आपल्याले रुपया दोन रूपये देते.... हा पाय म्या आरसा आनला साफसूफ

करून'', दत्ता एका झटक्यातच बोलला,

''ओय, हे हलकट काम नोको शिकू रे आमाले'' रम्श्याने प्रतिउत्तर उत्तर दिले,

''अरे, तुमी नोका मांगुना.... मीच मांगतो तुमी फक्त नदी जोळच्या बाभुयच्या झाडावर चढून फक्त मले मुसलमान आलें की इशारा करजा. मी हजार हावो आरसा घेऊन'', दत्ताने अधिक स्पष्टोक्ती केली,

'' मंग ठीक हाय, का रे बॉ नीतू तुले काय वाटते?'', रम्श्यान पत्ते पिचत विचारलं,

''ठीक हाय, सकाय माया बुडा नाई घरी काई वांदा नाई जाऊ पन लवकर यिऊ'', नितूने उत्तर दिले,

''तुमी दोघं जाता अन् मी एकटा का अथी भारे बांधू'', शेवटी रम्श्याने सोबत येण्यास होकार दिला.

दुसऱ्या दिवशी आठ वाजता नदीच्या पुलावर भेटले. तिथुन नितू आणि रम्श्या हे बाभळीच्या झाडावर चढून ईदगाहवरून येणाऱ्या मुस्लिम बांधवांची वाट बघू लागले. दत्ता हातात आरसा घेऊन मनात आज किती पैसे जमतील त्याचे नियोजन कसे करायचे? या दोघांना पार्टी देऊन घरी काही पैसे देता येतील का? याचा विचार करु लागला.

जवळपास पावणे नऊच्या दरम्यान ईदगाहच्या रस्त्याने परतणारे घोळके दिसायला लागले तसे नितू आणि रम्श्याने दत्ताला इशारा केला.

तो आपला आरसा घेऊन सर्वात पुढे उभा राहिला, मुस्लिम बांधव जवळ येताच तो आरसा दाखवायचा आणि म्हणायचा, ''चाचा ईदी''.

यावर कोणी रुपया दोन रुपये त्या आरशावर ठेऊन पुढे जायचा,हे सर्व बाभळीच्या झाडावरून नितू आणि रम्श्या बघत होते आणि आनंदात एकमेकांसोबत काहीतरी कुजबुजत होते. जवळपास अर्धाएकतास दत्ता फिरत राहिला आता खिशात पन्नास साठ रुपये जमा झाल्याचा अंदाज त्याला आला होता.

लोकांची गर्दी ओसरली हे त्याच्या लक्षात येताच तो धावत–धावत बाभळीजवळ आणि बोलला,

'' चलो दोस्तो,आज जलवा करते है'',

यावर तिघेही जोरात हसले आणि निघाले,गप्पा मारत ते मुख्तारलहूर हॉटेलात शिरले आणि दत्ता ऑर्डर देत बोलला, ''मुख्तार भाई तीन पिलेट भजीया खटाई और चटणी लगाके'',

''हां हां... आज सबेरे सबेरे'',

तिघेही भजे खाण्याचा मनसोक्त आस्वाद घेत होते त्यात आवर्जून नितू ईदीच्या पैसे देण्याबद्दल विचारत होता मस्त कल्पना आहे प्रशंसा करत होता आधी नाही नाही म्हणणारा रम्श्या हो ला हो लावत होता. मध्येच जोरात तिघे हसत होते

अचानक नितुच्या पाठीवर जोरात थापड बसली, बघतो तर समोर नितूचे वडील हातात एक लांबसडक काठी घेऊन एकदम रागात दत्तात्कडे बघत होते,

पुढच्याच क्षणाला त्यांनी नितूची कॉलर ओढली आणि बोलले, ''का रे मादरचोदा, ईदी मांग्याले जातं होना, भिकारचोटा,घरी खायाले नाई का रे कुतळ्ळ्या वानाच्या'',

त्यांनी शिव्याची व रट्ट्याची बरसात लावली होती,कुणाला नेमकं काय झालं? काहीच कळेना, रम्श्या आणि दत्ता फक्त चोरासारखे बघत होते आणि नितू मुकाट्याने मार खात होता शेवटी मुख्तारभाई आडवा आला,

''क्या भौ,इतना क्यू मार रहे बच्चे को,ईदी ही मांगी है ना कोई पाप थोडी किया है'',

''तु तेरा काम कर मुझे मत सिखा'', असं म्हणत त्यांनी नितूचा हात धरला व भरबाजारातून सपासप मारत मारत घराच्या दिशेने निघून गेले.

प्लेटमधले अर्धे भजे तसेच शिल्लक होते दत्ता व रम्श्याच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या.

दत्ताच्या मनाला खूप पश्चाताप होत होता कशाला आपण याला सोबत चल म्हटलं ? आपल्यामुळे बिचाऱ्या नितुला मार खावा लागला....खरचं ईदी मागणं हलकट काम आहे का ? असे एक ना अनेक प्रश्न त्याच्या बालमनाला सतावत राहिली. ❖

**दिवाळीचा सण येता**
**मनी आनंद जाहला**
**साऱ्या नात्यांचा सण**
**गोफ प्रेमाचा विणला**

–मनिषा शिरटावले
सातारा



# घुसमट


लेखिका
**रंजना कराळे**
अमरावती


प्राजक्ताची झाडाखाली जमिनीवर विखुरलेली, नारींगी देठांची नाजुक, सुंदर फुले अलगदपणे वेचतांना लहानगी मुग्धा हरखली होती. ती एकेक फूल हाती घेऊन निरखीत होती. त्याला डोळे मिटून हुंगत, आपल्या फ्रॉकच्या ओच्यात टाकतांना तिच्या निर्व्याज मनात गुदगुल्या होत होत्या. मधूनच पानांमधून एखादं फुल टपकन् खाली पडलं की ही उडी मारत ते फुल अलवारपणे ओंजळीत घेत असे.

प्राजक्तफुलाच्या पखरणीचा हा रम्य सोहळा अनुभवतांना मन कसं इंद्रधनुष्यी होतं, त्याची परिसीमाच नाही.

'' मुग्धा ....ए मुग्धा...अगं फुलं आणतेस नं..?''

आतून आईची हाक ऐकली तशी मुग्धा उठली. ओचा पकडूनच ती आत गेली. अन् देवापुढच्या परडीत तीनं फुलं ठेवली. निरागसपणे आपल्याच तंद्रीत बडबडत असलेल्या मुग्धाच्या हालचाली निरखत, सोनल कपड्यांच्या घड्या करत होती. इवलीशी सहा वर्षांची मुग्धा कशी मोठी झाली कळलंसुद्धा नाही. सततच्या वर्तमानपत्रातल्या, सोशल मिडिया व्दारे कानावर पडणाऱ्या बातम्यांनी अंतर्मन ढवळून निघते. या भावनाशून्य काळात कुणी स्त्री सुरक्षित नाही. कायद्यानं मिळणाऱ्या न्यायाचीही शाश्वती नाही. जेंव्हा तो मिळतो, बरेचदा खुप उशीर झालेला असतो. असे भयावह प्रसंग एखाद्या स्वप्नासारखे भासतात, की जाग आल्यावरही मनात शिरलेला आगडोंब कमी होत नाही. मुग्धा जन्माला आल्यापासून सोनलच्या मनात एक अनामिक धास्ती होती. क्षणभरही ती डोळ्याआड झाली की हिला चैन पडत नसे.

सोनल विचार करायची, तिचं लहानपण...... अगदीच अविस्मरणीय, ती मामा आणि

मावशीकडे अश्शी रमत होती. तो काळ, केवढा मन ओथंबून टाकणारा होता, काय भरभरुन जगली होती ती. मनाच्या निर्व्याज पटलावर कोरलेले ते क्षण.. कधीच संपू नये असं वाटणारे. दिवसभर मामेभावंडांसोबत ते खेळणं काय.. गप्पागोष्टी.. लपाछपी काय... सारंच खूप छान, अलवार होतं.. मामाच्या घरासमोरच्या तो ऐसपैस मोठ्ठा ओटा. त्यावर बसलेली आजोबा लोकांची मैफिल. अन् हास्याचा प्रचंड गडगडाट.. वेळ कसा निघून जात असे... कळत नव्हतं. सगळी किती प्रेमळ. जिव्हाळ्यानं वागणारी, मन जपणारी. प्रत्येकाशी जुळलेला तो ऋणानुबंध.... अजूनही आठवतो. इकडे आई–बाबांना कसली.. कसलीच फिकीर नाही. विश्वासाच्या धाग्यांनी विणलेलं, एकमेकावरचं ते प्रेमाच्या सुगंधाने घमघमणारं नातं, केवढं हृदयाशी भिडणारं होतं ते..

शुद्ध तुपाचा लाडू हातावर ठेवतांना आजी मायेनं चेहऱ्यावर हात फिरवी,''घे माझे बाई... तु तर माझी दुधावरची साय...''. असं म्हणून ती हळूच गालाची पापी घेत असे. तो तिचा ममताळू स्पर्श सतत हवाहवासा... मामीचं रुप तर अजुनही मनात किणकिणत असतं. कित्ती प्रेमळ.. घरभर फिरताना तिच्या पायातल्या तोरड्या छुमछुम वाजत. तो स्वर अजून रोमारोमात थिरकतोय. मधूनच मामी हातात गोड सोनपापडी ठेवायच्या... अन् म्हणायच्या, ''सोनल, चला गरमागरम वरणभात खायला... आवडतो नं तुम्हाला.''

तिनं असं म्हटलं की सारी भावंडं एकच गलका करायची. गोलात जेवायला बसणं तर खुप आवडायचं. मामा तर हृदयाच्या कोंदणी जपावा असा ठेवा. वात्सल्याचा निखळ झरा.. मायेनं ओथंबलेला.

मामा सगळ्यांना घरात तिची काळजी घ्यायला सांगत. म्हणत की अरे ती पाव्हणी आहे, ती काय इथे थांबायला आली आहे?...'' असे हे मामा तिला खुप आवडतं. ते काहीबाही आणत खायला. बाहेर फिरायला घेऊन जात. सोनलला खूप साऱ्या वस्तु घेऊन देत. तिला भारावल्यासारखं व्हायचं. आजोळातले ते दिवस पंख लावून भुर्रकन् उडून जात.

ती विचार करत होती.. काय ते दिवस. आज मुलीला एकटं कुठे पाठवणं तर स्वप्नवत झालं आहे. मनं कशी बुरसटून गेलेली. कुणी कुणी म्हणून विश्वासार्ह राहिलं नाही. किती भयंकर घटना रोजच कानावर येतात आणि जीवाचा थरकाप होतो. इवल्या इवल्या जीवांना मोकळेपणाने जगताही येऊ नये?..

बदललेल्या ह्या अतिमॉडर्न काळात नातीही बोथट झाली आहेत. जिव्हाळ्याची घरं पार मोडकळीला आली आहेत. सततच्या काळजीनं तिचा जीव कासावीस व्हायचा. अजून तर लेक मोठी व्हायची आहे. केवढा अमर्याद, अथांग असा हा जीवनप्रवास पार पाडायचा आहे. एका जीवघेण्या भयानं तिचं मन गोठून जात असे.

''आई, आई... बघ ना गं... मी कसा हार केलाय प्राजक्ताचा..'' ती हातात तो हार घेऊन आईकडे आली.

त्या नाजुक प्राजक्तपुष्पाकडे पाहात सोनल आणखीनच भावनिक झाली. अशा ह्या सुकोमल फुलांसारखीच ना माझी मुग्धा.... मला जपायचंय तिला अन् वाचवायचंय त्या विखारी वासनांध किड्यांपासुन.

सोनलनं तिला कुशीत ओढून घेतलं. तिचे पटापट पापे घेतले. मुग्धाला.. त्या निष्पाप जीवाला कळत नव्हतं आईला काय झालं ते.. जगातल्या ह्या राक्षसी रुपाला न ओळखणाऱ्या, निर्भेळ मनाच्या मुग्धाला घट्टपणे कवटाळत, तिच्या मस्तकावर अश्रुफुलांचा अभिषेक करत सोनल बसून होती. एखाद्या कराल भयसर्पाच्या विळख्यात असल्यासारखी.... ❖

**दारी लावा गं तोरण**
**आली दिवाळी दिवाळी**
**दीप लावा कोनाड्यात**
**रात उजळेल काळी**

– रंजना कराळे

# भामटे साधू



लेखक
**प्रविण म. सोनोने**
मु. पो. ता. दारव्हा

दोयपारच्या टायमाले , गावात दोन साधू पयदल येतानी दिसले.. गाव लय सामसुम व्हतं...! साधु सीधे वळाच्या झाला जौळ आले... धर्माले त्यायन ईच्यारलं का 'कपीलेश्वराचं देऊळ कुठ हाये..'

धर्मानं त्यायले देऊळ दाखोलं ''तं म्हाराज मने माह्या संग चाल तीतरोक ''

धर्मा त्याले घेउन सन्या देवळात. गेला....! धर्माले जरासाक संशय आला? 'दोनी सादुले, कवाच नाई पायलं! इथं कायले आले असतीन'.. मनात ईच्यार ये पन जावु द्या...! फालतू चौकस्या कायले कराव...! मनुन सन्या धर्मान सादुले देवळात सोळुन देलं.... अन धर्मा ईस्टँनवर वारीकाच्या दुकानात पेपर वाचा साठी वापस आला....

जवा रात झाली तवा झोपळपट्टीतल्या बाया मानसं देवळात जात व्हते. सबन येटायातले लोकं देवळात जमा व्हयेल व्हते. धर्माले भी वाटलं सायाचं लोकं जाउन रायले तं किर्तन गीर्तन असन मनुन धर्मा बी गेला...

देवळात अलग माहोल व्हयेल होता, धुप, अगरबत्याचा घमघमाट, अन सादुनं हवन पेटवलं. गावातल्या सखाराम बाँची एक नैतुरनी पोरगी तीले साकयदंडात बांदुन आनेल व्हत. तीले घुरी ये अन मंग काई काई बळबळ करे.....!

धरमाले वाटे ते बेमार हाये पन समजे नाई सायाचं ईले काय झालं असन ते....

सादुनं त्या पोरीले काई काई ईच्यारलं..! पन ते पोट्टी काईच बोले नाई.....

तसा सादुनं घोळ्याले माराचा वादीचा श्याट काडला अन सन्नान ओपला पाटीवर तं....

पोट्टी ची ची बोंबले पन गावातल्या कोनाले कनव नाई ये,

सादुनं लय झोपळलं... तरी हुँ का चुँ...... पन धर्माच्या मनात गलबला व्हयेल होता..... काय कराव काई सुचे नाई... तरी धरमानं डेरींग

केलं अन सादु जौळ जाऊन ईच्यारलं ''म्हाराज काउन झोळपून रायले काय झालं....''!

तसं गावातल्या लोकायनं धरमाले खाली बसवलं.....

त्या नैतुरन्या पोरीचा लय छळ मांडेल व्हता..... लैच का लैच... तिले चटके काय देले..! चाबकाचे श्याट काय मारले..... हे पाउन सन्या सबन बाया लळाले लागल्या व्हत्या...! पन निरदयी सादु त्या पोरीले लय यातना देउन रायला व्हता.....

रातीचे दोन वाजे लोक हे अघोरी खेय सुरुच व्हता..! धर्माले सईन नाई झालं.... अन तसाच उठला अन सादुचा हात धरला..... लोक धावले अन धर्माले बाहेर काळलं पन धर्मा गप्प रायनारा नोता.. !

त्यानं दा बारा पोट्ये जमा केले अन हातात बांबुच्या काड्या घेतल्या अन घुसले देवळात... दोनी सादुले खेचुन बायेरं काळलं अन दे दनादन पार फोळून काळले... पोलीस पाटलाच्या घरी नेलं तीथं बांदुन ठुलं....

घूरी येनाऱ्या पोरीले दवाखान्यात देलं धाळून.....

दुसऱ्या दिसी गावात पोलीस आले अन त्या सादुले घेउन जात व्हते... सबन गाव त्याले पाहा साठी आले... पोलीसानं सागंतल का हे दोघं अट्टल बदमास हायेत जेलात होते आता सुटले अन त्यायनं सादुचा धंदा सुरु केला....

तईच धर्मानं गाववाल्याले दटाउन ईच्यारलं... ''या भामट्याले गावात कोनं आनलं त्यानं पुळं यावं...''

कोनीच समोर ये नाई...

''मंग काल त्या पोरीले ईलाजासाठी कोनं आनलं ते पुळं या''

तरी कोनीच नाई आलं......

तईच पोरीची माय आली अन मने, ''माई पोरगी लय बेमार हाये... नीरा घुर्रच येते तीले...!

लय दवाखाने, अंगारे, धुपारे, केले पन आराम नाई पळ्ला..! ''

'' तं यातल्या येका सादुसंग कारंज्याच्या ईस्टँनवर भेट झाल्ती.. ते मने हे बाहेरचं वारं हाये...! ईच घुर्र दुर करासाठी, मोठा अंतरयामी सादु हाये... त्याले गावात आनतो ...! ''

''देवळात या पोरीले घेउन ये... मनुन सन्या घेउन आलती बाप्पा ...''

''अवं मावसे हे अघोरी भामटे वयखू नाई आलते का? त्वाल्या?

'' पोरीचा जीव गेला असता पन यायले कदर नस्ती आली ''

'' हाव ना बाप्पा..... माह्या लेकीच्या बेमाऱ्या पाई म्या बलावलं सादुले ..! अन पैसे बी देल्ते पाच हजार रुपये.....''

'' मावसे दवाखान्यात ईलाज व्हईन नं. त्या साटी दवाखाना हाये नां ? अक्कल कुटं गेली त्वाली कोनं काई सांगतलं त चाह्ली गंडे दोरे धूपारे कराले....!''

'' पोरीचा ईलाज कर....! काई नाई पळलं यात ....''

गाळगेबाबानं लय सांगलं... पन या कानानं आयकून त्या कानानं सोळून देलं ..गाळगेबाबानं गाव लय तं झाळलेच अन.. लोकायचे मेंदुबी सफा केले हे माईत नाई का? तरी बी हे अवदसा करता अन सत्यानास करुन घेता...''

''जे शिकोलं ते इसरुन नाई ज्यमन मावसे...! गाळगेबाबानं अंधश्रद्धेवर लय परबोधन केले... पन आपुन काई सुदरलो नाई .... आता तरी सुदरं नं .. अन दवाखाने करा ते आपल्या साटीच हाये ना?

सबन लोकायनं धर्माच्या गोस्टीले टाया वाजोल्या ...अन पोलीस त्या भामट्याले संग घेउन गेले......! ❖



# स्वप्न



लेखिका
**शीतल राऊत**

गवतावर लव लव करणारं पातं, त्यावर चकाकणारा दवबिंदू... पाऊस पडून गेल्यावर हिरवाकंच शालू नेसून नटलेली धरती आणि तिच्या अंगाखांद्यावर बागडणाऱ्या अल्लड नद्या, कुठेतरी माळरानातुन अलगद धावणारी पायवाट, मंद-मंद थंडगार वारा, सोबतच मध्येच धुडगूस घालणारी एखादी पावसाची सर.. काळ्याकुट्ट ढगांच्या आडून डोकावणारी लाल- तांबडी सूर्यकिरणे, कौलारू घराच्या छपरातून निघणारा धूर... चुलीवरच्या वाफाळलेल्या चहाचा सुगंध आणि मृदूगंधाने बेभान झालेली.. गाण्यात रमलेली स्वतः देहभान विसरून फिरकणारी निशाची पावलं

अधीरं मन झालेल्या..... तालावर फेर धरणार... तेव्हाच रमा खडकन निशाला उठवते... स्वप्नातून जागी होत निशा अंथरुणातून पाय जमिनीवर ठेवत, आईला म्हणते ''काय वं झोपू दे नं! उलशिक.. निरा! माया मांग लागतं!''. रमाची आवराआवर सुरू असते.

'' अवं तं हेंबाडे! किती वाजले पाय नं! का? निरा सपनच पायत रायतं ?''

निरागस निशा स्वप्नांच्या दुनियेत...

'' अवं आई मले मस्त स्वप्न दिसलं बरं.... पण त्वा उठोलं मंदातच... तुले तं मी बरीच दिसत न्हाई !''

रमा पसारा आवरता - आवरता

''हे पाय निशे! तुले सांगून ठेवतो , मायाच्यानं जेवढं होते तेवढं करतो, तुया बापानं इथं काही इस्टेट सोडली नायी, सांजी आंन अन् सांजी खानं! कुठून न्यू तुले.. मी? तुय सपन पूरं कराले, तुले जे काही कराचं थे इथच कर, दुसऱ्या ठिकाणी मी तुले पाठू शकत नायी, पाहून घे!

चल निंगतो मी.... ''मले जाले उशीर होत हाये, हे पाय सयपाक - पाणी सारं आटपलं हाय , तेवढे भांडे धूजो अन् डबा घेऊन शायेत जाजो, गेलं काय कानात ?...

आईच्या शब्दांनी भानावर येत निशा...

हाव! जातो मी शायेत, म्हणून नीशा मान डोलवते आणि रमा घराच्या बाहेर पडते .

पण निशाचं स्वप्नाच भूत काही केल्या रमाच्या डोक्यातून जात न्होतं, तीले पोरीले खूप मोठं कराचं व्हतं. निराधार लेकराले अशी स्वप्न पाह्याचा अधिकार नसते,

निशाले नाचाचा लय शोक होता. कोणत्याही गाण्यावर मस्त नाच करे, पुढच्या नाचण्याच्या प्रशिक्षणासाठी तिले शहरात जाचं व्हतं पण रमाले तिले शिकवाचं होतं, नोकरीवर लावाचं होतं. स्वप्नांच्या रुपेरी वाटेवर ती भरकटायला नको हेच रमाचं ध्येय व्हतं.

रमाले निशाच्या डोळ्यातल्या स्वप्नांची जाण होती, पण कुठेतरी मनात धास्तावलेली रमा, अश्रूंना लपवत घराबाहेर पडली.

रमाला भूतकाळ आठवला की, तिचं मन सैरवैर व्हायचं.

तिला वाटायचं की, माझं दुःख माझ्या मुलीच्या वाट्याला यायला नको, म्हणून ती शक्य तितकं निशाला भूतकाळापासून दूर ठेवत होती.

अशीच काहीशी स्वप्न रमाने बघितले होती, आणि ती पूर्ण करण्याच्या नादात चुकीच्या वळणावर वळली, आणि आयुष्याचं झालेलं मातेरं बघून तिला निशाच्या बाबतीत असं काही घडू द्यायचं नव्हतं. कसंतरी आयुष्य तिने सावरलं होतं.

रात्री घरी आल्यावर रमाने निशाला सांगितलं.

''निशा! मी तुले यवढच सांगतो, स्वप्नांच्या विश्वात रमून ती पूरी करायच्या नादत आपण काय गमावतो अन काय कमावतो, याचा विचार करून पुढं पाऊल टाकजो ''.

❖

# संतदृष्टीतून साधुत्व व बुवाबाजी



लेखक
**आबासाहेब कडू**
अमरावती

साधू, बुवा, महाराज, संत अशा विविध नावाने संबोधणाऱ्या प्रबोधनकारांना आपल्या भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात बऱ्यापैकी मान होता. महाराष्ट्र ही तर संताची भूमी. संत ज्ञानदेव ते संत तुकडोजी ह्या वारकरी संतपरंपरेने भागवत धर्माची पताका संबंध भारतभर फडकवत ठेवली आहे.

**ज्ञानदेवे रचिला पाया ।**
**उभारिले देवालया ।।**
**नामा तयाचा किंकर ।**
**तेणे केला हा विस्तार ।।**
**जनार्दन एकनाथ ।**
**खांब दिला भागवत ।।**
**तुका झालासे कळस ।**
**भजन करा सावकाश ।।**
**बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।**
**निरुपण केले ओजा ।।**

–संत बहिणाबाई

वरील ओवींमध्ये संत बहिणाबाईनी संतपंपरेचे चपखल वर्णन केलेले आहे.ह्यातील सर्व संतांनी विपुल व विविध वाड्.मयाची निर्मिती करुन महाराष्ट्राला आध्यात्मिक, वैचारिक व तात्विक बैठक दिली. महाराष्ट्राच्या जडणघडणीत ह्या संतांचा अनन्यसाधारण असा वाटा आहे.

**बहु यातायाती राहे संतापाशी ।**
**जरा नाहीं कैसी वेळा फावे ।।**
**जगाचे जीवलग संत मायबाप ।**
**आपुलाले ताप सांगे लोक ।।**
**सकळा करीती तेचि समाधान ।**
**भावाच्या प्रमाण देती फळे ।।**
**तुकड्यादास म्हणे नसे त्यांना चैन ।**
**सकळांचे मन त्यांच्या पायी ।।**

–संत तुकडोजी

अनेक अडलेले पिडीत लोकं, भक्तगण, मुमुक्षू साधू, बुवा, महाराज, संतांना ज्ञानी समजून मार्गदर्शन घेण्यासाठी संपूर्ण विश्वासाने त्यांचेजवळ येत असतात. तेही सर्वांचे समाधान करुन योग्य तो मार्ग त्यांना दाखवितात, केलेली साधना व देवभक्तीला स्मरुण ते त्यांचेवर आपली कृपादृष्टी करतात. हीच समज जनमानसात पूर्वापार निर्माण झालेली आहे. तोच समज आजतागायत कायम आहे.

**संत जनतेशी समरस होती ।**
**म्हणोनीच जडली त्यांवरि भक्ति ।**
**संत चालती बोलती मूर्ती ।**
**भगवंताची ।।**

– ग्रामगीता

पूर्वी जनता संतस्वरुपांना देवावतार समजत होती कारण त्यांचे अंतर्बाह्य वागणे सात्विक, पवित्र व प्रामाणिक होते. परंतु आताची स्वतःला तथाकथित साधु, संत, बुवा, महाराज म्हणवून घेणारी मंडळी भोळ्या जनतेला चमत्कार दाखवून लुबाडण्याचे काम करीत आहे. सांप्रत काळात खरे साधू, संत, बुवा, महाराज आहेत की नाही हीच शंका आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात तर बुवाबाजीचे स्तोम फार वाढलेले दिसून येते.त्यांना लोकांना लुबाडण्याचा जणू परवानाच मिळाला की काय असेही वाटून जाते.राजसत्ताही आपल्या स्वार्थासाठी अशा बुवा,महाराजांना हाताशी धरते यापेक्षा दुर्दैव ते कोणते? मतांच्या लोभापायी अशा बुवांबाजांमार्फत धर्माधर्मात झगडे लावण्याचे काम काही राजकीय मंडळी करीत असतात.भारतासारख्या खंडप्राय देशात धर्माधर्मातील अशा झगड्यांमुळे कोणते समाजहित साधले जाते? यात फक्त निष्पाप लोकांचे नाहक बळी जातात. प्रत्येक धर्मातील लोकांनी एकमेकांच्या धर्माचा आदर करुन एकोप्याने राहिले तरच आपला देश प्रगती करु शकणार आहे. शांतीने विश्वात नांदणार आहे.

**क्यों लडता है मूरख बंदे,**
**यह तेरी खाम खयाली है।**
**है पेड की जड तो एक ही,**
**हर मजहब एक–एक डाली है!**

– अज्ञात

प्रत्येक धर्माचे मूळतत्व एकच आहे आणि ते म्हणजे प्रेमतत्व. तेव्हा सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने राहिल्यासच मानवोन्नती, समाजोन्नती व पर्यायाने देशोन्नती साध्य होवू शकते. धर्माधर्मात झगडे होवू नये या कारणासाठी अशा बुवा महाराजांचा उपयोग राजसत्तेने करुन घेतला तर धरतीवर स्वर्ग निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

परंतु आता उठसुट कोणताही बुवा, महाराज स्वतः:ला आवडेल ती उपाधी आपल्या नावापुढे लावून, चमत्कार दाखवून भक्तांना लुबाडून ऐैश करीत आहेत. अशा बुवांचे अमाप पीक सध्या भारतात आलेले आहे. आलीशान गाडीत फिरणे व पंचतारांकित महालात वास्तव्य करणे इ.भौतिक सुखे ही त्यांची जीवनशैली झालेली आहे. त्यागाशी त्यांचा सुतराम संबंध दिसत नाही.

किर्तन, प्रवचनाकरिता ही मंडळी लाखो रुपयांची बिदागी घेत आहेत. हे बिदागी घेणारे खरे साधू, बुवा, महाराज, संत ह्यामध्ये मोडतात काय? याचाही जनतेने विचार करण्याची वेळ आलेली आहे. बुवा वजा व्यावसायीक असे ह्यांचे आजकालचे स्वरुप आहे. बुवाबाजी हे पोट भरण्याचे व संपत्ती गोळा करण्याचे साधन झालेले आहे. ह्या कलीयुगात बहुतांचा तोच धंदा झालेला आहे.

**मुखे सांगे ब्रह्मज्ञान ।**
**जन लोकांची कापतो मान ।**
**ज्ञान सांगतो जनासी ।**
**नाही अनुभव आपणासी ।**
**कथा करतो देवाची ।**
**अंतरी आशा बहुमोलाची ।**
**तुका म्हणे तोचि वेडा ।**
**त्यांचे हाणुनि थोबाड फोडा ।**

–संत तुकाराम

लोकांना ब्रह्मज्ञान सांगायचे, देवाधर्माच्या नावाखाली भाकडकथा सांगून मूर्ख बनवायचे व त्यांचेकडून धन लुबाडायचे हा काही धूर्त दांभिकांचा धंदा झाला आहे. अशांना लोकांनीच शासन करावे असे तुकोबाराय फर्मावतात.

'उत्तम व्येव्हारे जोडोनिया धन, उदास विचारे वेच करी' असे सांगणारे तुकोबाराय कुठे व लाखो रुपयांची बिदागी घेऊन ऐैश करणारे हे भोंदू कुठे. असे भोंदू मग व्यभिचारही करण्यास मागेपुढे पहात नाहीत. सांप्रत काळात असे अनेक भोंदू–बुवा, साधू–संत व्यभिचाराच्या गुन्ह्याखाली कारावासाची हवा खात आहेत. वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी ह्या भोंदूचे यथार्थ वर्णन खालील श्लोकात केलेले आहे.

**भगवे रंगले तरी काय झाले? ।**
**त्यागी नाही चाले तरि ते व्यर्थ ।।**
**लंगोटी घातली तरी काय झाले? ।**
**मन ना निघाले विषयातुनी ।।**
**संसार सोडला तरी काय झाले? ।**
**परदार सोडले नाही ज्याने ।।**
**तुकड्यादास म्हणे जरी माळ घाले ।**
**धर्म ना जाणले तरि ते व्यर्थ ।।**

–संत तुकडोजी

भगवे कपडे घातल्याने कोणी

साधू होत नाही. त्यागाशिवाय साधुत्व नाही. लंगोटी घालून वैराग्याचे सोंग जरी आणता आले तरी जो विषयवासनेला बगल देत नाही तो साधू होऊच शकत नाही.

**गले में क्यों पहनी माला,**
**बदनपर भस्म चढा डाला ।**
**लगाया चंदनका टीला,**
**पीता प्याला, प्याला शराबवाला ।।**

–संत तुकडोजी

देवाचे नावाने गळ्यात माळ घालणे, अंगाला भस्म फासणे, कपाळावर तिलक लावणे इ. भक्तीलंकार लेवून दारु पीत असेल तर तो कसला साधू?

**बेपार हा झाला संत–पोशाखाचा ।**
**आम्हासी तयाचा वीट आला ।।**
**वर्म कोणी नेणे धर्म कोणी नेणे ।**
**पोटासाठी गाणे गाती साधू ।।**
**जग जरी नर्की पडी आडरानें ।**
**तरी दया नेणे साधू कोणी ।।**
**तुकड्यादास म्हणे ऐसा नव्हे संत ।**
**आपुला आघात लोकीं टाकी ।।**

–संत तुकडोजी

भगवा पोशाख म्हणजे साधुत्वाचे लक्षण नव्हे. धर्मवर्म न जाणता काही मंडळी नुसता पोशाख घालून गाणे गाऊन पोटासाठी भीक मागतात. धर्माचे वर्म त्यांना ज्ञात नसतेच. अशाप्रकारचे सोंग करुन ते फक्त पोट भरण्याकरिताच हा धंदा करतात. त्यांच्या वागण्याने अलम दुनिया जरी नरकात गेली तरी चालते, त्यांचे त्यांना कवडीचेही दुःख होत नाही. अशा लोकांच्या पापाचरणामुळे सामान्य लोकांवर त्यांचे विपरीत परिणाम होत असतात. वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज अशा साधू मंडळीना मार्मिक उपमा लावून त्यांचा समाचार घेतात.

**जंगलाच्या अस्वलीला मोठमोठ्या जटा।**
**पारधी लंगोटीनं त्यागी दिसे मोठा ।।**
**श्वानाच्या अंगावर भगव्याच्या छटा ।**
**गाढवाच्या अंगी नाही भस्माचा तोटा ।।**

–संत तुकडोजी

अस्वलीला मोठ्या जटा आहेत म्हणून काही तो महंत होत नाही. पारधी तोकडे कपडे घालतो, तो त्यांचा पेहरावच आहे म्हणून काही तो त्यागी वगैरे असू शकत नाही. कुत्र्याच्या अंगावर भगव्या छटा असतात म्हणून काही तो बुवा होवू शकत नाही. गाढव तर नेहमीच राखेत लोळते.त्यांचे अंग नेहमी भस्मानेच भरलेले असते म्हणून तो काही साधू होवू शकत नाही.

ह्या भोंदू पैकी काही मंडळी स्वतः:ला गुरुही म्हणून घेतात.असे गुरु सकाळी उठल्याबरोबर आपल्या शिष्यांना शिव्यांची लाखोली वहात असतात.वं.तुकडोजी महाराज अशांचे वर्णन आपले काव्यातून कसे करतात ते पहा..

**पूजा करी अति थाटसें,**
**पानी चढा फूलों चढा।**
**मंदीरसे निकला हुवा,**
**गाली बके है भडभडा।।**
**मंदीरमें खूब प्रेम है,**
**पर जीवका दुश्मान है।**
**जाना नहीं सेवा धरम,**
**यह व्यर्थ ही अभिमान है।।**

–संत तुकडोजी

ज्याचे तन मन वासनेभोवतीच गुरफटलेले आहे. ज्यांचे अंगी प्राणीमात्रांबद्दल कोणत्याही प्रकारचा प्रेमभाव नाही. जो अजूनही भावभक्तीने देवाला शरण गेला नाही, जो भक्तीमार्ग अनुसरत नाही. तो फक्त पोट भरण्याकरिताच साधुत्वाचे सोंग घेत आहे असे जाणून त्यांचे पासून सावध रहावे.

**ईश्वराच्या नामें साधतील स्वार्थ ।**
**तया कैंचा अर्थ संसारि यां? ।।**
**'साधु' म्हणवोनी करितील चैन ।**
**तयांसी पतन चुके केवीं? ।।**
**भीक भिक्षुकासी पचावयासाठी ।**
**पाहिजे संपुटी पुण्य बहु ।।**
**तुकड्यादास म्हणे सुलभ हे नाही ।**
**फुटतील देही पापे सर्व ।।**

–संत तुकडोजी

ईश्वराच्या नावाने स्वार्थ साधून चैन करणाऱ्यांना पापापासून सुटका नाही. लोकांचे लुबाडलेले पचण्याकरिताही भाग्य लागते. जे अशा पाखंडांचे राशी नसतेच. केलेल्या पापाचे फळ त्यांना भोगावेच लागते.

**संत तोचि खरा ।**
**जया शुद्ध भक्ति–झरा ।।**
**जा दावी मार्ग नीट ।**
**चाले आपणही वाट ।।**
**दाखवी करोन ।**
**तरी ओळवितो जन ।।**
**तुकड्या म्हणे बंध तोंडी ।**
**'जनी जनार्दन' जोडी ।।**

–संत तुकडोजी

ज्यांची देवभक्ती शुद्ध आहे, ज्यांनी आत्मज्ञान प्राप्त केले आहे त्यांनी जनतेला खोट्या भ्रमात न ठेवता योग्य प्रबोधन करुन कर्तव्यपथावर आणले पाहिजे. हेच त्यांचेकडून अपेक्षित आहे. हेच त्यांचे कर्तव्य आहे. संतपद म्हणजे नुसता देखावा नव्हे. त्यांनी खोटे साधुत्व व बुवाबाजी करणाऱ्या दांभिकांवर प्रहार केला पाहिजे. सर्वांभूती ईश्वरच नांदत आहे हे ही त्यांचे लक्षात आणून दिले पाहिजे. दांभिक बुवाबाजीतून लोकांची सुटका केली पाहिजे. ❖



# मुलगी पसंद आली !

लेखक
**अशोक उघडे**
पुजा कॉलनी, अमरावती

तालुक्याच्या मध्यम शहरवस्ती असलेल्या ठिकाणापासून आमचं तीन किलोमीटर अंतरावर सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेलं मोठे गाव. गावातले कास्तकार अन् संत्राबागायतदार असलेलं बऱ्यापैकी रग्गड गाव अन् मजुरवर्गाला बाराही महिने रोजगार मिळणारे गाव असा नावलौकिक! गावात जि.प.शाळेत सातव्या वर्गापर्यंत शिकण्याची सोय अन् उच्च माध्यमिक शाळा कॉलेज तालुक्याच्या ठिकाणी होते. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकवर्ग जवळपासच्या गावचेच होते. शाळेच्या पहिल्या तुकडीपासून तर थेट शालांत परिक्षेपर्यंत राहूल माझा जिवलग मित्र सोबतच होता.

पुढचे महाविद्यालयीन शिक्षण मात्र अमरावती शहरात पण वेगवेगळ्या महाविद्यालयात झाले. दोघांनाही अभियांत्रिकीमध्ये रुची असल्याने पुढचे शिक्षण वेगवेगळ्या शाखेत सुरु झाले. त्याची आय.टी. ब्रँच तर मला मिळाली कॉम्प्युटर ब्रँच! एकाच शहरात असल्याने दोघेही जाम खुशीत होतो. चार वर्षे एकमेकांच्या संपर्कात व दोस्त मित्रांसोबत भेटीगाठी असल्यामुळे दिवस चांगले मौजमजेत गेले. चार वर्षात अभ्यासक्रम पुर्ण झाल्यावर दोघांनेही ठरविले की, एकाच शहरात आयटी क्षेत्रातील कंपनीत जॉब मिळवण्यासाठी प्रयत्न करायचे!

पुणे, मुंबई किंवा बंगलोर सारख्या ठिकाणी संधी मिळाली तर प्रयत्न करावा म्हणून ओळखीपाळखीच्या सिनियर मित्रांसोबत संपर्क साधत आपआपले रिझ्युम शैक्षणिक पात्रतेसह काहीच अनुभव नसल्याने लहान सहान वेतनावर अनुभव घेण्यासाठी मागं पुढं अलगअलग कंपनीत रुजू झालो. चांगल्या प्रतिष्ठित कंपन्यात जॉब मिळाले परंतू राहूल खराडीच्या आयटी पार्क, नगर रोडवर आणि माझे हिंजेवाडी (राजीव गांधी आयटी पार्क) या टोकावर! या काळातही आमच्या दोस्तमित्रांसोबत अधुनमधून भेटीगाठी अन् मौजमजेत दिवस जात होते. चारपाच वर्षात एक एक कंपनी स्विच करत करत दोघेही नामांकित कंपनीत

पुण्यातच स्थिरावलो.

चांगल्या नामांकित कंपन्या अन् बऱ्यापैकी मिळणार असलेले वेतन ह्या जमेच्या बाजू असल्याने दोघांच्याही घरी लग्नाच्या गोष्टी सुरु झाल्या होत्याच. घरच्यांना विश्वासात घेऊन आम्हीच विवाह जोडणाऱ्या विवाह ब्युरोच्या कार्यालयात बायोडाटा टाकावे म्हणून कामी लागलो.एकाच दिवशी कलर फोटोसह बायोडाटा वर-वधु सुचक मंडळात टाकून आलो. आमचे दोघाचेही उमदे व देखने व्यक्तीमत्व आणि बऱ्यापैकी पैकेज असल्यामुळे घरीही वधूपक्षाकडून निरोप येत होते.घरच्यांना सांगितले की, '' लग्नाची मुलगी आपल्याच भागाकडली अन् पुण्यातच आय.टी. क्षेत्रातच जॉब करणारी असावी.'' आता आम्ही आपआपल्या कामी लागलो अन् लग्न झाल्यावर राहण्यासाठी टू बीएचकेचा फ्लॅट पाहण्याचा कार्यक्रम सुरु ठेवला.

येथपर्यंत सारं कसं आमच्या एकमताने ठरविल्यासारखं सुरळीतपणे होत आलं. अधेमधे घरुनही त्यांच्या पर्यंत पोहचलेले बायोडाटा मुलीच्या फोटोसह यायला सुरवात झाली. पाहिजे तसं स्थळ पसंतीस पडत नव्हते. पण मोठ्या दादाने अमरावती जवळील गावातील पुसदेकर-देशमुख या घरंदाज कुटुंबातील सुस्वरूप, अभियांत्रिकी पदवीधर मुलीचा बायोडाटा पीडीएफ वर पाठविला. मुलगी पसंद येण्यासारखी असल्यानं घरच्या लोकांची पाहणीही झाली. अन् मोबाईलवर मुलगी पाहण्यासाठी लवकरच येण्यासाठी घाई करु लागले. मग जिवलग मित्र राहूलला या स्थळाबद्दल माहिती दिली. पाठविलेला बायोडाटा व कलर फोटोवरुन पसंत येणासारखे स्थळ असल्याची आम्हाला खात्री झाली. अन् येणाऱ्या लागोपाठ शनिवार रविवार जोडून सुट्या घेऊन राहूलला मोबाईल वरुन विचारले,

'' कारे राहुल्या चालतं काय ह्या शनवार रविवारले तुही होणारी वहिनी पाहाले.'' वऱ्हाडीतुन संवाद साधण्याची किंवा मोबाईल वरुन आबे-काबे असं वऱ्हाडी बोलीभाषेतुन बोलण्याची इथे पुण्यात येऊनही संवय सुटणारी नव्हतीच. तात्काळ त्याचे प्रत्युत्तर आलेच,'' अबे लेका एव्हढा उतावळा झाला काय? जसा उतावळा नवरा गुडघ्याले बाशिंग असंच म्हणा लागन! बरं कायजी करु नको शनवार-रविवारले दोन दिवसाच्या सुट्ट्या जोडून तुह्यासंग येतो.''

ठरल्याप्रमाणे आम्ही दोघेही गावाला पोहचलो. घरची सारे वाटच पाहत होते अन राघवमामा तयारच होते. दुसऱ्या दिवशी आमचे मोठे भाऊ, राघवमामा आणि आम्ही दोघे अशी मंडळी राघवमामाच्या हुंडई आय २० त दिडएक तासातच अमरावती शहराच्या जवळ मुलीकडील गावी पोहचलो. भल्यामोठ्या चिरेबंदी वाड्याच्या दर्शनी दरवाज्यातून आमचे स्वागत झालं! आतल्या दिवाणखान्यात स्थानापन्न झाल्यावर नाश्तापाणी येण्याअगोदर राघवमामाने आमचा परिचय बैठकीला बसलेल्या वडिलधाऱ्यांना करुन देत होते. '' हा आमचा भाचा लग्नाचा उमेदवार संदीप आन् सोबत आलेला हा त्याचा मित्र राहूल!'' पुढे संवाद जोडून राघवमामा त्यांना सांगायला विसरले नाहीत की, आमची लहानपणापासूनची मैत्री कशी आहे, सोबतच शिकले कसे, सोबतच इंजिनिअर झाले अन् सोबतच नोकरीवर लागले. राघवमामाने परिचय आटोपता घेतला. मुलीच्या वडिलांनी बैठकीत बसलेल्या मान्यवराचा परिचय करुन दिला. मुलीचा मोठा भाऊ अनीलदादांनी आम्हाला वर-वधु सुचक मंडळाच्या माध्यमातून मिळालेला बायोडाटा आमच्या घरी लहान बहिन स्नेहाचा बायोडाटा पाठविलेला होता. त्यानंतर घरच्या वडीलधाऱ्या मंडळीनी राघवमामा व मोठे दादासह पाहणी करुन आले अन् त्यांच्या पसंती नुसार आमच्या साठी हा वधुपाहणीचा कार्यक्रम ठरविला होता. नाश्ता, चहापाणी होत असतांनाच परिचयसत्र संपल्यावर स्नेहाच्या विवाहित वडील भाऊ अनीलदादानी परत एकदा आमच्याकडून सारी माहिती बोलता बोलता काढून खातरजमा करुन घेतली. आम्ही बैठकीत पुढच्या घडीची वाट पाहत असतानाच मुलीचे वडील व भाऊ आम्हाला पानसुपारी घ्यायला सांगुन माजघरात गेलेत. ते दोघेही लवकर बाहेर न आल्यामुळे आम्ही चौघेही थोडे विचारात पडलो होतो.

माजघरातली त्यांचा आपआपसात झालेला विचार विनिमय करुन परत दोघेही दिवाणखान्यात स्थिरस्थावर झाले. पण काहीशी विचलीत झालेली त्यांची चर्या आमच्या नजरेतून सुटली नाही. आत त्यांचे काय खलबत झाले याचा अंदाज येत नव्हता. शेवटी मुलीच्या वडिलांनी

सुरवात केली ,'' तुमच्याकडून आलेला मुलाचा बायोडाटा सोबत जोडलेल्या कलर फोटोसह आम्ही साऱ्यांनी पाहिला पण लग्नाच्या मुलाचा फोटो जो तुम्ही म्हणता त्या मुलाचा दिसत नाही.'' बाजूला बसलेले मुलीचे भाऊ हातातला मोबाईल पाहून सांगायला लागले की,'' बायोडाटा मध्ये असलेला फोटो संदीप ह्यांचा नसून बाजूला बसलेल्या पाहूण्यांचा दिसतो.'' प्रसंगावधान राखुन राहूलने त्यांच्या जवळून मोबाईल घेतला आणि मलाही दाखवला. झालेला सारा घोळ क्षणार्धात आमच्या लक्षात आला. वर–वधु सुचक मंडळाने आमच्या दोघांच्या बायोडाटावर फोटोंची केलेली अदलाबदल यामुळे हा सारा घोळ झाल्याचे लक्षात आले. राघवमामाला पण घडलेला प्रकार आम्ही लक्षात आणुन दिला. मग राघवमामा ह्यांनी आमच्या कडूनच झालेल्या चुकीचे स्पष्टीकरण बैठकीत वर्तवून घेतले. आम्ही झालेल्या या चुकीची सगळ्यांसमोर क्षमायाचना केली. घडलेल्या प्रसंगातून सावरुन साऱ्या बैठकीत बसलेल्या मानवाईक मंडळींच्या लक्षात उद्भवलेला घटनाक्रम यायला वेळ लागला नाही.

आमची परवानगी घेऊन मुलीचे वडील व भाऊ परत आत माजघरात गेले अन् पाचदहा मिनिटात बाहेर बैठकीत आले. चिंताग्रस्त असलेले आम्ही चार पाहूने पुढल्या क्षणात काय घडणार ह्यांचा विचार करीत होतो. बैठकीचा अंदाज घेत मुलीच्या वडीलांनी राघवमामाकडे स्मितहास्य करीत विचारणा केली,'' काय मामासाहेब आमच्या स्नेहाला बोलवुन घ्यायचे काय पाहणीसाठी! जर तुम्हास मुलगी पसंतीस पडली तर पुढील बोलणी करावयास हरकत नाही.'' आता बैठकच काय पण सारा चिरेबंदी वाडाच आनंदात उजळला असं वाटून गेलं. आम्ही चोघेही आता कुठे बिनधास्त झालो. झालेला गैरसमज दुर झाला अन् सारं मळभ दुर सारल्या गेले!

पुढील पाहणीचा कार्यक्रम आनंदी वातावरणात उरकला. ''मुलाला काही विचारायचे असेल तर विचारु शकता!'' अशी मुलीच्या भावाने विनंती केली. माझी अवघडलेली स्थिती पाहून जिवलग मित्राने वेळ मारुन नेली. होणाऱ्या नववधूची पाहणी–परिक्षा प्रश्नोत्तराने यथावकाश पार पडली. आम्हाला मुलगी पसंत पडल्याची बैठकीत बसलेल्या मान्यवरांच्या अनुभवी नजरेत लक्षात यायला फारसा वेळ लागला नाही.

परतीच्या प्रवासात राघवमामा राहूलची फिरकी घेत म्हणाले, '' काय राहूल तुला मुलगी पसंत पडली ना?'' लगेच सावरुन राहूल मामाकडे पहात तो म्हणाला,'' राघवमामा अशीच वहिनीसारखी मुलगी तुमची भाचसुन म्हणून पाहून ठेवा.'' हास्यविनोद आणि मोकळ्या गप्पा करीत वातानुकुलित हुंडई आय २० गाडीत आतल्या गारव्यात गावाच्या दिशेने धावत होती. घरी गेल्यावर चर्चेत सर्वांनी घेतलेल्या निर्णयानूसार मुलीकडील मंडळीस पुढील बैठकीस आमच्याकडे यायचे निमंत्रण द्यायला राघवमामा विसरले नाहीत. असा माझ्या बाबतीत घडलेला मुलगी पाहण्याचा घोळ झाला. पण वेळेवर सारा उलगडा झाला.पुढील सोपस्कार यथावकाश पार पडलेत आणि ''स्नेहा–संदीप'' म्हणजे आमचा विवाहसोहळा थाटामाटात आणि धुमधडाक्यात पार पडला. ❖



# माझी शाळा माझं गांव



लेखक
**नरेंद्र वसंतराव लोणकर**

माझं बालपण ज्या शाळेत गेलं त्याविषयी आज लिहायचं ठरवलंय. तसा विचार केल्यावर असंख्य आठवणींना उजाळा मिळाला. त्याच आठवणींना शब्द अलंकारात पहिल्यांदा सजविन्याचा प्रयत्न करतोय!

नवरगाव शहराच्या मधोमध उभी असलेली माझी शाळा मला अजूनही आठवते. माझ्या यशात माझ्या जडणघडणीत सिंहाचा वाटा असलेली प्रेरणादायी प्रवासाची सोबती असलेली माझी शाळा.

आठवत बाजूला असलेल्या कावळे च्या दुकानातील संत्राचि गोळी, चार आण्याला पाच मिळायच्या आणी तो वाटण्याचा असीम आनंद! मित्र सहा सात असले की वाटून घेण्यासाठी एकाचवेळी पुढे सरकलेले पाचही हाथ.

आठवते पाण्याचा पाट (क्यानल) अगदीच बाजूला लागून असलेला. दुःख वाहवून नेत असलेला आणी सुखाचा ओलावा देत असलेला.

आठवते उंच उभी असलेली पाण्याची टाकी,मोठे स्वप्न बघायची प्रेरणा बनून उभी असलेली. दिवसातून एक नजर तिकडे कायम असायची. टाकिवालि बाई आम्हाला तिकडे येऊ पण द्यायची नाही.

बाजूलाच बालवाडी असायची रत्नापूर च्या काकू तिथे शिकवायच्या. तिथे असणाऱ्या छोटे छोटे मूल बघून आम्हाला खाऊची आठवण यायची आणी सोबतच आमच्या बालपणातल्या बालपनाची सुद्धा!

बाजूला असलेल्या ढोर दवाखान्याच पण किती कूतूहल, मधल्या सुट्टीत आमच लक्ष्य तिकडे पण जायच अधामधात. आणी तिथे लागलेल्या खाबांना अटकुन व्यायम करायचो. अस्सल जिवन जगायचो त्यावेळी.

या सर्व गोड आठवणी दिलेल्या ठिकानांच्या मधातील वास्तू म्हणजे माझी प्रिय शाळा.

'' लोकसेवा प्राथमिक विध्यालय नवरगाव, तालुका सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर.''

शाळेबद्धल शब्द गुंफताना नेमकी सुरवात कुठून करावी हा प्रश्न असताना आठवली प्रार्थना. सुविचार आणी संस्कारासह देशप्रेमात जी सजलेली असायची ती वेळ. थोर पुरुषांचे विचार, गुजगोष्टी, दिनविषेश, राष्ट्रगीत आणी बरेच काही. माझ्यात जी काही प्रगल्भता आहे तिची मुहूर्तमेढ तिथूनच झालीय.

स्टेजवर अर्थात सर्वांच्या पुढे येऊन प्रार्थना राष्ट्रगीत म्हणणे हाही एकप्रकारे बहूमानच! त्यातील गंमत पण नेमकी किती गोड बघा न, जर का कुणी शाळेत उशिरा आल तर थेट लक्ष् जायच, मग समोरच्या भिंतिमागे लपणारे चेहरे शोधणे म्हणजे कमालच. चैतन्य होते त्या जगण्यात.

दिर्घ घंटा टन टन टन तो आवाज आजही हृदयात गुंजतो. शाळा सुरू होण्याची वेळ, आजच्या इलेक्ट्रॉनिक बेल मधे ती मज्जाच नाही.

बर आणखी एक महत्वाच, रांगेत प्रथम स्थान मिळायला हवे म्हणून धावत सुटायचो जेणेकरून मागच्या मुलांना शिस्त लावणे रांगेत उभे करणे, असंख्य आठवणी आहेत. आजच्या घडीला निव्वळ आठवुन इम्युनीटी वाढविनाऱ्या!

दफ्तर, पाटी, लेखणी पेन्सिल (पांढरी), खडू काय काय न्हवते. प्रत्येक गोष्टीत सुवर्णक्षण होता.

मी पेन्सिल खाललीय! आणी तुम्ही? आठवून चव जिभेवर येते एवढी गोड आठवण आहे ती.

फळा स्वछ पुसणे असो वा पुसता पुसता खडूची भुकटी डोळ्यात उडणे असो. जगलो आम्ही तेव्हाच!

अक्षरशः हसत खेळत. निस्वार्थी पणाने.

शाळेच्या आत असंख्य आठवणी आहेत. तश्याच बाहेरही आहेत. शाळेच्या समोरील आणी मागच्या बाजूला असलेले मैदान केवळ खेळायलाच न्हवत, तर त्यात बरेच उत्सव सुद्धा दडलेले. काळजाचा खोल गाभाऱ्यात, त्या आठवणी अजूनही जिवंत आहेत...

दिवाळीला होणारे गायगोदन, ज्यात गायी एकत्र यायच्या आणी आम्हीही. फटाक्यांची धूम असायची. डोळ्यात अजूनही क्षण न क्षण तसाच तराळतोय! कित्येक वर्ष झालेत अजून गायगोदन बघितले नाही. रंग दिलेली गाय आणी गोदनातून फिरणे आणी शेणात टाकलेल अंड न फुटणे हीही कमालच.

होळीला असलेले घानमाकड, त्यावर फिरण्याची मजा आजच्या विमान सफारीतहि नाही. किर्र किर्र आवाज, समोर बसलेला मित्र आणी सहकारी तो फिरवायचे. त्या आनंदाचा स्थर ठरविणे अशक्य. ते दिलखुलास हसणं अलौकिक होते.

मागच्या बाजूला आकर यायचे, सारवनासाठि शेन गोळा करण्यात पण आनंद ऊपभोगलाय. गायी बैलांचा घंटा नाद अजूनही आठवतोय. त्याचा हंबरडा अजूनही लक्ष वेधून घेतोय. शेण, सारवण, त्यात जपलेली संस्कृति आणी त्या सारवणावर सजलेली रांगोळी सुद्धा हृदयात घर करून अजूनही आहेत.

त्याच मैदानात गणेश चतुर्थी आणी दुर्गा पूजेला चित्रपट बघितल्याच पण पुसटस आठवतय. आठवतेय जिवंत कला जोपासलेली दंडार. सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल. अक्षरशः रात्री उशिरापर्यंत जागून नवीन चित्रपट सलग दोन तीन बघण्याचा आनंद काही औरच होता. आज मॉल मधल्या सीनेमाग्रुहात ती मजाच नाही.

मला शिकवायला आदरणीय देशमुख सर होते, योगायोगाने आज आम्ही एकाच शहरात आहोत. माझ्यातील वक्तृत्व कलेला आकार देण्याच सत्कार्य त्यांच्या मुळे घडलय. यथायोग्य मार्गदर्शनाने मी लोकांसमोर भाषण द्यायचो. तेही गुजरी चौकातील बस स्टॉप वर. नावं घेताच टाळ्या पडायच्या एवढं सगळ त्याकाळी कमावलं होत.

तिथे जे कमावलं त्या जोरावर आजपर्यंतचा प्रवास यशस्वी झालायं हे मी मान्य करतो.

१५ ऑगस्ट आणी २६ जानेवारी हा दिवस एखाद्या सणाहुन. त्याकाळी माझ्यासाठी मोठा होता. आदल्या दिवशी जवळ असलेला बूट, चप्पल स्वच्छ धुवायची, शाळेचा ड्रेस स्वच्छ धूवायचा, वाळू टाकून वाळली काय म्हणून चारदा उन्हात बाहेर जाऊन बघायच, आणी सायंकाळी प्रेस करून ठेवायचा. सुरवातीला प्रेस न्हवती तेव्हा लोटा(मग्गा) घेऊन त्यात निखारे टाकायचे आणी प्रेस करायची अस होतं. कालांतराने कोळशाची प्रेस होती सोबतीला. सकाळी लवकर उठून प्रभातफेरीची तयारी, क्या बात, एकच नंबर, लय खास दिवस होते ते!

प्रभातफेरीत जाताना हळूच पुढच्याला धक्का देण्यात वेगळीच मजा होती. मी तर ठेच लागून समोरच्याच्या अंगावर पाच दहादा पडायचो आणी तुम्ही?

त्या घोषणा, ती गीते, अंगात स्फुर्ती देणारी. अख्य गांव बघायच आणी तेव्हा एखाद्याने हाथ जरी दाखवला तरी कलेक्टर झाल्यासारखं वाटायचं. रस्त्यात चालताना ओळखीच्या एखाद्या व्यक्तीला हाथ दाखवणे सुद्धा किती दिलासा देणारे होते.

पहिली ते चौथी पर्यंत मला आठवते की एका पाटीने आणी एका गुरुलीह्री मधे माझं शिक्षण झालय. न वर्कबूक न नोटबुक पण अभ्यास व्हायचा. जे होत ते भरपूर वाटत होत. ते दिवस आठवून आजही समाधान वाटतं.

मित्रांनो तुम्ही बोकडे काकूंच्या हातचे बोर, पिंगर खाललेत काय? मी तर खाललेय बा! पिंगर तर चार बोटात खुपसून खाण्यात वेगळी मजा होती. आणी बोर खाल्यावर आटोळी (बी) शांत बसलेल्या एखाद्या जवळच्या मित्राला फेकून मारली की मला काही माहीत नाही या आवेशात आकाशाकडे दिवसा

तारे बघण्याचा अभिनय आता गालावर हसू आणतोय.

शाळेच्या बाजूला असलेला पाट मोठा होता, पण त्यालाच लागून छोटा पाट होता. तिथे आई कपडे धुवायला गेली की मागेमागे जाऊन आंघोळ करायचो. मनसोक्त पाण्यात खेळायचो. ते भिजणं खरच वेगळ होतं. त्यात पाण्याचा स्वच्छ रंग स्वतातही होता आणी आहे कायमचा!पाणी आटलं तरी आठवण मात्र आटत नाही. ती स्मरणात असते कायमची.पाणी अनेक ठिकाणी कुठेही असो, पण प्रत्येकाच भिजणं मात्र वेगळ असत! चिरकाल आठवणींत जपणार.

बालपणात एखाद वेळी आइस कांडी मिळाली की काय अपार आनंद व्यायचा! आइस फ्रुटवाल्या दादाची घंटी वाजली की आपसूकच आई जवळ जाऊन लाळीगोळी लाऊन चाराणे मागण्यात वेगळीच मजा. त्यात दुधाची कुल्फी म्हणजे जणू पर्वणीच. 'आला दुधाचा मेवा न ताजा ताजा घेवा' 'चार आण्याले भेटते न बडी मजा येते' हे वाक्य जसेच्या तसे कानात घूमतात... अजूनही!

एक्का बुक्कीत मी भिंत पाडली,मी पाट्याच्या या भागातून उडी मारून डायरेक्ट दुसऱ्या भागात पोचलो, माझे बाबा एवढे ताकतवाण पासून मामा चा दरारा या गोष्टी (फूशारख्या) मारणे सहज जमायचं. मी मोठा झाल्यावर मारुती कार घेईल असे स्वप्न त्यावेळी मित्रांजवळ रंगवायचो पण त्या स्वप्नांचा आनंद कार प्रत्यक्षात आली तरी बरोबरी न करणारा आहे.

मामाच पत्र हारवल तेच आम्हाला सापडल! काय मस्त खेळ होता तो, वर्तुळ करून बसणे आणी गोल गोल फिरणे, नकळत आपल्या मागे रुमाल टाकायचा आणी वर्तुळ पूर्ण करायच्या आत शोधायचा, नाही तर डाव आपल्यावर. आनंद देणाऱ्या रुमालाने आज घाम आणी आसवे पुसायची जागा घेतलीय. कुठलेही पत्र नसताना तो खेळ मामाच्या घराची आत्मीयता देणारा होता.

लपन छुपन हाही खेळ मस्त होता (रेशटिप) लपलेल्या मित्रांना शोधण्यात मजाच मजा होती. आता अर्ध आयुष्य नोकरी शोधण्यात सरते!

एकच शर्ट आणी एकच प्याट करडोडा(धागा) ने बेल्ट ची जागा घेतलेली. पाठीवर दफ्तर आणी हातात हाथ घेऊन शाळेत पायी जाणे. रस्त्यात चालताना गोटा हाती घेऊन साचलेल्या पाण्यावर मारणे,कुणाचे टप्पे जास्त होतात याची होड (पैज) लावणे, हळूच एखाद्या झाडाचे पान तोडणे, आंब्याच झाड वाटेत असल तर गोटा हाथी घेऊन मारणे आणी 'होय रे तिकडं' असा आवाज आला की भो पळणे.... अस धूव्वाधार बालपण जगलोय मी!

दुपारी दोन ते अडीच ला जेवणाची सुटी व्यायची,एकत्र जेवायची मजा यायची. त्या आधीचा पिरेड लवकर सम्पावा अस वाटायच,आणी बेल वाजली की सारे एकसाथ पाण्या कडे धावायचं हाथ धुवायला ,पाणी प्यायला.

कालांतराने खिचडी पण मिळायची जिची चव आजच्या पीजा बर्गर मधे मुळीच नाही.

आठवणी या अश्याच असतात न विसरता येणाऱ्या, काळजात घर केलेल्या, अविस्मरणीय, अद्वितीय,फक्त आठवुनहि जगता आले पाहिजे.

''माझी शाळा, माझं गांव'' (७)

पाऊस आणी शाळा हे नातं खूप बोलक होतं. बेधुंद बरसणाऱ्या सरी त्याचा टपटप आवाज आणी त्यात सर जोरात ओरडून शिकवायचे.वीज कडाडली की नजर मात्र खिडकीकडे पण ती बंद असायची.यातील गंमत म्हणजे अशी की मुसळधार पाऊस आला की एकतर लवकर सुट्टी व्हायची म्हणून मुसळ धार पावसाची मी वाट बघीतलीय! आणी तुम्ही?
लवकर सुट्टी झाल्याच्या आनंद आज मिळणाऱ्या पुरस्काराहून मोठा आहे!
पावसाच्या गढूळ पाण्याचे थेंब आजही स्वछ वाटताट चालताना धावताना पाठीमागून कपड्यांवर उडलेले.

शाळेतील सहल मला अजूनही आठवतेय मी दोनदा सहलीला गेलेलो. नागपूर रामटेक आणी चीखलधरा मुक्तागीरी.योगायोगाने ४ वर्ष नागपूर आणी सध्या चीखलधरा रोड लाच असलेल्या शाळेत मी नोकरीला आहे.सहलीवरुन परतल्यावर मित्रांना टाटा करतांना मन भरून यायच ,त्याच संवेदना अजूनही हृदयात जिवंत आहेत.

मराठीच्या कवितांना चाली देऊन त्या वाचायला मला फार आवडायच्या. ''प्रवासी मी दिगंताचा''या काव्याला मी पुढे २० गाण्याच्या चाली दिल्या होत्या.(एखाद वेळ याच ग्रुप वर ती कविता घेऊन नक्की लाईव्ह येइल), गायनात आज गीनीज बुक मधे नावं नोंदल्या गेलय ज्याची मुहूर्तमेढ शाळेत झालीय. (तेरी यादों मे या अल्बम साठी गाणी लिहून झालीय आपल्या समोर नक्की सादर करेल)

प्राथमिक शिक्षणाने जीवनाला वळण दिलं दिशा दिली. आदरणीय ढवस सर, देशमुख सर, शेंडे सर, बुद्धार्पवार सर, बावणे सर, धकाते मॉडम, चावरे सर, सोनुले सर्व, माझे वडील आणी मोठेबाबा लोणकर सर, देवा भाऊ सर्व कर्माचारी मार्गदर्शक आपण सर्व कायम स्मरणात आहात, राहाल!

❖



# कपिराज

लेखक
**रामदास गायधने**
खांदा कालनी, सेक्टर-५,
नवीन पनवेल(प)

विदर्भातील झोंबाडी नावाचे दोनेक हजार लोकवस्तीचे गाव. गावाशेजारीच भलेमोठे वडाचे झाड. त्याला लागुनच पिंपळ, आंबा, जांभुळ, पेरू आवळ्याचे झाडे. विस्तीर्ण असे पटांगण होते.

वडाच्याच झाडाला उठण्या बसण्यासाठी एक कट्टा बांधलेला होता. तिथेच एक हनुमंताचे मंदीर होते व एक विहीरपण होती. वाटेन येणारे जाणारे पाथस्थ त्या विहिरीचे गोड पाण्याने आपली तृष्णा भागवून मगच पुढे जात. वासुनाना रोज आपल्या चारपाच मित्राबरोबर त्या कट्ट्यावर गप्पा मारीत बसायचे. वासुनानांचा मुलगा दिल्लीत एका बँकेत मॅनेजर होता तिथेच तो आपल्या पत्नी व दोन मुलासोबत राह्यचा. दोनतीन महिन्यातुन एखादे वेळेस ईकडे यायचा. मुलगी व तिचा पती दोघेही सॉफ्टवेअर ईंजिनीयर. ते पण अधूनमधून गावी यायचे. येरवी वासुनाना व त्यांची पत्नी माई दोघेच असायचे. चांगला पाच सहा खोल्याचा भला मोठा वाडा होता. चांगली साठ सत्तर एकर जमीन होती.

बागबागायतीचे उत्पन्न पण भरपुर असायचे. तसे वासुनाना फार मोठ्या मनाचे होते. अडल्यानडल्यांना धान्याची वा पैशा अदल्याची मदत पण करायचे. तीन चार घरगडी जणावरांची काळजी घेत असत. वाड्याची साफसफाई करीत व शेतातील कामे पण करीत असत.

एकदा आपल्या मित्रमंडळी सोबत कट्ट्यावर गप्पा मारत असतांनी काळतोंड्या माकडाची टोळीच तिथ आली अन् या झाडावरुन त्या झाडावर,त्या झाडावरुन या झाडावर उड्या मारु लागली.काही दात विचकत होते तर काही वडाच्या पारंब्यावर लोंबकळत होते.झोके घेत होते.काही कच्च्या कैर्या नाचून नाचून उड्या मारुन खात खात खाली पाडत. वासुनानाजवळ एक मजबुत काठी नेहमीच असायची.

एखादे वेळेस कुत्रे अंगावर आलेच तर त्या काठीचा ते उपयोग करीत. त्यांना नुकतच साठावं वरीस लागल होत पण ते साठीचे वाटायचेच नाही, त्यांचे मित्र पण गंमतीन म्हणायचे पंचेचाळीशी असलेले जवान वासुनाना. ते पण हरखुन जात.

माकडाच्या टोळीतील एक नरवानर भड्या नुकत्याच जन्मलेल्या मादीवानराच्या पाठीमागे लागलेला होता. त्याला ठार मारण्यासाठी तो माकडीनच्या हातातून त्याला हिसकवण्याचा प्रयत्न करीत होता. पण ती माकडीन त्याच्या हातात त्या नवजात शिशुला लागु देत नव्हती. पण तो तिची पाठ सोडत नव्हता.

आता तर तो भड्या चांगलाच चिडलेला होता. माकडीनच्या हाताला चावा घेऊन त्या पिल्लाला हिसकावण्याचा प्रयत्न करीत होता. पण तरीही ती त्याला दाद देत नव्हती. शेवटी भड्याने माकडीनीच्या अंगावर जोरदार उडी मारुन तिच्या छातीला चिकटुन असलेल्या बाळाला ओढुन घेतले व खाली टाकणार ईतक्यात माकडीणीने त्या भड्याच्या हातातील बाळ खेचून घेतले पण त्या भड्याने माकडीनला जोरात धक्का देवून खालीच ढकलले.

ईतक्या उंचीवरुन बाळ खाली पडत असतांनाही तिने बाळाला पटकन छातीशी पकडले. दोघेही खाली पडली पण तिने तशाही परीस्थितीतही बाळाला सोडले नाही. पण तिचे दुर्दैव ती डोक्यावर पडल्यामुळे तिची शुध्द हरवली होती.

भळभळा रक्त वाहत होते. डोळे मिटलेले होते पण तरीही तिने तिच्या बाळाला छातीशी घट्ट धरुन ठेवलेले होते.

तेवढ्यात तो भड्या पुन्हा खाली उतरला. आता त्या पिल्लाचा जीव घेणार....... एवढ्यात वासुनाना व त्यांच्या मित्रानी खुप मोठ्यांनी आवाज केला व त्यांच्या हातातील काठीचा दणका त्याच्या पाठीवर दिला. तो एकदम चवताळला, पण पिल्लु मेले आहे पाहुन व बरेच लोकं बघून भड्या तेथून पसार झाला. त्याच्या पाठोपाठ सारी माकडे पण निघून गेली. वासुनाना त्या माकडीनीजवळ आले. ती मरणासन्न अवस्थेत होती. वासुनानाने तिथल्याच विहीरीचे पाणी आणून माकडिणला पाजले. व पिल्लु छातीशी घट्ट बिलगलेच होते. तिने वासुनानाकडे कृतज्ञतेन बघितल अन् क्षणात डोळे मिटले. जणूकाही ती त्यांना मनोमन विनवित होती की आता तुम्हीच याचे मायबाप. पिल्लु दुध पिण्यात मशुगुल होते. त्या बिचाऱ्याला काय कल्पना आपण आता आईविणा पोरके झालो......

वासुनानांनी अन् त्यांच्या मित्रांनी माकडिणला जमीनीत पुरले व त्या पिल्लाची जबाबदारी स्वतः घेतली. त्यांनी एक दुधाची बाटली आणून त्याला पाजलं. ते पण चुकचुक करून प्यायला लागल.

माईपण त्याची काळजी घेऊ लागल्या. त्याचे अंग साबणाने धुऊन पुसुन त्यावर जंतुनाशक पावडर टाकून त्याला एका खोलीत ठेवले. पण ते एका ठिकाणी राहातच नसत, साऱ्या घरभर फिरत. त्याला ''सु'' व ''शी'' कुठे करायची त्याबाबत पण शिकविले होते.

आता तर ते खुपच उनाडक्या करीत दोघांच्याही अंगाखांद्यावर, डोक्यावर चढून बसत. ते जसजसे मोठे होऊ लागले तसतसे घरकामात पण माईला मदत करीत असत. दोघांनाही जणूकाही आपला छोटा मुलगाच आहे असे वाटे. भुक लागली तर ओठाचा चंबु करून मोठमोठ्यांनी उड्या मारत असे. तहाण लागली तर हाताची ओंजळ ही तोंडाजवळ न्यायचा.

तो फारच कुशाग्र बुध्दीचा होता. त्याला बरच काही समजायला लागल होत. कुणी परका घरी आलाच तर त्याच्या अंगावर गुरगुर करुन दात विचकायचा व नानांनी स्टॉप म्हटल की निघून जायचा.

दोघेही त्याला प्रेमाने कपिराज म्हणायचे.

आता कपिराज बराच मोठा झाला होता. त्याच्या आहारामध्येही बरीच वाढ झाली होती.

त्याला कधी शिरा, चपाती, भात, भाकर कधी दहीभात पण चालायचा. केळी, सफरचंद, आंबे व पेरु हे आवडीन खायचा. शेतात गेल्यावर कधीकधी एखाद्या झाडावर चढून झाडपाला खात बसायचा. एकदा रात्रीची वेळ होती. साधारणतः दोनेक वाजले असतील.

दरवाजा तोडून दोन चोर आत शिरले. वासुनाना व माई दोघेही गाढ झोपेत होते. कपिराज आपल्या खोलीत कॉटवर झोपले होते पण खाडखाड आवाजाने ते जागे झाले. चोर तिजोरी फोडण्यात गुंग होते.

माकड हळूच ते काय करतात हे पाहू लागले. चोर तिजोरी उघड्डुन एका कपड्यात पैशाचे बंडल व सोन्याचे दागिणे बांधत होते.

कपिराजांनी अचानक एकाच्या कानाचा चावा घेतला व दुसऱ्याच्या हातून ते गाठोडे ओढुन आपल्या खोलीत घेऊन गेला इतक्यात त्या आवाजाने वासुनाना जागे झाले. व आपली काठी घेऊन एकाच्या अंगावर धावून गेले. पण तेवढ्यात दुसऱ्याने चाकु काढून ते वासुनानाला मारणार येवढ्यात कपिराजने छलांग मारुन

त्याच्या हाताला चावा घेतला.

तो मेलोमेलो म्हणत मटकन खालीच बसला त्याच्या हातातला सुरा दुर पडला. आता पुन्हा दुसऱ्याने सुरा काढला पण क्षणाचीही उसंत न देता कपिराराजने त्याच्या अंगावर उडी मारुन जोराने ढकलले. तो खाली पडला. त्याच्याही हाताला जोराने चावा घेतला व ओरबाडायला सुरवात केली.

इतक्यात वासुनानांनेही काठीचे फटके मारण्यास सुरवात केली. ते दोघेही रक्तबंबाळ अवस्थेत तसेच पळून गेले. वासुनानाने ती उघडी असलेली तिजोरी बघितली अन् ''चोरांनी सारं लुट्टुन नेल वाटत''

अस म्हणुन कपाळाला हात मारुन घेतला. पण एवढ्यात कपिराजने त्याच्या खोलीमध्ये जाऊन ते चोरांनी बांधलेले गाठोडे वासुनानांच्या हातात दिले ते पाहुन दोघांनाही खुपच आनंद झाला. त्यांनी कपिराजच्या पाठीवर प्रेमाने हात मारुन शाबासकी दिली. ही गोष्ट त्यांनी आपल्या मित्रांना सांगितली. सर्वांनी कपिराजचे तोंड भरून कौतुक केले.

कपिराजाच्या बरोबर कुठेही जात असतांनी कुत्रेही न भुंकता शेपटी हलवत असत. असेच एकदा वासुनाना कपिराजला सोबत घेवुन शेतात गेले.

आता कपिराज बरोबर असतांनी वासुनानांचे भय पळुनच गेले होते. शेतातल्या झोपडीवजा घराजवळ आले असतांना त्यांना सळसळ असा आवाज ऐकु आला. त्यांनी बारकाईने तिकडे बघितल तर तपकिरी रंगाचे दोन डोळे, बिबट्या वाघच होता. वासुनानांना चांगलाच घाम फुटला. आता दोघांमधले अंतर फक्त वीस फुटाचे उरले. अन् क्षणात बिबट्यानं वासुनानाच्या अंगावर उडी मारली. पण क्षणार्धात कपिराजनी नानाला थोडे दुर ढकलले.

त्यामुळे त्याची उडी हुकली व तो खाली पडला. आता बिबट्या वाघाने मोठी डरकाळी फोडली. तो चांगलाच चवताळला होता. क्षणातच पावित्रा घेऊन त्याने कपिराजवर हल्ला चढविला. कपिराजने पण त्याच्या अंगावर नखांनी ओरबाडायला सुरवात केली.

ठिकठिकाणी चावा पण घेतला. दोघेही रक्तबंबाळ झाले होते. बिबट्याने अचानक वेगळा पावित्रा घेऊन कपिराजची मान आपल्या जबड्यात पकडण्याचा प्रयत्न केल पण कपिराजने अशी हुलकावनी दिली. पण पुन्हा बिबट्या वाघाने जोरदार झेप घेतली व कपिराजची मान बिबट्याच्या तोंडात जाणार एवढ्यात कपिराजने बिबट्याच्या दोन्ही डोळ्यात आपली नख खुपसली.

बिबट्याच्या दोन्ही डोळ्यातुन रक्त वाहत होते. एवढ्यात वासुनानानी दातओठ खात बिबट्याच्या तोंडावर व पाठीवर काठीने प्रहार करण्यास सुरवात केली.

कपिराजन पण बिबट्याला जिथे तिथे चावायला सुरवात केली. पण ईतक्यात बिबट्याने कपिराजचा पायच पकडला व नंतर अचानक मान आपल्या जबड्यात पकडली. तेवढ्यात कपिराजने सारी शक्ती एकवटुन बिबट्याच्या पोटात नख खुपसुन कोथळाच बाहेर काढला. वासुनानाचे बिबट्याच्या नाका तोंडावर काठीने फटके मारण चालूच होते. अखेर बिबट्यान हार मानली व रक्ताळलेला बिबट्या नजरेआड झाला.

वासुनानांनी लगेच विहीरीचे पाणी आणून कपिराजला पाजले. एकदोन घोट पाणी पिल्यानंतर कपिराजने वासुनानाकडे कृतज्ञतेने बघितलं. वाघाच्या जबड्यात मान गेल्यामुळे त्याच्यात काहीच त्राण उरले नव्हते.

हळुहळु त्याची प्राणज्योत मालवली. वासुनाना धाय मोकलुन रडु लागले.

धन्यासाठी स्वतः प्राणपनान लढला पण वासुनानाला साधे खरचटु पण दिले नाही.

वासुनानांच्या डोळ्यातले आसवांचे थेंब कपिराजच्या मृतदेहावर टपटप पडत होते. त्यांनी त्याला छातीशी कवटाळुन घेतले, जणुकाही त्यांच्याच एका मुलाला गमावले होते. एक वानरजात असुनही मानवांच्या स्वभावाला त्याने जोपासले होते.

उपकाराची परतफेड आपले प्राण देऊन केली होती. एक प्राण्याची जात असुनही कृती मानवापेक्षाही श्रेष्ठ होती. प्रेम व माणुसकी दाखवली होती. वासुनानांनी त्याच्या स्मृतीदाखल त्याला पुरुन त्याची समाधी बांधून एक मंदीरच उभारले होते. तिथेच शिला लेखात त्यांनी कपिराजने केलेल्या अफाट धैर्याचे वर्णन केले होते. शिलालेखावर शिर्षक होता '' कपिराज स्मृती''.

आजही तिच काठी टेकत टेकत वासुनाना कपिराजच्या मंदीरात जाऊन समाधीवर अश्रु ढाळतात. दोन गुलाबाची फुले अर्पण करुन आपले अश्रुने डबडबलेले डोळे पुसतात अन् कपिराजची आठवण काढीत काढीत खिन्न मनाने काठी टेकत घरी येतात..

❖



# पोटच्या गोळ्यास रूतलो...

**बोलका झालो असा मी उत्तरे झाली मुकी**
**जो न कोणाला रूचे मी त्या सवाला सारखा**
**तो कधी जाहीर झाला न्यायही झाला कधी??**
**मी असा आहे करंटा त्या निकालासारखा.**

लेखिका
**विद्याताई बनाफर**
अकोला

आयुष्याची संध्याकाळ मस्त व्हावी, स्वस्थ व्हावी , समाधानात न्हावी, एक संतुष्टीची हास्य लकेर चेहऱ्यावर सदा असावी, जीवनातील कष्ट, साधना व त्यागांच्या परिणीतीची छबी त्यात दिसावी असेच वाटते प्रत्येकाला. पण संध्याकाळ होता होताच काही वेगळंच घडू लागतं. पक्ष्यांना पंख फुटले की ते घर सोडून जातात. बाहेरच्या आकाशात खूप काही शिकतात. घरात परत आले की आई–बाबांना म्हणतात, अहो जग खूप पुढे चाललं. तुम्ही खूप मागे आहात. आधुनिक झालंय सगळं. आपणही जगाबरोबर धावलं पाहिजे तुम्ही तुमचं जुनाट सर्व सोडून. संस्कार वगैरे गोष्टी फोल आहेत. बघा यात किती मज्जा आहे! मात्र आई वडील या पिढीला पटवून देण्याचा प्रयत्न करतानाच, की बेटा संस्कार हे चिरकाल टिकणारे व माणूस बनवणारे आहेत. नवीनमध्ये सुद्धा चांगले ते घ्यावे. आधुनिकतेच्या नावाखाली घाणेरडा खेळ, चारित्र्य भंग, ज्येष्ठांचे अपमान, आपल्या श्रद्धास्थानांचा अपमान हे सर्व नको. पाय जमिनीवर ठेवूनच उंच आकाशाकडे बघावं वगैरे तत्त्वज्ञान सांगताना, त्यांना हे सर्व सांगणारे प्रत्यक्ष जन्मदाते जेव्हा आपले शत्रू वाटू लागतात, आपल्या मनमानी करण्यामध्ये अडसर वाटू लागतात, तेव्हा त्यांच्या असुरी मनात जन्म होतो एका तुरुंगाचा. त्याचे नाव असते वृद्धाश्रम. मग मागणीवर पुरवठा म्हणून सामाजिक तत्वे प्रत्यक्ष वृद्धाश्रमांना जन्म देतात आणि वृद्धाश्रम ब्रुद्धांच्या प्रवेशांनी गजबजू लागतात. खूप मागणी आहे हल्ली वृद्धाश्रमांना. काही पैसे भरून चालत असलेले म्हणजे पेड वृद्धाश्रम तर काही सहानुभूतीच्या तत्त्वावर चालणारे म्हणजे विनामूल्य. मग काही सुशिक्षित मुले आई–बाबांना पेड वृद्धाश्रमात टाकतात आणि पैसा पुरवल्याचे उपकार दाखवून तुम्हाला कशाचीच उणीव नाही हे सांगून सुपुत्रा चे कर्तव्य पार पाडल्याचा आव आणतात. त्यांना कुठे माहिती असते की हे महिनेवारी पैसे देऊन सोय केल्याने ते संतुष्ट नाहीत. त्यांना तर ज्या मुलाला या हातावर, खांद्यावर खेळवलं, नऊ महिने पोटात असताना त्यांच्या सोनेरी भविष्याची स्वप्ने

रंगविली ती सत्य होताना पाहायचे आहे. त्यांची नातवंडे खेळवायची आहेत. रात्री रोज गोष्ट सांगायची आहे. चिऊ काऊचा घास भरवायचा आहे. त्यांच्या बाललीला बघायच्या आहेत आणि हा आनंद घेता घेताच समाधानाने डोळे मिटायचे आहेत. हेच त्यांचं स्वर्गीय सुख आहे. नाही तर आता म्हणायला खायचे दात राहिले नाहीत. सर्व चवी मनमुराद घेतल्या आयूष्यात. आता पंचपक्वानांवर वासना राहिलेली नाही. अनेक आजारांमुळे खाताही येत नाही. फक्त खळखळून, आपल्या वृक्षांना आलेल्या फांद्यांचा बहर बघून त्यांच्यासोबत हसायचं, बोलायचं.

पण ... पण अचानक आयुष्यात जेव्हा हे भयानक वळण येतं, तेव्हा आयुष्यातील तो एक एक खडतर प्रवासाचा दिवस आठवतो. रात्रभर डोळे उघडे ठेवून भकासपणे दिवस उजाडेपर्यंत विचार करणे आणि पश्चातापाच्या दाहक अग्नित जळणे हेच वाट्याला येते.

वृद्धाश्रम हा विषय फार मोठा आहे कोणी म्हणतं, वृद्धाश्रमाला कारणीभूत मुले आहेत, कोणी म्हणतं सुना कारणीभूत असतात, कोणी म्हणतं म्हाताऱ्या आई-वडिलांचा स्वभावच कारणीभूत असतो. वृद्धावस्था किंवा जरावस्था. ही एक प्रकारची बाल्यावस्था असते. बालक जसे आई-बाबास हट्ट करते तसाच हा काळ असतो. एवढे कळले तरी त्यांना वृद्धाश्रमात कोणी घालणार नाही. तसेच घरात वृद्ध व्यक्ती असण्याचे फायदे लक्षात घेतले तर वृद्धाश्रमाचा विचारही मनात येणार नाही. जसे लहान मुलांना पाळणा घरात ठेवून नोकरीवर जाणारे आई बाप. घरी आजी असल्यास, आजोबा असल्यास पाळणा घराला फाटा देऊ शकतात. लेकरांना आजी आजोबांचं प्रेम मिळते. ते आई-वडिलांच्या प्रेमापेक्षाही खूप मोठं असते. हे वेगळे प्रेम असते. रात्री आजीची गोष्ट नातवंडाला खूप सुखावते.

घाई गडबडीत व्यस्त आई बाळाला हळूवार प्रेम व वेळ देऊ शकत नाही, उलट त्याच्या मेंदूवर मानसिक अत्याचार होतात. ती हळुवार पणे हवे ते संस्कार त्या मुलावर करू शकत नाही. आजी-आजोबाच्या खांद्यावर बसून, घोडा करून नातू जे खेळ खेळतो आणि आनंद मिळवतो तो आनंद त्याच्याकडून हिरावून घेतला जातो. पण पैशाने सर्व काही होते हा गोड गैरसमज असलेली मंडळी या फायद्यांकडे कानाडोळा करून मोकळे होतात. त्याचे दूरगामी परिणाम या बालकाच्या भविष्यात दिसून येतात. काही वृद्धाश्रमाची कारणे मुलांचे प्रवासन किंवा पलायन असते. शिक्षणासाठी हल्ली दहावी बारावीनंतर मोठी शहरे प्रसंगी विदेश गाठून आपल्या जन्मदात्यांचे आजारा प्रसंगी किंवा अंत्यसंस्कारासाठीसुद्धा मुले येऊ शकत नाहीत ही परिस्थिती आज बघायला मिळते. इतकेच नव्हे तर वारंवार फोन आला तर एकदाच घरी येऊन त्यांना तीर्थयात्रेला किंवा परदेशात सोबत राहायला नेतो आहे असे सांगून विमानतळावर किंवा तीर्थक्षेत्रावर सोडून दिल्याचे क्रूर प्रकार घडलेले सुद्धा वर्तमानपत्रातून वाचायला मिळतात. खेदाची गोष्ट ही वाटते की महिलांसाठी महिला आयोग आहे बालकांसाठी बाल आयोग आहे पण वृद्धांच्या या समस्यांसाठी मात्र कोणताच आयोग नाही. ज्येष्ठ नागरिक कायदे असले तरी कोणतेच वृद्ध या वयात मुलाविरुद्ध केस कोर्टात टाकून न्याय मागू शकत नाही. कारण पुत्र प्रेम आडवं येते. अजूनही मुलगा सुखी रहावा असा आशीर्वादच त्यांच्या तोंडून निघतो. काहींकडे पैसा नसतो. ज्येष्ठ नागरिक कायद्याने 'हाफ तिकीट' चे सुख दिले असले तरी लांबचे प्रवास, तीर्थयात्रा करण्याइतका आत्मविश्वास शिल्लक राहिलेला नसतो म्हणून हे कायदे अशावेळी फक्त कागदी दस्तऐवज बनून राहून जातात. एक आई व एक बाप चार-पाच मुलांचे पालन पोषण, शिक्षण, करियरपर्यंत संघर्ष करून कर्तव्य पार पाडू शकतात. पण ही पाच मुले मिळून आई व वडिलांना शेवटचे काही वर्षे जवळ ठेवू शकत नाही.

वृद्धाश्रम हा स्वतंत्र विषय आहे. प्रत्येक वृद्धाश्रमाची स्वतःची नियमावली असते. त्याप्रमाणे कमीअधिक सोयी सुविधा असतात. काही वृद्धाश्रमात इतकी घाण असते, खिडक्यांची तावदाने तुटलेली, मच्छरांचा वास असतो. पंखे नसतात. जेवणाची सोय बरोबर नाही. पुरेसे अंथरून पांघरूण नाही. अशी अवस्था असलेले वृद्धाश्रम एखाद्या नरकापेक्षा कमी नसतात. तसेच काही सेवाभावी चांगली वृद्धाश्रमेही आहेत. जे या आवश्यकता व गरजांची पूर्तता करतात. पण शेवटी अपत्य व नातवंडांच्या प्रेमाची भूक त्यांची कोणीच पूर्ण करू शकत नाही. ते अतृप्त जगतात व अतृप्तच मरतात. जागतिकीकरण, पाश्चातीकरण व आधुनिकीकरणाचा बळी आजचा वृद्ध पालक ठरत आहे या विधानात अतिशयोक्ती आहे असे मला वाटत नाही. क्यू बोझ हो जाते है वो झुके हुए कांधे जिनपर चढकर कभी तुम दुनिया देख सकते थे ?

अस्वस्थ मनातील पडसाद

लेखणीच्या शाईमधून कागदावर उमटले की, मनाचं भरून आलेलं आभाळ मोकळं होतं.

निलेश कवडे म्हणतात,

सर्वजण लिहितात येथे
कागदावरती काळजावरचे बनू लेखक तुम्ही आम्ही.

असंच काहीतरी झालं माझ्या बाबतीत. माझ्याकडे कालच एक वृद्ध स्त्री कुठून तरी माझा पत्ता शोधत घरी पोहोचली कंबर जवळपास साठ अंशा मध्ये झुकलेली .छोटीशी पण न पेलणारी बॅग हातात.अशी हळूहळू पायी येताना तिला बघून मी पुढे गेले. मी ती बॅग घेतली आणि ती मागोमाग येऊ लागली. घरात आल्यावर चहापाणी झाल्यावर म्हणाली, मला वृद्धाश्रमात प्रवेश मिळवून द्या.

वेळ सायंकाळची होती .विचारपूस केल्यावर समजलं की मुलगा व सून कॅन्सरने गेली. स्वतःचं घर होतं पण ते मुलाला मी स्वखुशीने लिहून दिलं होतं. दोन मुली व जावई आहेत पण त्या सांभाळ करण्यास तयार नाहीत. सर्वात महत्त्वाची बाब ही की, त्या आजीला अकरा हजार मासिक पेन्शन होती. पण डोक्यावर छत नव्हतं.

आजच्या फक्त नर आणि मादी मानणार्या नराधमांच्या द्रष्टीने पाहिलं तर नव्वद वरवषाची म्हातारी सुद्धा रात्र रस्त्यावर काढू शकत नाही. म्हाताऱ्या पुरूषाला मात्र ही समस्या नसते.

अकरा हजार पेन्शन असून दोन मुलींकडे ती राहू शकत नाही याचा अर्थ काय? तर पैसाही नको पण तुझी अडगळ नको.

मग मी एका सेवाभावी वृद्धाश्रमात फोन केला. जे माझ्या चांगल्या परिचयाचे होते व वृद्धाश्रम सुद्धा खूप छान आहे. त्यांनी तेथे आरोग्यसेवा नसल्याने एका तरी नातेवाईकांची फार्मवर स्वाक्षरी व आरोग्याची तक्रार आली तर दवाखाना करण्याची जबाबदारी घ्यावी लागेल असा नियम सांगितला. पण दोन्ही मुली व जावई असे करण्यास नकार देत होते. शेवटी माझा नाईलाज झाला. गयावया करून आजी मला रात्रभर राहू द्या म्हणाल्या. मी म्हटलं, अर्थातच मी रात्री थोडीच तुम्हाला काढून देणार आजी. त्यांच्या अन्ननलिकेचे ऑपरेशन झालेलं. त्यामुळे तिखट चालत नाही. मऊच पाहिजे खायला काहीतरी. खूप थोडं जेवण पण ठरल्या वेळीच पाहिजे. मुलगा मरण पावला तेव्हा मानसिक धक्कयामुळे मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी झालेल्या आहेत. वगैरे माहिती मिळाली. रात्रभर थांबून त्यांना सकाळी त्यांनी सांगितले तेथे नेऊन सोडले. पण रात्रभर झोप आली नाही मला. नंतरही किती दिवस अस्वस्थता हृदयात, मनात घर करून होती. सर्व सोयींनी सज्ज अशा वृद्धाश्रमांची आज किती गरज आहे हा विचार राहून राहून येत होता

सुरेश भटांच्या या ओळी आठवल्या,

**कोणाला कोणाचीही कसलीही माया नाही**
**सारीच बोडकी झाडे कोठेही छाया नाही**
**आता ही उरली आहे मज केवळ सोबत माझी**
**कोणीच हसाया नाही कोणीच रडाया नाही.**

प्रश्न खूप होते. विज्ञान-तंत्रज्ञान या वेगवान काळात खरंतर या वृद्ध मंडळीसाठी कुठेच जागा नाही हे कटू सत्य आहे. काही मोठ्या शहरांमध्ये तर घरातील म्हाताऱ्या सासू-सासऱ्यांसाठी 'डस्टबिन' हा शब्द वापरला जातो हे जेव्हा पहिल्यांदा ऐकले तेव्हा संस्कृती या शब्दावरचा विश्वासच उडाला. खरंच आपल्या देशाला श्रावण बाळ, श्रीराम, यांची परंपरा आहे हे खरंय का, असं क्षणभर वाटू लागलं. कुठे चाललोय आपण. एका भयानक खोल कृष्णविवरामध्ये !!

हो ज्या पद्धतीने हे सर्व चाललंय, इन्स्टंट, शॉर्टकट आणि स्पर्धा यातून जाणारा हा मार्ग बरेचदा अंधाराच्या गर्तेतच नेतो. क्षणिक सुख हे केव्हाही धोक्याचं असते हे कुणी सांगावं या पिढीला. भ्रूणहत्या होत आहे, तशीच आपल्या पालनकर्त्यांना वृद्धाश्रमात नेऊन सोडणे ही सुद्धा त्यांची हत्याच आहे. आज लग्न उद्या घटस्फोट होत आहे. पैसा, पार्टी, पद, प्रतिष्ठा, राजकारण यामध्ये माणसाचं जीवन ढवळून निघत आहे. परिणामांची तमा न बाळगता.

कोण आहे जबाबदार याला? कोण थांबवणार हे सगळं?

त्या नाकारलेल्या आई-बाबांचा हा प्रश्न आहे तुम्हाला, मला, प्रत्येकाला.

एक बाप म्हणतो, निलेश कवडे यांच्या गजलेतला,

**रंग जपला जन्मभर गुलमोहराचा**
**मी व्यथा सोसत बहरलो बाप होतो.**
**संपली उपयोगिता माझी अळेरी**
**पोटच्या गोळ्यास रूतलो बाप होतो.**

काळजातून अशी व्यथा निघत लेखणीतून झरली पाहिजे. अशा काळजातल्या लेखनाची आज गरज आहे आणि ज्यामुळे काही अतिशय गंभीर प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळू शकतात. एवढ्यासाठीच ही हितगुज आपल्याबरोबर केली. प्रत्येकाने अंतर्मुख होऊन या प्रश्नांची उत्तरे शोधावी म्हणून.

❖

# खरंच... "ती" बदलली आहे का?



लेखिका
**मनिषा शिरटावले**
सातारा

**''नव्या युगाची मी नव महिला,**
**गाईन नवीन गाणी ।**
**मी न दासी मी न देवता,**
**जगेन माणूस म्हणूनी ।।''**

अशी आजची प्रगल्भ, स्व-अस्तित्वाची जाण असलेली, स्वयंभू महिला जाचक आणि भ्रामक जुन्या परंपरांची जुनी कात टाकून नवीन युगात पदार्पण करत, स्वतः च्या कर्तृत्वाने स्वतःलाच सिद्ध करत आत्मविश्वासाने एक एक पाऊल पुढे टाकत आहे. ते पाहून म्हणावं वाटतं पुन्हा पुन्हा,

**'तुझ्या उत्तुंग भरारी पुढे**
**गगनही ठेंगणे भासावे**
**तुझ्या विशाल पंखाखाली**
**विश्व सारे वसावे,'**

स्त्रियांविषयी आणि त्यांच्या बदलत केलेल्या मनोवृत्तींविषयी, तसेच त्यांच्याशी संबंधित दृष्टिकोनाविषयी होत गेलेला सामाजिक आणि सांस्कृतिक बदल समजून घेतल्याशिवाय आपण आजच्या 'स्त्री'ची मनोभूमिका मांडणे दुरापास्त ठरेल. अन्नाच्या शोधात भटकंती करणारा मानव सहजीवन आणि सहकार्याच्या दृष्टिकोनातून एकत्र टोळ्यांच्या स्वरूपात राहू लागला. तेव्हा घडून आलेले नैसर्गिक प्रक्रियेतील स्त्री-संबंध आणि पुढे नवनिर्मितीचे अंकुर आदिमानवाला कित्येकदा काही काळ स्थिर जीवनाकडे खुणावत होते. त्यातून पुढे बालसंगोपन करता चिकित्सकदृष्टीने विचार करून लागलेला 'शेतीचा शोध' हा ही स्त्रियांनी बहाल केलेला, निदर्शनास आणून दिलेला अभूतपूर्व साक्षात्कार.

नदीच्या काठी स्थिर होणारी वस्ती, शेती, बालसंगोपन, पशुपालन असे एकमेकांच्या साहचार्यातून समूहजीवन सुरू झाले. मुलांच्या पालनपोषणाच्या जबाबदारीची आणि कुटुंबाच्या पोटापाण्याची सोय स्त्रियांवर तेव्हापासूनच आली. त्याला काही नैसर्गिक गोष्टी कारणीभूत आहेत. स्त्रियांमध्ये असणारे मातृत्व, वात्सल्य, निरीक्षण, निर्णयक्षमता, संयमाने मार्ग काढण्याची वृत्ती या बौद्धिक गुणवत्तेचे तत्कालीन समाजव्यवस्थेत स्वागतच

झाले.मातृसत्ताक समाज व्यवस्था त्याकाळी अस्तित्वात आली. स्त्रियांना मानाचे स्थान मिळाले. त्यांच्याकडून होणारी 'नवनिर्मिती' हा सर्जनक्षमतेचा दैवी चमत्कार समजला जायचा. त्यातूनच समाजाचा विधायक विकास होत गेला. मानवी जीवनात सामाजिक आणि सांस्कृतिक समृद्धीची, भरभराटीची नांदी झाली. प्रदेशविस्तार होत गेला, गावे निर्माण होऊन गावगाडा सुरू झाला.

भारतातही अशी स्थिती होती; परंतु आर्य संस्कृतीचे आगमन भारतात झाले आणि पुढे मोठ्या प्रमाणात समाजव्यवस्थेत संघर्ष होऊन मातृसत्ताक समाज व्यवस्थेचा पराजय होऊन पुरुषप्रधान संस्कृतीचा उदय झाला. काही काळ स्त्रियांना महत्त्व दिलेही गेले; परंतु स्त्रियांना दुय्यम समजणारी, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी आर्य संस्कृती धार्मिक कर्मकांडांशी त्यांना जोडून शोषितांच्या वर्गसमूहात समाविष्ट करण्यास यशस्वी झाली. 'पुरुषाचे सुख' हे साध्य आणि 'स्त्री' ही त्याचे साधन असे समीकरणही निर्माण केले गेले. वैदिक काळात उच्चवर्गीय समजल्या जाणाऱ्या स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता पण तोही मर्यादित स्वरूपाचा. उपनयन म्हणजे प्राचीन काळचा एक महत्त्वाचा शिक्षणसंस्कार. उपनयनाचा अधिकार म्हणजे विद्यार्जनाचा अधिकार. यांत दोन प्रकार होते. एक म्हणजे सदयोवधू आणि दुसरा प्रकार म्हणजे ब्रह्मवादिनी महिला. सदयोवधू महिलांना औपचारिक शिक्षण न देता घरच्या घरी जुजबी शिक्षण देऊन लग्न उरकून दिले जायचे. त्यांच्यापेक्षा काही काळच ब्रह्मवादिनी स्त्रियांना जास्त शिकण्याचा अधिकार होता; परंतु ते प्रमाण अपवादात्मक होते. गार्गी आणि मैत्रेयी या अपवाद सोडून इतर बुद्धिवादी महिलांनाही कायम 'उपेक्षित नायिका' म्हणूनच संबोधून दमन करण्यात आले.

पुढे मध्ययुगीन कालखंडात अनेक दुष्ट प्रथांवर उदा. बालविवाह, सती जाणे, मुलगा-मुलगी भेद, हुंडाबळी, स्त्री-शोषण, पिळवणूक या अनेक सामाजिक रूढी आणि चालीरिती इत्यादी. राजाराम मोहन रॉय, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिराव फुले,कर्मवीर भाऊराव पाटील या समाजाच्या क्रांतिकारकांनी समाजव्यवस्थेत क्रांती आणण्याचा भगीरथ प्रयत्न यशस्वी केला आणि शिक्षणाची गंगा विचारधारेतून झोपडी-झोपडी पर्यंत पोहोचवण्याचा यज्ञ रचला.

ज्या स्त्रियांसाठी लढायचं, तिला शिक्षित करून मानव म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून द्यायचा यासाठी ज्योतिबांनी स्वतःच्या पत्नीला शिकवून शिक्षणाची कास अखंड पुढे नेली. पत्नी सावित्री तेवढ्याच खंबीरपणे या विचारयुद्धात शिक्षणाची शस्त्रे घेऊन अंधश्रद्धा, कर्मकांड, स्त्री-शोषण, अस्पृश्यता शोषण अशा खोटा मुलामा दिलेल्या चालीरीती आणि परंपरा यांच्याविरुद्ध उभी ठाकली अखेरपर्यंत. स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून अन्याय आणि अत्याचाराला सामोरे जाऊन 'माणूस' म्हणून स्वतःच अस्तित्व निर्माण करून समाजातील दुःख,दारिद्र्य, दैन्य दूर करण्यासाठी पुढे येण्याचं बळ दिलं. प्रसंगी रक्ताच्या माणसांकडून काळजावरचे घाव झेलले, दुरावा सोसला. आप्तेष्टच नव्हे तर समाजाच्या दुधारी शस्त्रांचे वार झेलले;पण दोघेही डगमगले नाहीत आणि त्यांच्या विचारधारेला जोडलेला प्रत्येक जण अधिकाधिक दृढ होत गेला. यांत ना जातीचा संघर्ष होता ना धर्माचा. फक्त होता माणुसकी जपण्याचा धर्म. निखळ मनुष्यपण जगण्यासाठी शोषितांना, अस्पृश्यांना, स्त्रियांना जागे करून सुशिक्षित आणि संस्कारीत करण्याचा, एक उज्वल देश घडविण्याचा अश्वमेध यज्ञ. यात वाहिली समिधा अंधकार, अज्ञान, भ्रामक कल्पनांची, अंधश्रद्धांची, कर्मकांडांची, माणूस म्हणून जगण्यास आड येणाऱ्या समाजरचनेची.

शिक्षणाने स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहेत. येणाऱ्या संकटावर बुद्धीच्या जोरावर जिद्दीने प्रयत्नांच्या बळावर अचूक लक्ष्य साधत आहेत. आज राजकारण, समाजकारणाच्या क्षेत्रात ज्यामध्ये 'स्त्री' मागे असायची, तिथेही तितक्या सक्षमतेने उभी राहिलेली आहे. एक 'स्त्री' गावच्या सरपंचपदाची धुरा सांभाळत आहे, तशी देशाच्या राष्ट्रपतीपदाची धुरा, देशाचा कारभार समर्थपणे आणि यशस्वीपणे पेलत आहे. आज स्त्री शिक्षक आहे, डॉक्टर आहे, वकील आहे, अभियंता आहे, पोलीस आहे, सैनिक आहे. सर्व क्षेत्रात भक्कम पाय रोवून उंच उंच गगनभरारी घेत आहे. अशा या स्त्रियांमध्ये कितीतरी नावे घेता येतील. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. आनंदीबाई जोशी, अनुपमा निरंजना, सुनीती सॉलोमन, इंदिरा अहुजा यांनी आपले नाव सुवर्णाक्षरांत नोंदविले जाईल असे कार्य करून दाखविले आहे. क्रीडाक्षेत्रात मेरी कोम, पी. व्ही. सिंधू, गीता फोगट, हरमन प्रीत कौर, राणी रामपाल, पी.टी,

उषा,सायना नेहवाल,माणदेशी एक्सप्रेस म्हणून ओळखली जाणारी 'ललिता बाबर' यांनी देशाला जागतिक स्तरावर उत्तुंग यशाचा मानकरी होण्याचा बहुमान मिळवून दिला आहे. तर पोलीस क्षेत्रामध्ये धडाडीने निर्णय घेऊन अनेक समाजकंटकांना जबर वचक बसविणाऱ्या मीरा बोरवणकर, किरण बेदी यांचा देशाला अभिमान वाटतो. प्रेमा माथूर वैमानिक म्हणून, कौशल्या खोब्रागडे या पोस्टमन म्हणून, फातिमाबीबी मिरासाहेब या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश, सुलोचना मोदी या केंद्रीय मंत्री अशा अत्युच्च पदाच्या पहिल्या भारतीय मानकरी महिला ठरलेल्या आहेत. अंतराळवीर म्हणून सुनिता विल्यम्स, कल्पना चावला यांनी आपला ठसा उमटवलेला आहे.राजकारणाच्या क्षेत्रामध्ये ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार केला तर झाशीची राणी लक्ष्मीबाई, शिवबाला घडवून संपूर्ण जगात शिवभारत इतिहास रचणाऱ्या राजमाता जिजाऊ, राणी ताराबाई, राणी अहिल्याबाई होळकर ते सध्याच्या प्रतिभाताई पाटील, द्रौपदी मुर्मू यांनी आपला ठसा उमटवला आहे. कलाक्षेत्रामध्ये ऐश्वर्या राय बच्चन, विश्वसुंदरी सुश्मिता सेन यांनी तर सामाजिक क्षेत्रामध्ये भारतरत्न, पहिला नोबेल पुरस्कार प्राप्त करणाऱ्या मदर तेरेसा यांनी आपल्या कर्तृत्वाची मोहर उमटवली आहे. माउंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या बचेंद्रि पाल तसेच पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेच्या पहिल्या जगातील व भारतीय पहिला महिला अध्यक्ष म्हणून विजयालक्ष्मी पंडित यांनी आपले नाव नोंदवून विक्रम केला आहे. सुचेता कृपलानी या उत्तर प्रदेशच्या पहिल्या मुख्यमंत्री, सरोजिनी नायडू या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष तर पहिल्या भारतीय स्त्री-शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात.स्त्रियांना मिळालेल्या विकासाच्या संधी, आत्मविश्वास आणि झोकून कष्ट करण्याची, लक्ष्य साधण्याची कला समाजाला भरभराटीच्या शिखरावर पोहोचवायला कारणीभूत ठरली आहे.

भारताचा अमृतमहोत्सव साजरा होताना आज या सर्व 'स्त्री'भोवती गुरफटलेल्या एका एका लडीचा गुंता सुट्टा करताना, सध्याच्या समाजाच्या मानसिक पार्श्वभूमीचा मागोवा घेताना मला सध्याच्या परिस्थितीत अजूनही हा प्रश्न जबाबदारीने मांडावा वाटतो,' खरंच ''ती''बदलली आहे का? शिक्षणाने स्वावलंबन दिले, अस्तित्व दिले. जगण्याचा अधिकार दिला, व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी दिल्या. पण तरीही आजही हुंडाबळी, वंशाला दिवा पाहिजे म्हणत मुलगा-मुलगी म्हणून समाजात दिसणारा भेद आणि त्यांतून क्षणाक्षणाला होत असणारी स्त्रीभ्रूण हत्या, दर क्षणाला घडत असणारे स्त्रियांवरील अत्याचार, सामूहिक बलात्कार, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, मिळणारी दुय्यम वागणूक,कमी मेहताना आणि जास्त राबवणूक, घराघरातून केले जाणारे मानसिक खच्चीकरण, चारित्र्याचे हनन, घेतले जाणारे संशय आणि दिली जाणारी अघोरी शिक्षा, शाब्दिक बोचणी, जीवन संपवावे अशी निर्माण केली जाणारी स्थिती आजही आपली पुरुषसत्ताक पाळेमुळे खोलवर पसरवून घट्ट उभी आहेत. कितीही अत्युच्च पदावर विराजमान झालेली प्रत्येक महिला सक्षम आहे का? तिला खरंच स्वातंत्र्य आहे का आर्थिक निर्णयाचे? कुटुंबातील निर्णयातही तिच्या मतांना खरंच स्थान दिलं जातं का? एवढेच नव्हे तर तिच्याच मुला-मुलींच्या जन्मापासून ते त्यांचे शिक्षण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत तिने घेतलेले निर्णय किती स्वीकारले जातात? 'स्त्री' कितीही शिकली तरी न दिसणारे आंतरिक, मानसिक शोषण खरंच संपले आहे का? एक भारतीय स्त्री म्हणून तर तिची होणारी झोपडीपासून ते टोलेजंग वाड्यापर्यंत उपेक्षा खरंच थांबली आहे का? तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषांची नजर आणि गौणत्वाची मनोवृत्ती बदलली आहे का? घराघरात श्रमासाठी जुंपली जाणारी स्त्री आणि नोकरीच्या ठिकाणी कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी सतत क्रियाशील राहणारी स्त्री दोन्ही ठिकाणी तारेवरची कसरत करताना आजही दिसते आहे. आर्थिक सुबत्ता आली असली तरी तिच्याशी संबंधित मानसिकतेबाबत समाजाची आजही केविलवाणी स्थिती आहे. ग्रामीण भागात तर अज्ञान, अंधश्रद्धा, धार्मिक व्रतवैकल्ये, चालीरीती, परंपरा यांच्या जोखडात महिलांचे जीवन आहे असेच खडतर चालू आहे. तिही एकाच वेळी घर, शेती, मोल- मजुरी, मुलांची जबाबदारी आणि पुरुषी हुकूमत्व यांची मारकरी ठरली आहे. काही उदाहरणे अपवादात्मक आहेत; परंतु अपवाद म्हणजे बहुजनसी साधणारे बहुमत नाही ना! एक- दोघींच्या आयुष्यात लाभणारे मनुष्यपण विरळे, अन्यथा

सारे वाचनीय मृगजळाचे आभास.

स्त्रिया सुशिक्षित झाल्या म्हणजे फक्त पदवीधारक झाल्या, मोठया-मोठ्या उच्चपदावर विराजमान झाल्या, की यशस्वी झाल्या किंवा विकसित झाल्या असा संकुचित अर्थ कोणाही स्त्रीला कधीच अभिप्रेत नव्हता. तिला हळवेपणाची झालर आहे. तिला आवश्यक तेवढं हक्काचं प्रेम, आपुलकी हवी असते. हळव्या क्षणात भक्कम साथ हवी असते, सोबत हवी असते जोडीदाराची, घरच्यांचा मानसिक पाठिंबा हवा असतो. तिच्या कष्टामागील तिच्या व्यक्तित्वाच्या भूमिकेची स्वीकृती हवी असते. येणाऱ्या कटू किंवा गोड अनुभवांच्या स्वातंत्र्याची अनुभूती हवी असते. प्रत्येक निर्णय स्वतः पडताळून दृढ होण्याची संधी हवी असते. पुरुषांप्रमाणे तिच्याही मतांना इतरांनी स्वीकारावे, विचारात घ्यावे हे आत्मिक समाधान हवे असते. तिलाही स्वाभिमान आहे, त्याची पायमल्ली होणार नाही याची अपेक्षा असते. कर्तव्यात कसूर करणे हे निसर्गतः तिला मान्य नसते हे सर्वश्रुत आहेच. तिला मात्र किमान पातळीवरून कमाल पातळी गाठताना मागे खेचणारे विखारी, सलणारे शब्द, असहकाराचे वलय, चारित्र्यावरील घाव, मानसिक खच्चीकरण, कौटुंबिक कारणातील दुर्बलता,आत्मविश्वासावर शंका नको असते. ही झाली एक स्त्री म्हणून माझ्या निरीक्षण अनुभवातील प्रत्येक स्त्रीला हवीशी वाटणारी धारणा.

समाजरचनेच्या आदिम काळापासून सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बदल होताना 'स्त्री' हा केंद्रबिंदू कायम ठरला आहे. तो गतिमान आहे तसा परिवर्तनशील आहे. अनेक स्थित्यंतराच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडीत बदल झाला तरी भारतासारख्या विकसनशील देशात अजूनही प्रचंड कोटीचा मागासलेपणा राहिलाच आहे. कारण एकच खरंच ''ती'' बदलली आहे का? काही अंशी मी 'हो' म्हणेन. पण प्रशंसेच्या खोट्या उपाधी लावून मी वास्तवाकडे डोळेझाक करणार नाही. आज स्त्रीपुरुष लोकसंख्येत ५० टक्के लोकसंख्या स्त्रियांची असतानाही अर्धा कुशल वर्ग त्याला विकासाच्या पुरेशा संधी उपलब्ध न करून दिल्यामुळे मागेच आहे. त्यांच्यातील उपजत शक्तींना संधीच न मिळाल्यामुळे विकासाची अपेक्षित पातळीच गाठू शकले नाहीत.त्यांच्या विकासाची संधी नाकारणे म्हणजे मानवजातीची ५०% कार्यक्षमता व सजनशीलता मारून टाकणे होय.याला एकमेव जबाबदार स्त्री-पुरुषांना दिल्या जाणारे वर्तनातील स्वातंत्र्य-असंतुलन आहे. स्त्रियांना धार्मिक चाकोरीचे नियम लावून दुय्यमत्व बहाल करून पावलोपावली मर्यादेच्या बंधनाच्या बेड्यांत करकचून घट्ट बांधले जाते. त्यांमुळे अत्युच्च शिखरावर पोहोचलेली स्त्री-व्यक्तिमत्वाची उदाहरणे विरळ आहेत.

सध्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत सुशिक्षित आणि सुसंस्कारित म्हणवल्या जाणाऱ्या शहरी स्त्रियांमध्ये सोशल मीडिया आणि मालिका यांच्या प्रभावामुळे अधिकाधिक सणसमारंभाचे केले जाणारे अंधानुकरण एक प्रकारे विवेकवादी विचारांना फाटा देऊन अंधश्रद्धेला खतपाणी घातल्यासारखे झाले आहे. अगदी वेशभूषेपासून ते खाद्यपदार्थांपर्यंतच्या सोपस्काराचे सोहळे घडवून आणले जात आहेत. स्त्री-मुक्ती, स्त्री-स्वातंत्र्याचे मुक्तपणे दार्शनिक घडून येणारे विडंबन हे शिक्षणाचा वसा देणाऱ्या सावित्रीला अपेक्षित होते का? आपणच परंपरावादी, भोगी वृत्तीने शिक्षणाचा आणि सुसंस्कृतपणाचा असा उत्सव करून चुकीच्या भ्रामक,अवास्तव आणि अनैतिक रुजवणुकीला उजळ माथ्याने स्वीकारायला लागलो तर पुन्हा अध:पतनाशिवाय मार्गच राहणार नाही. तेव्हा प्रत्येक स्त्रीने आपल्यातील सदसदविवेकबुद्धीचा सारासार विचार करून समाज प्रगतीसाठी पावले उचलली, शोषणाविरुद्ध आवाज उठवला तरच खऱ्या अर्थाने ''ती'' बदलली असे म्हणता येईल. ह्या जाणिवेची ज्वाला जेव्हा प्रत्येक स्त्रीमध्ये निर्माण होईल आणि ती स्व-अस्तित्वाच्या आविष्कारासाठी, सुप्त गुणांच्या अभिव्यक्तीसाठी, स्वाभिमानासाठी सज्ज होईल आणि खोट्या पुरुषत्वाचे, चालीरीतींचे, परंपरांचे, धार्मिक कर्मकांडांचे स्तोम स्वतःच्या अंतप्रेरणेतून उलथवून लावेल. सकारात्मक प्रगतीत अडथळे आणणारे सर्व पाशसुद्धा तोडण्यास तिची तीच उभी राहील तेव्हाच ती खऱ्या अर्थाने बदलली असे म्हणता येईल.एकच नारा तिचा सर्वत्र दुमदुमेल,

**''नको पूजाया मानूनी देवता,**
**माणूस म्हणूनी,जगू द्या मला,**
**स्वतंत्र जग माझे स्वीकारा,**
**बळ द्या मला बहराया,**
**अवकाश माझे पंख पसराया''**

❖



# जीवनकथा


लेखिका

**अश्विनी संदीप कोठावळे**

परळी, सातारा.


साधारण सात ते आठ वर्ष वय असणारी रश्मी तिच्या आईसोबत घरापासून जवळच असणाऱ्या बागेमध्ये फिरावयास गेली होती. रश्मी खेळण्यात गुंग होती व तिची आई बागेमध्ये एका बाकावर बसून सर्व बागेतील मुलांना खेळताना न्याहाळत होती. खेळताना बागेतील मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह ओसंडून वहात होता. बागेमध्ये मुलांच्या सोबत खेळताना रश्मी खुश आनंदी वाटत होती.

काही वेळाने बागेमध्ये तिच्याच वर्गातली एक वर्गमैत्रीण तिच्या बाबांसोबत खेळावयास आली त्या वर्ग मैत्रिणीला पाहून रश्मी जोराने ओरडली मीना.. मीना.

रश्मीने हाक मारल्याचे ऐकून मीना ने तिच्याकडे नजर वळवून पाहिले..... आणि दोघी एकमेकींना बघून खूप खुश झाल्या आणि बागेमध्ये घसरगुंडी, झोपाळा व इतर खेळ खेळण्यात मग्न झाल्या. रश्मी ची आई आणि मीनाचे बाबा मुलींचा खेळ पाहून खुश होते.

नंतर रश्मी ची आई व मीनाच्या बाबांच्या मध्ये मुलींच्या खेळण्या वरून संवाद सुरू झाला......

बऱ्याच नेहमीच्या गप्पा गोष्टी झाल्यानंतर ती दोघेही आपापल्या मुलींना घेऊन घरी जायला निघाली.... तेवढ्यात जाता जाता रश्मीने मीनाला प्रश्न केला.

अगं मीना.... उद्या या आपल्या शाळेमध्ये mother and child चित्रकला स्पर्धा आहे....तू ..ये..मी ही माझ्या आई सोबत येईन.. ओके?...

मीनाने फक्त सगळं ऐकून घेतलं आणि आणि ती निशब्द झाली.... तिने फक्त मान डोलवली आणि ती तिथून घरी जायला निघाली.

मीनाच्या चेहऱ्यावरील भाव व डोळ्यातील पाणी पाहून तिच्या बाबांना सर्व लक्षात आले. मीनाच्या बाबांनी रश्मीला व तिच्या आईला बाय म्हंटलं आणि तेही तिथून जायला निघाले.

मीना : बाबा... बाबा

बाबा : काय ग बाळा... बोल ना?..

मीना : माझी आई.....माझी आई ... असे बोलून ती हुंदके देऊन रडायला लागली.

बाबा : बाबांच्या ही डोळ्यात अश्रू तरळले तिला रडताना पाहून...त्यांनी तिला कसं बसं शांत केलं... व म्हणाले हे बघ बाळा... आपण घरी जाऊन बोलूया का ???

मीना : (डोळ्यातले अश्रू हाताने पुसतच)... बरं बाबा

दोघेही चालत चालत घरी आले. घरी आल्यावर मीना हात पाय स्वच्छ धुऊन शुभंकरोती म्हणावयास देवघरात गेली... मीनाची आजी देवापुढे निरांजन लावतच होती तेवढ्यात मीना तिथे पोहोचली.

आजी : आलीस बाळा...

मीना : हो आजी..

आजी : शुभंकरोती म्हणून देवाला नमस्कार कर बाळा...

मीना : हो आजी करते.

मीनाने व आजीने देवाला नमस्कार केला आणि त्या दोघीही देवघरातून बाहेर आल्या... आजी स्वयंपाक घरात स्वयंपाक करण्यास निघून गेली तर मीना दिवाणखान्यात एकटीच बसून स्वतःच्याच विचारात मग्न झाली.

मीनाला विचारात मग्न असलेली पाहून बाबांनी उगाचच चुकार जोक करून तिला हसवण्याचा प्रयत्न केला... बाबांच्या जोक वर मीनाने कोणतीच प्रतिक्रिया न देता ती शांत बसून राहिली आणि तिने राहून राहून परत तिच्या बाबांना तोच प्रश्न केला.

मीना : माझ्या आई बद्दल सांगा ना.. बाबा.. please???

बाबांना या चिमुकलीच्या प्रश्नांना काय उत्तर द्यावे ते सुचेना.... बाबा विचार करत राहिले... काय सांगू तिला???... कसं सांगू या बाळाला माझ्या???... या वयात चिमुकलीला सांगून काय समजणार???...या सारखे प्रश्न बाबांच्या मनात घोळत होते. तरीही तिला बरं वाटावं म्हणून बाबांनी सांगण्यास सुरुवात केली आणि बाबांच्या मध्ये व मीना मध्ये संवाद सुरू झाला..

बाबा : अगं बाळा तू छोटी होती ना... तेव्हाच तुझी आई हे जग व आपल्याला सोडून देवाघरी गेली.

मीना : म्हणजे काय??? .. बाबा.

बाबा : म्हणजे जी माणसं देवाघरी जातात ती परत कधीच येत नाहीत बाळा.

मीना : म्हणजे माझी आई आता कधीच परत येणार नाही का ???

बाबा : (बाबांचा कंठ दाटून आला) .. हो बाळा.

मीनाच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. आता फक्त तिने हंबरडा फोडणचं बाकी होतं.... बाबा थोडावेळ हे सर्व शांतपणे पहात होते. बाबांनी फक्त तिच्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली होती.. हळूच तिला जवळ घेतलं आणि आपल्या या दोन्ही बाहूंच्या मध्ये कवटाळून तिला म्हणाले...

बाबा : अगं वेडे.... मी आहे ना.. तुझा बाबा आहे ना बाळा.. मी सदैव तुझ्या बरोबर आहे बाळ.

तीच्या डोळ्यातील अश्रू पुसतच बाबांनी तिला आधार दिला. बाबांच्या बोलण्याने तिला थोडा धीर आला.. आणि ती बाबाला परत एकदा बिलगली....

तेवढ्यात आजोबांच्या पावलांची चाहूल लागताच तिने बाहेर धाव घेतली आणि आजोबा ...आजोबा ..म्हणून

बागेमधील मज्जा सांगण्यास सुरुवात केली... आजोबा ही तीच बोलणं लक्षपूर्वक ऐकत होते.... हे सांगताना तिचा आनंदी चेहरा बघून आजोबांचं मन सुखावून जायचं.. आणि आजोबा तिची पापी घेऊन तिला जवळ घ्यायचे.

आईविना पोर म्हणून आजोबांना तिची दया यायची.

आजोबा, आजी, बाबा आणि ती... एवढंच तीच विश्व... तीच एवढंच चोकोनी कुटुंब... आजी प्रेमाने तिचा सांभाळ करायची... आजीनं तिला आईची माया लावण्याचा प्रयत्न करत होती ...

आजोबां आजीच्या मायेच्या उबीखाली, वडिलांच्यां भक्कम छत्रछायेखाली तीच बालपण सरत होतं.... बालपणीच स्वभावाने curious असणारी मीनू आता शाळेमध्ये चांगलीच हुशार होती ... शाळेमध्ये होणाऱ्या स्नेसंमेलनात ती आवर्जून सहभाग घ्यायची.. तिला गाणं गुणगुणणं फार आवडत असे . शाळेमध्ये होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेत तिला प्रथम क्रमांकाचं पारितोषिकही मिळालं होतं.. तिच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी तिचे

बाबाही तेवढीच धडपड करत असायचे.. हळूहळू ती तिच्या रोजच्या दिनचर्या मध्ये व्यस्त होऊ लागली... कालांतरानंतर... तिचा रोजचा दिनक्रम चालू असताना एके दिवशी तिच्या दहावीच्या रिझल्टची वेळ येऊन ठेपली होती..

घरामध्ये आनंदाचं वातावरण होतं.. आज मिनू चा दहावीच्या परीक्षेचा निकाल लागण्याचा दिवस होता... घरातील सर्वजण त्याच उत्सुकतेत होते... आजीने तर आनंदाच्या भरात देवासमोर अगोदरच पेढे ठेवून दिले होते.. आजोबांनी मीनूच्या आवडीची सायकल सुद्धा ठरवून ठेवली होती... आणि मिनू चे बाबा मात्र शांत, धीर गंभीर असून कोणत्यातरी विचारात मग्न होते.... तेवढ्यात मिनू हातात दहावीचा रिझल्ट घेऊन धावत धावत पायऱ्या चढून वरती आली..... आजी...आजी.. आजोबा.... बाबा.. बाबा..... स्वयंपाक घरातून मीनूच्या आवाजाचा कानोसा घेत आजी बाहेर आली, आजोबा ही डोळ्याला चष्मा लावता लावता बाहेर आले... मीनूच्या चेहऱ्यावरील आनंद आणि हातातला रिझल्ट सर्वकाही सांगत होता ..मीनूला परीक्षेत ९५ टक्के मार्क मिळून ती उत्तीर्ण झाली होती....

मीनू : बाबा... बाबा.. कुठे आहात तुम्ही ???... बाबा.

बाबा : ( बाबा खूपच भावनिक झाले होते ..रडवेल्या स्वरातच बाबांनी मिनुला आवाज दिला ) ....मीनू बाळ.....ए मीनू बाळ ...अभिनंदन बाळा तुझ ...खूप ...खूप अभिनंदन.

मीनू बाबांना येऊन बिलगली...आणि मीनू व बाबाही दोघे ही ढसाढसा रडायला लागले... मिनू समजली होती की बाबा वरून दिसायला कणखर पण आतून एकदम हळवे होते... मीनूला लहानपणापासून सांभाळताना त्यांनी स्वतःला कधीही हळवं होऊ दिलं नव्हतं.... पण आज काय झाले कोणास ठाऊक...??? बाबांना भावनिक होताना पाहून मीनूला फार वाईट वाटले आणि ती सुद्धा जोरजोरात रडायला लागली.

मीनू : बाबा ..बाबा ..तुम्ही का रडताय ??? ..बाबा...

बाबा : अगं ..याला काय रडणं म्हणतात का??? हे तर आनंदाश्रू आहेत बाळा ...तू खूप मोठी हो .. यशस्वी हो असा आशीर्वाद देऊन बाबांनी तिला आजीने आणलेला पेढा खाऊ घातला व सर्वांनी पेढे खाऊन आनंदाने एकत्र भोजन केले.

मीनू आता करिअरच्या उंबरठ्यावर उभी होती..

मीनू च्या ठायी असणाऱ्या बुद्धिमत्तेला योग्य न्याय देता यावा म्हणून बाबांनी तिच्यासमोर करिअर च्या दृष्टीने अगोदरच अनेक पर्याय उपलब्ध करून दिले होते..पण

मीनू ने विज्ञान शाखेतून डिग्री घेऊन graduation पूर्ण करण्याचा निर्णय घेतला होता...ह्या तिच्या निर्णया मागे काही ठोस कारणं ही होती...पण त्याचा उलगडा मी आताच करू इच्छित नाही..

मीनू च शिक्षण आता उत्तम चालू होतं... हळूहळू वर्ष सरत होती..आता ती ऐन तारुण्याच्या वयात होती ....graduation च दुसरं वर्ष संपून आता तिने शिक्षणाच्या तिसऱ्या वर्षात पदार्पण केलं होतं....अभ्यास करता करता ती आजीला घरातील कामातही मदत करत असे .. आजी तीला नेहमी सांगायची ..बाळा मी असे पर्यंत तू सर्व स्वयंपाक शिकून घे...नंतर मी गेल्यावर तुमच्या तिघांचे पोटाचे हाल व्हायला नकोत ...आजीच्या या बोलण्याने मीनू उदास होत असे ...मीनू खिन्न होऊन आजीला म्हणाली....

मीनू : आजी तू असं का बरं बोलतेस ?? ..तुला काहीही होणार नाही....

आजी : अगं ..पिकल्या पानांसारखे आम्ही कधी ना कधीतरी गळून पडायचेच.....मीनू ल याचा अर्थ लवकर लक्षात येईना.... म्हणून तिने परत विचारलं...

मीनू : म्हणजे काय आजी ???

आजी : म्हणजे अगं ...आता माझं वय झालं... मी आता पंचाहत्तरी ओलांडायच्या जवळ आले... आजी आता खरंच थकायला झाली होती... थोडं जरी काम केलं तरी ती मनाने आणि शरीराने सुद्धा थकत होती...वरचेवर आजीच्या तब्बेतीच्या तक्रारी चालूच होत्या...म्हणून आजी तिला स्वयंपाक शिकून घे असं सांगत होती...आजीच्या बोलणं मीनू आता लक्षपूर्वक ऐकत होती....मीनू ला कळलं होत की आजी एक ना एक दिवस आपल्याला सोडून जाईल...

मीनू : ( चहा चा कप घेऊन आजोबांच्या जवळ आली ).

व आजोबाना म्हणाली .....आजोबा तुम्ही एवढे उंच..आजी इतकी बुटकी

...तुम्ही कसं काय आजीला पसंत केल...

आजोबा : ( हसले ) व म्हणाले ...अग..त्या वेळेस आम्हाला कुठं विचारलं जातं होत ..सगळं काही ..आम्हाला न विचारताच ठरलं जायचं... फक्त मुलगी दाखवली जायची आणि ...आणि लग्न लावून दिलं जातं होत ...तुझ्या आजीच ही तसच होत गं ..... तुझ्या आजी ने तर मला कधी पाहिलच नव्हंत....बिचारी मान खाली घालूनच लग्नाला उभी होती....पण तू हे का विचारतेस मीनू...???.

मीनू : काही नाही असंच...सहजच....

आजोबा : बर ..ठीक आहे..तुझा अभ्यास कसा चालू आहे मीनू ???

मीनू : आजोबा आताच आमची तिमाही चाचणी परीक्षा झाली...मला त्यात ही चांगले गुण मिळाले.

आजोबा : आशीच प्रगती करत रहा मीनू....

मीनू : हो... आजोबा

आजोबा आजीपेक्षा फक्त २ वर्षांनीच मोठे होते....त्यामुळे आजी पेक्षा ते ही वयाने मोठे असले तरीही त्यांची अंगकाठी एकदम..सडपातळ, उंच, होती....रोज बागेमध्ये फिरायला जाणे हा त्यांचा नित्यक्रम होता... आता बाबांची ऑफिस मधून घरी यायची वेळ झाली होती... मीनू.. बाबांच्या प्रतीक्षेत पायरीवरच बसून होती..आज तिला बाबांशी काहीतरी बोलायचं होतं... व ती त्या विचारात असताना ..बाबा ..दमून ..थकून घरी आले ....

बाबांना असं पाहता मीनू ने कोणताच विषय त्यांच्याकडे काढला नाही.. तिने बाबांशी बोलण्याच टाळलं होतं.... तेवढयात आजीने मीनू ला हाक मारून बाबांना चहा नेहून दे असं सांगितलं...मीनू हातात चहाचा कप घेऊन दिवाणखान्यात आली... बाबा.. चहा.. असं म्हणताच बाबांनी कप घेऊन चहाचा आस्वाद घेण्यास सुरवात केली...इतक्यात मिनुच्या मैत्रिणीचा नीता चा फोन बाबांच्या मोबाईल वर आला...

बाबा : मीनू ..मीनू ... अगं फोन आला आहे..तुझ्या मैत्रिणीचा...

मीनू : कोण आहे ???..बाबा..

बाबा : अगं.. नीता???

मीनू : आलेच मी .....

मीनू धावतच बाहेर आली... आणि फोनवर बोलायला लागली ... फोनवर बोलता बोलता... मीनू एकदम शांत झाली.... नीता काय म्हणते ते ऐकु लागली... नीता ने फोन वरच रडणं चालू केलं.. कारण.. नीताच्या घरच्यांनी तीच लग्न ठरवलं होतं... लग्न ठरवतानाची सर्व हकीकत नीता ने मीनूला सांगितली.... मीनू ने तिला तू शांत रहा... आपण बोलू या विषयावर.... असं म्हणून तिची समजूत घातली... व फोन ठेऊन ती तिच्या खोलीत निघून गेली... सायंकाळी ७ वाजण्याची वेळ होती... आजोबा... रानडे आजोबांना सोबत घरी घेऊन येत असतानाच वाटेत त्यांना नीता भेटली... ती ही मीनू ला भेटायला घरीच येत होती.. दिवेलाग्नीच्या वेळेला आजीने मिनुस आवाज दिला व देवाजवळ निरंजन लाव असे सांगितले. नेहमीप्रमाणेच देवाला प्रार्थना करून ती आजीला मदत करण्यास स्वयंपाक घरात गेली.

नीता : मीना ...मीना...असा जोराने तिने आवाज दिला....

मीना : कोण आहे?? आलेच मी .. असं म्हनून उत्तरं देत ती बाहेर आली....

मीना : अगं नीता तू ???

नीता ला बघुन मीना ला जरा आश्चर्यच वाटले...मीना तिला सोफ्यावर बसावयास सांगितले.. व त्या दोघींमध्ये चर्चा सुरू असतानाच मिनाचे आजोबा व रानडे आजोबा घरी आले... आजीने अगोदरच चहा उकळवायला ठेवला होता ...चहा घेऊन ती तडक दिवाणखान्यात आली ... आता सगळ्याच्यांच दिवाणखान्यात गप्पा सुरू झाल्या... हसण्या खिदळण्याचा आवाजामुळे घर .. कसं दुमदुमलं आणि गजबजलं होतं....

या गजबजेल्या घरात नीता अगदी सगळं विसरून गेली होती....नीता चे लक्ष्य दिवाणखान्यातील एका फ्रेम कडे गेलं..सगळे शांत झाल्यावर नीता ने त्या फ्रेम बद्दल आजी ला विचारलं...आजी या फ्रेम मध्ये तुम्ही सगळेजण आहात..फक्त मिनाची आई नाही असे का बरं???

आजी : ( थोड्या धीर गंभीर स्वरात म्हणाली) अगं ..ती या फोटोत नसली तरीही ती आमच्या सर्वांच्या मनात आणि तिच्या सर्व आठवणीं या घरात सदैव आहेत..

आजीच्या या मोठ मोठ्या शब्दांचा अर्थ मीनाला काही प्रमाणात कळाला होता.. आजी ने नीता ला

मालती बद्दल सांगण्यास सुरवात केली..

आजी : अगं मालती आमची सून व मिनाची आई... ती स्वभावाने प्रेमळ, शांत, आणि मनमिळावू होती. मीना ६ वर्षाची असतानाच ती आम्हा सर्वांना सोडून देवाघरी गेली ...या माझ्या नातीला तिचा फारसा सहवास सुद्धा लाभला नाही..पण काय करनार ..देवाच्या करणी पुढे कोणाचे काहीच चालत नाही ...असे म्हणून आजी तिथून निघून गेली..रानडे आजोबा हे सर्व ऐकत होते. रानडे आजोबांनी.. ...आजीला गहिवरून आलं होतं हे जाणलं होत आणि म्हणून त्यांनी नीताशी बोलण्यास सुरवात केली..

रानडे आजोबा : अगं मीना ची आई ही माझीच मुलगी होती बाळ... लहानपणापासून च शांत,. प्रेमळ होती ती... घरात तिचा वावर म्हणजे.. घर कसं गजबजून जायचं... घरात ती असल्याने... आम्हाला फार काही करावं लागायचं नाही... ती सगळी जबाबदरी अगदी यथेच्छ पार पाडत असे... तिच्या या लोभस स्वभावाने तिने फार माणसांना जोडून ठेवले होते... त्यात ही आमची दोन्ही कुटुंब... कुलकर्णी घराण्याची सून आणि रानडे घराची लेक या दोन्ही जबाबदाऱ्या वरही ती खरी उतरली होती. पण देवाला ते मान्य नव्हतं की काय कोण जाणे???...तिच्या शरीरात रक्तामध्ये अनेक गाठी झाल्याने व ऑपरेशन च्या वेळी काही complication आल्याने ती आम्हाला सोडून गेली.. तिची उणीव आजही आम्हाला भासते.. या माझ्या नातीला... मीनूला तिचा फारसा सहवास, प्रेम, माया देखील मिळू शकली नाही.. याचीच आम्हा सर्वांना खत वाटते... एवढं बोलून रानडे आजोबा शांत झाले... मीनूचे ही डोळे पाणावले होते.. इतक्या वर्षांनी मिनु समोर हे सत्य उघडकीस आलं होतं.. मिनुने बाबांच्या खोलीत जाऊन आईच्या फोटोला नमस्कार केला व ती ढसाढसा रडली... थोड्या वेळाने बाबा ही खोलीत आले... आणि त्यांनी मीनूला समजावलं व ते नीता आणि मीनूला बाहेर फिरावयास घेऊन गेले.

बघता बघता दिवस सरत होते. पण मालतीच्या आठवणीं अगदी ताज्या तशाच होत्या... मालती गेली पण मीनूच्या रुपात तिच्या आठवणीं ठेवून गेली... असे मीनूचे आजोबा नेहमी सर्वांना सांगायचे... घड्याळातील वेळ पाहताच रानडे आजोबा कुठले व माझी आता जेवणापूर्वीच्या औषधांची वेळ झाली असं सांगून ते घरातून निघाले. घरातून निघाल्यावर त्यांनी जाता जाता त्या फोटोकडे नजर टाकली व म्हणाले.... माझी लेक या घरात नाही असं कदापि वाटलं नाही आणि ते असं बोलून आनंदी मनाने घराबाहेर पडले. तेवढ्यात बाबा नीताला घरी सोडून मिनू सोबत घरी येताना दिसले.... आजी लगबगीने स्वयंपाक घरात गेली व तिने सर्वांच्या जेवणाची तयारी करायला घेतली आणि सर्वांनी एकत्र भोजन ग्रहण केले.... शतपावली करून झाल्यावर आजोबा व मिनू आपापल्या खोलीत झोपावयास गेले... मिनूही आता शांत झोपी गेली होती... उद्या कॉलेजमध्ये अंतिम परीक्षेसाठी एक्स्ट्रा क्लास ठेवण्यात आलेला होता.. मीनूच्या मैत्रिणी उद्या तिच्या क्लास साठी तिला घ्यावयास येणार होत्या व सर्वजणी मिळून छोट्याशा एका हॉटेलमध्ये जाणार असल्याचे मिनूने आजीला सांगितले होते.....

आजीने मीनूला सकाळ झाली उठ बाळा असं म्हणून हाक मारली... मिनू सकाळी स्वतः सगळं आटोपून नाष्टा करण्यास स्वयंपाक घरात आली व आजीला म्हणाली... आजी बघ ना... सगळ्यांच्या जीवनात काहीना काही दुःख हे असतेच पण तरीही त्या दुःखाशी दोन हात करून आपल्याला पुढे जावेच लागते... तुम्ही सगळ्यांनी माझा एवढा छान सांभाळ केला की मला आई नसल्याच दुःख, वेदना पचवता आल्या... आणि आता त्यासोबत निर्माण होणाऱ्या प्रश्नांना मी आता सहजपणे सामोरे जाऊ शकते. Thank you आजी.. तू माझी.. आजी नसून... आई झालीस... thank you very much आजी.. I love you.... असं बोलून तिने आजीला कडकडून मिठी मारली.

**अलक**

**'' हा काय प्रकार !**
**बिनडोक कुठला,**
**निदान शुभेच्छा देतांना**
**तरी नीट देत जा,**
**माझा धर्म कोणता?**
**आणि तू मला कोणत्या**
**देवाचे आशीर्वाद दिलेत ?''**

– प्रविण जगन्नाथ बोपुलकर

# हितगूज निसर्गमित्राशी...



लेखिका
**कांता भोसले**
सातारा

हितगूज निसर्गमित्राशी......
अरे निसर्गा....... नाही नाही, 'अरे,निसर्गराजा' म्हणेन मी. तुझ्यासाठी तेच योग्य वाटतं. मित्रा, तुझ्याशी आज काही बोलायला आलोय मी, ते तू नक्कीच ऐकून घेशील यात काही वादच नाही. आपल्या दोघांची अगदी आपल्या नकळतेपणापासूनची मैत्री. आजपर्यंत दोघेही स्वतः इतकेच एकमेकांवर जीवापाड प्रेम करत आलो आणि मैत्रीच्या नात्याने घट्ट बांधले गेलो. आभाळाच्या छताखाली आणि धरणीच्या अंगाखांद्यावर खेळलो, बागडलो. पण खरंच मित्रा, माझ्यापेक्षा तूच मला वेळोवेळी सावरलस, घडवलस. तुझी साथ मला लाभली हे माझ्यासाठी खूपच मोलाचं ठरलं म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजतो. कारण तू तुझ्या कुटुंबाबरोबर माझ्याही कुटुंबाची उत्क्रांती केलीस. तुझ्या आधारामुळेच मी आज माणूस म्हणून उदयाला आलो आणि मानाने जगतो आहे म्हणूनच मला नेहमी तुला मित्र म्हणून घ्यायला अभिमान वाटतो. मित्रा, तू प्रत्येक ऋतूत माझ्या परिवाराला जे जे गरजेचं ते ते सर्व भरभरून दिलस. आजही देतो आहेस. देताना तुझा हात कधी थरथरला नाही. सढळ हाताने ओट्यात ओततो आहेस. आम्हाला पोसताना तुझ्या मनाला कधी स्वार्थ शिवला नाही, की कधी पायापुरता विचार केला नाहीस. उन्हा– पावसापासून रक्षण करतोस. विसाव्याला गार सावलीला घेतोस. याशिवाय फळाफुलांची बरसात करतोस. भेदभावाचा वारा तुझ्या गावी कधी फिरकलंच नाही. तू सदैव तुझ्या कुटुंबापेक्षा माझ्याच कुटुंबाची जास्त काळजी घेतोस. स्वतःच्या लेकरांप्रमाणे अन्नदाता होऊन पालकत्व स्वीकारलं. आजपर्यंतच्या सर्व पिढ्यांना जीवापाड प्रेम करतोस,पोसतोस म्हणून माझी प्रगती झाली. खरंच, तुझ्या मनाचा मोठेपणा वाखाणण्यासारखाच आहे. तुझं हे नि:स्वार्थ,प्रामाणिक कर्तृत्व पाहून मला खूपदा प्रश्न पडतो, की तुला हे आभाळाएवढं मोठं मन कोणी बहाल

केलं? तुझं कर्तुत्व एवढं महान असूनही त्याची वाचाळता तुझ्या तोंडून कधी झाली नाही की त्या अविर्भावात तुझं वावरण कधी दिसलंच नाही. आमच्यासारखा उथळ होऊन कधी खळखळला नाहीस. सदैव कर्तव्याची जाण मनात ठेवून जमिनीवर पाय रोवून उभा आहेस. एवढ्या संयमी तू.कसं काय तुला हे जमतं सारं? खरंच मित्रा, तुझी तुलना नाही रे कोणी कुणाशी करू शकत हे तितकंच खरं.

तुझ्याशी अजून एक गोष्ट बोलावीशी वाटते. ती म्हणजे तुझे संस्कार खूप महान आहेत. ते तुझ्या लेकरात तुझ्यासारखेच रुजलेत म्हणून तुझी लेकरं तुझ्यासारखीच सर्वांशी नेकीने वागतात. काडीमात्र सुद्धा बदलली नाहीत बघ. माझ्या लेकरांशी प्रामाणिकपणे व्यवहार करतात. त्यांचं वागणं तुझ्याइतकच कौतुकास्पद आहे. पण मित्रा,मी हारलो रे. माझ्या वारसात संस्कार रुजवताना मी कुठे कमी पडलो तेच मला कळेनासे झाले आहे. आज त्यांचा शोध घेत जगभर भटकण्याची पाळी माझ्यावर आली आहे. कुठे चुकलीत माझी पोर?याचं आत्मपरीक्षण करतोय मी. तसा खोल विचार केला तर तुझे माझे वर्षानुवर्षाचे मैत्रीचे ऋणानुबंध. पण माझी लेकरे ते ओढूनताणून तोडून पाहतायत. परिवर्तनाच्या नावाखाली अघोरी महत्वाकांक्षा बाळगत आहेत बदलती जीवनशैली म्हणत. स्वतःच्या स्वार्थासाठी, मतलबासाठी तुझ्या लेकरांवर अन्याय करत आहेत, तुझा समतोल बिघडवत आहेत, पावसाच्या वाटेत अडथळे निर्माण करत आहेत. हे मलाही कळतंय रे पण त्यांना त्याचं भान नाही की चाड नाही. हीच तर माझी शोकांतिका आहे.

आता तूच बघ ना! तुझी कत्तल होते आहे. तुझ्या घराला वणवा लावला जात आहे.मग त्या वणव्यात तुझ्या बी-बियाणांचा तडफडून अंत होतोय. तुझ्या आसऱ्याला राहणारे तुझ्यावर त्यांचे जीवन अवलंबून असलेले प्राणी, पक्षी, कीडा, मुंगी आणि सरपटणारे लाखो जीव बेघर, बेसहारा होत आहेत. त्यांच्या पिढ्यानपिढ्या नष्ट होत आहेत. कित्येक संसार मोडत आहेत. पण कुणाचं मन कळवळेना की गहिवरेना . तुझ्यावर सपासप वार करताना तुझ्या किंकाळ्या कुणालाच ऐकू येत नाहीत. एवढी आंधळी-बहिरी झालीत माझी पोर. संवेदनाच बोथट झाल्यात त्यांच्या. तू काही म्हण, पण हे दगड झालेत दगड. तुझ्या पोरांसारखा एकोपा नाही राहिला त्यांच्यात. ज्याला त्याला आपलं पडलंय.काय तर म्हणे, प्रगती होते आमची. पण खरं सांगतो तुला, मित्रा ही तात्पुरती प्रगती काही कामाची नाही.उद्याची पिढी त्यांच्या प्रगतीचं कौतुक नाही करणार तर त्यांच्यावर आमचं कायमच नुकसान केलं म्हणून आरोळी ठोकत राहणार. पैशानं सगळं सुख विकत घेता येत नाही. आता बघ ना, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इतकं वाढले आहे, की श्वास घेणं मुश्कील होतंय. हे कुणाच्या लक्षात येईना? का जाणून बुजून कोणी लक्ष देईना. मला तर काही कळेना बघ. पण काही म्हण, त्यांच्या अशा विकृतपणामुळे माझ्यावर लाजिरवाणं जिणं जगण्याची वेळ आली आहे. बघ ,पण मी तुला सांगतो मित्रा, तुझ्यावरील छळवादाने एक दिवस त्यांना पश्चातापाला सामोरे जावं लागतं की नाही? लांब कशाला मी आजच गावात फेरफटका मारत असताना काही गोष्टी जाणवल्या मला.

ज्यांनी तुझी कत्तल करून घर बांधली. तुझ्या नद्यांचा, ओढ्यांचा प्रवाह अडवला, त्यांच्या गावात नक्षत्राविना केव्हाही पाऊस धुमाकूळ घालतोय. शेतातील हाता-तोंडाला आलेली पिकं वाहून जात आहेत. पुराच्या भीतीने जो तो जीव मुठीत घेऊन जगतोय. ज्यांनी वणवा लावला त्या वणव्याने तुझे वारसदार दुर्मिळ झाले आहेत. त्यामुळे ते आजीच्या बटव्यालाही पोरके झाले आहेत. झाडांची कत्तल करून, डोंगर फोडून पायथ्याला मानवाच्या वसाहती झाल्याआणि तेथे भर दिवसा वाघ,सिंह घरात घुसतायेत. डोंगरदर्यांच्या, ओहोळाच्या वाटा मोडल्या त्यामुळे पावसाचे पाणी डोंगरात मुरतंय आणि डोंगर कोसळून वसाहती नष्ट होत आहेत.नदी- नाल्याची दिशा बदलून वाळू उपसून तुझी कत्तल करून मानव स्वार्थ साधत आहेत. स्वतःच्या प्रगतीच्या , विकासाच्या नावाखाली तुझ्या कारभारात ढवळाढवळ करतात. आता तूच बघ काही कारणाने हवेतलं तापमान वाढलं तसं तसं विहिरींनी तळ गाठलं. बघता बघता जमीन भेगाळली पिकं करपली. ओसाड माळरान वाढत आहे .वारा भिरभिरतोय पालापाचोळा घेऊन. तेव्हापासून मातीची धूप वाढली. माती- पाण्याविना तुझी वाढ खुंटली. तू ही वटत चाललास.तुला वाढवणारी

तुझी रक्षण करणारी मातीच सत्वहीन झाली. तसं ऋतुचक्रही बदलायला लागले. मला आता कळून चुकले, की तुझं जगणंच मुश्किल केलंय माझ्या पोरांच्या छळवादांनी आणि स्वतः थेंब भर पाण्यासाठी भटकतात रणरणत्या उन्हात रानोमाळ दुष्काळाच्या झळया सोसत. माझ्या अवतीभोवती रात्रंदिवस घोंगावत राहते एक अदृश्य वादळ. ते मला विचारते हा वनवास का आला? कुणामुळे आला? आता मी कसं सांगू ?आणि काय सांगू? कसा त्याला आडवा जाऊ? कसा रोखू? तूच सांग मित्रा, तू आम्हाला लक्ष लक्ष हाताने अनमोल देणं दिलं. पण तुला आम्ही अधाशासारखं ओरबडत राहिलो आणि आत्ता कळतं, की आपणच आपल्या पायावर दगड मारून घेतलाय.तू तर तुझ्याबरोबर आम्हाला समृद्ध केलंस. तुला गुरु मानून तुझ्याकडून देण्याची परोपकाराची विद्या घेण्याऐवजी तुलाच ओरबाडत राहिलो. तुझ्या छायेत तहानलेला कोणी दिसत नव्हता. गर्द वनराईत पक्षी किलबिलत होते. प्राणी विसावत होते. झुळझुळणारे ओढे– झरे निर्मळ मनाने खळखळत होते. पण आता गटाराच्या पाण्याने ते कुठे निर्मळ राहिलेत! ज्या नद्यांना मातीचा दर्जा देऊन पूज्य मानत. ज्याच्यामुळे संस्कृती अस्तित्वात आली. तिची अवस्था आज किती केविलवाणी झाली आहे. जी साऱ्या सजीवांची तहान भागवत होती. तिचा तळ आज भेगाळ लेला आहे तुझ्या कर्तृत्वानं तुझं हिरवगार वैभव कसं ओसाड झालंय. तुझ्या कर्तृत्वाने सारा परिसर सुजलाम,सुफलाम होता. तेव्हा सारी सुख सगळ्यांच्या पायाशी लोळण घेत होती. धन– धान्याच्या संपत्तीचा तुटवडा नव्हता कधी. तृप्त मनाने समाधानाने जो तो ढेकर देत होता. पण आता त्यांना काय अवदसा सुचली अन विकासाच्या भूतानं वेड केलं.आता तर माझी पोरं अंतराळातल्या ग्रहांचं रहस्य उलगडायला निघालेत;पण इथं पृथ्वीचा विराण वाळवंट होण्याची वेळ आली. कधी भूकंप, कधी त्सुनामी तर कधी ज्वालामुखी, पूर कधी,तर कधी दरड कोसळतीये. कोरडा दुष्काळ कधी तर ओला दुष्काळ कधी. तरी या पोरांचे डोळे कधी उघडणार आहेत?काय माहीत?या बेफिकीर, बेजबाबदार पोरांना कळत नाही बघ मित्रा. हे तुला कळतंय.माझं मन तुझ्यासाठी तळमळतय;पण एक सांगू, मला तोंड आहे म्हणून मी बोलतोय. मला माहीत आहे तू बोलणार नाहीस. तुला मी चांगला ओळखतो.चुपचाप सगळं सहन करत राहणार तू.तुझे कितीही हाल झाले तरी तू वेदना हृदयात दाबून ठेवणार. तुझे अवयव जरी माझ्या पोरांनी मोडले–तोडले तरी शेवटच्या श्वासापर्यंत तू त्यांच्यावर दयेची छायाच धरणार. पण तुझ्या तोंडून ब्र शब्दही वाईट निघणार नाही.यात शंका ती कसली? पण तू काही जरी बोलला नाहीस तरी तुझ्या मनाचा मोठेपणा महान आहे आणि म्हणूनच तू आमच्या सर्वांपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहेस. तुझी सहनशीलता, हे वागणंही माहीत झालं आहे मला. हा तुझा छळवाद सहन होत नाही. म्हणूनच आज मी तुझ्या पुढे हात जोडून क्षमा मागतो. मला माफ कर. आज मी कबूल करतो, की यापुढे तुझी फरपट होऊ देणार नाही. कर्तव्यदक्षता, जबाबदारी,जागृती या सगळ्या गोष्टी पणाला लावून तुझ्याप्रमाणेच मीआणि माझी पोरं तुझ्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी धडपडत राहणार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जीवाचं रान करणार; पण तुला, तुझ्या परिवाराला जपणार.माझ्या लेकरांत तुझ्या अस्तित्वाचं आणि मोठेपणाचे महत्त्व खोलवर रुजवणार. तुझ्या माझ्या मैत्रीची घट्ट वीण कधी तुटू देणार नाही. बघच! निसर्गमानवाच्या अतूट नात्याचा गोप प्रत्येकाच्या गळ्यातील ताईत होतो की नाही! माझी पोरे तुला नव्याने रुजवतील. आपलेपणाने संगोपन करतील. कारण त्यांनाही कळून चुकले आहे.विज्ञान आपल्या सर्व प्रश्नांची उत्तर देऊ शकत नाही. तेव्हा अशावेळी निसर्गाला शरण जाणं कधीही चांगलं. आपण त्यांचा आदर केला पाहिजे.त्याची काळजी घेतली तर आयुष्यभर तो आपल्याला पोसेल आणि पिढ्यांपिढ्यांचा उद्धार करेल.

❖

**बेडवर मरनासन्न पडलेल्या आजोबा जवळ त्यांची मुलेबाळे सगळे नातेवाईक असतानाही त्यांची भिरभिरती नजर कोणालातरी शोधत होती. शेवटी तो आला...**
**'' तो त्यांचे गाल आपल्या लालबुंद जिभेने प्रेमाने चाटू लागला, आणि त्यांनी डोळे मिटले.''**

– देवेंद्र शं. इंगळकर



# दिसणं नि असणं!


लेखक
**राजेंद्र विष्णू कणसे**
अंगापूर


दैनंदिन जीवनामध्ये आवश्यक असणाऱ्या सामान्य वा किंमती वस्तू घेत असताना तिच्या मूल्यांकनाचे काही निकष ठरलेले असतात. ते निकष अंतर्बाह्य पारखून मगच ती योग्य त्या किंमतीला खरेदी करत असतो. याकामी पारख महत्त्वाची असते. ती पारखी नजर दिसणारी वस्तू तशी आहे का? नि असणारी वस्तू तशी दिसते का? हे पाहत असते.

समाजामध्ये आपण ज्या क्षेत्रात वावरतो त्या क्षेत्रातील किंवा इतर क्षेत्रातील माणसे ओळखताना मात्र ठाम विश्वासाने ओळखता येत नाहीत. नि मनात संभ्रम निर्माण होतो की ती दिसण्यावरून ओळखावी की असण्या वरुन. नि याला संत चोखामेळा यांचे 'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा काय भुललासी वरलिया रंगा' हे प्रमाण बहुतांशी आधार ठरते.

कारण काही पेशातील, क्षेत्रातील माणसं कशी असावीत नि कशी दिसावीत याचे संकेत ठरलेले आहेत. त्यामुळे दिसणं हीच त्यांची ओळख असते. परंतु दिसणारी माणसं तशी असतातच असं नाही नि असणारी माणसं तशी दिसताच असं नाही. दिसणं आणि असणं, असणं आणि दिसणं यामध्ये विसंगती असते तिथे बहुतांशी फसणं येतेच. कारण आज असणं कमी नि दिसणंच जास्त दिसून येते. एकूण काय तर दिसणं आणि असणं यामध्ये असणं महत्त्वाचे असते. म्हणून दिसावे कसे यापेक्षा असावे कसे हे फार महत्त्वाचे आहे. नि भारतीय संस्कृती, सामाजिक व इतर क्षेत्रातील इतिहास नि वर्तमानही दिसण्यापेक्षा असण्यालाच अधोरेखित करतो.

वैयक्तिक पातळीवर रूपवान असावं की गुणवान? हाही प्रश्न तेवढाच महत्वाचा वाटतो नि गुणा पेक्षा रूपाला जास्त महत्त्व दिलेले दिसून येते. आपलं बाळ, पत्नी नि पती याबाबतच्या असणे (गुण) नि दिसणे(रुप) या निकषांमध्ये हे विशेषतः दिसून येते.'रुप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी'ही अनुभूती प्रत्येकाला येतेच असे नाही.अब्राहम लिंकन कुरूप होते परंतु विद्वान होते. एका सुंदर स्त्रीने त्यांच्याशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. आपण विवाह केल्यास आपला पुत्र माझ्यासारखा दिसण्यास सुंदर नि तुमच्यासारखा हुशार व गुणवान निपजले. लिंकन म्हणाले, ''समजा उलट झाले तर? ''

हल्ली मात्र व्यक्तिमत्त्व विकासाला जास्त महत्त्व दिले जात आहे. नि त्यामध्ये व्यक्तिमत्वाच्या बाह्यांगाला म्हणजे दिसणे अधोरेखित केले जाते. कारण आजच्या जगात 'चिंध्या पांघरूण सोने विकायला जाल तर तुमचे सोने चिंध्यांच्या किमतीलाही कोणी घेणार नाही; पण सोने पांघरूण चिंध्या विकायला गेला तर तुमच्या चिंध्याही सोन्याच्या किमतीला विकल्या जातील.'ही बहुतांशी रीत बनत चालली आहे. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असो तेथे अंतरंगाच्या असण्यापेक्षा बाह्यांगाच्या दिसण्यालाच महत्त्व दिले जाते. त्यामुळे हल्ली काही  कीर्तनकारही मेकअप करुन कीर्तनसेवेला उभे राहतात.शेवटी काळाचा महिमा म्हणून होणारे बदल इच्छेने वा अनिच्छेने स्वीकारावे लागतात.परंतु मूल्ये कधीच बदलत नाहीत ती शाश्वत असतात. ती मूल्ये अंगिकारताना मात्र आपले दिसणे यापेक्षा असणे जास्त महत्त्वाचे वाटते .

स्वामी विवेकानंद, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू , सुधा मूर्ती, नाना पाटेकर(अगदी आजही विविध क्षेत्रात अनेक असे लोक आहेत.)यांचे दिसणं हे असण्याच्या पलिकडचे नि असणं हे दिसण्याच्या पलिकडचे होते व आहे. त्यामुळे दिसणं नि असणं यामध्ये कशाला महत्त्व द्यावे? याचे उत्तर मिळण्यास थोडीफार नक्कीच मदत होते.

❖



# काजवे

लेखिका
**गीता नरेश रक्ताडे**
वाशी नवी मुंबई

**'काजवे' म्हटले की आपल्या समोर काळ्या कुट्ट आमावस्येच्या रात्री ना, सूर्य असतो ना चंद्र, चांदणे त्यावेळी आपली वाट प्रकाशमय करणारा सोबती अशीच व्याख्या समोर येते. काही अंशी ते खरेही आहे जेव्हा एखाद्याच्या जीवनात काहीच उरले नाही असे वाटते पुढे वाट दिसत नाही अशावेळी एखादा 'काजवा' प्रकाश देतो आणि वाट दिसू लागते.**

भंडारदरा हे ठिकाण काजव्यांसाठी प्रसिद्ध आहे हे आपल्या सगळ्यांना माहित आहेच निसर्गरम्य ठिकाण हिरवेगार डोंगर, झरे, लहान मोठे धबधबे, गर्द झाडी व रात्रीची वेळ आणि त्या झाडांमधून प्रकाशित होणारे काजवे हा खूपच सुंदर व नयनरम्य असा देखावा .

निसर्गरम्य ठिकाणच्या जवळचे एक गाव तिथे पवार नावाचे एक जोडपे राहत असे त्यांचे काम म्हणजे येणाऱ्या पर्यटकांच्या जेवणाची व राहण्याची सोय पाहणे व त्यांना काजव्यांचे दर्शन घडविणे. हे काम ते गेली अनेक वर्षे करत होते. त्यांच्या लग्नाला दहा वर्षे झाली होती तरी संसार वेलीवर फुल आले नव्हते म्हणून ते खूप दुःखी असत पण त्यांनी आशा सोडली नव्हती आणि देवानेही त्यांना निराश केले नाही. दहा वर्षानंतर पवारांच्या घरी एका छान सुंदर, गोंडस, काळ्याभोर डोळ्यांच्या परीने जन्म घेतला. बाराव्या दिवशी नामकरण करण्यात आले तिचे नाव नियती असे ठेवण्यात आले. पण त्या वेळी तिच्या आई बाबांना असे काही तिच्या आयुष्यात पुढे नाम साधर्म्य काही घडेल अशी पुसटशी देखील कल्पना नव्हती.

नियती निसर्गाच्या सानिध्यात वाढत होती शाळेतही फार हुशार होती काजवे तिला खूप आवडायचे पर्यटकांबरोबर ती नेहमी काजवे पाहायला जात असे तरी तिला कधी कंटाळा आला नाही ती नेहमी काजवे म्हंटले की ते बघायला ती एका पायावर तयार असे. नियती मोठी झाली तिने एस.एस.सी परीक्षा दिली पुढे तिला शिकून सरकारी नोकरी करून आई-वडिलांना खूप सुखात ठेवायचे होते असे तिचे स्वप्न होते. दहावीची परीक्षा संपून सुट्टी लागली होती. त्या सुट्टीमध्ये काही दिवसांनी नियतीची तब्येत बिघडली तिला ताप आला होता पण जाईल आज उद्या असे म्हणून दुर्लक्ष झाले. मात्र त्या रात्री जो ताप तिला आला तो काही केल्या उतरलाच नाही गावातल्या डॉक्टरांनी ताबडतोब शहराकडे घेऊन जाण्याचा सल्ला दिला आई बाबांनी तिला शहराकडे नेले.

डॉक्टरांनी तिला तपासले व तिच्या काही तपासण्या केल्या रिपोर्ट आल्यावर तिच्या आई-बाबांना डॉक्टरांनी केबिनमध्ये बोलवले तेव्हा

नियतीच्या आई–बाबांना डॉक्टर काही अनपेक्षित बोलतील याची तीळ मात्र देखील शंका आली नाही. त्यावेळी नियती तापाने फणफणत होती व बेशुद्ध अवस्थेत होती डॉक्टर म्हणाले ''तिला डेंगू झालाय आणि तो ताप तिच्या मेंदूपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे शरीराच्या कोणत्या भागावर कसा काय परिणाम होईल हे आत्ताच सांगता येणार नाही ती शुद्धीवर आल्यावरच कळेल.'' डॉक्टरांचे हे शब्द कानावर पडतात नियतीच्या आई–बाबांच्या पायाखालची जमीनच सरकली दोघांच्याही डोळ्यांमधून घळाघळा अश्रूंच्या धारा वाहू लागल्या तिची आई तर खालीच कोसळली. त्यांनी डॉक्टरांचे पाय धरले व म्हणाले ''काहीही करा पण नियतीला बरे करा.'' डॉक्टरांनीही शर्थीचे प्रयत्न केले त्याला यश आले तिचा ताप उतरू लागला व दुसऱ्या दिवशी सकाळी नियतीच्या हाताची हालचाल आई–बाबांना दिसली त्यांनी डॉक्टरांना ताबडतोब बोलावले तिने डोळे उघडले व ती बोलली ''आई बाबा कुठे आहात दिवे गेलेत का? मला काहीच दिसत नाही '' खोलीत लख्ख प्रकाश असून देखील, नियतीच्या डोळ्यासमोर मात्र काळाकुट्ट अंधार पसरला होता. तापाने तिच्या डोळ्यांची दृष्टी हिरावून घेतली होती.

आई–बाबांना व डॉक्टरांना तिला कसे सांगावे काय सांगावे काहीच कळत नव्हते पण धीर करून डॉक्टरांनीच तिला सत्य परिस्थिती सांगितली नियती खूप हतबल व निराश झाली तिने खाणे पिणे सोडून दिले होते. तिच्या आई–बाबांनाही तिची समजूत कशी काढावी हे कळत नव्हते. मात्र दहावीचा निकाल जाहीर झाला व तिच्या आयुष्यात पहिल्या काजव्याने प्रकाश दाखविला नियतीला ९९% मार्क मिळाले होते. शाळेतून व राज्यातून ती पहिली आली होती. मात्र तो आनंद घरात कोणीच साजरा करू शकत नव्हते कारण आता पुढे काय? हा प्रश्न सर्वांसमोर होता. पण त्यावेळी नियतीवर उपचार केलेल्या शहरातील डॉक्टर पाटील यांना ही बातमी समजली तेव्हा ते तिच्या घरी गेले व घरच्यांना माहिती दिली की, नियतिला शहरात पुढील शिक्षणासाठी अशा महाविद्यालयाची सोय उपलब्ध आहे की जिथे ती पुढील शिक्षण पूर्ण करू शकते व त्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी देखील डॉक्टरांनीच घेतली आणि डॉक्टरांच्या रूपाने नियतीला दुसरा काजवा प्रकाशवाट दाखवून गेला.

नियतीने खूप जिद्दीने व कष्टाने शिक्षण पूर्ण केले व सरकारी नोकरी एका मोठ्या पदावर रुजू झाली घरी सर्व आनंदात होते. पण या तिच्या मनात मात्र आपण काहीतरी समाजासाठी करावे असे वाटत होते. त्यातूनच तिला दृष्टीहिन मुलांसाठी आपल्या गावी एक शाळा काढावी असे सुचले व तिने शाळा सुरू केली व त्या शाळेचे नाव तिने,'काजव्यांची शाळा' असे ठेवले तिने मुलांना तिथे शिक्षण देण्यासाठी शिक्षक नेमले होते. त्या मुलांना शिक्षणासाठी लागणारे विशेष असे सर्व साहित्यही तिनेच दिले. शाळेतली मुले तिला बाई न म्हणता आईच म्हणायची. तिने देखील अविवाहित राहून समाजाची सेवा केली व शाळेतील अनेक मुलांची ती 'आई ' झाली होती.

अनेक अंधारात चाचपडणाऱ्या मुलांचा आधार व प्रकाश ती बनली होती. ती मुलांना काजव्यांचे वर्णन करून सांगे आणि मुले तिच्या बोलण्यातून काजवे अनुभवत व खूप आनंदी होत असत. काजव्यांची शाळा अनेक मुलांना अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जात होती मुले मोठी झाली मात्र 'काजव्यांची शाळा' व नियती आईला कधी विसरली नाही. ती शाळा सोडून बाहेर गेली, स्वतःच्या पायावर उभी राहिली, जीवनात यशस्वी झाली तरी गुरुपौर्णिमेच्या दिवशी तिचे सगळे विद्यार्थी तिला भेटायला येत भेट वस्तू जमली नाहीतरी हमखास एक गुलाबाचे फुल तरी द्यायचे. आणि नियती डॉ.पाटील यांना गुरू मानायची त्यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेत करायची अनेक फुलांनी सजविलेल्या मुलांनी बनवलेल्या सुगंधित अशा पुष्प माळांनी.

या ठिकाणी मला इलाही जमादार त्यांनी लिहिलेली व भीमराव पांचाळे यांनी गायलेली सुप्रसिद्ध गझल जरूर आठवते त्याचे शब्द असे आहेत.

**मए सनम! आँखो को मेरी,**
**खूबसूरत साज दे,**
**है अंधेरी रात फिर भी,**
**रोशनी की बात कर,**
**लावण्या तू दीप येथे,**
**काळजाची वात कर,**
**दिल में सौ सूरज है रोशन,**
**दिल में काबा दिल मे काशी,**
**अंतरातच विश्व दडले,**
**तिर्थ यात्रा आत कर,**
**रास्ते मे लोग काँटे,**
**अक्षर बिछाते है यहाँ,**
**फुल ही उधळेल कोणी,**
**चालण्यास सुरुवात कर,**

❖



# आम्ही समजूतदार

लेखिका
**वर्षा हेमंत फाटक**
सातारा

परवा एका फेमस सिनेस्टारचा इंटरव्ह्यु वाचला. त्याने लिहिले होते कि आम्ही दोघे म्हणजे तो आणि त्याची दुसरी बायको शांतपणे/ समजुतदारपणे वेगळे झालो आहोत. (बहुतेक पहिली बायको कडाक्याचं भांडण करून वेगळी झाली असावी)

घटस्फोटाची प्रक्रिया पण वादावादी न होता झाली. आणि नंतरही ते दोघे मुलांसाठी एकमेकांच्या संपर्कात राहाणार आहेत. Human being म्हणून त्याची बायको खुपच चांगली आहे.

ही मुक्ताफळं वाचून मला हसावं कि रडावं तेच कळेना.

ह्युमन बिइंग म्हणून चांगली मग बायको म्हणून वाईट? ते ही मान्य पण परतं मुलांची काळजी म्हणून एकमेकांच्या संपर्कात राहाणारचं मग घटस्फोट कशाला ?

समजुतदारपणे घटस्फोट घेतला मग हाच समजुतदारपणा एकमेकांशी वागतांना दाखवानं!!

म्हणजे या लोकांच्या कोणत्या समजुतदारपणाचं कौतुक करायचं तेच समजेनासं झालं आहे.

परत पार्टीत भेटले कि आ गले लग जा असतचं!!

समजूतदारपणा कि गेंड्याची कातडी?

आणि दुर्दैवाने आजची पिढी त्यांना ब्लाइंडली फॉलो करण्यात धन्यता मानते. सामाजिक बांधिलकीची वाट!!!

तू नही और सही, और नही और सही!! या और ला शेवटचं नाही.

आज भाची घरी आली ती रडतंच.

मला म्हणाली, '' मावशी मी सुयशशी ब्रेकअप करते आहे. अर्थात आम्ही चांगले मित्र राहाणार आहोतचं.

हो का? कोणी ब्रेकअप करण्यात पुढाकार घेतला? मी विचारलं.

नजर चोरून म्हणाली ,सुयशने!

आणि तुझी प्रतिक्रिया काय? मी विचारलं.

मावशी तो नाहीच म्हणाल्यावर मी काय बोलणार? रडवेली झाली होती.

मी चिडून म्हणाले, ''अग देवाने तुला दोन हात आणि त्याला दोन गाल दिले आहेत नं? लाल का नाही केलेत तिथेच?''

मावशी म्हणून गळ्यात पडली आणि रडायला लागली. तिला जवळ घेतलं आणि समजावलं.

दोघीही तयार होऊन सुयशच्या घरी गेलो.

त्याचे आई-बाबा चेहरा पाडुन बसले होते. माझ्या भाचीला बघताच त्याची आई समोर आली आणि म्हणाली, ब्रेकअप का केला तुम्ही दोघांनी?

सुयश आल्यापासुन खोलीच दार लावून बसला आहे''.

मी त्यांना विचारुन सुयशशी बोलायला आत गेले.

मला पहाताच चपापला.

माझ्या नजरेत त्याला सगळं दिसलं होतं.मी जाब विचारल्यावर पोपटासारखा बोलायला लागला.



# पाऊस आणि संगीत

लेखिका
**वंदना विष्णू पांडे**
पुणे

आसमंतात जरासे थंड वारे सुटलेले ! आभाळ भरून आलेले ! काळ्या मेघांची गर्दी दाटलेली!! हा पाऊस आता केव्हाही कोसळेल, अशी परिस्थिती!!!

पण षड्ज लावण्यालाच तो इतका वेळ घेतो आहे की बस! ठाक ठाक ठाक ठाक करून मेघ महाराज तबल्याचा रिदम ठीक करताहेत. वाऱ्याच्या तंबोऱ्यावर एक सूर लावून ठेवला आहे . पण मेहफिल अजून म्हणावी तशी जमून येत नाहीयै . सगळ्या वाद्यांची चार्जिंग बरोबर आहे ना , हे पाहण्याचा चार्ज आता वीजेनी घेतलाय. वीज जरा अस्वस्थ झालेली. इतका वेळ धीर धरून शांत बसलेली वीज ! पण तिची मात्र आता चुळबूळ सुरू झालेली आहे . मधूनच हळूच एक चमकदार हास्य करून, ती सगळी व्यवस्था नीट आहे याचा संकेत देतेय .

आता हळूहळू बुंदाबांदी सुरू झालेली. वातावरणातला गारवा थोडा थोडा चढत चाललेला. हळुवारपणे रंग चढत असलेली एखादी गझलच हा पाऊस जणु गातोय. संथपणे मेहफिल रंगत आहे. रंगात येत आहे. पाऊस एक एक शेर पेश करतोय! आणि ह्या सजीव– जगताची दाद त्याला मिळतेय . वाह ! किती प्रसन्न वाटतंय! किती हा सुखद पाऊस!! गारेगार वातावरण झालं आहे. गात्रं नी गात्रं सुखावून गेलेत.

पण आत्तापर्यंत धीराने पहात असलेल्या बिजलीला फार वेळ काही हे शांत संगीत रुचलेलं नाही. ती ''कडकड कडकड'' करत अशी काही जोरात चमकली, की सगळी सजीव सृष्टी हादरली. जो तो आडोसा शोधून पळाला. आणि ....... आता संपूर्ण ठेक्यात सुरू झालंय संगीत, बिजलीच चहकणे , मेघांची गर्जना आणि कोसळणाऱ्या जलधारांच्या पदन्यासावर सर्व सृष्टी थेंबांचे पैंजण पायी बांधून नृत्य करतेय!!

सरीवर सरी! पाऊस मनसोक्त कोसळतोय. पावसाचे हेही रूप विलोभनीय!! मेघांच्या तब्बलजींची एकापेक्षा एक गतिमान

ताल वाजवून दमछाक होतेय. पण सृष्टीला आता कसलेही भान उरलेले नाही. ती तल्लीन होऊन जलधारांबरोबर नृत्य करतेय . तिला साथ देण्यासाठी सौदामिनी सुसज्ज आहेच. तब्बलजींना ठेका तर धरावा लागणारच ! या जलधारा की त्यांच्या घामांच्या धारा , असा प्रश्न पडावा! एवढं हे घुसळून टाकणारं संगीत!!

तड तड कोसळून, हळूहळू, पावसाचा जोर कमी होत चाललेला. मेघांचे तब्बलजी आता कधी एकताल तर कधी झपताल धरताहेत. जरा विश्रांती मिळाली आहे त्यांना. बिजली पण आता गार झालेली.

इतका वेळ या धूमशानात ढगात लपून बसलेला सूर्य हळूच डोकावून बाहेर बघतोय. लख्ख उजेड पसरलाय सृष्टीवर! झाडे वेली न्हाऊन अधिक तेजोमय झालेल्या! छोटे छोटे तळे साचलेले. छोटे छोटे ओहोळ वाहू लागलेले. त्या खळखळ वाहणाऱ्या ओहोळांमध्ये कागदी नावा टाकून खेळत असणाऱ्या मुलांच्या हास्याचा खळखळाट!! हे निरागस संगीत कोणत्याही साजातून उत्पन्न होणार नाही .हे कसब फक्त या सृष्टीला आणि या पावसालाच साधत असते.

आता पाऊस पूर्णपणे थांबला आहे .झाडे वेलींवरून पाणी ठिबकत आहे. सगळीकडे एक ओली शांतता पसरलेली आहे. प्रत्येकाच्या तनामनात हे संथ, शांत संगीत आता झिरपतेय. वाऱ्याच्या अंगातली मस्ती मात्र अजून संपलेली नाही. मध्येच तो एखादी तान छेडतो आणि त्याच्या हेलकाव्यामुळे झाडांची पाने सळसळतात. त्यांच्यात अडकून पडलेले पाण्याचे थेंब आपले तुषार उडवून एक अल्लड संगीत उत्पन्न करतात. सुस्नात होऊन आलेली एखादी तरुणी आपले केस झटकत उभी आहे, जणु असेच वाटावे. असेच अवखळ संगीत!

कुठेतरी वळचणीवर साचलेल्या पाण्याचा एक एक थेंब, थोड्या थोड्या वेळाने, खाली अंगणात साचलेल्या पाण्यावर पडला की ''बुळूक'' असा नाद निर्माण होतोय . त्या साचलेल्या पाण्यावर असंख्य वर्तुळे उमटताहेत. एका वर्तुळातून दुसरी वर्तुळे तयार होत आहेत , हे पहात बसणे हा सुद्धा एक रंजक खेळ आहे. एखाद्या ताडपत्रीच्या छतावर जमा झालेलं पावसाचं पाणी , त्या छताला त्याचा भार सहन होत नाही. पटकन ती ताडपत्री लपकते आणि ''छपाक'' असा आवाज करून ते पाणी खाली पडतं. हेही एक मनभावन संगीत!

पाऊस पडत असताना तर तो वेगवेगळे नाद निर्माण करीत होताच पण कोसळून गेल्यावर सुद्धा त्याच्या अंगात भिनलेली संगीताची नशा अजून काही उतरलेली नाही. आणि त्याच्यासोबत जीवन जगत असलेले आम्ही सगळे, त्या नशेत अजूनही पूर्णपणे चूर झालो आहोत.

❖





# सहचारिणी


लेखिका

**वीणा मुळे**

पाषाण, पुणे


भिंतीचा रंग उडालेला, पोपडे निघालेले, जमिनीला पडलेल्या भेगा, घराचे छप्पर खाली लोंबकळलेले, भिंतीच्या आधारासाठी लावलेल्या लाकडी खांबांना वाळवी लागलेली, अशा प्रकारे वाड्याचं म्हातारपण पाहता क्षणी लक्षात येत होतं. त्याच म्हाताऱ्या वाड्याच्या सोबतीने सखारामपंत आपलं म्हातारपण घालवत होते .

नाही म्हणायला स्वतः राहण्यापुरत्या दोन खोल्या त्यांनी बऱ्याच उशिरा ठीक करून घेतल्या होत्या.

गावामध्ये सखारामपंत, यांना बापू या नावाने ओळखत. तीस एकर शेती, भरभक्कम वाडा, गडी माणसं सर्व कारभार बापू सांभाळत. पांढरा स्वच्छ धोतर कुर्ता, खांद्यावर स्वच्छ उपरणं, जाड भिंगाचा चष्मा, काळ्याभोर वळवलेल्या जाड मिशा अशा रुबाबात तरुणपणात बापू रस्त्याने जात तर एक प्रकारचा दरारा लोकांना जाणवत असे.

शेतीच्या जमिनीत आता पुरेसा कस राहिला नाही. पाऊसही लहरी झाला. शेतमजूर पोटापाण्यासाठी शहरात स्थलांतरित झाले. शेतातील विहीर आटली, बापूंचेही वय झाले असल्याने शेतीकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते. आता मोजकीच शेत जमीन बापूंकडे शिल्लक होती त्या वाड्याचीही डागडुजी करण्याला बापूंना उत्साह नव्हता.

भरभराटीच्या काळात पार्वती बापूंच्या आयुष्यात आली. दुःखाचा लवलेश नव्हता.

सुख ओंजळी भरून वाहत होते .दोन दोन वर्षाच्या अंतराने पार्वतीने तीन मुलांना जन्म दिला .

राजेश, निलेश, परेश तीनही बाळं आईच्या वळणावर, गोरीपान आणि देखणी. हुशार मात्र बापू सारखी. मुलांची शाळेतील प्रगती त्यांचे शिक्षक बापूंना सांगत तेव्हा बापू अभिमानाने फुलून जात. मुलं चांगली शिकली आणि उच्च शिक्षणासाठी दूर शहरात गेलीत. बापू थोडे नाराज झाले पण पार्वतीने समजावले, ''आकाश खुणावू लागलं की मुलांना घराच्या

चार भिंतीत ठेवणं अवघड जातं. तारुण्यानी मुसमुसणाऱ्या मुलांना म्हातारा वाडा आणि खेडवळ वातावरण कसं रुचणार?''

मुलांचा स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास होता. शेती, वाडा कशाचेच मोहात मुलं अडकले नाहीत .

म्हातारपणी आपणच एकमेकांसाठी काठी होऊ, अशी मनाची समजूत घालत बापू आणि पार्वती आनंदाने राहू लागले.

पहिल्या वर्षी रोज रात्री दुबई, मुंबई, सिंगापूरहून नियमाने एकेका मुलाचा फोन येत असे. हळूहळू पंधरा दिवसानंतर रिंग वाजू लागली. महिना दीड महिना वाट पाहून फोन येईना. फोनची रिंग ऐकायला आतुर असलेले कान अतृप्तच राहत.

एक दिवस झोपेतच पार्वती बाई गेल्या. डॉक्टरी उपाय करण्यापूर्वीच त्यांनी बापूंची साथ सोडली.

''मुलांनी वाड्यात यावं, नातवंडांनी वाड्याचे गोकुळ करावं, अशी साधी स्वप्न होती बापुंची. मुलांनी तिकडेच्याच मुली पसंत केल्यात. आज एकेका अपत्याचे बाप झालेत. आज मात्र गात्र शिथिल झालेला मी आणि ढासळलेला वाडा एकमेकांना सोबत करत राहतो आहोत '' मनातील खंत बापूंनी स्वतःच्या मनाला सांगितली.

आज सकाळी सकाळी शेतातील, तण काढायची का, म्हणून विचारायला तानबा आला. त्याची आई शेतात एका झोपडीत राहून शेताची निगराणी करी ''सुगीच्या दिवसात पार्वती व मी शेतावर गेलो की तानबाची आई भागवती सुग्रास जेवण करून वाढी. ताज्या वांग्याचे भरीत आणि त्यावर शेतातला हिरवा कंच कोवळा कांदा आणि हातावर थापलेल्या चुलीवरच्या भाकरी पार्वतीला फार आवडत असत.'' जुन्या आठवणीत बापू रमले.

एका किरकोळ आजाराने भागवतीचा पोरगा तानबा गेला.

गावातील डॉक्टर रजेवर होते. आणि शेजारच्या शहरातून डॉक्टर येण्यापूर्वी तानबा गेला.

भागवती एकटी पडली.

बापूंनी विचार केला.''भागवतीला मागल्या अंगणातल्या खोलीत राह्यला जागा देऊ. वाड्याची देखभाल, स्वयंपाक पाणी आणि मधून मधून शेतात जाऊन शेतीची देखभाल, भागवती करेल '' बापूंनी भागवतीला वाड्यात राहायला आणले. ७२ वर्षाच्या बापूला एक सोबत मिळाली. चारच दिवसात गावात कुजबुज वाढली. पंधरा दिवसात तर कुजबुज आणि विस्तार वाढला. खेड्यामध्ये अशा बातम्यांना लवकर पाय फुटतात.

बापू आणि भागवतीला ऐकू येत नव्हते असे नाही .

बापू शांत राहिले. भागवतीलाही शांत राहण्यास सांगितले. ''भागवती, लोकांची तोंडं धरणारे आपण कोण? चार दिवसांनी आपोआप कलकल थांबेल.

आपण एक जरी शब्द बोलण्याचा प्रयत्न केला तर चारी दिशांनी, चार तोंडांनी शब्द ऐकण्याची तयारी ठेवावी लागेल. माझा आधार तू भागवती आणि तुझी म्हातारपणाची काठी हा खंबीर बापू.''

''मालक, आपुन लय खंबीर. म्हनूनशान सहन करतुया. म्या, आता धीरानं वागतो. आपुन लय शिकवलं मले.'' भागवती बोलली.

''भागवती, कुठल्याही गोष्टीचा हव्यास करायचा नाही. शांततेने प्रश्न सुटतात. त्राग्याने वाढतात. शेवटपर्यंत सोबत करत करत परस्परांचे म्हातारपण सांभाळत आनंदाने राहू.'' बापू शांतपणे भागवतीशी बोललेत.

''आपली लग्नाची बायको मी नाय. पन हे म्हातारपन सोबतीनं चालाचं असं मी ठरोलं हाये. मालक, मी सोताला आपली साथीदारीण मानतो.'' बापू समोर आज पहिल्यांदाच भागवती एवढं बोलली.

ङ'बरोबर बोलतेस भागवती. माझ्या या म्हातारवयात तू मला सहचारिणी बनून साथ देत आहेस. मानसिक आधार फार मोठा आधार असतो. एकमेकांना आधार देत आपण आनंदाने जगतो आहोत. तुला पैशाचा हव्यास नाही. मानमरातबीची लालसा नाही. शेतावर तू खुश होतीस. इथेही आनंदात राहते आहेस.''

थोडा विचार करून बापू पुढे बोलू लागले, '' भागवती, मला असं वाटू लागलं की दोन दिवस आपण शेतावर जाऊन राहू यात. खूप महिन्यांमध्ये शेताकडे गेलो नाही.''

दुसरे दिवशीच जायचे ठरले. नित्य नियमाप्रमाणे बापू सकाळी लवकर उठून गावातल्या कान्होबाच्या मंदिरात जाऊन आले. आणि सूर्य देवाच्या तप्त झळांनी छळण्यापूर्वी

शिदोरी घेऊन बापू व भागवती शेतावर पोहोचले सुद्धा.

शेत आता हिरवगार राहिलं नव्हतं. जमिनीवरील भेगातून रानटी गवत डोकावू लागलं होतं. वाळलेल्या उसाच्या कांड्या जमिनीवर इतस्ततः पसरल्या होत्या. सुकलेली ज्वारीची कणिसं दाण्यातून मोकळे होण्याची वाट बघत होती. चुकून मागे राहिलेली एखादी कैरी पिवळी होऊ पाहत होती. झाडावरच्या घरट्यातून पिले हळूच डोकावत होती. कोणीतरी वस्तीला आलेला दिसतो असं जणू चिव चिव करून एकमेकांना सांगत होती. पूर्वीच्या दिवसांची आठवण काढत भागवती व बापूंनी रात्री आठ वाजता घरून आणलेली शिदोरी खाल्ली आणि निवांत मोकळी थंडगार हवा घेत, बापू जवळच्या सतरंजीवर आडवे झालेत. भागवती सर्व आवरून आली तर बापूंना गाढ झोप लागली होती. रोजच्या प्रमाणे दुसरे दिवशी सकाळी पाच वाजता बापू उठले नाहीत. दोन-चार काड्या काटक्या गोळा करून भागवतीने चहा उकळला पितळेच्या पेल्यात ओतून एका बाजूने चुलीवर निखाऱ्यावर झाकून ठेवला.

''बापू, बापू कसे आहात? बऱ्याच महिन्यानंतर आलात! असे म्हणत तात्या आत आलेत. बऱ्याच दिवसांनी मित्राची भेट होणार म्हणून तात्यांच्या बोलण्यात आणि चालण्यात अधीरता होती. तात्या जवळ पोहोचले पण बापूंची काहीच हालचाल नाही. तात्यांना संशय आला.

''बापू''म्हणून तात्याने जोराने हंबरडा फोडला. ऐकून भागवतीच्या हातातील चहाचा प्याला निसटला. बापूंच्या चेतनाहीन कलेवरावर त्यांच्या प्रिय अशा शेत जमिनीवरच शेवटचे विधी पार पडलेत.

बापूंच्या तीनही मुलांना ही दुःखद बातमी देऊन गावी येण्याविषयी भागवतीने कळविले. बापूंच्या इस्टेटीतला एक छदामही भागवती बाई आपल्याला मिळू देणार नाही अशी व्यर्थ भावना मनात ठेवून तिघेही लगबगिने आलेत, आप्त, गावकरी सर्वांसमोर मुलांनी दुःखाचे नाटक छान वठविले. गावकरी जाणून नव्हते असे नाही.

बापूंचे पंधरा दिवस आटोपल्यानंतर भागवतीने तिनही मुलांनासांगितले ''मी भागवती. थकलेल्या बापूले मी साथीदारीण म्हनून सोबत केली. आमाले आधाराची गरज व्हती. सोबती सोबतीन हा काळ सुकाचा केला. तुमा लेकराची लय आठोन याची मालकाले. मी म्हनायचो ''या मोट्ट्या दुनियेत आपली लेकरं आभायाले हात भिडण्यासाठी गेल्ती, तवा आता माघारी कशी येतीन?''. महा बोलनं बापुले पटलं. मंग कंदी तुमा लेकरायची आठोन काढली नाय मालकानं.''

''लेकरांनो, वाड्यातील हरेक वस्तु जश्शीच तश्शीच ठीवली हाय. वाड्याचे अन् ह्यो जिमीनीचे कागदं फडताळात ठीवली हायेत. थांबा, मी सोता तुमाले दावतो. अन् मंग मी तीर्थाले जायाले निंघतो.''

'' चुकलं माकलं असंन तं माफी करजा.''

एका जुन्या कापडाच्या पिशवीत रोजचे दोन नऊवार अन् चोळी कशी तरी कोंबून, मागे न पाहता झपा झपा पावलं टाकत भागवती निघून गेली. ती कोपऱ्यावर वळेपर्यंत मुलं तोंडाचा 'आ' पसरून बघतच राहिली.

❖





# हो!... सर्वात मौल्यवान भेट

लेखिका
**डॉ उज्ज्वला देशमुख**

मावशी माझी दिवाळीची ओवाळणी दे, मला छानसा रँबको कंम्पनीचा पेन घ्यायचा आहे.

भामा मावशी ही आमच्या घरातील बाल विधवा मावशी म्हणजे आमचे सर्वस्व. मोठ्या काकुंची ही लहान बहीण. वयात येतांनाच ह्या किशोरीचे म्हाताऱ्या साठीच्या वयात असणाऱ्या व्यक्तिशी लग्न लावून दिले. मोठी, समजदार होण्याच्या अगोदरच तिच्यावर वैधव्याचा पहाड कोसळला. आमच्या घरी ती आश्वस्त झाली. आमचे घर सामाजिक बांधीलकी जपणारे अडीअडचणीला लोकांना मदत करणारे असल्याने मोठ्या बहीणीने ह्या छोट्या भामाला सांभाळण्याची जबाबदारी घेतली. घरातील सगळ्या लहानांची ती मावशी झाली. संपुर्ण मातृत्वाचा घडा तिने ह्या सगळ्या लहानग्यांच्या संगोपनासाठी ओतला.

मला आठवतं की मी पहाटे तिच्या मागे घरभर फिरत असे. ती तिचे कामं करी आणि मी तिच्यामागे शेपूट! तिच्याहातचं शेंगदाण्याचं बट्ट माझ्या आवडीचं! उन्हाळ्यात चांगली आंबे माझ्यासाठी टरबुजाची फोड ती काढुन ठेवी. काहीही हट्ट तिच्याकडे! सगळ्या मुलांना तिचा लळा होता. जीव लावणं म्हणजे काय हे चालतं बोलतं उदाहरण म्हणजे आमची भामा मावशी.

अशी ही आमची मावशी स्वतःची कुस उजवु शकली नाही. पण घरातील प्रत्येकाला तिने आईच्या ममतेने वाढवलं, सांभाळलं. आमच्या मोठ्या चुलतभावाच्या मुलाच्या शिक्षणासाठी मावशी नाशिकला त्याची आई होऊन राहिली ती तिच्या शेवटच्या श्वासा पर्यंत.

मधल्या काळात मेडिकलचे शिक्षण, लग्न, संसार, डॉक्टर म्हणून सिध्द करण्याचे तप, ह्या अनेक स्थितींमधून जाताना तिची अवचित भेट होई. हळू हळू वृध्दावस्थेकडे जाणारी मावशी सगळ्यांच्या आठवणी काढत असे. मलाही तिच्या भेटीची ओढ लागली होती. कामाच्या घाईत तिच्या भेटीस जातांना काही भेटवस्तू घेण्याचं राहिलं. तिची उरभेट, सुरकुतलेल्या हातांनी चेहऱ्यावर फिरुन बोट मोडुन काढलेली दृष्ट हीच खरी आम्हा उभयतांची खरी भेट व निघतांना एक पाचशेची नोट तिच्या हातावर ठेवत मुठ बंद करुन मी तिला म्हणाले मावशी तुझ्या आवडीचे पातळ ( नववार साडी) घे आणि नेस हो! ती खुदकन् हसली. डोळ्यातील अश्रु लपवत मी तिचा निरोप घेतला. हीच तिची शेवटची भेट असेल असे वाटले नव्हते. एक दिवस माझ्या भाच्याचा फोन आला आपली मावशी आता पुन्हा भेटणार नाही तिला देवाज्ञा झालीबोलतानाही त्याचा हुंदक्याचा आवाज मी ऐकला. किती लळा लावला ह्या मायेने सगळ्यांना.

मी जेव्हा नाशिकला गेले तर भाचेसुन बाईंनी सांगितलं की मावशीच्या पेटीत तुम्ही दिलेली पाचशेची नोट मिळाली. ती नोट तिने जतन करुन ठेवलेली होती,एखाद्या अमुल्य ठेव्या प्रमाणे.

कारण ती तिच्या लाडक्या डॉक्टर ताईने दिली होती. ती तिच्या जीवापाड होती. ❖

# लोखंडी कपाट



लेखक

**प्रा. मोहन ज्ञानदेवराव काळे**

**'' नाही म्हणजे नाही. तुमचं दोघांचं मी सगळं ऐकतो. फक्त तेवढं सोडून बोला.''**

अजय ठामपणे मान हलवत ''नाही'' म्हणाला तशा समाधानरावांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. पण त्यांनी जग पाहिलं होतं. त्यांचे केस फक्त उन्हानंच पांढरे नव्हते झाले. त्यांच्या मनातल्या भावना ते चेहऱ्यावर कधीच येऊ द्यायचे नाहीत. दुसऱ्याचं मन दुखू नये म्हणून त्यांनी स्वतःचं मन अनेकवेळा मारलं होतं. त्यांनी सुमनकडे, त्यांच्या पत्नीकडे, पाहिलं.

''बरोबर बोलते तो. तुम्ही जमान्यासंग चालत जा. सगळं तुमच्याच मनासारखं कसं होईल? काही गोष्टी पोरांच्याही ऐकल्या पाहिजेत. पोरं ''नाही'' म्हणतात तर जाऊ द्या ना. तुम्ही जास्त विचार नका करत जाऊ. जास्त टेन्शन नका घेत जाऊ.'' आता मात्र समाधानरावांच्या चेहऱ्यावर दुःखाची सावली पसरली. विषण्णतेचे काळे काळे ढग त्यांच्या मनाच्या आकाशात तरंगायला लागले. पण त्यांच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. ना बायकोचं, ना पोरीचं, ना पोराचं, ना सुनेचं. ते सगळे त्यांच्याच धुंदीत होते. त्यांना बायकोचं कौतुक वाटलं. किती लवकर स्वतःमध्ये बदल घडवून आणला तिने!

समाधानरावांना समजलं, की आता पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं आहे. आता आपणही बदललं पाहिजे. काळासोबत चाललं पाहिजे. आतापर्यंत आपल्याच तर मनासारखं होत होतं सगळं! मग आता मुलांच्या मनासारखं झालं तर काय बिघडलं? शेवटी आपल्यासाठी महत्त्वाचं काय, तर मुलं, बायको आणि कुटुंब. आतापर्यंत आपण कर्ते होतो म्हणून आपलं ऐकलं जायचं. आता मुलं कर्ती झाली तर त्यांचं ऐकलं तर बिघडले कुठे? काळाचा महिमा. दुसरं काय? आधी ते घरात एकमेव कमावते होते. सर्वांना हवी ती वस्तू पुरवत होते. पण निवृत्त झाल्यापासून त्यांच्या शब्दांतील वजन कमी झालं होतं. मुलाला आणि सुनेला नोकरी लागल्यापासून तर त्या दोघांनी घरातील निर्णयांचा ताबाच घेतला होता. तसे त्यांचे अधिकार संपले नव्हते. फक्त अधिकारांचं हस्तांतरण मुलांकडे आणि सुनेकडे झालं होतं. त्यांचा आदर कायम होता. पण त्यांची लुडबूड कायम राहिली नव्हती.

त्यांच्या डोळ्यांसमोर राहून राहून तेच दिसत होतं. त्यांची नजर त्याच्याकडेच जायची. त्यांच्यासोबतच तेही उदास दिसायचं. असं वाटायचं, की आता तेही ढसाढसा रडायला सुरुवात करेल. ते चार पाचही खोल्या सोडून त्याच खोलीत जास्त रुंगयरांगय करायचे. त्या खोलीतून त्यांचा पाय काही निघायचा नाही. साठीनंतर माणूस लहान मुलासारखं वागतो म्हणे! क्षणात आनंदी आणि क्षणात दुःखी. पटकन हसतो अन् पटकन हसतो. अश्रूंचा तलाव शिगोशिग भरलेलाच असतो. अश्रू गाळण्यासाठी डोळ्यांचा सांडवा सदैव तयारच असतो. बालसुलभ भावना. दुसरं काय?

त्यांचं सुमनशी लग्न झालं तेव्हा त्यांच्या झोपडीत साध्या साध्या वस्तूही नव्हत्या.स्वयंपाकाचे थोडेसे भांडे. दोन तीन खाटा. तीन चार वाकळा. तीन चार चादरी. कपडे ठेवायला तीन दोर. एक ओले कपडे वाळविण्यासाठी, दुसरा वाळलेले कपडे ठेवायला व तिसरा अंगणातील विहिरीतून पाणी काढण्यासाठी. आंघोळीसाठी प्लॅस्टिकची बादली. प्लास्टिकचा एक लहानसा मग. बस्स एवढंच. छोटासा, गरिबीचा पण सुखी, समाधानी व आनंदी संसार.

त्यांनी बचत करू करू, पोटाला चिमटा देऊ देऊ, मुलांना शिकवलं. मुलांचे शाळेचे गणवेश, कपडे व पुस्तकं ठेवायला एक लोखंडी कपाट विकत घेतलं होतं. घर गळलं तरी आता पुस्तकं व गणवेश ओले होणार नव्हते. त्यांना त्या कपाटाचंच किती कौतुक! कोणत्याही पहिल्या गोष्टीचं कौतुक असतेच म्हणा! कपाट आल्यापासून दोरीवर टांगण्यात येणारे कपडे व्यवस्थित घडी करून कपाटातील एका कप्प्यात असे ठेवले जायचे जसे काही सैन्यात सैनिक जसे शिस्तीत कवायत करताना उभे असतात तसे! एका कप्प्यात पुस्तकांसाठी जागा. मजबूत, दणकट म्हणून त्या घरात तीच एक वस्तू होती. त्या कपाटानं आतापर्यंत म्हणजे तीस वर्षे खूप चांगल्या प्रकारे सेवा दिली होती व अजूनही ते त्याच ऐटीत उभे होतं. सह्याद्रीसारखं. घरात अभिमान वाटावा अशी ती एकच वस्तू होती.

''नवीन घरात जुन्या वस्तू शोभून दिसत नाहीत. फ्लॅट एवढा पॉश घेतला अन् त्या फ्लॅटमध्ये काय अशा जुन्या काळच्या वस्तू न्यायच्या काय? आपण सुंदर व आकर्षक फर्निचर करू. सोबतच लाकडी कपाट बनवू. हे लोखंडी कपाट आपण कोणाला तरी फुकट देऊन टाकू किंवा कामवालीला ती देईल तेवढ्या पैशात देऊन टाकू. पाचशे रुपये आले तरी चालतील.'' सून म्हणाली होती. आधीच्या पिढीच्या कष्टांवर, घामांवर, त्यागांवर आर्थिकदृष्ट्या सक्षम बनणाऱ्या पुढच्या पिढीला त्या कपाटाची अडगळ, अडचण होत होती. त्यांना समजेना, की फ्लॅट जरी नवीन व पॉश घेतला तरी चांगल्या स्थितीत असणाऱ्या लोखंडी कपाटाची तिथे कशी अडचण होणार होती? शेवटी ती एक उपयोगाची वस्तू होती. पण आताची पिढी टिकाऊपणापेक्षा दिखाऊपणाला जास्त महत्त्व देणारी आहे हे समाधानरावांच्या लक्षात आलं. लाकडाचं कपाट काय लोखंडाच्या कपाटापेक्षा मजबूत असणार आहे का? सोनं देऊन पितळ घेण्यात कोणता शहाणपणा आणि आधुनिकपणा आहे? आणि हो... आपणही तर आता जुने झालो, म्हातारे झालो. आपली पण अडगळच होईल का नवीन घरात? आपणही त्या नवीन घरात शोभून नाही दिसणार का? उद्या आपल्यालाही बाहेर, ओसरीत किंवा कुठल्यातरी वृद्धाश्रमात तर जावं लागणार नाही ना?'' असा विचार मनात येताच त्यांच्या अंगावर काटा उभा राहिला. अंगभर अनामिक वीज सळसळत गेली. त्यांना जाळत गेली. त्यांच्या मनात असंख्य विचार गर्दी करू लागले :

'पोराला, सुनेला कसं सांगायचं, की जिवंत माणसांप्रमाणेच निर्जीव वस्तूंमध्येही जीव असतो म्हणून. त्यांच्यावरही आपला जीव जडलेला असतो म्हणून. घर म्हणजे निर्जीव वस्तूंचा समुच्चय नसतो तर प्रत्येक वस्तू मग ती सजीव असो की निर्जीवअसो त्याच्याशी ह्यदयाचं एक नातं तयार झालेलं असतं. जिवंत नातं. भावनिक नातं. पण भौतिकतेलाच महत्त्व देणाऱ्या पिढीला ते कसे कळेल, की घरातील वस्तू सुद्धा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असतात म्हणून. उगाच आपण बालपणीच्या आठवणी वस्तू रुपाने जपून ठेवतो काय? आपण फक्त विचार करू शकतो, जीव लावू शकतो. आपल्याला जोडणंच माहीत आहे. तोडणं मुळीच जमत नाही. कुणी याला आपला लोभही म्हणू शकेल. पण तसा लोभी मी आहेच. माणसांवर जसा माझा लोभ आहे तसाच प्रत्येक वस्तूवर लोभ आहे. कारण त्यांनी माझ्या जीवनातील बरेच क्षण सुखकर व आनंदी केलेले आहेत. माझं मन फक्त जीव लावणं जाणतं. झिडकारणं, तोंडणं मला जमतच नाही. काय करू? मीही पोरांसारखाच व्यवहारी, संवेदनाहीन आधुनिक होईल का अशी भीती मला आताशा वाटायला लागलीय. आपल्या हातात आता एकच गोष्ट आहे. आणि ती म्हणजे सामान हलवताना किंवा कपाट सोडून जाताना किंवा कपाट दुसऱ्या कुणीतरी नेताना बघायला आपण घरात थांबायचंच नाही. नाही तर रडण्यापासून, तुटण्यापासून आपण स्वतःला रोखू शकणार नाही. कदाचित कपाटसुद्धा रडणार नाही कशावरून?''

❖

# मी पाहिलेले ताडोबा जंगल

## भाग २



लेखिका
**सीमा श्रीकांत देशमुख**
अमरावती

**नमस्कार मित्रांनो**

**मी पहिले लिहिलेल्या ताडोबा जंगलाच्या वर्णनाला तुम्ही दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मला पुन्हा लिहिण्याची प्रेरणा मिळाली. आणि मी परत दुसरा भाग लिहिण्यासाठी माझी लेखणी उचलली.**

पहिल्या भागात मला झरणी नवची वाघीण अगदी जवळून दिसली होती .हे आपल्याला माहीत आहे.

प्रत्येक वेळेस जंगल बघायचा अनुभव हा अगदी वेगवेगळा असतो.

अगदी पहाटे उठून आम्ही सर्वजण जय्यत तयारीनिशी चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा जंगल पाहण्यासाठी निघालो. गप्पागोष्टी गाणे म्हणत आमचा प्रवास चालला होता. यावेळेस आम्ही समृद्धी महामार्गावरून गेल्यामुळे थोडं लवकर पोहोचलो. आमचे नेहमीचे रिसॉर्ट म्हणजे, टायगर रिसॉर्ट आम्ही उतरलो. मागच्या वेळेपेक्षा रिसॉर्ट अधिकच सुंदर दिसत होतं. बऱ्याचशा सुधारणा आणि झाडं नवीन दिसत होती. जंगलाच्या मध्यभागी असलेले हे रिसॉर्ट खूपच सुंदर आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर गावापासून काही अंतरावर थोडं जंगलाच्या जवळ हे रिसॉर्ट आहे. तिथे पोहोचल्यावर आम्ही सर्वजण फ्रेश झालो.

हॉटेलमध्ये आमच्यासाठी जेवण तयार होतं. कडाडून भूक लागल्यामुळे सर्वांनी पोटभर जेवण केलं. तेवढ्यातच आमच्या ट्रीपचे ऑर्गनायझर चंदू सर यांनी आम्हाला ऑर्डर दिली की आता सफारीला जायचे आहे लवकर तयार व्हा!

थोड्याच वेळात दोन जिप्सी गाड्या हॉटेलमध्ये आल्या शूज, कॅप, गॉगल, कॅमेरे हे सर्व घेऊन आम्ही जंगल सफारी साठी रेडी होतो. जंगल पुन्हा एकदा बघण्याची उत्सुकता होती आणि त्यातच वाघाला बघण्याची जास्त उत्सुकता होती.

आदल्या दिवशी खूप पाऊस पडून गेल्यामुळे वातावरण थंड होते. एरव्ही मे महिन्यामध्ये तापमानातील

सर्वाधिक उच्चांक गाठणार हा चंद्रपूर जिल्हा, यावेळेस मात्र थंडगार होता. थंडहवा अंगाला स्पर्शून जात होती. आपण एखाद्या हिल स्टेशनवर तर आलो नाही ना! असा भास होत होता. जस जसा आम्ही जंगलाच्या आत जात होतो अधिकच ठंड हवा जाणवत होती.

या वेळेची पहिल्या दिवसाची सफारी आमची कोरच्या जंगलात होती. ताडोबाच्या जंगलात कोर ,बफर असे अनेक भाग आहेत. एका वेळेस आपण संपूर्ण जंगल फिरू शकत नाही. जेवढा भाग आपल्याला परवानगी असते तेवढ्याच भागात जंगल फिरता येते.

कोरचे जंगल हे थोडसं मोकळ आहे. जंगलात शिरण्याचा रस्ता पण चांगला आहे. पाऊस पडून गेल्यामुळे थोडीफार हिरवळ चिखल रस्त्याने दिसत होता. निसर्गाच्या लहरीपणामुळे मे महिन्यातच झाडांना पालवी फुटली होती थोडीफार हिरवळ दिसत होती आश्चर्यच होतं!

आमच्या सोबत असलेले गाईड आम्हाला झाडांचे वृक्षांचे येथील प्राण्यांची माहिती देत होते. इथे बरीच झाड आहेत. प्रामुख्याने इथे दिसणारी झाडें म्हणजे, बांबूची झाडं, तेंदू, मोहाचे झाडं, अर्जुन साल, बिजा , घेवडा, मधुका अशी अनेक वेगवेगळ्या जातींची झाडं आहेत.

एका झाडाला भरपूर फुलं आलेली दिसत होती. मी विचारलं हे झाड कसलं आहे? तेव्हा ते म्हणाले हे झाड मोहाचे झाड आहे या मोहाच्या फुलांपासून दारू तयार करतात . पहिल्यांदा ही फुले तोडून ती एका प्लास्टिक मध्ये पाणी टाकून सडवली जातात. आणि मग एका मडक्यामध्ये पाणी टाकून उकळले जातं. त्या मडक्यावर येणारी वाफ त्या वाफेवरून येणारे जे पाणी असतं त्याच्यापासून मोहाची दारू तयार करतात. असं मला तेथील गाईडने सांगितले. नंतर आम्हाला एक विचित्र झाड दिसलं हे झाड म्हणजे घोस्ट ट्री आहे असं त्याने सांगितलं. हे झाड निष्पर्ण होतं. वाकड तिकडं वाढलेलं आणि या झाडाचा रंग पांढरा होता. रात्रीच्या वेळी ही झाड जंगलात भुतासारखी दिसतात पांढरे शुभ्र असल्यामुळे अंधारात चमकतात. आणि त्यांचा विचित्र आकार आणि फांद्यांमुळे त्यांना घोस्ट ट्री म्हणतात. खरंच विचित्र आणि भयंकर दिसत होती ते झाड.

जसजसा मी पुढे जात होतो आम्हाला अनेक प्राणी दिसत होते त्यात सांभर डियर, हरणांचे कळप, मोर, गवा, रानडुक्कर, माकडं वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी देखील आम्ही पाहिले. त्यात ईगल, किंगफिशर, अजून बरेच पक्ष होते ज्यांची नाव देखील मला माहित नाही.

थोडे अंतर पुढे गेल्यावर आम्हाला एक पाण्याचा तळं दिसलं या तळ्याच्या काठावर एक भली मोठी मगर सुस्त अवस्थेत पडलेली दिसली. तिचा हिरवट काळपट रंग अगदी दगडासारखा वाटत होता. असं वाटत होतं जणू एखादा दगडच तिथे ठेवलेला आहे. या मगरी भोवती तिचे अंडे देखील होते. कोणी प्राणी येऊन अंड खाऊन घेईन या भीतीने ती त्यांच्या रक्षणासाठी त्या अंड्याच्या जवळ झोपलेली होती.

असेच एक एक प्राणी, पक्षी बघत बघत वेळ कसा जात होता समजलच नाही. थोडं अंतर पुढे गेल्यावर आम्हाला सगळ्या जिप्सी एका ठिकाणी थांबलेल्या दिसल्या.

तिथे जाऊन पाहतो तर काय!

एक भलं मोठं अस्वल गाडी समोर उभं होतं. अस्वल बघण्याची ही माझी पहिलाच वेळ. काळा रंगाचं, केसाळ अस्वल जिप्सीच्या अगदी समोर होतं. सर्व पर्यटक आपल्या जिप्सीत बसून अस्वलाचे निरीक्षण करत होते. सगळ्यांनी आपले कॅमेरे उचलले आणि पटापटा अस्वलाचे फोटो काढत होते. ते अस्वल खाली मान करून नाकाने जमिनीवर काही तरी सुंगत होत . गाईड कडून कळले की हे अस्वल जमिनीवर असलेले कीटक, मुंग्या किडे हे शोधत असतं आणि खात असतं. आमच्या समोरच्या जिप्सी काही लहान मुलं होते. त्यांच्या खेळण्यातला टेडीबेअर आज त्यांच्या प्रत्यक्ष समोर होतं हे पाहून लहान मुलांमध्ये खूप आनंद दिसत होती. अस्वलाला कल्पनाही नव्हती की इतके लोक त्याला बघत आहेत. नंतर ते हळूहळू जंगलाच्या आत निघून गेलं.

दुपारच्या सफारीची वेळ संपली होती आणि आम्ही रिसॉर्टच्या दिशेने निझालो.

दुसऱ्या दिवशी आमची पहाटे साडेपाच ते सफारी होते.

पहाटे जंगल बघायचा अनुभव म्हणजे काही औरच होता. पहाट असल्यामुळे वातावरण अधिकच थंड होते. पहाटे पावसाच्या सरी आल्यामुळे झाड वेलींवर दवबिंदू दिसत होते.

अतिशय सुंदर आणि नयनरम्य हे दृश्य होतं.

आज मात्र वाघाचे दर्शन होणार असं मनापासून वाटत होतं. आज आमची सफारी बफर मध्ये होती. बफरचे जंगल वाघांसाठी प्रसिद्ध आहे इथे आल्यावर वाघ दिसतोच. असं तेथील गाईड आणि लोकांचं म्हणणं होतं.

त्यामुळे पुन्हा एकदा वाघाला बघण्याची उत्कंठा निर्माण झाली होती.

गाईड मला वाघांविषयी माहिती सांगत होता.

सध्या ताडोबा जंगलाचा राजा हा छोटा मटकासूर असे त्याचे नाव आहे. या छोट्या मटका सुराची पोट हे मटक्यासारखे असल्यामुळे त्याचे नाव मटकासुर असे पडले. छोटा मटकासूर हा सर्वात ताकतवर आणि शक्तिशाली वाघ ताडोबा जंगलात आहे. त्याला तारा नावाच्या वाघिणीपासून पिल्ले झाली.

तेथील गाईडच्या बोलण्यावरून असे लक्षात आले की वाघ हा नेहमी आपल्या वर्चस्व सिद्ध करीत असतो. दुसऱ्या वाघाची पिल्लू जर आपल्या भागात जर आले तर तो त्यांना मारून टाकतो.

जंगलात अनेक वेगवेगळ्या नावांचे वाघ वाघिणी आहेत.

मी गाईडला प्रश्न विचारला आपण वाघांना कसे ओळखता तेव्हा ते म्हटले की त्यांच्या अंगावरचे जे पट्टे असतात त्यावरून त्यांची ओळख पटते. यातील एका वाघिणीचे नाव सोनम आहे मी म्हटलं तिची नाव सोनम का ठेवले. तेव्हा ते म्हणाले तिच्या मानेवर ड अशी खून आहे म्हणून आम्ही तिचे नाव सोनम ठेवले आहे. अशा अनेक रंजक गोष्टी मला कळत होत्या.

अशाच गप्पा मारता मारता अचानक आम्हाला सांबर डियरच्या कॉलिंग चा आवाज ऐकायला यायला लागला. कॉलिंग म्हणजे त्यावेळेस वाघ जवळपास असतो त्यावेळेस इतर प्राणी आवाज काढतात. आणि सूचना एकमेकांना देतात .वाघ जवळपास आहे. सावध व्हा! सांबर सतत आपला आवाज करून सगळ्यांना सूचना देत होतं.

आम्ही थोड्या वेळ तिथेच थांबलो. थोड्या दूरवर अगदी दाट झाडांमध्ये. नीट निरखून पाहिल्यावर. आम्हला. भानुखिंडी नावाची वाघीण दिसली. आम्ही विचारल्यावर कळले की या वाघिणीला पाच बछडे आहेत वाघीण जंगलाच्या आत असल्यामुळे आम्हाला फक्त तीन बछडे आणि वाघिणीची हालचाल दुरून दिसत होती. सर्व टूरिस्ट आपापले कॅमेरे घेऊन वाघिणीला बघण्याचा प्रयत्न करत होते. जशी वाघीण उठून चालायला लागली बछडे देखील तिच्या मागे निघून गेले.

याच बछड्यांना बघण्यासाठी आमच्या जिप्सीची धावाधाव सुरू झाली. जिप्सीतून

वाघीण कुठून दिसते हे बघण्यासाठी सर्वजण प्रयत्न करत होते. बफर जंगलाचा वळणावळणाचा आणि खडकाळ रस्ता आणि वाघिणीला बघण्याची आमची उत्कंठा, यामुळे खूप थ्रिलिंग एडवेंचर वाटत होतं.

थोडे पुढे गेल्यावर सर्व जिप्सी एका ठिकाणी थांबलेला दिसल्या. दुर्बिणीच्या आतून पाहिल्यावर. पुन्हा तीच वाघीण आणि तिचे बछडे आम्हाला दिसले. त्यातील एक बछडा अगदी स्पष्टपणे समोरून जाताना दिसला.

खूप रोमांचकारी हा क्षण होता. माझ्या हाताने नकळत टाळी वाजली आणि मला सगळ्यांनी चूप बसण्याचा इशारा केला. कारण प्राण्यांना आवाज आवडत नाही ते शांतता प्रिय असतात. माणूस हा एकमेव प्राणी आहे की तो बोलल्याशिवाय शांत राहू शकत नाही. सर्वजण त्या बछड्याचे वाघिणीचे छायाचित्र काढण्यात दंग झाले थोड्या वेळानंतर मात्र वाघीण आपल्या बछड्यांसह आत जंगलात निघून गेली .

अशा तऱ्हेने यावेळी देखील लांबून का होईना पण वाघाचे दर्शन आम्हाला बफरच्या आलिझंझा कोर या भागात झालं आणि आमच्या ताडोबाच्या सफारीचं सार्थक झालं. फक्त जंगलचा राजा छोटा मटकासूर दिसला नाही याची खंत वाटत होती.

❖

## अलक

**''आणि लक्षात ठेव, विषय चहावरच संपव समजलं, जास्त चोमडेपणा करु नकोस आपण कोण? ते कोण ?'', आई राजुला खडसावून सांगत होती.**

– प्रविण जगन्नाथ बोपुलकर



# कृषी शिक्षणाचे महत्त्व व तंत्रज्ञानाची गरज.....

लेखिका
**सुनीता सूर्यभान तिकोने**
शिक्षिका पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आपला भारत देश कृषीप्रधान देश आहे. आजही देशात तथा महाराष्ट्रात ६० ते ६५ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका शेती व्यवसायावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे खूप मोठ्या प्रमाणात शेतकरी कुटुंबांकडे शेती क्षेत्र अल्प प्रमाणात आहे.

जास्त क्षेत्र असणारे शेतकरी खूप कमी संख्येने आहेत. यापैकी बरेचसे क्षेत्र पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे खात्रीशीर उत्पादन मिळण्याची शाश्वती नसते.

मर्यादित जमिनीचे क्षेत्र उपलब्ध असल्याने आणि सिंचनाच्या सुविधा मुबलक नसल्याने याच क्षेत्रातून अधिक उत्पादन कसे घेता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.

शेती उत्पादन हे शेतीची आवश्यक मशागत विविध निविष्ठांचा योग्य प्रमाणात आणि वेळेवर वापर या गोष्टींवर अवलंबून असते. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी मुख्यत्वे भांडवल, सिंचनाची व्यवस्था या कृषी विषयक बाबी महत्त्वाच्या आहेत. याचबरोबर कृषी तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे.

कृषी संशोधकांनी अभ्यास करून आणि विशेष परिश्रम घेऊन विविध विषयांसंबंधी सुधारित कृषी तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि शेतकऱ्यांनी उपलब्ध कृषी तंत्रज्ञानाचा उपयोग शेतीमध्ये करावा यासाठी शासनाने मार्गदर्शनपर सत्र आयोजित करणे आवश्यक आहे. तसेच या ज्ञानाचा प्रसार व प्रचार करणेही गरजेचे आहे.

शेतकऱ्याला कृषी तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ग्रामीण भागातील कृषी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांनी कृषी शिक्षण घेतले तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

शेती हा व्यवसाय शास्त्र आणि कला कौशल्य यावर आधारित आहे. म्हणून शेती शास्त्राची आणि त्यातील कौशल्याची माहिती करून घेणे शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. शास्त्रीय ज्ञानाद्वारे आपण एखाद्या गोष्टीबाबत कारण आणि परिणाम या संबंधाचा शोध घेतो. एखाद्या माणसाला काही आजार झाला तर डॉक्टर त्याच्या आजाराचे कारण शोधून उपचार करतात. कृषी व्यवसायात अशा अनेक बाबी आहेत की ज्यावर कारण आणि परिणाम यांची मिमांसा विचार करून उत्पादनात वाढ करता येऊ शकते. त्यासाठी गावामध्ये तीन ते चार कृषी पदवीधर स्वतः शेती करत असतील तर त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा गावातील शेतकऱ्यांना होईल. शेतीचे हंगामानुसार नियोजन करणे गरजेचे आहे. कृषी तज्ञ हे ग्रामीण भागात कृषी विषयक मार्गदर्शन व सल्लागार म्हणून कार्यरत असल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या व्यवसायात नक्कीच फायदा होईल. शासनाने शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आणल्या आहेत परंतु त्या त्यांच्यापर्यंत पोहोचण्यास खूपच वेळ जातो. तसेच काही शेतकरी या योजनांपासून अनभिज्ञ असतात ,त्यासाठी शासनाने उपाय योजना राबवणे आवश्यक आहे. तसेच नव युवकांनी कृषी शिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे.

असा हा शेतकरी राजा जगाचा पोशिंदा ,आपले सर्वांचे पोट भरणारा शेतकरी राजा त्यांचा आपण सर्व भारतीयांनी मान ठेवू, गौरव करू, व शेतकरी राजाला प्रोत्साहन देऊ.....

❖

# जत्रा



लेखिका
**शिल्पा चऱ्हाटे**
मुंबई

उर्मिलाने पायातले घुंगरू काढले. त्याला डोक्यावर नमस्कार करून लाल मखमली कापडा मध्ये गुंडाळून ठेवले. नाचून नाचून अंग ठणकायला लागले होते. महिन्याभरापासून बैहरमच्या यात्रेत मुक्काम होता. दुपारी चार वाजता पासून ते रात्री बारा, एक वाजेपर्यंत तमाशात नाचावे लागत होते थोडाही विसावा घेतो म्हटलं तर पब्लिक आरडाओरड करायची.

उर्मिला वासेकर ची लावणी बघायला आजूबाजूच्या दहा गावातले लोक यायचे जत्रेत देवदर्शन तर एक निमित्त असायचं खरा जागर उर्मिलाच्या फडावर चालायचा. आक्काच्या कडक तालमीत वाढलेली उर्मिला केवळ नयन कटाक्षाने अख्खी पब्लिक घायाळ करायची . लोक तिच्यावर नोटांचा वर्षाव करायचे. शरीर थको वा मन तिला नाचणे भाग होते वीस , पंचवीस जणांच्या ताफ्याचे पोट भरायचे होते.

काही दिवसापासून मन फार बैचेन होत होतं.

तिने घट्ट डोळे मिटले वडिलांचा हात धरून, तर कधी खांद्यावर बसून ती कितीतरी वेळ या जत्रेत आली होती.

जवळच्याच गावात ती, आईवडील, भावासोबत राहायची . जत्रेत बाबांसोबत यायची भिंगरी, बाहुली , चणे, फुटाणे कितीतरी वस्तू ती खरेदी करायची तुफान गर्दीत वडिलांचे बोट घट्ट धरून फिरायची.

एके दिवशी कसा कोण जाणे बाबांचा हात सुटला.

ती बावरली सैरावैरा धावत बाबा, बाबा ओरडू लागली. माणसाच्या सागरात त्या इवल्याश्या जीवाचा काय थांग लागणार. शेवटी थकून ती एका राहुटी जवळ जाऊन बसली. तिला कधी झोप लागली कळलेच नाही जाग आली तेव्हा ती एका बैलगाडीत होती. ती रडायला लागली ''बाबा ,बाबा'' गाडीतला माणूस धावत पुढच्या छकड्या कडे गेला. ''आक्का पोरीले

सुध आली'' तशी आक्का तिच्याजवळ जात रोख्यान विचारलं

'' नाव काय ग तुझं, अन् कुठुन आली '' ती कावरीबावरी होऊन बघत होती. चार–पाच वर्षाची पोर काय बोलणार ती रडु लागली. आक्का ''तुला बोलता येत नाही का तेव्हापासून हमसून, हमसून रडून राहिली, आता काय करायचं या पोरीच.''

गणप्या लगेच बोलला ''जाऊ दे ना आक्काची, देवाची कृपाच म्हणायची तुझा वारसा चालवायला

कोवळी काकडी पाठवली त्यांन. आता तुझ्या तालमीत होऊन जाऊ दे दुसरी आक्का वासेकर''

आक्कान तिच्या हनुवटीला पकडून निरखून बघत ''गणप्या तू म्हणतो ते एकदम बरोबर आहे. नाक ,नक्षा चांगला आहे .तुफान करन ,अक्काच्या फडाचं नाव करन. आज पासून हिचं नाव उर्मिला, उर्मिला वासेकर'' वीस वर्षे उलटले होते. आज परत त्याच गावात मुक्काम होता. मन बालपणीच्या घराकडे धाव घेत होतं. आई , बाबा, भाऊ असेल का तिथे?.

मला कोणी ओळखेल का? मी तमाशात नाचणारी त्यांना चालेल का?

परत बाबाचा बोट धरून जुन्या आयुष्यात जाऊ शकेल का? तिने गालावरच्या अश्रुंना पुसले.

सकाळी गणपत मामाला सोबत घेऊन ती तिच्या गावाच्या दिशेने निघाली.गाव संपूर्ण बदलले होते मातीचे घर जाऊन सिमेंटची घर होती.

पाऊलवाट तर तीच होती. पावले झरझर चालत होती.

एका घरा जवळ येऊन ती थबकली.

घराची अवस्था सांगत होती आता इथे कुणीच राहत नाही. तिने काव्ऱ्या बाव्ऱ्या नजरेने इकडे तिकडे बघितले. समोरून येणाऱ्या व्यक्ती ला थांबवत ''दादा इथे सुधाकर कदम राहत होते. कुठे गेले?''

तो थोडा वेळ विचार करीत म्हणाला '' संदिप भाऊ का? ते तर शहरात गेले कवाचे अन तुम्ही कोण?''

'' मी त्याची..'' ती चुप बसली डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या.

तो माणूस पुढे बोलू लागला. ''लय वंगाळ झालं बघा त्यांच्यासोबत त्यांची बहीण, सुधाकर दादाची पोरगी जत्रेत हरपली लय शोधलं नाय गावली. शेवटी नशीबाले दोष देत दिस काढत होते. एकदा जत्रेत गावाच्या लोकांनी तिले फडात पायली, ही बातमी कानावर पडताच सुधाकरदादा धावत गेले.आक्कान त्या दोघांची भेट होऊ दिली नाही..

स्वत: च्याच पोरीसाठी जन्मदाता बाप आक्का बाई कडे हात पसरून इनवनी करु लागला मायी छकुली वापस करा.''

''मायी छकुली मले द्या.''

''आसवांन तिचे पाय धुतले पण त्या बाईले काही पाझर फुटला नाही''..

''दुसऱ्या दिवशी अख्खा गाव गेला. तर तिथं फडच नव्हता. रातोरात पोबारा केला त्यांनी. हातातोंडाशी आलेला घास पुन्हा हिरावला गेला.''

''तेव्हापासून सुधाकरदादा वेड्यासारखे वागायला लागले. कुणाचीबी पोरगी दिसली की मायी छकुली,मायी छकुली म्हणत छातीशी लावत होते. अन् शेवटी छकुली , छकुली करत प्राण सोडला . सारं गाव हळहळलं. त्याचा पोरगा संदिप अन् त्याच्या आईनं गाव सोडलं. शहरात कुठे गेले कुणालाच माहिती नाही''.

एक पुसटशी आठवण तिने मनात जपली होती. आज नाही तर उद्या आपल्याला आपले आई ,बाबा ,भाऊ भेटतील म्हणून पाय घुंगराच्या साखर दंडात बांधुन ती नाचत होती. आज सार संपल होतं .या जत्रेन तिचं सारं हिरावून घेतले होते.

तिनं जोरात हंबरडा फोडला ''बाबा तुमची छकुली आली. बाबा तुमची छकुली'' ......

❖





# परडी

**''ती'' तिच्या विषयी खूप काही सांगायचे आहे म्हणून मी लिहित आहे... परंतु त्या पूर्वी थोडक्यात मांडते... मला ती आयुष्यभर जशी भासली अगदी तशी... ''ती'' म्हणजे कोण? असा प्रश्न पडला ना! आपली सगळ्यांना हवीहवीशी वाटणारी सगळ्यांची लाडकी आजी आणि आमच्या घरातील आम्हाला जपणारी विधात्याची परडी**

**लेखिका**

**गिरिजा (जयश्री विजय गिते)**

मुंबई

**''एक परडी या जगी सुंदर रंगीबेरंगी फुलांने बहरलेली**

**बहरून टाकी अवघा आसमंत अशी परिमळाने मोहरलेली...''**

परडी' हा शब्द ऐकताच मनी थोडा विचार आला असेल. डोळ्यापुढे एक सुखावणार सुंदर चित्र उभं राहिल असेल ते म्हणजे विविध रंगी फुलांनी बहरलेली 'परडी'... एवढचं नव्हे तर तुमच्या सभोवताली परडीतील फुलांचा मंद परिमळ दरवळत असेल. दुसऱ्या अर्थी 'परडी' म्हणजे देवाने दिलेला असा आशिर्वाद की जिच्या स्पर्शाने आपल्या जीवनातील दुःख, दारिद्र्य दूर होते. आणि म्हणूनच आल्याबल्या घेत जोगतीण आपली 'परडी' पुढे करते... आणि त्या 'परडी' च्या अदृश्य स्पर्शाने आपले दुःख नष्ट होतात हा मनाचा भाव अन् एक निर्मळ श्रद्धा....मनुष्याने तयार केलेली ही अशी एक धार्मिक वस्तू आहे की, जीला लहान-मोठा, चांगले-वाईट याच्याशी काहीही घेणं-देणं नाही. तिला फक्त सर्वांच्या दुःखाचा नाश करणे एवढेच माहित आहे. तर मी बोलत असलेल्या 'परडी' मध्ये सर्व फुले ममत्वाने स्वतः च्या कवेत घेण्याची आस आहे. ''ती फुलं सुकलेली असली तरी सुखावलेली असतात.''

अशीच एक विधात्याची अद्वितीय घडण असलेली अनेक गुणांनी भरलेली परडी माझ्याकडे होती...(होती असे म्हणण्यापेक्षा आहे म्हणणे योग्यच) जिच्यामध्ये धरतीची सहनशीलता, सरीतेची निरंतरता, सवितेची प्रखरता, पर्वताची अचलता,शिक्षणाविषयी अपार आस्था, प्रेम,ममत्व हेच नव्हे असे अनेक गुण तिच्यामध्ये होते. अशी ती जीला मी परडी म्हणते अशी प्रेम मूर्ती म्हणजे माझी ''आजी...''.

तिचं जीवन हे जणुकाही विविध रंगाने रंगविलेल्या 'परडी' प्रमाणे होते. आणि ज्याप्रमाणे फुलांची 'परडी' विविध फुलांना स्वतःचे नसतांना देखील आपलसं करून जाते तशी ती होती. ज्याप्रमाणे 'परडी' ही बारीक काड्यांनी विनलेली असते आणि त्या काड्यांच्या विनाइच आपणास गुढ कळत नाही. तशीच आमची आजी तिच्यामध्ये विविध गुण वेगवेगळ्या पद्धतीने गुंफलेले होते. तिचे शरीर साधारण बारीक, साजेशी

उंची, काळे पण बोलके डोळे, नववार काष्टी पातळ आणि एखाद्याला बघताच त्यांच्या मनातील भाव जाणुन घेवून त्यावर योग्य काय ते सुचविण्याची क्षमता. असे कितीतरी गुण आजीचे होते.

माझी म्हणणं चुकीचे ठरेल ती आमची होती. आम्हा सर्वांची ती हवीशी असणारी आजी. जिने आम्हा लेकरांना फुलांप्रमाणे आपल्या कवेत घेतले. थोडं तिच्याविषयी बोलावं वाटतं....

आजीचा जन्म बिड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील 'नायगाव' ज्याला मोराचे नायगाव असे ओळखले जाते. घरात ४ भावंडे होती. लहानपणापासून प्रेमाने आणि कर्तृत्ववाने सर्वांना आपलसं करणे हा तिचा गुण. पण ज्याच्याकडे सर्व आशेने पाहतात त्यालाच विविध कसोटीला तोंड द्यावे लागते. विवाह झाला आणि सासरी आली सासरी अगोदरच मोठा परिवार. मोठ्या बहिणीचे (आजोबांना पहिल्या पत्नीपासून ९ अपत्य (३ मुले व ६ मुली) होती. मात्र काही शारीरिक आजाराने पहिल्या आजीचे देहावसान झाले. मागे ही मुलं आणि संसार सोडून पहिली आजी देवाघरी गेलेली. त्यापैकी फक्त एका मुलीचा विवाह झालेला. तर काही अगदीच लहान. विवाहानंतर घरी येतांना तिला ठाऊक होते की, घरात आपल्याला घरातील ही चिमणी पाखरं सांभाळणे आहे. थोडक्यात काय तर तिला याची जाणीव होती की, आपल्याला घरातील फुले जपून त्यांचे संगोपन करून त्यांना असं करायच आहे की; ते सर्वांच मन जिंकुन देवाच्या चरणाशी अर्पण न करता त्या फुलांची सुंदर पुष्पमाला बनून त्यांनी देवाच्या ह्दयाशी सतत रहावे. आजीने त्याचप्रमाणे या सगळ्यांना चांगलेच शिकविले. आणि आजीच्या प्रेमाने जोपासलेल्या या फुलांचा कर्तव्य रूपी परिमळ सर्वत्र हळूहळू पसरत आहे. आजीने त्या सगळ्यांना अगदी आपलसं करून घेतले. अगदी जसं परडी कुठलेही फुल हे दुसऱ्या वेलीच असलं तरी आपलसं म्हणून त्यांना जवळ घेते अगदी तसं.

तेव्हापासून तिने स्वतःला जणू या संसार यज्ञात झोकून दिले होते. त्या परडीत असणाऱ्या फुलांच भविष्य आता तिच्या हातात होत. संपूर्ण घराची जबाबदारी सांभाळत तिने सर्वांना आपलसं करून घेतल आणि कसलाही भेद न करता त्यांना भरभरून प्रेम दिलं. मुलं मोठी झाली त्यांचा विवाह झाला आणि या परडीत फुलं वाढतचं गेली. मात्र तिच्या चेहऱ्यावरील व ह्दयातील प्रेमभाव व ममत्व कमी झाले नाही. बघता बघता नवीन सूना घरी आल्या. ह्या सुना कधी मुली बनल्या हे कळलेच नाही. त्यांच्या हाताला धरून तिने त्यांना प्रत्येक गोष्ट,काम आईच्या मायेने शिकविले. लहानपणापासून आईच्या प्रेमाला मुकलेल्या सुनेची (माझ्या आईची) ती आईच बनली. प्रत्येक संकटात, सुख-दुःखात तिच्या सोबत उभी होती.

माझ्या वडीलांच्या काही वैद्यकीय अडचणीमुळे आई-बाबा आमच्या पासून तीन वर्ष दूर होते अशावेळी आजी आमची आई-बाबा बनली. वडीलांच्या निधनानंतर आईची भक्कम पाठराखण केली. त्या लतिकेचा आधारवड बनली. हे सगळं करत असतांना आमच्या साठी अपार कष्ट केले व या चिमण्यांच्या चोचीत दाणा भरवला. व आम्हाला सावरले. आम्ही वेलीवरील सुकोमल फुले फक्त या परडीमुळे जगाच्या पसाऱ्यात आनंदाने व संस्काराने वावरत आहोत. मुलांना शिकवणे आणि पडेल ते काम करणे हीच तिची शिकवण.

तिने १५ वर्ष संत गजानन महाराज मंदिर संस्थान, शेगांव येथे सेवाकार्य केले. सतत कामात असणारी आजीला शेवटच्या दिवसात शारीरिक व्याधींचा त्रास होता. स्वतः च्या कामासाठी कधीही कोणाला त्रास न देणाऱ्या आजीला शेवटी अर्धांगवायू झाला. मात्र त्यावेळी देखील तिचा तो काम करण्याचा प्रयत्न आणि 'न थांबता चालत रहा!' हे सांगण्यासाठी तोंडावाटे बाहेर पडणारे बोबडे बोल अजूनही कानात फिरतात. आजही आम्ही भावंड आजी या विषयीवर बोलायचे म्हटले तर शब्दकोश अपुरा पडेल. शेवटच्या क्षणापर्यंत तिने तो प्रेमाचा झरा कधीही आटू दिला नाही. अनेकांनी प्रेम देवून स्वार्थ साधला ही मात्र निस्वार्थी जगली.

या वेळेपर्यंत या 'परडी' मध्ये असणारी आम्ही ताजी टवटवीत फुले होती...जिचा तिने सांभाळ करून त्यांना योग्य त्या मार्गाने जाण्यासाठी सक्षम करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. प्रत्येक जण आपल्या भविष्याचा वाटेकडे मार्गक्रमित झाला. आम्हा पाचही भावंडांना अत्यंत प्रेमाने जपले. ती गरिबीतून जन्माला आलेली व गरीबांसाठी जगलेली आमच्या परिवाराचा एकमेव कणा. स्वाभिमानाने जगणे म्हणजे काय हे तिच्याकडून शिकावे. आज आमच्या वागणुकीतून, स्वभावातून, कार्यातून, वात्सल्यातून जो संस्कारांचा परिमळ दरवळतो तो म्हणजे या 'परडी'चा लाभलेल्या सहवासाने. या विधात्याच्या 'परडी'ने आमच्या उजडलेल्या बागेचे नंदनवन केले.

**असे वेळेचे उलटे चक्र फिरावे**
**परतूनी एकदा लहान व्हावे**
**तसेच हसत-बागडत जगावे**
**अलगद आजीच्या प्रेमळ**
**कुशीत शिरावे.**
**या परडीने प्रेमाने जपलेले**
**एक वेगळे फुल...**

# मैत्री
## म्हणजे प्रेमाचा झरा.....!




**लेखिका**

**मयुरी अशोक कोरे**

अकोला


एक शाळकरी वयाचा मुलगा घरची परिस्थिती हलाखीची म्हणून दारोदारी जाऊन वस्तु विकायचा आणि उदरनिर्वाह करायचा.पण नियतीच्या मनात काही वेगळेच होतं... बालपणीच पितृछत्र हरवलं त्यामुळे घरातील मोठा म्हणून घरची सर्व जबाबदारी याच्याच खांद्यावर आली. तेवढ्याच उत्पन्नावर ते काटकसर करून सुखा समाधाननं आयुष्य जगत होते.

दिवसभराच्या श्रमान शरीर पुरत थकलेल होतं झोप लागणार तेच त्याला आठवलं उद्या तर आईचा वाढदिवस...! आईला काहीतरी भेटवस्तु देऊया असा विचार त्यांच्या मनात आला म्हणून आज तो सकाळी लवकरच उठला आणि लगबगीने आवरुन वस्तु विक्री करायला निघाला. जास्त पैसे कमविण्याच्या नादात तो वणवण फिरत होता.

पण....नियतीला काही त्याच सुख मान्य नव्हतं. काळाने त्याच्यावर घाला घातला. त्याचा खुप मोठा अपघात झाला त्या अपघातात त्याला त्याचे पाय गमवावे लागले, त्याला अधूपण आलं.

आता तो पूर्णतः घरच्यांवर अवलंबून होता.आपल्या अपघातामुळे आईला पुन्हा कष्ट करावे लागता आहेत असे असंख्य प्रश्न डोक्यात थैमान घालत होते.म्हणून '' तो'' वैतागला होता,शिणला होता जगण्याला. चारी बाजूंनी संकटं आ वासुन उभी होती.पाऊलही उचलवत नाही आणि बळजबरीने उचललं की पडायचं. पुन्हा ठेचा परत रक्तबंबाळ होणं आणि पुन्हा दुसऱ्याच्या आधाराने पावलं टाकणं हा त्याचा प्रवास....

पण एक दिवस तो पुरता दमला.तो थकला होता स्वतःशीच झगडून. वैतागला होता सतत दुसऱ्याच्या आधारावर अवलंबून असण्याला.

क्षणभर मरणाचा विचार केला तरी माणसाला यातना होतात... इथे तर हा रोजच मरतोय. त्याच्या वयाची मुलं मैदानात छान खेळतात आणि हा असा .....

त्याच्या केविलवाणा, निरागस चेहरा बघून आईला अश्रु अनावर झालेत. अश्रु पदराआड करत तिची नजर मैदानात खेळणाऱ्या मुलांवर गेली.

मुलांना असं स्वच्छंद बागडतांना खेळतांना बघून तरी हा दुःखातून बाहेर येईल असं आईला वाटत होत म्हणून आई त्याला घेऊन एकदिवस मैदानावर गेली. तिथे मुले छान खेळत होती. मुकूल त्या मुलांना केवीलवाण्या नजरेने बघत होता आणि त्या मुलांना खेळण्यासाठी अजून बढावा देत होता.

मुलेही अधिक जोशाने खेळत होती.त्यांच्यापैकीच एक माधव. माधव ला नवनवीन मित्र बनवायला फार आवडायचं. तो लगेच धावत मुकूलकडे आला व त्याला म्हणाला मित्रा आम्हाला खेळण्यासाठी प्रेरित करतो आहे आणि तु मात्र खुर्चीत बसून आहेस. तु पण ऐना आमच्यासोबत खेळायला खूप मज्ञा येईल तुला पण.

माधव चे बोलणे ऐकून मुकूल आपल्या अधू झालेल्या पायांकडे बघतो त्याला अश्रु अनावर होतात. मुकूलला असे रडतांना पाहून माधवलाच वाईट वाटू लागतं तो मुकुल ची माफी मागतो. मित्रा माझा तुला दुखवायचा मुळीच उद्देश नव्हता मला माफ कर. तू नको हताश होऊस! एक दिवस तू पण स्वतःच्या पायावर उभा राहशील आणि आमच्या सोबत खेळशील.

तू नको रे माफी मागू मित्रा...! मित्र बोलला आणि माफी मागून क्षणात परकं पण करून टाकलं.

असं काही नाही रे मित्रा......

आज पासून आपण मित्र. तू पण येत जा असा रोज आपण सोबत खेळत जाऊ. माधवच्या सानिध्यात राहून मुकूल त्यांच्या अधूपनातून हळूहळू सावरायला लागला. मैत्रीच्या ताकदीने मुकूल ला जगण्याची नवी उमेद मिळाली दुःखी मनाला आनंदी करण्याचं बळ मिळालं ते मैत्री मुळेच.

मुकूलने मनःपूर्वक माधवचे आभार मानलेत. मित्रा आज तुझ्यामुळेच मी माझ्या पायावर उभा आहे आणि पुन्हा एकदा मी माझ्या कुटुंबांची जबाबदारी घेऊ शकतो आहे आणि त्यांना सुखी समाधानी पाहु शकतो आहे.

जीवन जगत असतांना जीवनाला योग्य वळण देणारी, सुख–दुःख वाटून घेणारं जीवाभावाचं आणि हक्काचं नातं म्हणजे मैत्री!

❖




**पुरस्कारासाठी आलेले प्रस्ताव चाळतांना, ''मि कवियत्री, साहित्यीका, परीक्षीका, सूत्रसंचालीका, आनी साहीत्यात याच्या व्यतीरीक्त मि या क्षेत्रात बरेच उल्लूखेनीय काम केलेले आहे'' वाचताच त्याने प्रस्ताव बाजूला ठेवला.**

–प्रविण जगन्नाथ बोपुलकर

# पांघरूया थंडी गुलाबी



लेखिका
**भारती दिलीप सावंत**
खारघर, नवी मुंबई

**लपेटून थंडीची शाल**
**नटली सजलीय धरा**
**खाऊ गरम पक्वान्नं**
**मिळवू पोटास उबारा**

शरदाची चाहूल लागताच साऱ्या चराचराला आनंद होतो. थंडीचा महिना आला म्हणजे ''आला थंडीचा महिना, झटपट शेकोटी पेटवा'' या लावणीची हमखास आठवण येते. आमच्या बालपणी मुले-मुली सकाळी उठले की सारे जमून अंगणात शेकोटी पेटवत असायचो. आजूबाजूला पडलेले कागद, पालापाचोळा गोळा करून त्यात टाकत असू. त्याला ''म्हातारी'' म्हणायचो. प्रत्येकाने थोडी थोडी म्हातारी आणून टाकल्याने शेकोटी चांगलीच पेटायची. मग अंगाला उबारा देत गप्पांची मैफल जमायची. काहीवेळा गाण्याच्या भेंड्या खेळल्या जात. आम्ही साखर कारखान्याच्या परिसरात राहत होतो. त्यामुळे ऊस खाऊन टाकलेल्या चुयट्या दिवसभराच्या उन्हाने वाळत. मग आम्ही त्या गोळा करून ठेवत असायचो. शेकोटीत म्हातारी म्हणून टाकल्या जात. शेकोटीत बराच वेळ त्याची धग राहायची. अंगात बऱ्यापैकी उब आली की आम्ही स्नानादि काम उरकत असू. आईच्या तोंडाचा पट्टा हाका मारण्यासाठी अधून मधून सुरूच असायचा. कितीही वेळ शेकोटी घेतली तरीही अंघोळ करताना कपडे काढले की थंडीने अंगावर शहारा यायचा. मग आई, आजी गरम गरम पाण्याने आम्हाला आंघोळ घालत. शरीराची हालचाल सुरू झाली की थंडी आपोआप पळून जायची मग उन्हाची कोवळी किरणे पडू लागली की आजोबा-आजी उन्हाला बसत. सोबत लहान बाळांना कोवळी उन्हं मिळण्यासाठी घेऊन बसत.

**पांघरूया थंडी गुलाबी**
**मदमस्त असा गारवा**
**घेऊया शाल लपेटूनी**
**सुटताच थंडगार हवा**

शाळा दुपारची असल्यामुळे आम्ही

देखील निवांत असायचो. मग आम्ही त्यांच्याजवळ गुळ शेंगदाणे खात अंगावर उन्हं झेलत बसायचो. त्यावेळी जीवनसत्वांचे आपोआपच पोषण होत असे. त्यामुळे विटामिनच्या गोळ्या खाण्याची आमच्यावर कधीच पाळी आली नाही. हाडांमध्ये जीवनसत्त्वाचा योग्य पुरवठा झाल्याने किती वेळा पडलो, झडलो तरीही कधी हाड मोडल्याचे आठवत नाही. हल्ली शहरात गगनचुंबी इमारतीमुळे सकाळचे दहा वाजले तरी सूर्य किरणे जमिनीपर्यंत पोहोचत नाहीत. तसेच शहरात अंगण हा प्रकार नसल्याने मुलांना ड जीवनसत्व जे हाडांच्या वाढीसाठी उपयुक्त असते ते पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे जरा पडले झडले तरी हाड मोडण्यासारखे प्रकार वरचेवर पाहायला मिळतात. ड जीवनसत्व हे सूर्याच्या कोवळ्या किरणांपासून सहज उपलब्ध असतात.

**घेऊया अंगावर सूर्यदेवाचे**
**कोवळे जीवनसत्वाचे ऊन**
**बनतील सारी हाडे मजबूत**
**सजती पाने दवबिंदू पिऊन**

हल्ली धकाधकीच्या जीवनात मोफत मिळणारी सूर्यकिरणे अंगावर झेलायलाही उसंत नसते. त्यामुळे हाडे ठिसूळ होताना दिसतात. थंडीच्या दिवसात शिवार हिरवाईने फुललेले दिसून येते. ताजा कोवळा भाजीपाला, वाटाणा, पावटा, चवळीच्या शेंगा यांना बहर आलेला दिसतो. बाजारातही या भाज्या पाहायला मिळतात. थंडीच्या दिवसात भूकही खूप छान लागते. त्या त्या ऋतूमधील हिरव्या भाज्या अजूनच पौष्टिक असतात. पौष्टिक आणि सकस आहार खाल्ल्यानंतर शरिराला रोग शिवतदेखील नाही. म्हणूनच रात्रंदिवस शेतात कष्ट केलेला शेतकरी वृद्ध झाला तरी धडधाकट असतो.

**खाऊया भाजून शेतातला**
**पौष्टिक स्वादिष्ट तो हूरडा**
**आला सुगीचा हा मोसम**
**भाकरीसंगे मिरचीचा खरडा**

शहरातील चाकरमानी मंडळी पंचविशीतच गळ्याठल्यासारखे वाटतात. कारण ऊर फाटेस्तोवर त्यांना नोकरीच्या मागे पळावे लागते. शिवाय हल्ली इंजेक्शन देऊन हायब्रीड धान्य, कडधान्य, भाज्या, फळे खावी लागत असल्यामुळे कस असलेले भोजन त्यांना मिळणे दुरापास्तच!अधूनिक जमाना आला. सर्व सोयीसुविधा झाल्यामुळे अंगमेहनत देखील होत नसते. त्यामुळे शरीराला हालचाल कमी आणि एका जागेवर बसून फक्त खाल्ल्यामुळे शरीराचे वजन वाढत राहते. या जीवनशैलीमूळे निरनिराळ्या रोगांना आमंत्रण दिले जाते.

असे असहाय झालेले आपण डॉक्टरच्या दारात चकरा मारत बसतो आणि शरीराला टिकवण्याचा प्रयत्न करत असतो.

थंडीच्या मोसमात वृक्षांची पानगळ सुरू होते. तरूतळाशी पडलेली वाळलेली पाने हवेच्या झोतासंगे इकडे तिकडे पळतात तेव्हा खुळखुळ्यासारखा आवाज येत असतो. दुरून येणाऱ्या वावटळीने धुळीचे कण हवेत उडतात आणि लहान मुले त्या वावटळीत खेळायला पळतात. आयाबाया त्यांचे वाळवण झाकून ठेवायच्या मागे लागतात. धुळीचे कण घरात शिरून मातीचे थर निर्माण होतात. शेतकरी गुरांना गोठ्यात नीट कोंडून ठेवतात आणि हिरवा चारा त्यांच्या पुढे टाकतात. कधी कधी पावसाच्या धारा देखील कोसळू लागतात आणि थंडीचा कडाका जास्तच वाढू लागतो. मुले बाळे गारठून बिछान्यात गुडूप झोपून जातात. थंडीत अंगाला घाम सुटत नसल्यामुळे आणि आल्हाददायक वातावरणामुळे व्यायाम करायला जास्त मजा येते. थंडीत भूकही चांगली लागते.

सकाळच्या शाळेत मुले स्वेटर, मोजे आणि मफलर किंवा कानटोपी घालून शाळेत जातात. या आल्हाददायक ऋतूमध्ये कंटाळा येत नाही. काम करण्यासाठी, खेळण्यासाठी विशेष आनंद वाटतो, जोश असतो. हिवाळ्यात सर्वत्र फुटबॉल, हॉलीबॉल, क्रिकेटचे सामने चालू असतात, क्रीडांगण मुलांनी भरून गेलेले दिसते, सकाळी धुक्यामुळे रस्ते झाकले जातात, धुके जणू काही डोंगराला टेकले आहे असे सुंदर मनोहरी दृश्य दिसत असते. सूर्याचे दर्शनही होत नाही. पहाटेला पानांवर फुलांवर पडलेले दहिवर मोत्यांप्रमाणे दिसते. सूर्याचे कवडसे पडून ते चकाकते. थंडीत सर्दी खोकल्याचा त्रास होतो म्हणून शरीराला गरम वाटणारे पदार्थ, मिठाया खाल्ले जातात. गरम कॉफी, चहा पिली जाते. दिवाळी, नाताळ, मकर संक्रांती, होळी असे बरेचसे सण थंडीत असल्यामुळे अंगाला उटणे लावून अभ्यंगस्नान करतात. ऐन

थंडीत आपला दिवाळी सण येतो. पावसाळा संपून नवीन पिके हाताशी आलेली असल्यामुळे धनधान्याने कोठारे भरले असतात. त्यामुळे शेतकरी खुश असतो. शरद पौर्णिमेच्या चांदण्यात कोजागिरी साजरी करताना गुलाबी थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात होते.

दिवाळीत लाडू, चिवडा, चकली, कडबोळी, करंज्या असा फराळांचा मेवा खायला मिळतो. पहाटे लवकर उठून अंगाला चंदन उटणे लावून गरमागरम पाण्याने अभ्यंगस्नान करणे, नवीन कपडे घालून फटाके फोडणे याची मजा काही औरच! सभोवार फुलांना बहर आलेला असतो. त्यामुळे दिवाळीत घरांदारांना फुलांची तोरणे अडकवली जातात. देवळांना फुलांसोबत विद्युत रोषणाई केली जाते. देवांना सुगंधी फुलांच्या माळा घालून सजवले जाते. सर्वत्र पवित्र वातावरण असते. दारात रांगोळ्या काढून पणत्या, आकाशदिवे लावले जातात. विविध देवदेवतांच्या पूजाअर्चा केल्या जातात. सायंकाळी आरत्या म्हणून सणांचे पावित्र्य जपले जाते. मुले मातीचा किल्ला तयार करून त्यावर मातीची खेळणी ठेवतात. त्यावर धान्य पेरतात. काही दिवसांनी त्या किल्ल्यावर अंकुर उगवले की हिरवागार दिसू लागतो. दिवाळीच्या भाऊबीजेच्या दिवशी भाऊ बहिणी एकमेकांकडे जाऊन नात्यांचे रेशमी बंध जपतात. एकमेकाला शुभेच्छा आणि फराळ देऊन एकोपा टिकवून ठेवतात. थंडीत सहल, पिकनिक काढल्यामुळे पर्यटनाला खूप जोर आलेल्या दिसतो. थोडक्यात 'खाओ, पिओ, ऐश करो' असा हा थंडीचा महिना लहान थोर सर्वांनाच फार आवडतो. थंडीत दम्याच्या लोकांना मात्र विशेष काळजी घ्यावी लागते.

दिवाळीच्या सुट्टीत शाळांना सुट्ट्या असल्यामुळे मुले उशिरा उठतात. थंडीच्या काळात मैदानावर खेळायला बहर आलेला असतो. मुले निरनिराळे खेळ खेळून शरीराचे आरोग्य राखतात. खेळून भूक चांगली लागते त्यामुळे जेवणही भरपूर खाल्ले जाते.

**आवडतो सर्वांना हवासा**
**थंडीचा मस्त हा ऋतुमास**
**बदाम काजूपिस्त्यांचा मेवा**
**बनवू आरोग्यासाठी खास**

❖




## अलक

**''माझा इंपोर्टेड गॉगल कशी काय विसरली तू? आता काय फायदा? एवढा गढ चढून आले, मला महाराजांपुढे ऐटीत गॉगल घालून फोटो काढायचा होता ना यार''**

– प्रविण जगन्नाथ बोपुलकर

**कण कण उजळतो**
**लक्ष दिव्यांची आरास**
**मांगल्याच्या पणतीला**
**लाभे प्रकाशाचा श्वास**

– रंजना कराळे



# लढाई

लेखक

**नितेश राऊत**

अमरावती

मगनराम गावाच्या शेवटच्या कोपऱ्यात एका झोपडीत एकटाच राहायचा. साठपासष्टच्या आसपास वय, काटक शरीरयष्टी आणी प्रामाणिक स्वभाव. मूलबाळ नसलेला मगनराम पत्नी वारल्यापासुन एकटा झाला होता. मेळघाटच्या जंगलात अख्खा जन्म गेलेला.

आताशा मगनरामला एक नवीन काम लागले होते. वनखात्यातली पुरुषमंडळी रात्रपाळीच्या ड्युटीवर असली की जंगलभागात असलेल्या त्या तीन क्वार्टरची चौकिदारी करायची.

फक्त तीन क्वार्टर आणी आजुबाजूला घनदाट जंगल. कधी रात्री बेरात्री एखादं बिबट, एखादी अस्वल किंवा कोल्हा लांडगे असे हिंस्त्र प्राणी क्वार्टरच्या परिसरात फेरफटका मारुन जायचे.

कंपाऊंडच्या आतमध्ये असलेल्या हनुमान मंदिरात असलेल्या मुर्तीवर कधी कधी ओरखडे दिसायचे. ते ओरखडे म्हणजे वाघाने ओरबाडल्याच्या खुणा असल्याचे जुणे जाणते लोक बोलायचे. मग क्वार्टरमधले बायका लेकरं भयभीत व्हायचे.

मगनराम बद्दल अशी वदंता होती की मगनरामला मंत्रसामर्थ्याने वाघाची दाढ बांधता येते. त्यामुळे मगनरामला क्वार्टरच्या चौकिदारीवर ठेवले की वनखात्याचे कर्मचारी बीनघोर रात्रपाळीच्या पेट्रोलिंगला नीघुन जायचे.

एखाद्या क्वार्टरच्या व्हरांड्यात उघड्यावरच मगनरामची खाट असायची. मगनरामला आपल्या आजुबाजुला येऊन जाणाऱ्या हिंसक प्राण्यांची अजिबात भीती नसायची. मगनराम असला की तिन्ही क्वार्टर मधले बायकापोरे निर्धास्तपणे झोपी जायची.

चिलमीत एकदा तंबाखु ठासुन भरला की धुआरी मारत आजुबाजुच्या परिसरात तीनचार वेळ मगनराम हातातल्या कुऱ्हाडीचा दांडा आपटत चक्कर मारायचा. पहाटे पहाटे कधीतरी झोपायचा. मगनरामचा क्वार्टरमधल्या कुटुंबांना मोठा आधार वाटायचा.

मृग नक्षत्रातल्या एक दोन सरी नुकत्याच पडुन गेल्या होत्या. जंगलावर हिरवा गलीचा दाट होण्याची सुरुवात झाली होती. यावेळी जंगलात लवकरच अंधार पडायचा. रात्रीच्या वेळी पावसाची भुरभुर चालु असली तरी रातकिडे आणी बेडकांचा किर्राट चालुच असायचा. क्वार्टरमधल्या तीन्ही कुटुंबातल्या पुरुषांची पेट्रोलींगची रात्रपाळी असल्यामुळे आज गावातुन मगनराम चौकिदारीवर आला होता. पावसाची रीप रीप चालु असल्यामुळे आज मगनरामने हनुमान मंदिराच्या समोरच्या छपरीत आपली खाट टाकली . एका घरातुन आलेल्या ताटात खाटेवर बसल्या बसल्याच जेवण करुन मगनरामने चीलिम भरली होती.

चिलमितल्या तंबाखुचे दोन दम मारल्यावर मगनरामने आजुबाजुच्या परिसराकडे नजर फिरवली. काळ्याअंधाऱ्या परिसरात सुरु असलेल्या पावसाने छोटे छोटे विटकरी ओहोळ तयार झाले होते. काळ्याशार अंधारलेल्या धरतीवर थोडासा प्रकाश परावर्तीत होऊन ओहोळांच्या सोनेरी रेषा चमकायच्या. तेवढ्या पावसातही उंचच उंच असलेले साग, कडुनींब, निलगिरीची झाडे एखाद्या तपस्व्याप्रमाणे डोलत उभी होती. एखादी हवेची वेगवान झुळुक सळकन यायची आणी त्या हीरव्यागार तपस्व्यांची तपस्या भंग करायचा प्रयत्न करायची. त्या पावसाचे थोडेसे भयकारी रुप पाहात पाहातच मगनरामचा डोळा लागला.

अर्ध्या रात्री कसल्या तरी खसपस आवाजाने मगनरामला जाग आली. मगनरामने डोळे उघडुन कुट्ट अंधाराकडे पाहिले. काळ्याकुट्ट अंधाराशीवाय मगनरामला काहिच दिसले नाही. क्षण दोन क्षणात डोळे अंधाराचे अभ्यस्त होताच मगनरामला चांगली जाडजुड अशी काळी आकृती हलतांना दिसली. ही आकृती नसुन एक भलेमोठे अस्वल असल्याचे अनुभवी मगनरामच्या लगेच लक्षात आले. न घाबरता मगनरामने हातात कुऱ्हाड घेतली आणी ओठातल्या ओठात कसलेतरी मंत्र पुटपुटत छपरीतुन बाहेर निघाला. बापदाद्यांपासुन पासुन वारश्यात मिळालेल्या मंत्रशक्तीमुळे मगनरामला भीती हा प्रकार माहित नव्हता. समोर उभ्या असलेल्या दैत्याकारी अस्वलाच्या अंधारात चमकणाऱ्या डोळ्यात डोळे रोवुन मगनराम उभा ठाकला.

हा कोण यत्किंचित प्राणी मला आव्हान देतोय असा विचार अस्वलाच्या मनात चमकुन गेला असावा. चपळाईने अस्वलाने मगनरामवर धाव घेतली. पंजाचा एक फटकारा मगनरामच्या शरीराच्या दिशेने फीरवला. मगनरामने विजेच्या वेगाने अस्वलाचा वार चुकवला तसे अस्वलाचे समोरचे दोन्ही पंजे चिखलात आदळले.

लढाईला तोंड फुटले होते. अस्वलाने नुकत्याच आखलेल्या सीमारेषेत अनावधानाने मगनरामचा मुक्काम होता. अस्वलाच्या सल्तनतीत मगनरामची घुसखोरी ते जनावर सहन करायला तयार नव्हतं.

तर पीढ्यानपीढ्या असलेल्या मंत्रसामर्थ्याला आव्हान देणारे अस्वल मगनरामसाठी कल्पनातीत होते. लढाई तर होणारच होती.

मगनरामने मंत्र पुटपुटत कुऱ्हाड सरसावली, केसांनी आच्छादलेल्या अस्वलाच्या पाठीवर दणणदिशी कुऱ्हाडीचा दणका बसला. व्रुद्ध असला तरी काटक शरीरयष्टीचा मगनराम ताकतवान होता. कुऱ्हाडीचा दणका पाठीवरच्या मणक्यावर बसल्याने अस्वल कळवळले आणी दूर पळाले.

हा घुसखोर दिसतो तेवढा कमजोर नाही हे अस्वलाच्या लक्षात आले होते.

आता अस्वल पुढे पळुन जातांना अचानक थांबले, मागच्या दोन पायावर गिरकी घेत गोल फीरले आणी मगनरामच्या दिशेने धावत येऊन मगनरामला जोरदार धडक दिली. गाफील मगनराम अस्वलाच्या धडकेने रप्पकन चिखलात कोसळला. अस्वल मगनरामच्या छातीवर चढुन त्याच्या नरडीला जबड्यात पकडायचा प्रयत्न करु लागले. मगनरामचे दोन मजबुत हात अडसर बनुन प्रतिकार करु लागले. मगनरामच्या दोन्ही खांद्यामध्ये अस्वलाची नखे घुसून रक्ताची चिळकांडी उडुन चिखलात मीसळायला लागली.

मगनराचा मंत्रोच्चार सुरुच होता. मंत्रोच्चाराच्या विश्वासाने जणु मगनराममध्ये अफाट शक्ती संचारली होती. आजुबाजुची उंचच उंच झाडे आता स्तब्ध होऊन ही लढाई पाहात होते.

मगनरामसाठी ही लढाई आता जीव वाचवायची लढाई नव्हती तर

अस्तीत्वाची लढाई होती. वर्षानवर्षापासुन ज्या मंत्रसामर्थ्यावर गावकऱ्यांनी विश्वास ठेवला होता तो वीश्वास टीकवुन ठेवण्याची लढाई होती.. मरणाला मगनराम घाबरत नव्हता, पण ही आस्थेची लढाई होती. ही लढाई एका कमजोर पण मानसिकदृष्ट्या शक्तीशाली माणुस आणी अफाट ताकतीचा एक जंगली प्राणी यांच्यामधली होती..

या झटापटीत मघाशी बाजुला पडलेली कुऱ्हाड मगनरामच्या हाती लागली...'' जय भुमकाबाबा'' अशी गर्जना करुन मगनरामने अस्वलाच्या मस्तकात हातातल्या कुऱ्हाडीचा दणका मारला. घाव वर्मी बसला. अस्वल एका झटक्यात बाजुला झाले... फीरुन जंगलाकडे पळायला लागले, अस्वलाच्या नाका कानातुन रक्ताची धार सुरु झाली. फर्लांगभर पळाल्यावर अस्वल खाली कोसळले.. दोन चार आचके देऊन गतप्राण झाले.

विजयी योद्ध्याप्रमाणे हातात कुऱ्हाड घेऊन मगनराम अस्वलाच्या धुडाजवळ पोचला. अस्वलाची हालचाल बंद पडली होती. मगनरामचे मंत्र पुटपुटणे सुरुच होते. त्याने स्वत:च्या शरीराकडे पाहिले, तो रक्ताने न्हाऊन निघाला होता. पण मगनरामला या गोष्टीची पर्वा नव्हती, संपुर्ण गावाने ज्या मंत्रशक्तिवर आयुष्यभर वीश्वास ठेवला ती वाया गेली नाही याचे समाधान मगनरामच्या चेहऱ्यावर दिसत होते. रक्तस्त्राव सुरुच होता. ग्लानी येऊन मगनराम मटकन खाली बसला, अस्वलाच्या धुडाला टेकुनच...

हळु हळु मगनरामची शुद्ध हरपायला लागली. एक आगळे समाधान घेऊन असलेले सतेज डोळे हळुहळु निस्तेज होता होता एका क्षणी कायमचे विझले .. ❖





# आकाश कंदील

लेखिका
**डॉ. शैलजा करोडे**
नेरुळ नवी मुंबई

''अरे अण्णा, अजून उंच घे काठी आणि चांगली मजबूत बांध ''

'' आता ठीक आहे काय ?''

'' थोडी, थोडी तिरकी कर''

'' आता बरोबर आहे काय''

'' अं, हो , हो बरोबर आहे ''

'' आता, आता दोरीच्या सहाय्याने आकाशकंदील वर चढव. आपण झेंडा वर चढवतो तसं ''

'' अरे व्वा. गेला आकाशकंदील वर, आता ही दोरी त्या काठीजवळच्या वळचणीला घट्ट बांधून ठेव. वारा आला तरी आकाशकंदील खाली पडणार नाही.''

अण्णा, माझा भाऊ खाली उतरला. आकाशकंदीलात वीजेच्या दिव्याचा प्रकाश पडताच कंदील उजळला. कंदील रंगबिरंगी कागदांचाच घरी तयार केलेला होता. माझ्या दुसर्या भावाचे ड्राइंग खूप चांगले होते. तोच कंदीलावरील चित्रे काढायचा .

कंदीलाच्या चारी बाजुला चार देवतांची चित्रे. लक्ष्मी, सरस्वती, गणपती, अंबाई. वीजेच्या दिव्याच्या प्रकाशात या देवतांची चित्रे उजळती. रंगबिरंगी कागदांनी ती चित्रे अधिकच नयनरम्य वाटत होती. मी भक्तीभावे नमस्कार केला.

'' बाबा, आकाशकंदील का लावतात दिवाळीत? आणि तो ही असा उंचावर का लावतात ?''

'' बेटा, दिवाळी हा प्रकाशपर्वाचा सण, घरात, दाराशी , अंगणात आणि मंदिरातही हजारो दिवे, पणत्या लावून आपण हे प्रकाशपर्व साजरे करतो. आपले पुर्वजही हा सोहळा आकाशातून पाहात असतात अशी भावना आहे. त्यांनाही आकाशात उजेड मिळावा. त्यांच्या स्मृति आमच्या मनात आहेत. त्यांनीही या सणात सामील होऊन आम्हांला वरुन आशीर्वाद द्यावेत म्हणून ''आकाशकंदील'' लावला जातो .तसेच आपले सगळ्या देवी देवतांचे स्थान स्वर्गात म्हणजेच आकाशात आपण मानतो . म्हणून त्यांचीही ही पूजाच असते .

माझं बालमन , त्यातलं मला काही फारसं कळालंही नाही. पण आकाशकंदीलाची रोषणाई मला फार आवडायची .

माझे बाबा प्राथमिक शिक्षक, आम्ही चार भावंडे दोन बहिणी, दोघे भाऊ, आजी आजोबा. बाबांचा पगार कुटुंबाच्या गरजा भागवतांना फार कमी पडायचा. आई शिवणकाम करायची, माझा मोठा भाऊ शाळा करुन सायंकाळी चणे , मटकी विकायचा. दिवाळी सणाला आम्ही आकाशकंदील करुन विकायचो. जवळ जवळ एक महिना आधीपासून आम्ही कंदील बनवायला सुरूवात करायचो. पंधरा दिवस आमची दुकान लागायची बाजारात. दुकान म्हणजे पलंग ठेवून बाजूला खुर्ची , स्टुल ठेवत असू. पलंगालाच थोडेसे लाकडी काड्यांचे स्टँड बांधून त्याला आकाशकंदील

अडकवलेले राहात.

पंधरा दिवस मस्त विक्री होऊन बराच नफा राहायचा व आम्हां भावंडाचा वह्या, पुस्तके, गणवेश, शालेय साहित्यासाठी पैशांची साठवण होत असे, शिवाय घरखर्चालाही मदत होत असे.

माझे लग्न झाले, परक्याचे धन असलेली मी परक्या घरी म्हणजेच सासरी आले. हळूहळू सासर घरी रमले. माझा मनमिळावू स्वभाव असल्याने सासरीही मी आनंदीच राहिले. माहेरी अनुभवलेले आकाशकंदीलाचे ज्ञान वापरून मी सासरीही आकाशकंदील घरीच बनवायचे.''अग वहिनी, तू किती छान आकाशकंदील बनवतेस. माझ्यासाठीही बनव बाई'' माझ्या नणंदेचा प्रेमळ आग्रह असायचा. नात्यातील इतर मंडळीही आकाशकंदीलासाठी आग्रह करीत. मलाही आवड असल्याने कामाच्या व्यस्ततेतही वेळात वेळ काढून मी आकाशकंदील बनवून द्यायची .

'' राणी सरकार, खूप छान आकाशकंदील बनवतात तुम्ही, या प्रकाशपर्वाला मस्त उजळून टाकता तुम्ही. काय भेट देवू तुम्हांला असं म्हणत माझे पती साडीचा बॉक्स माझ्या हाती ठेवत. आणि होय, ही साडी ठेवून नका देवू. काढा वापरायला.'' मी ही ह्यांचा आग्रह कधीच मोडला नाही. नवीन साडीतच लक्ष्मीपूजन व्हायचं. ''निलिमा खूप सुंदर दिसतेस तू. आकाशाशी नातं सांगणाऱ्या आकाशकंदीलाची कला तुला अवगत, नावही तुझं निलिमा. शांत, संयमी, माझं जीवन उजळणारी सखी लाभली, मी केवढा भाग्यवान,''

'' चला, काहीतरीच काय, इश्श '' ''अरे बापरे, काय लाजलीस, आकाशतील चंद्र तारकाही फिक्या आहेत या रूप सौंदर्यापुढे '' '' पुरे ना, किती कौतुक, मुले मोठी होत आहेत आपली आता ''.

आकाशकंदीलाचं आणि माझं नातं असं जीवाभावाचं व सौख्याचं होतं. माझा हा गुण माझ्या दोन्ही पाखरांमध्येही उतरला होता. असा आनंदानं माझं घरकुल नहात असताना क्रूर नियतीनं डाव साधला. माझ्याच संसाराला जणू माझी दृष्ट लागल्यासारखं झालं. कोरोनाच्या विळख्यात माझे पती ''विशाल'' अडकले. माझी पायाखालची जमीनच जणू सरकली. विशालला हॉस्पिटलला अँडमीट केले. सर्वतोपरी औषधोपचार सुरू होते. रोज पंधरा लिटर ऑक्सिजन लागत होता. औषधे, इंजेक्शने सुरू होती. आठ दिवसांनी त्यांना बरेही वाटू लागले खउउण तून बाहेरही आले. दोन दिवसांनी दवाखान्यातून सुटीही मिळणार होती. पण पुन्हा फुफ्फुसातील इन्फेक्शन वाढले. प्राणवायू सपोर्ट पुन्हा सुरू झाला. रक्तदाब कमी होऊ लागला. आणि पंधरा दिवसांपासुन चाललेली मृत्यूशी ही झुंज थंडावली. मला काहीच कळेनासे झाले. साऱ्या संवेदनाचं गोठलेल्या. कोरोना काळ असल्याने कोणी नात्यातील मंडळीही आली नाही. माझी दोन्ही पिल्लं दुर्मुखली. ''आई, काय झालं बाबांना? का रडतेस? माझी छोटी शलाका माझ्या कुशीत शिरली, तशी मी भानावर आले. यांचे ऑफिसचे दोन मित्रांची मदत व काही हॉस्पिटलच्या मदत, ॲम्ब्युलन्सने मी यांची अंतेष्टी केली.

''वहिनी, सावरा स्वतःला. तुमचं दुःख फार मोठं आहे. पण मुलांसाठी तुम्हांला आता दुःख मागे ठेवून सावरायला हवं.

आजारपणात सगळी शिल्लकही संपली होती. ''काय करावं, मोठा प्रश्न होता. एका खाजगी शाळेत मला संस्कारवर्ग चालवायची परवानगी मिळाली. पगार तुटपुंजा होता, पण माझ्या पुढे दुसरा मार्गही नव्हता. आईकडून मला शिवणकामाचं तंत्र मिळालचं होतं. ते ही आता कामी येऊ लागलं. दिवाळी जवळ येऊ लागली होती. आकाशकंदील मी बनवायला घेतले. माझी पाखरं समीर व शलाकाही मला मदत करू लागली. माझा समीर तर कॉलनीत जावून जावून आकाश कंदील विकू लागला. सायंकाळ झाली होती. मी दिवेही उजळले. पण अजून समीर आला नव्हता. माझे छातीतील धडधड वाढली. कोठे असेल माझं बाळ? कां उशीर लागला असेल? सुखरूप तर असेल ना? वैरी ना चिंती ते माझं मन चिंतू लागलं.

शलाका, मी समीरला शोधायला जाते बेटा. तू घरातून कोठेच जाऊ नकोस, आलेच मी. म्हणत मी पायात चपला अडकविल्या व निघाले. तशी कंपाऊंडचे गेट उघडून समीर आत आला.

'' समीर किती हा उशीर, किती वाट पाहायची मी.''

'' सॉरी मम्मी, पण आज सगळे आकाशकंदिल विकूनच घरी जायचं ठरवलं होतं.'' '' अरे, दिवेलागणी झाली, माझा जीव खालीवर होत होता तुझ्यासाठी.''

'' होय मम्मी, मी तुझ्यासाठी साडी घ्यायला गेलो होतो.'' ''आणि साडी कशासाठी रे'' ''मम्मी दरवर्षी बाबा तुला दिवाळीत नवीन साडी आणायचे. यावर्षी बाबा नाहीत. म्हणून मी आणली साडी'' म्हणत समीरनं साडी मला दिली. क्षणभर ''विशाल''च माझ्यासमोर असल्याचा भास झाला. मी समीरला छातीशी कवटाळले. चल बाळ, हातपाय धुवून शुचिर्भूत हो आणि लक्ष्मीपूजन कर. आकाशकंदीलाकडे व आकाशाकडे माझे लक्ष गेले, जणू विशालचं आम्हांला आशीर्वाद देत होते.



# पारिजात

लेखिका
**मनिषा राजन कडव**
कल्याण पश्चिम

सुन्न मनाने तिने फोन ठेवला. समोरच्या टेबलवर ठेवलेला चहा केव्हाच थंड झाला होता, त्याखालचा सकाळचा पेपर फडफडत होता पण तिला काही सुचत नव्हतं. हुंदकाही येत नव्हता. आतून थिजल्या सारखी ती गोठून गेली होती. अण्णा जाणार हे निश्चितच होतं. त्यांचं वयही झालं होतं. होणार हे माहीत असलं तरी प्रत्यक्षात झाल्यावर गोष्ट मनाला चटका लावून जाते. गायत्रीचही तसंच झालं. अण्णांच्या मागोमाग तिच्या मनात विचार आला माईचा. माई कशी असेल? सावरली असेल का? तिने चटकन माईला फोन लावला. पण कोणी फोन उचललाच नाही.

माईशी बोलल्यालासुद्धा आता बरेच महिने होऊन गेले होते. दिवाळीत केला होता का शेवटचा फोन, आणि मध्ये एकदा अण्णांच्या तब्बेतीची चौकशी करायला केला होता ना? ती आठवू लागली. गेल्या दीड वर्षात तिच्या स्वतःच्याच आयुष्याची घडी इतकी विस्कटली होती की ती पुन्हा बसवताना या साऱ्या गोष्टी राहूनच गेल्या होत्या. त्यात माई, अण्णा हे हक्क गाजावणार्यान्पैकीही नव्हते की रुसवे फुगवे धरणार्यान्पैकी. आणि मुंबईला आईबाबांना फोन केला की त्यांची खुशाली कळतच होती की! आता मात्र नुसता फोन नाही तर माईला भेटायलाच जायचं असा तिने निश्चय केला.

आज रात्रीच अमितशी बोलून तिकिटं बुक करूया असा विचार पक्का केला केला तव्हा कुठे गायत्रीला जरा बरं वाटलं. तिची नजर घडाळ्याकडे गेली. सौम्याला नर्सरीतून आणायची वेळ झाली होती. म्हणजे आजसुद्धा योगा राहीलाच की. काल रात्रीच अमित हसत हसत तिला म्हणाला होता, योगाबिगा करत जा मॅडम, वजन वाढतंय तुमचं! त्याच्या त्या हसत हसत मारलेल्या शेर्यामुळेसुद्धा ती दुखावली गेली होती. मुंबईत योगा इन्स्ट्रक्टर म्हणून तिचा बिझनेस

नावारूपाला येत होता. रेग्युलर क्लासेस, ट्युशन्स, एखाद दोन सेलिब्रिटी क्लायन्ट्स असा तिचा जम बसू लागला होता. तिचे आईवडील जवळच रहात असल्यामुळे सौम्याचीही व्यवस्थित काळजी घेतली जात होती. पण दीड वर्षापूर्वी अचानक अमितला ही मोठी संधी चालून आली. त्याची कंपनी कार्नाटक मध्ये बिझनेस वाढवण्याचा प्रयत्न करत होती. तिथल्या ऑफिसमधे त्याने जावं आणि ते काम बघावं अशी त्याला वरून सूचना आली.

बँगलोर वगैरे ठीक होतं रे, पण हे नल्लूर अगदी कुठच्या कुठे आडगाव आहे! गायत्री नाखुषीने म्हणाली, सौम्याचं काय? तिची शाळा?

अगं आपल्याला काही तिकडे कायमचं नाही रहायचंय. दोन वर्षांचाच प्रश्न आहे. सौम्या तर लहानच आहे अजून.

ते खरय रे पण मला माझे क्लासेस बंद करावे लागतील

आय नो..... पण तू तिथेसुद्धा पुन्हा सुरु करू शकतेस ना? आणि बघ ना मी मिडल मॅनेजमेंटवरून हायर मॅनेजमेंटच्या ब्रॅकेटमधे जातोय. फक्त माझ्या करीअरच्याच नाही तर पैशांच्या दृष्टीनेसुद्धा आपल्याला किती चांगलं आहे! अमितचं म्हणणं खरं होतं. पैशांच्या दृष्टीने चांगलं होतं यात काहीच वाद नव्हता.

नाहीतर असं करायचं का? तू जा, मी आणि सौम्या दर महिन्याला येऊन तुला भेटत जाऊ किंवा तू अधून मधून येत जा इथे तिने सुचवून पाहिलं. चल्, तुला आणि सौम्याला सोडून नाही जाणार मी. जायचं तर एकत्र, नाहीतर मी नाही म्हणून कळवून टाकतो. अमितच्या या म्हणण्यावर गायत्री वरवर वैतागली तरी मनातून खरतर ती सुखावली होती. नकार कळवणं शक्य असलं तरी प्रायव्हेट कंपन्यांमधे असे नकार पचवले जात नाहीत याची अमित आणि गायत्रीलासुद्धा पूर्ण कल्पना होती.

हो ना करत तिघे या नवीन गावी आले. गायत्रीला वाटलं होतं त्यापेक्षा सौम्या नल्लूरला फारच चटकन रुळली. अमितसुद्धा कामामुळे बिझी झाला. राहिली गायत्री. घर शोधा, शाळा शोधा, बाजारहाट, दुकानं शोधा यात सुरुवातीचे काही महिने पटकन गेले. त्यांच्या या नव्या घराच्या आसपास रहाणारे सगळे लोक कन्नडच होते. स्थानिक भाषा समजावी, बोलता यावी म्हणून गायत्रीने पुस्तकं आणून कन्नड भाषा शिकायला सुरुवात केली. कामापुरते शब्द यायला लागले असले तरी संवाद करण्याएवढी कन्नड भाषा तिला अजून बोलता येत नव्हती. सौम्या मात्र मित्र मैत्रिणींबरोबर कन्नडात सहज बोलत होती. लहान मुलांना 'माझं चुकलं तर' अशी धास्ती फारशी नसते त्यामुळे बर्याच गोष्टी लहान मुलं मोठ्यांपेक्षा पटकन शिकतात. सौम्याचही काहीसं तसच होतं. चटचट तयारी करून गायत्री सौम्याच्या नर्सरीत गेली. मायलेकी चालत चालत घरी पोहचल्या. गायत्रीचं हे घर अगदी ऐसपैस, प्रशस्त होतं. समोर मोठ्ठा व्हरांडा, अंगण. अंगणात गायत्रीने हौसेने दरवाज्याजवळ लावलेला फुलांचा ताटवा छानच बहरला होता. एका बाजूला तिने भाज्यांचा छोटासा वाफाही केला होता. त्यात कढीपत्ता, कोथिंबीर, मेथी असे तिचे प्रयोग चालत.

आई, मृणालिनीने आज वर्गात एक गाणं म्हणून दाखवलं. ती म्युझिक क्लासला जाते तिथे शिकवलं. चारुकेशी सुद्धा जाते. मलासुद्धा त्या क्लासला जायचय सौम्या सांगत होती. अगं, त्या कर्नाटकी म्युझिक शिकतात. आपण काही इथे कायम रहाणार नाही. मग तू पुढे कसं कंटिन्यू करणार? काय उपयोग त्याचा? आईचं म्हणणं सौम्याला काही फारसं पटलं नाही. पण आत्ता तर आपण इथे आहोत ना! मला जायचचे तिने हट्टाने म्हटलं. बरं बघू. बाबाशी बोलूया मग ठरवू. तिने तेवढ्यापुरता विषय टाळला पण ते विचार तिच्या मनात रेंगाळत राहिले. सौम्यासारखं आपल्यालाही सगळे बदल पटपट स्वीकारता आले असते तर किती बरं झालं असतं. आपणही मुंबई सारखा योगा क्लास इथे सुरु करायचा का.... पण भाषेची केवढी अडचण आहे...... इतके चांगले क्लासेस चालू होते आपले.... कशाला आपण अमितला हो म्हटलं इथे यायला. त्याचं ठीक आहे पण माझी ही दोन वर्षं वायाच आहेत ना! नाही म्हणायला इतक्या वर्षांनी थोडी उसंत मिळाली. थोडी पुस्तकं वाचली, थोडं पेंटिंग केलं, हा बगीचा फुलवला ....... मग मी नक्की मिस काय करतेय? माझा योगा क्लास? पैसे? स्वतःची ओळख? ...... नुसते प्रश्न, अनुत्तरित

प्रश्न ...... मनातल्या या द्वंद्वामुळे गायत्री कोमेजत चालली होती. अमितच्या नजरेतून हे सुटलं नव्हतं. पण त्याचाही नाईलाज होता.

समोरच्या अय्यन्गारांची गाडी येताना दिसली म्हणजे सहा वाजले असणार. गायत्री घाईघाईने स्वयपाकाला लागली. त्या रात्री तिने अमितला अण्णा, तिचे आजोबा गेल्याचं सांगितलं, आणि माईला भेटण्याची तिची इच्छासुद्धा. कधी नव्हे ती अमितलाही सुट्टी मिळाली आणि दोन दिवसांतच ते तिघेही निघाले, आधी मुंबई आणि मग ते थेट कसालला तिच्या माहेरच्या गावी, माईला भेटायला गेले.

कसालचं ते कौलारू घर अजून अगदी तसंच होतं. अंगणात तुळशी वृन्दावन, ओसरी, गप्पा मारत, गोष्टी ऐकत बसायला अंथरलेली ओसरीतली चटई, मोठी पडवी, पडवीतला लाकडी झोपाळा. आतलं माजघर, तिथले दिवे ठेवण्यासाठी भिंतींत असलेले कोनाडे, माजघराच्या वरचं ते काचेचं कौल आणि त्यातून थेट आत येणारा सूर्यप्रकाश. माजघराच्या एका बाजूला असलेली मोठी देवाची खोली. त्या खोलीतला तो उदाबत्तीचा मंद सुगंध, समईचा मिणमिणता प्रकाश आणि शारंगधराच्या मूर्तीपुढे शांतपणे डोळे मिटून समाधीसारखी बसलेली माई......

बाकी सगळे बाहेरच थांबले आणि गायत्री एकटीच देवघरात माईजवळ गेली. माईच्या खांद्याला तिने हलकासा स्पर्श केला. माईने डोळे उघडून पाहिलं. गायत्रीने तिने वाकून नमस्कार केला आणि मग घट्ट मिठी मारली. तीही काही म्हणाली नाही आणि हिनेही सांत्वन केलं नाही. अश्रूंच्या संवादात शब्द मुके झाले.

चार दिवस माई बरोबर काढून आता परत जायची वेळ आली. आजची कासालची शेवटची रात्र. उद्या मुंबई आणि दोन दिवसांत पुन्हा नल्लूर. अमित बाहेर पडवीत झोपला होता. सौम्या आणि गायत्री आत खोलीत. रात्री सगळी निरवानिरव झाल्यावर माई गायत्रीच्या खोलीत आली. ये, आज तुझ्या डोक्याला तेल लाऊन देते. तिने प्रेमाने म्हटलं. अगं माई आता काही माझे केस लांब नाहीयेत पूर्वीसारखे. गायत्रीने म्हटलं. नसूदे गं, डोक्याला थंड वाटतं म्हणत माईने बोटानी गायत्रीच्या डोक्यावर तेल चोळायला सुरुवात केली. ते ऊनऊन खोबरेल तेल आणि माईचा तो प्रेमळ स्पर्श, आजीच्या कुशीत गायत्री पुन्हा लहान होऊन गेली. कसं चाललंय तुझे नव्या जागी? क्लासेस कसे चालेयेत तुझे? माईने विचारलं. काही बोलायच्या ऐवजी गायत्री हुंदकेच देऊ लागली. अगं काय झालं? जावईबापू नीट वागतात ना? माईने काळजीने विचारलं. हो गं, अमितचं काही नाही. मलाच काही करता येत नाहीये. मुंबईत व्यवस्थित क्लासेस होते माझे पण नल्लूरला काही नाही. तिथे सगळे कानडी, मी कशी बोलणार, कशी शिकवणार आणि अशा गावी शिकायला येणार तरी कोण! काही न करावं तर इतकं गिल्टी वाटतं की काय करत्येय मी आणि तिथे न जावं तर अमितच्या करीअरचं नुकसान होतं. अगदी कात्रीत सापडल्यासारखं वाटतं. असं वाटतं शेवटी माझी ओळख तरी काय आहे? गायत्रीने एका दमात मनातलं सगळं सांगितलं. माईने प्रेमाने तिच्या डोक्यावर थोपटलं. ती म्हणाली अगं, संसार म्हटला की थोडंफार इकडे तिकडे होणारच. थोड्या वर्षानी मागे वळून पहाशील तेव्हा तुला स्वतःलाच समाधान वाटेल की तू काही करायचं ठेवलं नाहीस. आणि हे सगळं काही कायम असंच रहाणार नाही. ती गोष्ट आठवते तुला गायत्री, चार आंधळे हातांनी हत्तीला चाचपून बघतात. सोंड धरणारा म्हणतो ही नळी आहे, कानवाला म्हणतो हे सूप आहे, पाय धरणारा म्हणतो हा खांब आहे, आणि शेपूट धरणारा म्हणतो ही तर दोरी आहे. माणसाच्या आयुष्याचंही तेच आहे ग. तू कोणाची मुलगी आहेस, कोणाची बायको, कोणाची आई, एक योगाभ्यास शिकवणारी शिक्षिकाही आहेस. पण ही सारी तुझी अंग आहेत. तू, तू अशी जी आहेस ती या सर्वांच्या पलीकडेसुद्धा आहेसच. खरी गोष्ट अशी आहे की हत्तीला स्वतःला खात्री हवी की तो हत्ती आहे. आंधळे म्हणतात म्हणून जर हत्ती स्वतःला नळी, खांब, सूप, दोरी असं काही समजू लागला तर काय होईल सांग! तू कोण आहेस ते लोकांच्या पारड्यात तोलू नकोस बाळा.... तुझं तू शोध. स्वान्तः सुखाय, स्वतःसाठी शोध. आणि असा शोध घेशील ना, तेव्हा खरच सांगते, तुला तुझी ओळख नक्की सापडेल, अगदी १०८ टक्के. माईच्या शब्दांनी गायत्रीचं मन शांत झालं. लहान

मुलीसारखं माईच्या मांडीत डोकं ठेऊन तिने माईचा हात पुन्हा आपल्या डोक्यावर ठेवला, तिने थोपटावं म्हणून. माई हसून तिला थोपटू लागली. नकळत सवयीने माईने भग्वद्गीतेतले श्लोक पुटपुटायला सुरुवात केली.

**निर्मान मोहा जितसङ्ग दोषा,**
**अध्यात्म नित्या विनिवृत्त कामाः**
**द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःख सञ्ज्ञैर्गच्छन्त**
**मूढाः पदम् अव्ययम् तत**

झोप आणि जागृतीच्या सीमारेषेवर असलेल्या गायत्रीला अण्णाच आपल्या धीरगंभीर आवाजात श्लोकाचा अर्थ सांगतायत असं वाटू लागलं, निराभिमानी, निर्मोही, कुसंगातीपासून मुक्त असा जो, ते शाश्वत तत्त्व जाणतो, जो इच्छांचा त्याग करतो, आपपर द्वैताच्या, सुखदुःखाच्या पार आणि मोहरहित असा जो असतो, तोच ते शाश्वत स्थान प्राप्त करतो

दुसऱ्या दिवशी सकाळीच मंडळी मुंबईला परत निघणार होती. सामान गाडीत ठेवणं वगैरे चालू होतं. अंगणात पारिजातकाचा सडा पडला होता. अंगणातल्या काळ्या मातीवर केशरी देठाची ती नाजुक पांढरी फुलं, जणू चान्दण्यांचा सडा. आई, किती छान आहेत ना! ती फुलं दाखवून सौम्याने गायत्रीला म्हटलं. हो गं, आपल्या नल्लूरच्या घरीसुद्धा आहे पारिजात. अजून लहान आहे, मोठा झाला की त्याचासुद्धा असा सडा पडेल गायत्रीने हसून म्हटलं. पण आपण असणार का तिथे? आपण तर तिथून परत जाणार ना? सौम्याने क्लासची गोष्ट आठवून म्हटलं. तुला आवडत असेल तर राहू की गायत्रीने असं म्हटल्याबरोबर गाडीत बॅग ठेवणाऱ्या अमितने वळून तिच्याकडे पाहिलं. तिचा शांत, समाधानी चेहरासुद्धा त्या बहरलेल्या पारिजातासारखाच त्याला वाटला.

❖

**ऊब दिवाळसणाची**
**सप्तजन्मास पुरते**
**आभा सुखसमृद्धीची**
**आयुष्यात विखुरते**

– रंजना कराळे





# चिरविश्रांती


**लेखिका**

**कल्याणी मादेशवार**

यवतमाळ


आज तिच्या जीवनातला संघर्ष संपला होता.... ती निश्चिंत होऊन पहुडली होती... कुणाचाही विचार न करता... कशाचीही चिंता न करता.....अशी कशी ती निष्ठूर झाली होती...!!

सर्वांनी किती हाका मारल्या तरी ती ऐकायला तयार नव्हती. मुलांचा आक्रोश ऐकूनही आज ती उठायला तयार नव्हती. सारे जगचं जणू तिच्यासाठी परके झाले होते.

तिचं संपूर्ण आयुष्यच कष्टात गेलं होतं.जीवनात आराम म्हणजे काय ? हे तिला माहीतच नव्हतं....

पाटलाच्या घरात तिचा जन्म झाला. मानी स्वभावामुळे तिच्या आजोबांनी पाटीलकी सोडून दिली आणि एका खेड्यात राहायला आले. शेतीवाडी सारे काही सोडून आल्यामुळे खेडेगावात त्यांना वडिलोपार्जित व्यवसाय करावा लागला. तिला धरून चार भावंडे.... जवळ होता तो पैसा संपल्यानंतर त्यांना घरात पैशाची चणचण भासू लागली आणि हिचे शिक्षण चौथीपर्यंत करून आई तिला शेतात घेऊन जाऊ लागली आणि तेव्हापासूनच तिच्या काबाडकष्टाला सुरुवात झाली.

लहान भावंडांना पाहणे, त्यांना खाऊ पिऊ घालने आणि घरचे सारे काही करून कामाला जाणे.... एवढेच तिला माहित होते. वयात येताच बऱ्यापैकी घर पाहून तिचे लग्न झाले. माहेरी लहानपणापासूनच कष्ट करावे लागले आता सासरी तरी आपल्याला सुख मिळेल या अपेक्षेने ती बोहल्यावर चढली. पण सासरी पाहते तर मोठे कुटुंब. इथेही तिचं सर्वात मोठी सून ....आणि तिच्या पेक्षा लहान लहान तीन दीर आणि दोन ननंदा होत्या. इथे आल्यावर तर ती लहान दिरांची,ननंदेची जणू आईच बनली होती. त्यांना जेवण चारण्यापासून तर पाळण्यात घालेपर्यंत सारे काही तिलाच करावे लागायचे.

शिवाय घरातले स्वयंपाक पाणी, डोक्यावरून नदीचे पाणी आणणे, एवढ्यांचे कपडे धुणे .... किती दमछाक व्हायची तिची. इथे तर बोलायची ही सोय नव्हती. गरम स्वभावाच्या पतीमुळे तर ती मनातलं बोलूही शकत नव्हती. काय हवं, काय नको तेवढेच बोलायचे. तक्रारीचा सूर नकोच होता.... मग चूप राहणे आणि राबणे एवढेच तिच्या वाट्याला होते.

पुढे चांगले दिवस येईल या आशेवरचं ती सासरचे दिवस कंठत होती. उकंड्याचीही रया पालटते तशी माझीही बदलेल एक दिवस......!!

पाहता पाहता ती दोन मुलांची आई झाली आणि.... मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून ते तालुक्याला राहायला आलेत. सुटले एकदाचे खटल्यातून असे तिला वाटते. आता आपला संसार आणि आपण.... ती सुखाचे स्वप्न पाहू लागते. मुले शाळेत जाऊ लागली. सारे काही ठीक चालले होते.

अचानक एके दिवशी पतीच्या पोटात दुखू लागले आणि ते आजारी पडले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करायला सांगितले. आता काय करावे या विचारात जवळची जमापुंजी आणि दागिने मोडून ती आपल्या कुंकवाच्या धन्याला वाचविते .......पण आता मुलांच्या शिक्षणाचे काय ? या प्रश्नाने ती कासावीस होते. काहीही झाले तरी मुलांना शिकवायचे आणि त्यासाठी कितीही कष्ट करायची तिची तयारी होती. ती दुसऱ्यांच्या शेतात कामाला जावून मुलांना शिक्षणासाठी पैसा पुरविते. मुलेही जाणीवपूर्वक अभ्यास करून आपले शिक्षण पूर्ण करतात. लवकरच मोठ्या मुलाला चांगल्या पगाराची नोकरी मिळते.

आईला अतिशय आनंद होतो. आता लवकरच आपले सारे कष्ट संपतील आणि सुखाचे दिवस पाहायला मिळेल या आशेने ती भविष्याचे स्वप्न पाहत असते.

......पण नियतीच्या मनात काही वेगळेच असते. अशातच तिच्या पतीला हृदयविकाराचा झटका येतो आणि..... त्यातच ते दगावतात. तिच्यावर तर दुःखाचा डोंगरच कोसळतो. कितीही म्हटले तरी ते तिच्या मुलांचा बाप असतो. एवढेच नाही तर तिचाही आधार असतात ते .......पण आता तिला हातपाय गाळून चालणार नसते. मुलांकडे पाहून आपले दुःख लपवून ती हसतमुखाने सारे काही करत राहते.

मुलांचे लग्नाचे वय झालेले असते. पण मालतीबाईला मुली पाहायला जायचं कामच पडत नाही. मोठा मुलगा कार्यालयातीलच एका नोकरीवाल्या मुलीशी लग्न करतो त्यामुळे नोकरीच्या गावीच तो आपले घर बांधतो आणि तिकडेच राहतो.

आई आणि लहान भाऊ मात्र गावी राहतात. छोटा मोठा व्यवसाय करून त्याचेही ठिक चालले होते. इकडे गावात त्याचेही प्रेमप्रकरण चालू असते. तोही मुलीच्या घरच्या विरोधाला न जुमानता प्रेम विवाह करून आपला संसार थाटतो. आपलेच दात आणि आपलेच ओठ कुणाला काय सांगणार अन् काय बोलणार.

ती सारे काही निमुट पणे पहात असते. आपण मुलांना संस्कार देण्यात कुठे चुकलो तर नाही ना ! असेही तिला वाटून जाते. आता रामनाम जपायचे अन् दिवस काढायचे. एवढेच तिच्या हातात असते.

आज पर्यंत चांगली वागणारी, गोगल गाई सारखी दिसणारी सूनही आता आपली शिंगे दाखवू लागली होती. मुला जवळही तिला काही बोलता येईना आणि मोठ्या मुलाकडे जावे तर दोघेही नोकरीला जातात मग आपण कसे राहावे. मालतीबाईच्या मनाचा नुसता कोंडमारा होत होता.

एके दिवशी शनिवारी मोठा मुलगा आईला घ्यायला येतो ते पाहून आईला अतिशय आनंद होतो. मोठ्या आनंदाने ती मुलाकडे यायला तयार होते. तेव्हा तिला कळते की सुनेला डॉक्टरांनी बेडरेस्ट सांगितली आहे आणि म्हणून मुलगा आपल्याला घ्यायला आला. मदत करणे आपले कर्तव्यच आहे. आपलेच दात अन् आपलेच ओठ.... तो तरी कुठे जाईल? असे बोलून ती तेथे राहू लागली. कधीकधी काम करून ती थकून जायची....

पण मुलगा,'' दमली का ?

आई... म्हणून सुद्धा कधी विचारत नाही.

उलट पत्नीला म्हणतो,'' आई ,खूप छान स्वयंपाक करते. तुला काय हवे तेवढे आईला सांगत जा.''

आज ही भाजी तर उद्या ती भाजी करायला लावून तोही आपले चोचले पुरवून घेत होता. मालतीबाई चार लोकांच करता करता खंगत चालल्या होत्या. पण मुलाला काही लक्षात येत नव्हते. आता घरात नवा जीव जन्माला येईल. आपण आजी होऊ, त्याच्या बोबड्या बोलाने आणि मायेच्या निरागस स्पर्शाने आपल्याला केवढं सुख मिळेल या विचाराने मालतीबाईला आनंद व्हायचा. ती मनोमन सुखावून जायची. अजूनही सुख स्वप्नांची आस तिने सोडली नव्हती.

दिवस भरायला आले होते म्हणून सुनेच्या आईलाही घरी मदतीसाठी आणले होते पण ती पाहुण्यासारखीच राहायची आणि मालतीबाईला तिच्याही हातात चहा द्यावा लागायचा. दिवस भरल्यानंतर सून बाळंत झाली मुलगा झाला. घरात आनंदाचे वारे वाहू लागले. दिवसभर काम करून शिणलेल्या जीवाला रात्री अंथरुणावर अंग टाकल्याबरोबरच झोप लागायची. बारा दिवसानंतर बारसे आटोपले. बाळाला तेल लावण्यापासून ....सारे काही मालतीबाईला करावे लागायचे त्यामुळे मालतीबाईला दिवसभर उसंत कशी मिळत नव्हती.

आतापर्यंतच आयुष्य काबाडकष्टातच गेलं आणि आताही तिला कुठलेही सुख मिळत नव्हते सर्वांसाठी राब राब राबणेच तिच्या नशिबी होतं हेच का ? हेच तिचं आयुष्य होतं का ? घरातलं माणूस, केवळ मायेनं विश्वासाने करणारी एक बाई या व्यतिरिक्त तिला काहीही किंमत नव्हती.

अशातच मालतीबाईची तब्येत बिघडते. आता तिचे कोण करणार? घरात तर बाळंतीण बाई म्हणून..... औषध पाणी देऊन मोठा मुलगा तिला इकडे आणून पोहचून देतो. आजारी आई घरी आलेली पाहून लहान मुलगा भडकतो. आता तुझं कोण करणार ? म्हणून तिच्यावर ओरडतो. असहाय झालेली मालतीबाई चुपचाप आतल्या आत रडत असते. आपल्या जीवनाचा झालेला पाचोळा ती पाहत असते. आपली कुणालाही आता गरज राहिलेली नाही असे वाटून एक मोठा सुस्कारा सोडते.... तशीच छातीत एक मोठी कळ निघते..... आणि..... जागीच मालतीबाई गतप्राण होते. सकाळ झाली आई अजून उठली कशी नाही? अजूनही अंगण झाडले नाही की पाणी सुद्धा टाकलेलं नाही म्हणून तो मोठ्यानेच ओरडतो,

''आई ए आई....'' तरीही आई हो देत नाही म्हणून तो आईला हलवतो तर सर्वांग गार पडलेलं आणि मालतीबाई केव्हाच हे जग सोडून निजधामला निघून गेलेल्या असतात. शेजारीपाजारी पाहायला येतात पण मालतीबाई शांत सुखाची झोप घेत असते आज तिच्या सुखाच्या आड कुणीही येऊ शकणार नसते. ती चिरविशांती घेत शांत पहुडली असते..... कायमची.....!!!

❖

**ध्यान शिबीरातुन परतल्यावर घरात शिरतांना नाश्त्याची थाळी मेजवर न दिसताच तो ओरडला, ''अरे...काही तारतम्य आहे की नाही''.**

---

**त्या गर्दीत केविलवाणा चेहरा करत तिने अंग चोरले मात्र त्याने पुन्हा मुद्दाम धक्का दिलाच....**

---

**अमेय : काका, कृपया या भजनाचा आवाज थोडा कमी कराल का? अभ्यासात व्यत्यय येतोय. काका: अरे देवाच्या भजनाचा कसला व्यत्यय ?**

– प्रविण जगन्नाथ बोपुलकर




लेखिका
**मिरा घोंगे**
कल्याण पश्चिम

**शिशीराची पानगळ**
**चाहूल वसंताची**
**ऋतुबदल होऊनी**
**पालवी नवी वृक्षाची**

शिशीरातील पानगळ म्हणजे शरीराने टाकलेली कात साप जसा कात टाकतो सरडा जसा आपला रंग बदलतो तव्दतच वृक्षांची पाने पिवळी पडून ती गळतात आणि नवीन पालवी फुटते. छोटी छोटी पोपटासारखी पोपटी पानं उगवायला लागली की ऋतु बदलतो. ऋतुगंध वसंताची चाहूल लागते. पळसाच्या पानांच्या जागी केशरी रंगाची फुलं उमलायची सुरुवात !! जस सूर्यानी केशरी रंग पिचकारीत भरून शुष्क झालेल्या पळसाला ताजतवान केलं असं दृष्य जागोजागी पाहायला मिळत.आमराईतील वृक्षांवर कोकिळेचं कुहुकुहू गुंजन जणू वसंताच्या आगमनाची तयारी सर्वदूर चालू असते. वसंतोत्सव करण्यास प्रियकर प्रेयसी आतुर झालेले आहेत वातावरणातील शुष्क कोरडेपणा नाहिसा करण्यासाठी चरचरातील पशुपक्षी वसंत ऋतुला साद घालतात.

हे वसंता कधी येणार तू धरेवर पानगळ झाली आहे धरणीवरील पानगळीनी बागबगीचे रुक्ष होऊन नवीन पालवी येण्याची उत्सुकता आता लपत नाही वृक्ष, वेली सारी धरती छोट्या पोपटी पानांचा अंगरखा केव्हा पांघरु म्हणून आतुरतेने वाट पाहतायतं!!

पिकलं पानं गळून तारुण्यानी वृक्ष टवटवीत होणार. रंगाची उधळण करणारा रंगपंचमीचा सण याच ऋतुत. वसंत म्हणजे सहा ऋतुंच्या सोहळ्यातला अतिशय सुंदर ऋतु!!

सरस्वती देवीचा जन्म याच ऋतुत म्हणजे वसंत पंचमीचा याचदिवशी सरस्वती मातेला वंदन करुन पूजा करुन अक्षर गिरवले जाते.कविंचा अतिशय लाडका ऋतु म्हणजे वसंत.वसंताचा गंधच अनिवार ओढ निर्माण करतो.

वसंताच्या कुशीत केव्हा शिरु यांची ओढ धरेवरील सर्वच जीवमात्रांना अस्वस्थ करते.

वसंताची चाहूल आनंदोत्सव साजरा करते.चराचराला रोमांचित करते!! ❖



# हाऊ इज डॉग?

लेखक
**प्रकाश बाळासाहेब पाटील**
हुतात्मा चौक, मुंबई

सचिवसाहेबांचा दौरा निश्चित झाला. त्याबाबतचे फर्मान सुटले. तसे वरपासून खालपर्यंतचे सर्व कार्यालयीन स्तर कामाला लागले. ठिकठिकाणची शासकीय विश्रांतीगृहे बुक होऊ लागली. आजूबाजूला पहाण्यासारखी कोणती ठिकाणे आहेत? चांगली हॉटेल्स कोणती आहेत? याची तपासणी होऊ लागली. त्याचं कारण तसंच होतं. साहेबांची बडदास्त उत्तम ठेवली तर बऱ्याचजणांची अडलेली कामे होणार होती. कोणाचं प्रमोशन होतं, कोणाला हवी तेथे बदली, कोणाला पुरस्कारासाठी शिफारस तर कोणाचं मेडिकल बिल मंजूर करून घ्यावयाचे होते.

साहेबांच्यासोबत त्यांचे दहा पंधरा नातेवाईक येणार होते. या सर्वांचे खाणेपिणेसाठी सर्व किराणा आणणे, खानसामाला तयार ठेवणे तसेच इतर व्यवस्था यासाठीसुध्दा सर्वांची धावपळ उडाली होती.. तसेच साहेबांच्या आत्याला एक जुने शिवमंदिर पहायचे होते. काकांना धबधबा पहायचा होता. तसा निरोपही आला होता. त्यामुळे या मंदिराची व धबधब्याची तपासणी करण्यासाठी दोघांना पाठविले गेले. अशा प्रकारे सर्व बंदोबस्त सुरू होता. सर्व वरिष्ठ अधिकारीसुध्दा जातीनं लक्ष घालत होते.

ठरलेल्या दिवशी साहेबांचे आगमन झाले. नातेवाईकासह तीन मोठ्या गाड्या होत्या. त्यांत साहेबांचे आई-वडिल, काका, काकी, पुतणे, बहिणी, आत्या,आज्या, वहिन्या, भावजया, पोरंटोरं या सर्वांचा समावेश होता. जो तो आपापल्यापरीनं साहेब कसे खूष होतील हे पाहू लागला. हिरीरीनं त्यांची व त्यांच्या नातेवाईकांची काळजी घेऊ लागला.

खाण्यापिण्याची तर ददात नव्हती. वेज-नॉनवेजची दंगल उडाली. वर आईस्क्रीम! मजाच मजा! सर्वत्र आनंदाचे तसेच गंभीरतेचे वातावरण होते. आनंदाचे यासाठी की, बऱ्याचजणांची खायची- प्यायची व्यवस्था झाली होती व गंभीरतेचे यासाठी की, साहेबांची कांही आबाळ

होऊ नये म्हणून!

सर्व आपआपल्या कामात दंग होते. साहेबांचा एक सात वर्षाचा मुलगा होता. सायंकाळी तो चेंडूने खेळत होता. खेळता खेळता त्याचा चेंडू एका भटक्या कुत्र्याला लागला. कुत्रा चिडला आणि त्याने त्याचा चावा घेतला. पायाला मोठी जखम झाली. रक्त वाहू लागले. मुलगा मोठ्यांदा व्हॉं–व्हॉं करून रडू लागला. सर्वत्र गोंधळ उडाला. 'डॉक्टरला बोलवा, डॉक्टरला बोलवा!' असा कालवा झाला.

कोणीतरी तत्परतेने डॉक्टरला बोलावून आणले. डॉक्टरने इलाज केले.

इलाज करता करता डॉक्टरने प्रश्न विचारले,कुत्रा कसा होता? त्याच्या तोंडातून लाळ पडत होती काय? तो सैरावैरा पळत होता काय?

पुढे ते म्हणाले, असा कुत्रा असल्यास त्याला पकडा. दोन तीन दिवस नजरेखाली ठेवा. त्याची उत्तम बडदास्त ठेवा. कोणत्याही परिस्थितीत तो मरता कामा नये, याची दक्षता घ्या. तो जर मेला तर, तो पिसाळला आहे असं समजा. पिसाळलेला कुत्रा चावला असेल तर अठरा इंजेक्शन्स पोटात घ्यावी लागतील. रेबीज हा एक भयंकर व्हायरस आहे. त्याच्यामुळे जीवघेणा आजार होऊ शकतो. हा आजार कुत्र्याच्या चावण्यामुळे होतो. कुत्र्याला जर रेबीज असेल तर त्याच्या चावण्याने लाळेद्वारे रेबीजचा जंतू माणसाच्या शरीरात प्रवेश करतो. तरी काळजी घ्या.

डॉक्टर निघून जाताच सचिवसाहेबांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले. बाहेर उपस्थित असलेल्या लोकांमध्ये मात्र चर्चा रंगली. कुणी काय म्हणालं तर कुणी काय म्हणालं! त्याचा परिणाम इतकाच झाला की, बरीच नवीन माहिती सर्वांना मिळाली.

एकजण म्हणाला, कुत्रा चावल्यावर ती जखम बांधू नये व जखम उघडी ठेवावी. जखम साबणानी धूवून घेतली पाहिजे. अन्यथा व्हायरस मेंदूमध्ये प्रवेश करतो.

दुसरा म्हणाला,चावलेल्या जागी वेदना होतात. खाज सुटते. ताप येतो. बेशुध्दपणा, धुरकट दिसणे, पाणी पिण्यास भिती वाटणे, हिंसात्मक होणे अशी लक्षणे दिसतात.

तर तिसरा एकजण म्हणाला, हे तर कायच नांही. भास निर्माण होणं, लाळ सुटणं, डोळ्यातून पाणी येणं, उजेड सहन न होणं, अस्वस्थ वाटणं, श्वास बंद होणं, हृदय बंद पडणं, रक्तपेशी कमी होणं, अंतर्गत रक्तस्त्राव होणं असं होऊन रोगी दगावतो. आमच्या गल्लीतलं बामणाचं वामन्या असंच मेलं. त्यामुळे तात्काळ इलाज करावे लागतात.

चौथा म्हणाला, पिसाळलेले कुत्रं चावलं तर माणूस मरण्यापूर्वी कुत्र्यासारखं ओरडतो. त्याच्या पोटात कुत्र्याची पिल्ले तयार होतात.

अशी भयंकर चर्चा झाली.

सांजसमयी कुत्रा चावला होता. तो कसा होता ते सचिवसाहेबांच्या मुलाला सांगता येईना. तिथं कांही कुत्रे भटकत होते. ते वेगवेगळ्या रंगाचे होते. त्यातीलच एक चावला होता.

शेवटी त्या मुलानं सांगितलं, तो काळा होता.

लगेचच काळा कुत्रा शोधण्याचे आदेश क्षेत्रिय अधिकाऱ्यांना झाले. मग डिपार्टमेंटच्या स्टाफकडून कुत्रा शोधण्याची मोहीम सुरू झाली. शोधपथकात आठ–दहा लोक होते. पण थोड्याच वेळांत ते बुचकळ्यांत पडले, कारण आजूबाजूला चार काळे कुत्रे भटकत असल्याचे दिसले. आता काय करावे? कोणता कुत्रा पकडावा ? हा प्रश्न पडला. कुत्रा तरी पकडावा लागणार होता. न पकडला तर साहेबांची नाराजी ओढवून घ्यावी लागणार होती. मग गोपनीय अहवालात चांगली नोंद झाली नसती. त्यामुळे त्यातील कोणता पकडावा याबाबत गोंधळ झाला. मग स्टाफने त्यातील एक निवडला व तो कुत्रा पकडायचा निर्णय घेतला. लोक त्यांच्याकडे हळूहळू जाऊ लागले. कुत्र्याला संशय आला व ते शेपूट घालून जोरात धावत सुटले. पळता पळता भितीने केकाटत होते. चार पाचजण त्यांच्या मागे धावले. धावता धावता दोघे ठेचकाळून पडले. त्यांची ढोपरी फुटली. पण परत उठून कुत्र्यामागे लागले. कुत्रे या आळीतून त्या आळीत धावत होते. पळताना विरूध्द दिशेने येणाऱ्या लोकांशी स्टाफच्या लोकांची टक्कर होई. मग शिवीगाळ होई. सॉरी म्हणून स्टाफ पुढे जाई.

इथंपर्यंत सर्व व्यवस्थित होते. पण एका म्हातारीला जेंव्हा धडक बसली. तेंव्हा ती खाली पडली व ओरडू लागली,आग, आई! आई, आई ग! मेलो मेलो!! कोण ढासळला गं बाई ! त्येचं मडं बसिवलं त्येचं !

मग त्या म्हातारीची दोन मुलं बाहेर आली व त्यांनी डिपार्टमेंटच्या माणसांना चांगलीच शिवीगाळ केली.

भांडण्यात अर्थ नव्हता. लवकर गेलं नांही तर साहेब रागावेल ही भिती होती. पुन्हा स्टाफ कुत्र्यामागं धावू लागला. कुत्रंही एव्हाना पळून पळून दमलं होतं. शेवटी त्याला पकडण्यांत स्टाफला यश आलं. विजयी मुद्रेनं कुत्रा पकडल्याचं जाहीर करण्यांत आले. या घटनेने दुःखातही सचिवसाहेबांना आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी दौरा अर्धवट सोडून साहेब मुंबईला परतले. मुलाला चांगल्या डॉक्टरला दाखवायचे होते. मजा न करताच परतावे लागल्याने साहेबांचे नातेवाईक अत्यंत नाराज झाले. मुंबईला पोहोचताच सचिवसाहेबांनी मुख्य कार्यालयास दूरध्वनी केला, हाऊ इज द डॉग?

त्यानंतर मुख्य कार्यालयाचा त्यांचे अधिपत्याखालील अधीक्षक कार्यालयास दूरध्वनी गेला, हाऊ इज द डॉग?

लगेचच अधीक्षक कार्यालयाचा त्यांचे अधिपत्याखालील कार्यकारी कार्यालयास दूरध्वनी गेला, हाऊ इज द डॉग?

मग कार्यकारी कार्यालयाचा त्यांचे अधिपत्याखालील उप कार्यालयास दूरध्वनी गेला, हाऊ इज द डॉग?

तत्परतेने उप कार्यालयाचा त्यांचे अधिपत्याखालील कनिष्ठ कार्यालयास दूरध्वनी गेला, हाऊ इज द डॉग?

कनिष्ठ कार्यालयाने उप कार्यालय प्रमुखाना सांगितले, सर, डॉग इज ओ.के.

उप कार्यालयाने कार्यकारी कार्यालय प्रमुखाना दूरध्वनी केला, सर,डॉग इज ओ.के.

कार्यकारी कार्यालयाने अधीक्षक कार्यालयास दूरध्वनी केला, सर,डॉग इज ओ.के.

अधीक्षक कार्यालयाने मुख्य कार्यालयास दूरध्वनी केला, सर,डॉग इज ओ.के.

मुख्य कार्यालयाने सचिवाना दूरध्वनी केला, सर,डॉग इज ओ.के.

असा संवाद दिवसातून तीन चार वेळा होत असे. प्रोटोकॉल हो! दुसरं काय?

याशिवाय कुत्र्याची काळजी घेणेबाबत वरून खालपर्यंत आदेश येत असत. त्यामुळे कुत्र्याची बडदास्त चांगल्याप्रकारे ठेवली जात असे. त्याच्यासाठी उत्तम बेड तयार करण्यात आला. त्याला थंडी वाजू नये उबदार ब्लँकेट आणले गेले. खायला रोज चांगल्या प्रकारची बिस्किटे, मटण, दूधभात, भाकरी, ब्रेड, कुत्र्याचे विशिष्ठ प्रकारचे खाद्य असे अन्न दिले जात असे. कुत्राही दाबून खात होता आणि भरपूर घाण करत होता. असे सर्वांसाठी चिंतेचे व कुत्र्यासाठी मजेचे दिवस जात होते. जनावराचे डॉक्टरांची तैनात करण्यांत आली. तीन दिवसांनी कुत्रा विचित्र आवाज करून भुंकू लागला. थयथय नाचू लागला. कांही कांही वेळा तो रडे नि वातावरण भेसूर करी. त्याला मारता पण येत नसे. चूकून मेला तर काय घ्या. खरं तर तो एक भटका कुत्रा होता. खाऊन खाऊन सर्व इच्छा पूर्ण झाल्यावर, कुत्र्याला स्वातंत्र्याची आठवण झाली असावी. आपलं स्वातंत्र्य हिरावून घेतल्याचं त्याला जाणवलं असावं. पण डॉक्टरलाही कांही कळेना. पण तो कायतरी इलाज करून फी घेऊन जाई.

फोन येतच होता व कुत्र्याची खुशाली कळविली जात होती.

एक दिवस गजब झाला. काय झाले कुणास ठाउक? कुत्रा मरण पावला. खरं तर तो पिसाळलेला नव्हता. तो गांवठी कुत्रा होता. त्याला राजेपण झेपलं नांही. तो खाऊन खाऊन अपचन होऊन मेला. खालचे लोक घाबरले. गांवठी भटक्या कुत्र्यांची वाणवा नव्हती. त्यांनी ताबडतोब दुसरा तसाच दिसणारा कुत्रा आणला व बांधून ठेवला. त्याची ही उत्तम बडदास्त ठेवली गेली. त्याची चंगळ झाली. त्यानंही कधी नाही ते सर्व खाऊन घ्यायला सुरू केले. ज्यांच्यावर कुत्र्याची जबाबदारी सोपविली होती ते लोक कुत्रे मेले की, त्या ठिकाणी दुसरे आणून बांधत. अशी महिनाभरात चार सायकल झाली.

एक महिन्यापर्यंत दूरध्वनीचे सायकल सुरू होते. नंतर ते हळूहळू बंद झाले. परंतु सचिवसाहेबांनी मुलाच्या बेंबीभोवती अठरा इंजेक्शन घेतल्याचे कळते. ❖

**ओसंडल्या काळजात**
**समाधानाच्या पखाली**
**सई दीप पाजळते**
**वडपिंपळाच्या खाली**

– रंजना कराळे



# अंतर्नाद


लेखिका
**शालिनी बेलसरे**
अंजनगाव सुर्जी, अमरावती


ऋतू हा कधीच स्थिर नसतो. पण आपल्या वैचारिकतेला फक्त कल्पकतेचे लिंपण करून बघा... काय होईल? ऋतूराजाच्या शिरपेचातील असंख्य सौंदर्यात्मक, बोधात्मक, औदर्यात्मक तुरे क्रमाक्रमाने गळून जाऊन कल्पना विश्वात गडप होतील. हिरव्याकंच वनराईने अंथरलेल्या तृणांच्या पायघड्या... लावण्यमय मादक सौंदर्यात दंग होऊन समीरासमवेत दाहदग्ध गारव्याला, कवेत घेऊन डोलणाऱ्या अगणित झाडांची चैतन्यमय कुटुंबे... अत्तराची कुपीही ज्यांच्यापुढे न्यूनत्व स्वीकारेल असे विविध रंगी पुष्पांची मनोरम्य गंधबने. किती छान वाटेन हे सर्व काही असच राहिल तर... पण आजन्म अखंडित हे असेच राहिले तर ?

साधे कालचेच बघा! तनामनात नवचैतन्य रुजवणारा पाऊस! म्हणजे माझा जिवलग सखा... आवडता ऋतू. पाच ते सहा दिवसांपूर्वी मनांगणात सरींची सुगंधमय कलाकृती, प्रत्येक टपटपणाऱ्या थेंबातून अवनीच्या देहात्म्यावर रेखीव शिल्पाप्रमाणे तरंगमय वर्तुळाकार वलय रेखाटत होती. अंकुर संभवाच्या उद्देशाने! पावसात बेभान चिंब चिंब झालेली वृक्षराजाची प्रत्येक शाखा सृजन औत्सुक्यात मुळापर्यंत पावसाचा थेंब अन् थेंब पोहचवत होती. अधूनमधून पाऊस रूपांतरित होत होता. कधी नादमय शांतपणे पण हर्षाने बरसणारा, तर कधी विद्युलतेला सहसोबती बनून अतोनात बरसणारा. हे वर्षाचक्र न थांबता सातत्याने सुरूच होते. वाटा... पायवाटांचा ओलसरपणा ते पाण्याचे आवरण असलेल्या अस्पष्ट वाटा असा प्रवास पूर्णत्वास आला होता. मळभ दाटलेला नभोमंडप

विलोभनीय तर कधी भयावह चित्रे क्षणोक्षणी चितारत होता. संध्या प्रहरी, रात्री आणि कदाचित उद्यासाठीही...

पण एवढं अखंड मळभीय चित्रालय कुणाला आवडत असेल? आनंद देत असेल? एकच एक गोष्ट मानवीय अंतर्मनात सातत्याने रुंजी घालत राहिली किंवा तोच तो पणा अंकित होत गेला तर त्याचे मूल्य, महत्त्व तितकेच प्रभावीपणे जाणवेल का? हा ही प्रश्न वैचारिक गुंता वाढवणारा आहे. यशाची पेरणी मागून पेरणी होत रहावी आणि आनंदाची उत्पत्ती होत रहावी. पण कुठवर? त्याचे खंडन होणे आवश्यक नाही का? भीतीचा स्त्रोत आंतरिक भयावह बिंबांकन झाल्याने होते याउलट सातत्याने हे बिंब मन:पटलावर प्रदीर्घ विराजमान होत राहिले तर त्याला नि:शंक लुळेपांगळेपण येऊन मरण पत्करावेच लागेल. पण भावनांची एवढी व्यापक संरचना कशी?

मनातील दडून ठेवलेल्या वृक्ष मुळांप्रमाणे वरून देहाचे, हावभावाचे कवच, चपलखपणे पांघरलेल्या, आंतरिक भावना अजबच! बरं अपूर्ण इच्छांची रांगोळी सत्यत्वात न्हावून जीवनांगणात वास्तविकपणे रेखाटली जावी, याकरिता आयुष्याचे कुरुक्षेत्र करून, पावलोपावली लढत राहतो. कधी... काही वेळा सूत्रधार सर्व सूत्र योग्य मांडून आपल्याला हवे तसे उत्तर देतो. पण पूर्णत्वास आलेल्या स्वप्नालयाचे मूल्य आपण किती दिवस जाणतो? तरीही तीच स्थिती अपूर्णत्वाची. आपला फक्त अर्जुनच होतो... अखेर पर्यंत... गोंधळलेला! असे का व्हावे?

भिंतीला पूर्णपणे रंगवलेल्या नंतर छान दिसावी... नव्हे तर तिला पडलेली पुसटशी दु:खमय चीर डोळ्यांतील अश्रूंना घायाळ करून जाते, पण बाकी रंगवलेल्या मोहक भिंतीचे काय? जर ती भेग अतिशय सचोटीने भुजवली तरी मन त्याच डागडुजीकडे! आणि भींतीला असंख्य तडा गेल्या तर?

**काय करावे मनाचे**
**उगवतो नवांकूर**
**उषेतील किरणांना**
**औदासिन्याचा नूर**

अपूर्णत्वाचा पूर्णत्वाकडे होणारा प्रवास... पूर्णत्वानंतरचा त्या गोष्टीला किंवा इच्छेला प्राप्त झालेला पूर्णविराम आणि होणारी नव इच्छांची निर्मिती... हे सर्वच पेच निर्माण करणारं! पण या अनुषंगाने सातत्याचा पुनर्विचार करता येईल.

**ईप्सितांची सरिता**
**महासागर होते**
**प्राप्त झाले ते नको**
**न्यूनत्व मनी सलते**

मानवी मनाच्या उत्खननात अनेकानेक अपेक्षांच्या, इच्छांच्या थरांचे प्रदेश सहजतेने प्राप्त होतात. सातत्यातील औदासीन्य हे इच्छांशी नक्कीच निगडीत आहे. अंतर्नाद हा सातत्यावर असो, औदासिन्यावर असो, अर्जुनासारख्या आंतरिक द्विधा स्थितीवर असो किंवा पूर्ण–अपुर्णत्वाच्या चढा ओढीचा असो... अंतर्नादाचे रूपांतर भावनिक स्थितीत व भावनिक स्थितीचे वलय मानवीय आयुष्यात वागण्यात प्रखरतेने जाणवतेच. अंतर्नाद घोंघावत राहतो... अविरत... प्रत्येक श्वासात!

**मी आहे साद अंतरातील**
**डावलून मला जाल कुठे ?**

**उटण्याच्या मोहक सुगंधाने**
**फुलली आजची पहाट**
**लख्ख दिव्यांच्या तेजाने**
**लाभो आपणास यशाची**
**वाट**

**उजळल्या दाही दिशा**
**दीपावलीच्या या दिृ**
**पूर्ण व्होवोत मनोकामना**
**हिचं सदैव इच्छा मनी**

– अश्विनी निलेश अतकरे,
मुंबई



# ग्रीष्मसखा

लेखिका
**डॉ. योगिता राजकर**
अंजनगाव सुर्जी, अमरावती

बाहेर लख्ख ऊन.. डोळे दीपवणारे. हिरवाईच्या पार्श्वभूमीवर दाहकता कमी जाणवत असली तरी ग्रीष्मातलं ऊन चटका मारणारं. जीवाला कासावीस करणारं. नुकतीच काही झाडांची पाने झडून गेलेली. हळूहळू झडताना कोवळ्या पालवीने जागा घेतलेली. एकदम न गळता रोज थोडी थोडी वाऱ्यावर स्वार होत झाडाच्या पायतळी विसावलेली. आता मात्र ते समोर दिसणारे रामफळ पोपटी छटा लेवून कोवळ्या उन्हात चमकतंय. वाऱ्याबरोबर होणारी पानांची सळसळ आनंदाची बरसात करतंय पण त्या उन्हात गुलमोहर मात्र कसा खळाळत हसतोय. नखशिखांत मोहरतोय. जरा आश्चर्य वाटले. त्याच्या कडे निरखून पाहू लागले. हिरवागार पानांचा पिसारा आणि त्यात फुललेल्या तांबूस लाल पाकळ्यांचा गुच्छ. किती मनोहर दिसत होता तो उन्हाच्या सोनेरी कॅनव्हासवर..! सोनेरी तळपत्या किरणात न्हालेला तांबूसवर्णी गुलमोहर म्हणजे जणू जप करत असलेला साधू बैरागीच ..! आपसूकच लेखणीतून हायकू शब्दात उतरला क्षणभरात..

गुलमोहर फुलांनी डवरला
संन्याशी झाला

जेव्हा जेव्हा फक्त केसरी, लालभडक फुलांनी गुलमोहर डवरून येतो तेव्हा तेव्हा त्याचं हे संन्यस्त रूप मनास मोहून टाकते. डोंगरदरीत, रानीवनी, रस्त्याच्या कडेला, अंगणात अगदी कुठेही तो फुललेला दिसतो.. विरक्त.. अलिप्त! आपल्या कडील सहस्त्रावधी तांबूसलाल पाकळ्यांची मनमुरादपणे उधळण करून आपल्या पायतळी पायघड्या घालतो. वर फुलांचे छत्रचामर तर झाडाच्या खाली पाकळ्यांची तितकीच मोहक लालसर रंगाची रांगोळी. मातकट रंगाच्या खोडावरची हरेक फांदीफांदी फुलांच्या गुच्छा सोबत हलकेच वाऱ्याच्या झुळकी बरोबर हिंदोळे घेतेय. वाऱ्याची मोठी झुळूक आपल्या बरोबर पाकळ्या अलवार वाहून नेतेय. झाडाखाली उभे राहून वर पाहिले असता दिमाखदार सळसळत्या शेंदरी वर्णाच्या डेरेदार घुमटाखाली उभे आहोत असा भास होतो.. नजर जमिनीवर जाताच तांबूसलाल पाकळ्यांची रंग उधळण मनास सुखावते. त्या सुरेख, तलम नक्षीदार पाकळ्यांच्या सड्यावर पाय द्यायला मन कचरते. नजरेत बंदिस्त करून तो रंगसोहळा जपून ठेवावा असाच. हलकेच एक पाकळी सुटून खाली गरगरत आली आणि ओंजळीत विसावली. 'आपले शेवटचे श्वास मातीत मिसळून मातीला रंग बहाल करून कृतकृत्य होत असतील नाही या पाकळ्या'.. हलकेच स्पर्शिकेसारखा

विचार मनास स्पर्शून गेला.

निखारे असेच असतात या शेंदरी पाकळ्यांसारखे.. की या गुलमोहराने लुटला की काय.. निखर्याचा रंग.. छे .. म्हणूनच हायकूच्या चिमटीत याचे नाजूक रंग पकडले

**रानावनात गुलमोहर झुले**
**निळारा फुले**

तळपत्या उन्हाच्या काहिलीत जणू काही निखारेच झाडावर फुललेत असा गुलमोहरी भास व्हावा.. इतकं देखणेपण या झाडाचं नजरेस लुभावते.

उमललेल्या फुलाच्या चार पाकळ्या तांबूस आणि एक पांढुरक्या तांबूस छटेत ऐटीत मिरवणारी. ती तुऱ्या सारखी उभी असते. रंगानेही जरा वेगळी. म्हणूनच की काय याला Peacock Flower असं एक सुंदर नाव आहे. एप्रिल पासून सुरू झालेला गुलमोहराचा बहर जुलै पर्यंत फुलत राहतो. सुरुवातीला हिरव्या रंगाची आतून लाल असलेली तोंड मिटलेली कळी. हळूहळू टपोरी होऊन फुलू लागते. हिरवट कळीतून तांबूसलाल रंग डोकावू लागतो.. कळीच्या ओठावरचे ते उमलते हसू किती गोड.. मुग्ध बलिकेसारखे.. निर्मख.. नितळ.. मनमोहक. तिला पाहून मन वेडावते. सोबत असलेल्या हिरव्यागार झाडांमध्ये गुलमोहराचे भगवे रुपडे उठून दिसते. हिरव्यागार साड्या नेसलेल्या बायकांच्या मेळाव्यात नारिंगी रंगाचा फेटा घातलेला नवरदेव मिरवतोय.. अगदी दिमाखात.. दिलखेचक अशी त्याची आ..! भगवी पताका भर उन्हाच्या तलखीत आभाळपालखीत फडकतेय.. असा भास होतोय. वाऱ्याच्या झुळुकीसरशी पायतळी पाकळ्यांची पखरण होतेय. लालभडक, नारिंगी, पिवळसर लाल अशा छटांनी गल्लीबोळात तर कधी रस्त्याच्या कडेला, डोंगर दरीत हा आपलं लक्ष वेधून घेतोय.

त्याच्या पाच पाकळ्यांची देखणी आरास मनास सुखावतेय. चार पाकळ्या लालसर तर एक पांढरट रंगाची रेषा असलेली. चार पाकळ्या लाल तर एक वेगळी पांढऱ्या रंगाची ज्यावर लाल छोट्या छोट्या उभ्या रेषा. त्या पाकळीला राजा आणि उरलेल्या चार पाकळ्या म्हणजे त्याच्या राण्या. म्हणून आम्ही त्याला राजाराणीचं झाड म्हणत असू. त्या फुलात मध्ये पुंकेसर. पाकळ्यांच्या खाली कळीचे हिरवे आवरण.. ते पण पाकळीसारखे विभागलेले. आतून लालसर आणि बाहेरून हिरव्या असलेल्या त्या पाकळ्या आम्ही लहानपणी तोडत असू. लाल रंगाचे आवरण थोडे खरवडून त्या हिरव्या पाकळ्या आम्ही हाताच्या पाचही नखांना चिकटवत असू. हाताच्या बोटांना हिरवे नेलपेंट लावल्यासारखे दिसायचे. टोकदार हिरवी टवटवीत नखांना चिकटवलेले नेलपेंट एकमेकांना दाखवून आम्ही खुश होत असू. कुणाची नखे लांब, कुणाची छान असा खेळही गुलमोहराखाली रंगायचा. गुलमोहरच्या रंगात रंगलेल्या अशा गुलमोहरी आठवणी तितक्याच नितांतसुंदर..! भातुकली, लपाछपी हे खेळही गुलमोहरासोबत बहरलेले..! तो आमचा बालपणीचा सखा, सोबती..!

तांबूस, केशरिया रंगांची लयलूट करावी ती गुलमोहरानेच! गुलमोहरी फुलांनी डवरलेलं निष्पर्ण झाड पाहताच मनात रंगपंचमी फुलते. वाढत्या वयात त्याच्याकडे पाहताना संदर्भ बदलत गेले. वळणावर उभा असलेला गुलमोहर विरही जीवांचा सखा. म्हणूनच शब्द उमलले.. वळणावर गुलमोहर फुले विरही झुले

उन्हाचा पिसारा फुलू लागला की त्याच्या फुलण्याचे वेध मनास लागतात . सहस्रावधी किरणांचे चटके अंगाखांद्यावर झेलून पानाविना फुलण्याची त्याची अगम्य असोशी.. मनास उभारी देते. वेदनां सोसून सदैव हसणारा गुलमोहर असंख्य शब्दांचे दान पदरात टाकून कवितेत फुलतोय. मलाही फुलवतोय..! वेगवेगळ्या रुपात तो मला भुलवतोय.. कधी भगवी कफनी घालून संन्याशाच्या वेशात तर कधी भगवी पताका निळाईत डौलाने फडकवत.. कधी भगवा फेटा घालून राबणाऱ्या माझ्या कास्तकर्यांच्या रुपात.. तर कधी गुलमोहरी स्पर्शभाषेत.. नव्या नवलाईच्या तिच्या उमलत्या वयातील गालावर तो आपली मोहोर उमटवतोय.. तर कधी तिचा हरेक ऋतू झेलताना आरक्त होऊन फुलतो. तलम मऊ पाकळ्यांच्या पायघड्या घालणाराही तोच अन वाऱ्यावर स्वार होऊन विखुरणाराही तोच. ऊन झेलून सदा हसणारा.. एरवी अलिप्त पण ग्रीष्मात चटकन नजरेत भरणारा.. सवंगडी..!

मान्सूनपूर्व वाऱ्या वावटळीचे दिवस येतात आणि गुलमोहराची अक्षरशः लूट करून नेतात. सोसाट्याच्या वाऱ्यात गुलमोहराची फुले वाऱ्यावर स्वार होऊन दूरवर जाऊन विसावतात. हिरव्यागार पानांच्या सोबतीने फुललेली माया निसर्गाच्या एका फटक्यात विखुरली जाते. गुलमोहराची नक्षी बदलू लागते. हळूहळू सर्व फुले पाऊस घेऊन जातो आपल्या ओंजळीत. गुलमोहर पुन्हा शांत हिरव्या पानांची सळसळ उरी घेऊन उभा राहतो !

तुला कोणत्या रंगात रंगवावं हा प्रश्न मला छळतो. म्हणून माझं मीच कवितेतून उत्तर शोधते..

तुझं चित्र रंगवायला घेतलं
पण तुझं सळसळतं लावण्य
कॅनव्हासवर उतरेना..
मग मी रंगवलं माझ्या अंतरी तुला
तप्त आरक्ती विरहवणवा तगमगता
ग्रीष्मसखा रसरसता...! ❖



# ज्ञानरचनावाद : शिक्षणातील बदलती भूमिका

लेखिका
**डॉ . शुभांगी तानाजी कुंभार**
सातारा

आजच्या शिक्षण पद्धतीमधील आधुनिक शिक्षण पद्धती म्हणजे ज्ञानरचनावाद. आजच्या आधुनिक युगात शिकण्याला शिकवण्यापेक्षा जास्त महत्त्व आहे. शिक्षण प्रक्रियेचा विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थी हा केवळ ज्ञानाचा स्वीकारहर्ता आहे ही भूमिका बदलल्याशिवाय अध्ययन आनंददायी होणार नाही. अध्ययनात ज्ञानरचनावादामुळे आनंद निर्माण होतो. विद्यार्थी स्वयं - प्रेरणेने अध्ययन करतात. त्यांची ही स्वयंप्रेरणा त्यांना आनंद देते. ज्ञानरचनावादाला संरचनावाद असेही संबोधले जाते. ज्ञानरचनावादाचे मूळ वेदकालीन कालखंड, रामायण, महाभारत, सांख्यदर्शन यासारख्या महाकाव्यात बौद्धकालीन कालखंडामध्ये सापडते. जीन पियाजे व लेव वायगोटस्की या मानसशास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर ज्ञानरचनावाद हा उदयाला आला. या दोघांचे सिद्धांत जगभर प्रसिद्ध झाले. यामध्ये ग्लेसर फोर्ड यांनी अधिक भर टाकलेली आहे .

राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा २००५(NCF) मध्ये ज्ञानरचनावादाचा पुरस्कार केला आहे. विसाव्या शतकात नव - नवीन शैक्षणिक प्रवाहांमध्ये जॉन ड्युई यांनी ज्ञानरचनावादाशी संबंध जोडला आहे. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, निसर्गवादी शिक्षणतज्ज्ञ रुसो यांचाही विचार ज्ञानरचनावादाच्या दृष्टिकोनातून करावा लागतो कारण, ज्ञानाच्या स्वरूपाचे स्पष्टीकरण ज्ञानरचनावाद करतो. व्यक्ती आपल्या पूर्वज्ञानानुसार अनुभवांचा अर्थ लावते. ज्या घटकांच्या संपर्कात व्यक्ती येते त्यानुसार त्याचे अनुभव घडत जातात. वस्तू, घटना, प्रसंग यावर आधारित व्यक्ती विविध घटनांचा अर्थ लावते ज्ञानरचनावादामध्ये स्वतःच्या अनुभवांच्या आधारे पुनर्रचना करणे हा ज्ञानरचनावादाचा आत्मा आहे. यामध्ये कृतिशीलता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

कृतीतून शिक्षण घेतल्यामुळे ते स्मरणात ठेवावे लागत नाही. आपोआप अध्ययन घडून येते आणि एकदा केलेले अध्ययन पुन्हा विसरत ही नाही हेच ज्ञानरचनावादाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्ञानरचना, ज्ञानाची निर्मिती सहकार्यातून गटकार्यातून व शोधातून घडत असते. बालक स्वतः

ज्ञानाची निर्मिती करतो. ज्ञान निर्मितीची नैसर्गिक पद्धती औपचारिक शिक्षणात आणल्याने विद्यार्थी केंद्रीय शिक्षण व्यवस्था निर्माण झाली आहे ज्ञानरचनावादामुळे पूर्वजांनी निर्माण केलेले ज्ञान अंगीकरायला विद्यार्थ्याला मदत करते.

विद्यार्थ्याला पुढच्या आयुष्यात उपयोगी पडणारे ज्ञान, कौशल्य आणि वृत्ती वृद्धिंगत करण्यास मदत करते हे आज सहज शक्य झाले होत आहे. ज्ञानरचनावाद हा शिक्षण क्षेत्रामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. विद्यार्थी केंद्रीय शिक्षण असल्यामुळे विद्यार्थ्याला प्राधान्य आहे. त्याच्या कृतीशिलतेला वाव आहे. त्यामुळे त्याच्या मेंदूचा विकास चांगला होतो. सातत्याने क्रियाशील राहणे, शोधून काढणे आणि त्यातून मिळणारा आनंद याचे समाधान विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादातूनच अनुभवता येते. पश्चिमात्य संस्कृतीमध्ये (१७७८-१८६०) गिम्बास्टिका विको, इमॅन्युअल कांट व अर्थर स्कॉफीअर हे रचनावादाचे अलिकडीलसंशोधक आहेत. विकोनी यांनी १७१० मध्ये ज्ञानाची रचना हा निबंध प्रसिद्ध केला या विवेकात्मक निबंधात विकोनी यांनी सर्वप्रथम अशी कल्पना मांडली की,

'' ज्ञान म्हणजे व्यक्तीकडून केली जाणारी विशिष्ट प्रकारची त्याची रचना होय'' यातूनच ज्ञानरचनावाद ही संज्ञा विकोनीच्या लिखाणातून उदयाला आली. त्यामुळे विकोनी हा ज्ञानरचनावादाचा प्रवर्तक मानला जातो.

**ज्ञानरचनावाद संकल्पना**

**''कृतिशील स्वयंशिक्षण म्हणजे रचनावादी शिक्षण होय किंवा विद्यार्थ्यांनी स्वतः हातांनी करून पाहत शिकणे, हालचाल करत, स्वतः शिकणे म्हणजे रचनावाद होय''** – रमेश पानसे

**'' पूर्वज्ञानाच्या आधारे जेव्हा व्यक्ती नवीन संकल्पनांची रचना करते तेव्हा त्यातून अध्ययन घडते यास ज्ञानरचनावाद म्हणतात ''.**

माझ्या मते ज्ञानरचनावादाची अशीही व्याख्या होईल की, विद्यार्थ्याच्या पूर्वज्ञानावर आधारित नवीन ज्ञानाची रचना म्हणजे ज्ञानरचनावाद. कृतीयुक्त आनंददायी शिक्षण म्हणजे ज्ञानरचनावाद –

विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती वाढवणारी आधुनिक शिक्षण पद्धती म्हणजे ज्ञानरचनावाद. constructivism हा शब्द con Struere या मूळ लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. यापासून To construct हे क्रियापद बनलेले आहे. याचा अर्थ रचना करणे किंवा मांडणी करणे होय. सातत्याने चालणारी रचनेची प्रक्रिया या ज्ञानरचनावादाचा केंद्रबिंदू आहे. वरील व्याख्यांचा परामर्ष घेता असे लक्षात येते की, प्रत्येक मूल कृतीतून हळूहळू शिकत राहते. त्याची पाहण्याची दृष्टी अतिसूक्ष्म असते म्हणजेच प्रत्येक वस्तूंचे, घटकांचे, घटनांचे निरीक्षण करतो आणि त्यातून नवा अर्थ शोधून काढतो हे केवळ ज्ञानरचनावादामुळे शक्य झाले आहे. सॉक्रेटिस व त्यांचे शिष्य यांच्या वैचारिक चर्चेतून असे स्पष्ट झाले की, ज्ञानरचनावादाचे हे त्याचे मूळ आहे आणि हे सत्य आहे. गिम्बास्टिका विको (१७१७ ) यांनी ज्ञानरचनावादाचा प्रवाह आणला. त्यांच्या मते, 'मानव ' हा निष्क्रिय ज्ञानप्राप्ती करणारा प्राणी नाही अशा शब्दांत इमॅन्युअल कांट यांनी ज्ञानरचनावादी संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. वायगोटस्की ( १७९० ) हा खरा ज्ञानरचनावादाचा तत्वज्ञ समजला जातो. अध्ययन-अध्यापन या दोन घटकावर त्यांनी अधिक भर दिला आहे. शिकण्याची प्रक्रिया ही रचनावदांमध्ये कृतीशील व रचनात्मक असते. आपल्या आसपासच्या वास्तव जगाशी परिचय करून घेताना मूल कृतीतून शिकते. आपल्या मन:पटलावर उमटलेल्या प्रतिमातून आकलन करून घेते. शिकणे हे व्यक्तीच्या ज्ञाननिर्मितीवर अवलंबून असते. जेवढी शिकण्याची तीव्र इच्छा असेल तेवढे अध्ययन त्वरित घडून येते.

**ज्ञानरचनावाद स्वरूप**

पंचज्ञानेंद्रियांच्या साह्याने आपल्याला ज्ञान मिळते. हे ज्ञान मिळवत असताना आपण स्वतः त्या उत्तराचा शोध घेण्यापर्यंत पोहोचतो म्हणजेच आपण स्वतःहून ज्ञान मिवळत असतो. ज्ञानाच्या उपशाखेतून न्याय निर्मितीचा दृष्टिकोन मान्य करण्यात आला. शिक्षणाचे तत्वज्ञान आहे. ज्ञान हे विद्यार्थ्याकडून विद्यार्थ्यांमध्ये विकसित होते याची रचना विद्यार्थ्यांनी करावयाची असते. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चेतना देणारे वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही शिक्षकांची असते. विद्यार्थी ज्ञान

निर्मिती करतो तेव्हा अध्ययन कसे घडते हे जेव्हा पाहतो तेव्हा ज्ञानरचनावादाच्या अध्ययन उपपत्तीचा विचार आपण करतो.

**ज्ञानरचनावादाचे प्रकार**

ज्ञानरचनावादाचे प्रमुख तीन प्रकार आहेत. बोधात्मक, सामाजिक व समूळ ज्ञानरचनावाद.

१. **बोधात्मक ज्ञानरचनावाद** – (Congnitive) ज्ञानग्रहण करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेवर अवलंबून असते. वाढीच्या टप्प्यांप्रमाणे मुले ज्ञानग्रहण करत सभोवतालच्या जगाचा अर्थ लावतात. त्यानुसार मूल प्रतिसाद देते अनुभवांतून मुलांच्या मनात बोधात्मक रचना तयार होते. व्यक्तीभिन्नतेमुळे विभिन्न अनुभव आल्याने बोधात्मक रचना वेगवेगळी होते.

२. **सामाजिक ज्ञानरचनावाद** (Social) लेव वायोगोटस्की यांनी सामाजिक रचनावादाचा पुरस्कार केला. लेव यांच्या मते, 'मुलांच्या विकासात भाषा व विचार यांचा बहुमूल्य वाटा आहे या आंतरक्रिया कृती–संभाषण यातून घडत. भाषिक क्रियेतून संवेदनांचे अवबोधांचे संबोधन बदल होतात. मानसिक प्रक्रिया या घटकावर अवलंबून असते. ज्ञाननिर्मिती घडताना मन व समाज यांच्यात अनुबंध निर्माण होतो. या ज्ञानरचनावादामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक आंतरक्रियेच्या माध्यमातून प्राप्त माहितीची ज्ञानरचना अपेक्षित आहे'.

३. **समूळ ज्ञानरचनावाद** (Radical) समूळ(मूलगामी) ज्ञानरचनावादाचा अर्नेस्ट व्हॉन ग्लॅसर फेल्ड यांनी पुरस्कार केला. यांच्या मताप्रमाणे, 'ज्ञान हे मानवी मेंदूची व संघटनात्मक वैचारिक प्रक्रिया होऊन ज्ञानाचे संकलन करण्यापेक्षा ज्ञानाची रचना करणे हा यांचा प्रथम उद्देश आहे. ज्ञान हे वस्तुनिष्ठ नसून ते कोठेही बांधून ठेवता येत नाही त्याची संरचना होणे आवश्यक आहे.

विद्यार्थी पूर्वज्ञान, तत्कालीन अनुभव, कल्पना यांचा सहाय्याने स्वतःहून याची निर्मिती करतो हे ज्ञानरचनावादाचे प्रमुख तत्व आहे. विद्यार्थ्यांना आपले ज्ञान अनुभवातून प्राप्त करण्याची संधी रचनावाद देतो. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानरूपी कळ्या उमलताना रचनावादातून सुंदर उमलून बाहेर पडतात कारण विद्यार्थ्यांच्या आंतरिक उर्मिला वाव आहे. विद्यार्थी सातत्याने कृतिकौशल्य प्रक्रियेमध्ये बांधून ठेवण्याचं काम हा रचनावाद करतो. ज्ञानाला कोणीही बांधून ठेवू शकत नाही कारण ज्ञान अथांग आहे मात्र, ते रचनेच्या स्वरूपामध्ये जर आपण मांडत गेलो तर त्यातील नवीन दिशा, नवीन जागृती, नवीन नवनिर्मिती, सर्जनशीलता ही घडून येते आणि रचनावाद हेच महत्त्वाचे कार्य करतो. ज्ञानरचनावाद ही शिक्षण क्षेत्राला मिळालेली एक बहुमूल्य अशी देणगी आहे कारण, रचनावाद हा शिक्षण प्रक्रियेमध्ये अत्यंत मौलिक भूमिका पार पाडत असतो. विद्यार्थी अंतर्मुख होण्यापासून रचनावाद त्याला परावृत्त करतो यामध्ये ज्ञानरचनावादाची भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रेरणा देणारा रचनावाद प्र शिक्षणामध्ये गरजेचा आहे. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांना, त्यांच्या सर्जनशीलतेला, नवनिर्मितीला वाव देणे आवश्यक आहे. रचनावादामध्ये वर्तनवादी शिक्षक हा अडथळा ठरतो त्यामुळे शिक्षकांनी आपली बदलती भूमिका जाणून घेऊन विद्यार्थ्यांशी आपले नाते प्रस्थापित करून घेणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञानार्जनाकडे वळवणे ही खरी काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये सातत्याने बदल होत आहेत आणि हे बदल नाविन्यपूर्ण दिशेने जात आहेत. विद्यार्थ्यांच्या बौद्धीक विकासासाठी समाज, शिक्षक, पालक यांनी आपली बदलती भूमिका जाणणे आवश्यक आहे. शिक्षक, समाज, शाळा आणि विद्यार्थी हे नाते अतूट आहे. त्यामुळे या सर्वांचे ज्ञानवर्धनात्मक संगोपन पालनपोषण होणे शैक्षणिक विकासासाठी आवश्यक आहे. ❖

**उजळून निघू दे आयुष्य**
**दिव्यांच्या तेजाने....**
**सर्वत्र दरवळू दे**
**सुगंध उटण्याचा.....**
**बहरू दे उंच मनोरा यशाचा**
**कृपा असावी श्री लक्ष्मीची...**
**दीपावलीच्या खूप खूप**
**शुभेच्छा.....**

**–शीतल राऊत**
**अमरावती**

# रोमच्या वाटेवर
## (छोटा प्रवासानुभव...)



लेखिका
**जयश्री चौधरी**
मुंबई.

वरील फोटोतील उभा पुतळा म्हणजे इजिप्तची सुप्रसिद्ध ममी.

आम्ही रोम येथील भव्य असे कलोसियम हे पुरातन, भग्न अवशेष पहाण्यासाठी त्या दिशेने जात असताना फुटपाथवर ही मम्मी उभी दिसली. म्हणजे थडग्यातून जसे काढलेले वस्त्रांकित प्रेतच या फुटपाथवर उभे दिसले. जी ममी नेहमीच आडवी शोकेसमध्ये ठेवलेली असते ती चक्क वाटेवर उभी.

प्रथम दर्शनी वाटलं इथे जागोजागी पुतळे उभे केलेले असतात तसाच हा सोनेरी रंगाने मढवलेला पुतळा असावा ममीचा!

प्राण गेलेल्या कलेवराचे दर्शन कधीच सुखावह नसते.

मरणोत्तरही जीवाचा पुढील प्रवास सुखाचा व्हावा म्हणून राजे महाराजांचे मृतदेह जतन करून ठेवण्याची प्रथा इजिप्त या देशात इ.स. २६०० पूर्व काळात प्रचलित होती. प्रेतावर महागडी रासायनिक प्रक्रिया करून सम्राट व राजेमहाराजे यांचे उदा. फारोंचे देह असेच जपून ठेवले जात. मिस्र देशाचा अमरत्वावर विश्वास होता.

मृतदेहावर विधीवत रासायनिक प्रक्रिया केली जात असे. ही प्रक्रिया करणारी मंडळी या कलेत निपुण असत. त्यांची वसाहत गावाबाहेर बरीच लांब असे.

प्रथम मृत देह आतून अतिशय स्वच्छ केला जात असे. त्यावर विविध रासायनिक प्रक्रिया केल्या जात. ही प्रक्रिया आणि विधी करणारी खास मंडळी होती.

हा सर्व विधी (mumification) झाल्यावर ही मंडळी त्या जागेवरून ताबडतोब व गुपचूप निघून जात असत. नाहीतर गावातील लोक त्यांना दगड धोंडे मारून पिटाळून लावत असत. कारण त्यांचे नंतरचे दर्शन अशुभ व अतिशय अपवित्र समजले जाई.

सुप्रसिद्ध प्राचिन ग्रीक इतिहासकार हेरोडोटस याने या प्रथे

बाबत सविस्तर लिखाण केलेले आहे.

अशीच एक मम्मी मी कलकत्त्याच्या संग्रहालयात पाहिली होती.त्या दालनात अजिबात गर्दी नव्हती.साहाजिकच आहे. अतिशय मंद दिवे असलेल्या त्या दालनात चिकित्सकपणे बघणारी मी एकटीच होते.

अर्थात इतिहासाची शिक्षिका म्हणून निरीक्षण चालले होते.

पण जास्त वेळ थांबू शकले नाही. तिथले ते उदास वातावरण!

या मम्मी भोवती गुढ वलय आहे. मृत्यू संदर्भात कोणालाच बोलावेसे वाटत नसते. ऐकावेसेही वाटतं नाही.

सामान्य माणसांना तर या प्रकरणापासून दूर राहणे आवडते.

फुलणारे फूल सुंदर व आश्वासक असते. ते देवावर वा देहावर वाहिले गेले तरी निर्माल्य झाल्यानंतर शेवटी ते मातीतच विसावते.

मम्मींचे गूढ या विषयावर आधारित अनेक इंग्रजी भयपट देखील येऊन गेले आहेत. बऱ्याचशा लोकांनी ते पाहिलेही असतील.

काहीं संशोधकांनी पिरॅमिडचेही संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे त्यातील मम्मीबद्दल जाणून घेण्यासाठी.

तर रोममधील कलोसियमच्या वाटेवर ही मम्मी अचानक वाटेत उभी दिसली. ते भिकार्यांने घेतलेले सोंग आहे हे जरा ऊशीरानेच कळले.

आता भिकारी फक्त मागास देशातच असतात असे नाही, पाश्चात्य देशात यांची संख्या नगण्य असते एवढेच! वरील चित्रात दिसणारा पुतळा म्हणजे एक कार्पोरेट भिकारीच म्हणायचा. हाडामासाचा माणूस पण काय बेमालून मेकअप केले होते त्याने. त्यासाठी त्याने कितीतरी भांडवल देखील खर्च केले असेल. अंगावर ताणून, चिकटवून बसवलेले सोनेरी कापड जसा काही सोन्याचा मुलामाच वाटत होता. त्याच्या पुढून जाताना जेव्हा त्याच्या पोटाजवळ त्याच्या हातांची हालचाल झाली तेव्हा कळलं हा जिवंत माणूस आहे. अर्थात थोडं दचकायलाही झालं. त्याच्या पायाशी ठेवलेल्या भांड्यात आपण चिल्लर पैसे(नव्हे युरो) टाकायचे असतात.

इटलीतील, रोम, पिसा येथे ''खिसा पाकीट संभालो'' असा इशारा घरादारातून दिला गेला होता. अर्थात आमची पाकीट संपूर्ण सहलभर शरीराचाच भाग झाली होती शिवाय त्यात महत्त्वाचा दस्तावेज होता पासपोर्ट! पोर्ट पास करायला तो हवाच ना. ईच्छा असूनही ही गुप्त तिजोरी उघडणे अशक्य होते समोरच्या फुटपाथवर रोमन सम्राट ज्युलियस सिझरचा भव्य आणि सुरेख पुतळा होता. हा मात्र खरा खुरा ब्राँझचा पुतळा होता. पुतळ्याच्या समोर दोन वादक एकमेकांपासून थोडे लांब वर आपल्या गिटार सदृष्य वाद्यांवर सुरेल धून वाजवीत होते .बऱ्यापैकी पोषाख केले होते त्यांनी. शेवटी ते तर युरोपमधीलच.

आमचा मँगो हॉलिडेज हा पर्यटक ग्रुप पाहून त्यांनी लगेच दिलवाले दुल्हनियाँ (DDLJ)ची छानशी, मशहूर धून वाजवायला सुरुवात केली. या लोकांची नजर व कान कसे तयार असतात ना! कोण कुठल्या देशातून अवतरलेत हे त्यांना पटकन कळते. परदेशात आपल्या हिंदी गाण्याची धून ऐकायला खूप छान वाटलं.

मात्र त्यांच्या समोरील टोपीत आणि हातरीवर फारशी चिल्लर मात्र पडली नाही.

रोम या इटलीच्या राजधानीला आम्ही दिनांक आठ मे (८/५/२०२३) रोजी भेट दिली भव्य परिसर पायी पायी हिंडून पाहताना पायांचे तुकडे मात्र पडले. मी आर्थरायटीसची दुखणेकरी पण जग भटकण्याची हौसच भारी त्यात इतिहास आणि भूगोल हे माझे अत्यंत आवडते विषय. माझी ही हौस भागली तब्बेतही छान राहिली.

I return home intact in one piece. असे सांगायला मी मोकळी.

सकारात्मकता बाकी काय?

**रोम करी रोमांचित**
**जगडव्याळ वारसा जपते**
**भग्न अवशेषातून मात्र**
**दुःखाचे उसाचे टाकते.**

**जगभरातून लोक सांडतात**
**माणूस माणसाची कला बघतो**
**त्या मागील क्रौर्य दिसताच**
**मनातून खिन्न होतो.**

**पुस्तकातून वाचावा इतिहास**
**डोळ्यांनीही तो बघावा**
**साधक बाधक वृत्तीने**
**त्यातून खरा धडा शिकावा**

❖



# किलोकभर हरबऱ्याईची गोठ

लेखिका
**विद्या भगतसिंग राणे**
अकोला

चला मंग आज आपुन येक 'सायन्स फिक्शन श्टोरी' वाचू!!

पोट्टं बेज्ञाच वाया गेलं भो अवं जवान लेकराले काई म्हंसान तं तो चाल्ला जाईन ना कुठी निंगून? येकच लेकरून न् ते बी डोयात सलते तुमच्या..

येकोन्ता येक वाचो न् उरावर नाचो' असं नको करू वं...जात अशीन तं जाऊ दे कुठीबी,पन दमळी देनार नाई! मीसूर नाई फुटली धळ न् लगन करून पायजे लेकाले! म्हतलं चांगलं निंगीन काट्टं...हा तं बावीशीतच चाल्ला लफळे क-याले.

पैशे बी कमावीनच ना तो! येकोन्ता येकच तं हाये. चाळीस येक्कर कोनासाटी हाये मंग?

मट झाली तू पोट्ट्यापाई. जमीनीत घाम गायल्याशिवई ते काईच देत नाई. का खळे गोटे खाईन जिंदगीभर? हे बांदर तुयाच्यानंच वाया गेलं. त्याले म्हना पैशे कमाव मंग बोल! काई नाई पायजे मले तुमचा पैसा...संग बांदून घिऊन जाजा. चाल्लो वं आई मी!–रूप्या

हौ, जातो जातो न् कायतं संध्याकाई घरी वापस! आता पैसा कमावून दाखो न् मंगच घरात पाय टाकजो.तर तं म्हनीन असलाच्या पोटचा!! असं म्हनून बापानं हात धरून घराभाईर काळ्लं!

आतापरेंत मजाकीत सुरू होतं पन हे लयच झाल्ती. रूप्या ज्या पोरीच्या मांग फिरे ते न् तिचे मायबाप बी शेजारून हे सरं पायत होते. रूप्यानंबी चलेंज स्वीकारलं होतं. माय लळे पळे...पन आज ना रूप्या आईके ना रूप्याचा बाप. रूप्या तानंतानं घरातून निंगाला.

बाबू, खरंच जात अश्शीन तं हे देवाची मूर्ती घिऊन जाय...हाच तुले तारीन असं म्हनून मायनं त्याले येक शंकराची पितयीची मूर्ती देली. तिच्याच मायबापानं तिच्या लग्नात पाच पितयीचे भांडे देल्ते. त्याचीच हे मूर्ती तिनं बनून घेतली होती. तिनं ते जबरदस्तीनं लेकाच्या हाती देली. रूप्या रागंतमं निंगाला तं खरा! पन हाती पैसा ना अधला? फक्त हे मूर्तीच!!

दोस्ताईनं समजावलं. राय म्हनत आमच्या घरी पन रूप्यानं ठरोलंच होतं का आता पूजीसंग लगन कराचं तं बुड्याले पैसा कमावून दाखवाच लागन. नित्या नं सांगलं का गंगाखेळ ले जत्रा हाये टेंबेश्वराची. तथीसा कुस्तीची स्पर्धा असते.''आपून तं जीकूच असा इच्यार करत तो गंगाखेळले गेला. भूक बम्म लागेल होती. लोकाईचे नवसाचे रोडगे होते. येका खटल्यानं त्याले जीऊ घातलं. मंदिराच्या पायरीवरून त्याले खेयन्यावाले, फुग्यावाले, पान–फुल–

परसाद वाले दिसले. चैत्रात नदी कुठी कुठी सोकली होती.रेती वर आली होती.शेती चांगली पिकल्याच्यानं लोकं काई काई ईकत घेत, दानधरम करत. खन–बांगळ्या पाऊन त्याले पूजीची भलकशी आठोन आली. ते भेटली तापासून तो लय सुदरला होता.

मान्सं कुस्ती पाहाले गर्दी करत. रूप्या बी तथी गेला. पन कुस्तीतले डावपेच कई त्याले मैत नोते. अन् अल्ली–अल्ली पैलवान पाऊन त्याले वाटलं लेक या स्पर्धेत मेल्यापेक्षा दुसरं काई पावू. शीर सलामात तं पगळी पचास!! रूप्या संध्याकाई येका भंडा–यात ज्यवला. आज सत्यपाल महाराजाचं किर्तन होतं बेज्ञा गर्दी झाल्ती. मंग मंदिराच्या आवारातच आंग टाकलं अन् बाजूलेच आईनं देयेल पितयीची शंकराची मूर्ती ठूली. घळीक वाटलं का हे इकून पैशे कमावाव.पन अशे कितीकच भेट्टीन? न् देव कसा ईकाव?... इच्यार करता करता त्याले आयडिया सापळली न् तो मस्तं झोपी गेला.

दुसऱ्या दिशी येका मोसमी साधूकून त्यानं कपळ्याचा जुगाळ केला होता. तसा त्याचा हँडसम बियर्डो लूक म्हंजे दाळीत तो खासच दिशे. त्यानं साऱ्या जत्रीच्या परिसरात गोठ सांगतली का आज संध्याकाई नदीच्या पात्रात शंकरजी प्रकट होनार हायेत. काही लोकाईले आश्चर्य वाटलं. काहीनं टिंगल केली. सरेजनं संध्याकायची वाट पाह्याले लागले. रूप्या डिट्टो साधूच दिशे. तीन–चार जनी बी त्याच्या आसपास फिरतांनी त्याले दिसल्या. यानं तिकळे ध्यान नाई देलं.कुठी घेता नस्ती आफत बावा!!चंदन लावून त्याचा देवाच्या नावाचा जप सुरू झाला. बरं झालं कालंच अंधश्रद्धा निर्मूलन समिती वाले सत्यपाल महाराज, गुल्लेरकार नरेंद्र इंगळे, चंद्रकांतदादा झटाले यीवून गेल्ते. आज त्याले काईच धोका नोता. अंदामंदातून तो येका ठिकानी पान्याचे शिपके मारे. सोताभावती त्यानं रिंगन आखून घेतलं. अगरबत्या, धुपबत्त्या सुरू झाल्या.अंदामंदात 'ओम रामरीमरोम' करून देवाले बलावत होतं. चार–पाच घंटे हे नाटक चालत रायलं. रूप्याभवती गर्दी वाहाळतच होती. अन् काय आश्चर्य शंकरजी सोता नदिपात्रातून भाईर याले लागले. कोनं अदिक जोळ यीवू नये म्हनून येक जन रिंगनाजोळ आला न् अचानकच चक्कर यीवून पळ्ला तसं लोकाईनं अंतर ठुलं. इच्यार केला–दूरच राहाव बा.. कायले नसती बिलामत!! ते रिंगनाभाईरच उभे रायले. अखीन घंटाभरानं मुर्ती जमिनीपासून जराक जास्तच वर आली... मंग पूरीच वर आली. रूप्या सोता रिंगनाभाईर आला. तशी सादूबाच्या पायावर डोक्सं ठुवाले मींीीरे गर्दी झाली. लोकं सादू बाले पैशे देत.सादू बा म्हने मले नोका दिऊ. हे जागृत देवस्थान हाये. अथीसा देवाचं मंदिर बांदाचं हाये, मंग तं पैशाचा पाऊसच पळ्ला कारन लोकायनं असा चमत्कार कदी पायलाच नोता. रात झाली. गर्दी कमी झाली. साक्षात शंकराचं दर्शन झाल्याची चर्चा लोकाईत होती. गंगाखेळच्या पाटलानं घरी चालाची सादुबाले इनंती केली. पन सादू मान्सासाटी सारं जग हेच घर असते. म्हनून मी टेंबेश्वराच्याच मंदिरातच राईन. पाटलानं तथीच सादूबाच्या ज्यवा–खावाची राहाची, येवस्ता केली.

आता रूप्याले आईची न् पुजीची बेज्ञा आठोन येये. च्यार पाच रोजानं त्यानं बायना करून मंदिर सोळ्लं. खुर्दा–नोटा मोजल्या... बाप्पा बाप्पा!! ईतले?? बापाचं चलेंज येका रातीतच पूरं केल्तं त्यानं. बस्स!! रूप्या पैदलच गावाकळे निंगाला. पायटी चार वाजता घरी पोचला. आईले आवाज देला. आईले वाटलं भास अशीन. बाप म्हने–पैशे कमावले अस्तीन तरच घरात घे, नाईतं दे हाकलून दिवट्याले!

आईनं जबरदस्ती दार उघळ्लं. रूप्यानं समोर झोयी केली. बाप आवाक् झाला. म्हने कुठी केली चोरी? मंग रूप्यानं सारी गोठ सांगतली.–

म्या लोकाईले देव प्रकट करून दाखोला नदीच्या पात्रातून!

कसा काय? बापानं डोये मोठे करून इच्यारलं.

नित्याले म्या त्याच्या घरून किलोकभर हरबरे न् इश्टिलचा उभट गंज आनाले लावला. ते हरबरे पान्यात भीजून कोळ्ल्या पात्रातल्या जमिनीत खड्डा करून गंज ठुला. हरबरे अदिक फुगले पायजे म्हनून तेच्यावर मंतर म्हनत पान्याचे शिपके मारो. अन् कोनी जौळ ना आलं पायजे न् लोकायले आपली आयडिया समजली ना पायजे म्हनून नित्या चक्कर यीवून पळ्ला. मंग तं लोकायले पक्काच इस्वास बसला का देव कोपते बा!!सरे दूरच उभे रायले.अन् माह्यं काम झालं.

हे आईकून रूप्याच्या बापाले बेज्ञाच हासा आला...पन पोट्टं हातचं जाईन म्हनून त्याले बुड्यानं बम्म शादोलं. रूप्या जीयाले बसला.

आईले बी हासा ये पन नव–याच्या रागापूळे तेबी काई बोलेना. जसा रूप्याचा बाप बैठकीत यीवून हाश्याले लागला तशी माय म्हने...बापा, शेंबळ्या पूजीसंगं लगन करासाटी कितिक बदमाशी केली काट्टट्यानं...आखरी तुमचंच पोरगं हाये...आदिक कसं अशीन?...तुमी माह्यासंग लगन कराले कमी टोले घेतले होते का?असं म्हनून रूप्याचे माय बाप दोगंई बम्म हाश्याले लागले. ❖



# जिव्हाळा

लेखिका
**प्रेरणा प्रदीप वाडी**
नागपूर

नेहा ऑफिसला आली पण तिच्या डोळ्याचे पाणी खळले नव्हते. मोठे मोठे टपोरे डोळे रडून रडून सुजून गेले होते. चेहरा उतरलेला होता.ती टेबलवर बसतात तिची बाजूची मैत्रिणी मुग्धाने तिच्याकडे पाहून खुणेने विचारले काय झाले? पण नेहाने काही नाही असे मानेनेच उत्तर दिले. आपले काम सुरू केले पण तिला वारंवार रडायला येत होते सारखी ती डोळे आणि नाक पुसत होती सारखा सुसू आवाज येत होता. शेवटी मुग्धा उठली आणि तिला बळेबळे कॉफी प्यायला घेऊन गेली. तिकडे गेल्यानंतर तिने तिला हळूच विचारली. नेहा म्हणाली अगं काही नाही; नेहमीचेच! रोज मरे त्याला कोण रडे! मी नशिबात कदाचित सुख घेऊनच नाही आली. काय करावे कळतच नाही. मी कितीही चांगले वागण्याचा प्रयत्न केला तरीही नावडतीचे मीठ आळणी अशी गत आहे. leave it. That which can't be cured must be endured. मुग्धा म्हणाली तुला हे सारे कळते पण तरीही तू का रडते? नेहा म्हणाली वाईट तर वाटतेस ना गं.

नेहा एका गरीब घरची मुलगी. वडील एका दुकानात काम करायचे नेहमी तोंडात तोबरा भरलेला असायचा आणि त्याने परिणाम दाखवलाच. तोंडाचा कॅन्सर झाला आणि त्याचाच त्यांचा अंत झाला. घरी दोन मुली आणि एक मुलगा. घरावरती कुऱ्हाड पडली पण आई धीराची; तिने चार घरचा स्वयंपाक पाणी सुरू केले आणि मुलांना मोठे करणे सुरू केले. मोठ्या मुलीचे लग्नही केले मुली दिसायला छान.मुलाला शिकवायचे म्हणून नेहाला मागे हटावे लागले. तशी ती बुद्धीची चांगली होती पण दोघांच्या शिक्षणाचा खर्च आई करू शकत नव्हती. म्हणून नेहाने एका खाजगी कंपनीत नोकरी पकडली. एम एस सी आय टी चा कोर्स तिने केला होता  ती लवकरच सगळ्यांची लाडकी झाली. कंपनीमध्ये नेहमी येणारा सुयश त्याला पाहिल्याबरोबर नेहा आवडली. गोरीपान, निरागस डोळ्याची, सोज्वळ आणि हसतमुख कोणालाही आवडेल अशीच होती.

सुयश चार्टर्ड अकाउंटंट आणि घरचा श्रीमंत होता त्याच्या आईचे म्हणजे भावनाताईंचे मोठे मोठे स्वप्न होते. त्यांना आपल्या मुलाचे लग्न त्यांच्याच तोला – मोलाच्या घराण्यातल्या मुलीशी थाटामाटाने करायचे होते. परंतु सुयश ऐकायला तयार नव्हता. मुलासमोर भावनाताईंना हार खावी लागली आणि नेहा व सुयशचे लग्न झाले अतिशय साधेपणाने लग्न झाले असे भावनाताईंना वाटत होते पण खरे तर नेहाच्या आईने त्यांच्याकडून जेवढे होईल तेवढे सगळे करण्याचा प्रयत्न केला होता.पण  सगळी सोंग आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही.

नेहा सासरी  झाली. नव्या नवलाईचे चार दिवस जात नाही तोच तिच्या लक्षात आले भावनाताई तिचा सतत रागच करतात त्यांची नाराजी पदोपदी त्या जाणवून देतात सुयशच्या समोर काही बोलत नाही.पण तो समोर नसेल

तर नेहाला नबोलण्याची एकही संधी त्या सोडत नाही आणि तिच्या घराण्याचा उद्धारही करायला मागेपुढे पाहत नाही.

सुयश ला सांगितले पण सुयशला ही माहित होते मारणार्याचा हात धरता येतो बोलणाऱ्याचे तोंड कसे धरायचे. त्याने तिला दुर्लक्ष करायला सांगितले.

दिवस उलटत गेले परंतु ह्या प्रकारात काहीही बदल झाला नाही. दोन वर्षानंतर सुयशच्या धाकट्या भावाचं म्हणजे सुजयचं लग्न झालं ते मात्र भावनाताईंनी अगदी तोलामोलाच्या घरातली, भरपूर शिकलेली, मोठ्या पगाराची श्रीमंत घरची एकुलती एक मुलगी पाहिली. दुसऱ्या सुनेचे म्हणजे श्वेताचे पारडे नेहमी करता जड राहिले. आता तर घरात उठसूट नेहाचा पाणउतारा आणि श्वेताचे कौतुक सुरू झाले.

सध्या सुयश तीन महिन्यासाठी लंडनला गेला आहे. या तीन महिन्यांमध्ये भावनाताई इतक्या विचित्र वागत आहेत की जणू काही त्यांना हिंदी सिरीयल मध्ये दाखवतात असे नेहाला कसेही करून घरातून हाकलूनच लावायचे आहे. श्वेताची ही त्यांना छुपी साथ आहेत.

नेहा समजूतदार आहे आणि तिचे घरचे संस्कारही खूप छान आहेत. म्हणून ती सारे सहन करते पण प्रत्येक गोष्टीला एक अंत असतो. तिने कसेबसे तीन महिने काढले. सुयश वापस आला आणि एकदा त्याने आईचे मुक्ताफळ स्वतःच ऐकले आणि श्वेताची बडबड ही ऐकली मग त्याचा पारा तडकला. आणि त्याने ताबडतोब वेगळा संसार मांडला.

सुयश आणि नेहा गेल्यानंतर भावनाताईंचा पारा अधिकच भडकला. आणि त्यांनी रागारागाने सगळी इस्टेट घरदार सुजय च्या नावाने करून टाकले. एकदा सगळी इस्टेट हातात आली आणि श्वेताचे रंग बदलले नेहमी भावना ताईंच्या पुढे पुढे करणारी आता ती पूर्णपणे त्यांना दुर्लक्ष करू लागली आणि प्रसंगी भांडू आणि बोलूही लागली. त्यांनी सुजयला सांगण्याचा प्रयत्न केला पण श्वेताने पहिलेच सुजयचे कान भरून ठेवले होते तो आईलाच बोलू लागला. हा भावनाताईं करता फार मोठा धक्का होता. आता रोजच घरात भांडण होऊ लागले शेवटी एक दिवस भावना ताईंची रवानगी वृद्धाश्रमात करण्याचे ठरले. ही बातमी एका नातेवाईकांकडून नेहाला कळली आणि तिला जबरदस्त धक्का बसला.

नेहा डिस्टर्ब दिसली म्हणून मुग्धाने पुन्हा विचारले आता काय झाले? तर नेहा म्हणाली ही श्वेता इतकी वाईट वागू कशी शकते. आणि तिने झालेले सगळे मुग्धाला सांगितले. मुग्धा म्हणाली बरे झाले त्यांना त्यांच्या करणीचे फळ मिळाले. परंतु नेहाला ते अजिबात आवडले नाही.

ती म्हणाली तू अशी कशी बोलतेस? या वयात त्यांना वृद्धाश्रमात पाठवून आम्हाला कुठले सुख मिळणार? मुग्धा म्हणाली अग ह्याच तर पहिले तु् तुला नेहमी त्रास द्यायच्या. नेहा म्हणाली की हो, पण त्या वागल्या तसेच मी वागावे काय? काही झाले तरी त्या माझ्या सासूबाई आहेत. सुयशच्या आई आहेत.आपली आई आपल्याला बोलत नाही काय? तेव्हा पण आपण रडतो, गुरफटून बसतो, जेवत नाही म्हणून आईला सोडून निघून जातो काय? खरे तर आपल्या आईकडे आपण फक्त वीस–पंचवीस वर्षेच असतो पण आयुष्यातले जास्तीत जास्त वर्ष आपण सासू सोबतच असतो.आपल्या करता यशोदामाई असतात.आई आपल्याला जन्माला घालते लहानाची मोठी करते,पण जगात कसे वागावे, संसार कसा करावा, व्यवहार कसा चालवावा अशा बऱ्याच गोष्टी ही यशोदा माईच आपल्याला शिकवते. आणि आज त्यांचे वय नाही की आपण त्यांच्या चुकांची त्यांना शिक्षा देऊ.

नात्यातला जिव्हाळा पण काही असतो ना? काठी मारून कधी पाणी दुभंगते काय? मग रक्ताचे नाते पातळ असते काय?

तिने ऑफिसमध्ये सुट्टी टाकली.आणि सुयश ला घेऊन सरळ वृद्धाश्रमात जाऊन पोहोचली. भावनाताईंना वाटले आता ही आपल्याला बोलणार. त्यांच्या डोळ्यात पाण्याच्या धारा येऊ लागल्या. पण नेहा धावली रुमालाने त्यांचे डोळे पुसले आणि म्हणाली आई एकदा तर मला आवाज द्यायचा होता मी होते ना.चला आम्ही तुम्हाला न्यायला आलो आहे. भावनाताई बघतच राहिल्या त्या म्हणाला पण मी तुझ्यावर फार अन्याय केला. नेहा म्हणाली झाले गेले गंगेला मिळाले. चला आम्हाला तुमची आजही गरज आहे आणि मुख्य म्हणजे जान्हवीला आजी हवी ना!

भावनाताईंनी डोळे पुसले. नेहाला जवळ घेतले आणि म्हणाल्या एकदा मला माफ कर ग. जगात पैशापेक्षा संस्कार मोठे असतात हे मला जरा उशिरा कळला. आणि नात्यांमध्ये घराणे पैसा नाव यापेक्षा प्रेम आणि जिव्हाळा पहावा हे तुझ्या कृतीतून शिकवून दिलेस. नेहाने त्यांच्या ओठावर बोट ठेवले. आणि त्यांचे सामान भरणे सुरू केले. जानवी आजीला बिलगली आणि सुयशला कितीतरी दिवसानंतर मनातून आनंद झाला.

❖

# मी पाहिलेली माझी मुंबई



लेखिका
**ललिता गवारी**

३० डिसेंबर २०१६ रोजी मुंबई येथील माझगाव कार्यालयात मी रुजू झाले. ज्या दिवशी रुजू झाले त्या दिवशी मी नवीन ठिकाणी खूप भेदरलेली होते. माझ्या मॅडम रजेवर असल्याने आमचा कार्यभार राज्यकर उपायुक्त दिप्ती दळवी मॅडम यांच्याकडे होता. मॅडमने माझ्याकडे पाहिलं आणि त्या बोलल्या,''ही मुंबई आहे. इथे असं नाही राहायचं. एकदम मस्त आणि आनंदी राहायचं.'' त्यानंतर या दोघी मॅडमने आणि त्यानंतर आलेल्या सर्व आदरणीय किरण सोनवणे मॅडम, उत्तरवार साहेब, वसुधा धुमाळ मॅडम, कृष्णा बोडखे साहेब, अविनाश शिंदे साहेब अशा सर्वच वरिष्ठांनी कायम खूप चांगलं मार्गदर्शन केले. तसेच, आमचे सहआयुक्त आदरणीय हेमंत कापगते साहेब व आदरणीय जयंत पाटील साहेब यांचं सर्वच बाबतीत असलेलं पाठबळ कामाचा दर्जा आणि वेग वाढवत गेलं. त्याचप्रमाणे कामाच्या बाबतीत माझे बॅटचमेट्स काही पुण्याहून एक वर्ष आधीपासून इथे रुजू असलेले यांनी प्रत्येक अगदी छोट्या छोट्या गोष्टीत खूप मदत केली. माझ्यासोबत प्रमोशन झालेले माझे बॅटचमेट्स आणि माझगाव कार्यालयातील अनेक सहकारी, वरीष्ठ यांची कार्यालयीन इतर सर्व दैनंदिन बाबी सुरळीत करण्यात खूप मदत झाली. असे सर्वच जण आता जिवाभावाचे मैतर झाले आहेत. भाग्यश्री भेटली. मग सुजाता, पवित्रा. असा हळूहळू मैत्रिणींचा लवाजमा देखील वाढत गेला. पुणे कार्यालयातील सांस्कृतिक मंडळाचा वाईट अनुभव असल्याने मी मंत्रालयाच्या सचिवालय जिमखान्यात प्रवेश घेतला. तिथून माझ्या गाण्याची गुणवत्ता वाढत राहिली आहे. सचिवालय जिमखाना हे माझं मुंबईतील तिसरं घर आहे. या घरातील माणसे तर लाजवाब आहेत. पहिलं घर ते जिथे मी राहते आणि दुसरं घर म्हणजे माझं ऑफिस ज्याच्यावर माझं खूप प्रेम आहे. कारण, ऑफिसमुळेच मी मुंबईशी कायमची जोडली गेले आणि इथले सहकारीही कमाल

आहेत. तसेच, मुंबईमध्ये लोकलच्या कोणत्याही प्लॅटफॉर्मवर तुम्हाला गाड्यांची अचूक माहिती मिळते त्यामुळे प्रवास करताना कधीच चुकायला होत नाही.

मुंबईच्या पावसाबद्दल तर आपण सगळे ऐकून आहोतच. मुंबईचा पाऊस मी देखील अनुभवला. २०१७ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये मला बाहेरगावाहून यायला उशीर झाला म्हणून उशिरा ऑफिसला निघाले होते. पाऊस खूप जोरात सुरू होता. गाडी चुनाभट्टी आणि जीटीबीनगरच्या मध्ये बराच वेळ थांबली. मला ऑफिसला यायला खूपच उशीर होतोय असा फोन माझ्या वरिष्ठांना मी केला. पुढे पूर्ण पाणी साचले असल्याने गाडी पुढे जात नव्हती. काही वेळाने लोक खाली उतरून चालत चुनाभट्टी स्टेशनकडे जाऊ लागले. प्रत्यक्ष अनुभव नसला तरी २६ जुलैच्या पावसाबद्दल वाचून बरेच काही माहिती असल्याने काय करायला हवं याचा विचार करत आमच्या फर्स्टक्लास मधल्या मुलींना मी विचारलं तर त्या बोलल्या आम्ही नाही उतरणार. मी बघितलं खाली उतरायला खूप खोल होतं. मोठ्या वनस्पती वाढल्या होत्या आणि प्रचंड घाणही होती. मी थोडा वेळ विचार केला आणि निर्णय घेतला. मी त्या मुलींना म्हटले मी उतरतेय, ज्यांना यायचं असेल त्यांनी चला. मग मात्र त्या म्हटल्या अगर आप जा रहें हो तो हम भी आयेंगे. तिथून चाललेल्या एका व्यक्तीला हात द्यायला सांगितला आणि मी उतरले. मग मी त्या लोकांना विनंती केली की या मुलींना पण उतरवून द्या. पण, मुली त्या लोकांची मदत घ्यायला तयार नाहीत. त्या म्हणाल्या आप ही हमे नीचे उतारो. माझाही नाईलाज झाला त्यांना मी तिथेच सोडून ही जाऊ शकत नव्हते. मी त्या सात जणींना उतरवून घेतले. अशा प्रकारे सर्वजणी उतरलो आणि त्या घाणीतून चालत चुनाभट्टी गाठलं. तिथे कोणाला कुठे जायचे आहे याप्रमाणे आम्ही आमचे ग्रुप केले. आम्ही चौघीजणी त्या धुव्वाधार पावसात चालत सायनला गेलो. तिथेही टॅक्सीसाठी फिरत राहिलो. एवढया पावसात महत्प्रयासाने एक टॅक्सी मिळाली आणि आम्ही जीव मुठीत धरून घरी पोहोचलो. विशेष बाब म्हणजे यातल्या आम्ही कोणीही एकमेकींच्या कुठल्याही प्रकारे ओळखीच्या नव्हतो. पण, त्यावेळी आम्हीच एकमेकींचा आधार झालो होतो.



ऑफिसमधल्या मित्रांना फोन करून सांगितलं, एस.एम.एस. करून सांगितलं की निघा, गाड्या बंद झाल्या आहेत पण कोणीही तेवढं गांभीर्याने घेतलं नाही. साहजिकच, अनेकांना कार्यालयात मुक्काम करावा लागला तर ज्यांची लहान मुले होती ते भर पावसात तसेच पुढे निघाले आणि रात्री १/२ वाजता घरी पोहोचलो.

इतकं सगळं होऊनही माझं मुंबईवर निरतिशय प्रेम आहे. कारण, या शहराला माणुसकी आहे.

या मुंबईने मला काय दिलं नाही? माझ्यावर खूप प्रेम करणारी, सतत माझ्या अवतीभवती राहणारी माझ्या मदतीसाठी तत्पर असणारी माणसे दिली. माझी कलाक्षेत्रातील कामगिरी उंचावली. माझी सलग तीन वर्षे अखिल भारतीय नागरी सेवाच्या नृत्य व संगीत स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड झाली आणि दरवर्षी बक्षिसेही जिंकली. मला राज्य नाट्य स्पर्धेत जीएसटी विभागाच्या नाटकात काम करण्याची तसेच झी मराठीवर गायनाच्या स्पर्धेत जीएसटी विभागाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. विविध अभिनय संस्था आणि कलाक्षेत्राशी संबंधित व्यक्तींसोबत ओळखी झाल्या आणि त्यांच्यामुळे अभिनय क्षेत्रातही पुढे जाण्यास मदत होते आहे. शब्दवेल साहित्य समूहाचा पाया इथेच रचला गेला आणि मी शब्दवेलचा अविभाज्य बनून गेले. बाहेरून आलेल्या प्रत्येक व्यक्तीला ही मुंबई आपल्यात सामावून घेते. मुंबईतील मित्रमैत्रिणी, बाहेरचे लोक सर्वांनीच मला कधीच परकेपणाची जाणीव होऊ दिली नाही.

आणि म्हणूनच, मुंबई मेरी जान हैं. ❖



# काळजातली आठवण

**लेखिका**
**प्रणिता पापळकर**
पार्वतीनगर, अमरावती

आठवणी जपतोय न आपण... होय जपतोय.

मात्र केव्हा? जेव्हां ती गोष्ट किंवा ती व्यक्ती आपल्या बरोबर नसते तेव्हा. होय नं आणि मग आपल्या ला आठवणी आठवतात म्हणजे ते कश्या प्रकारे होती वगैरे....

पण तुम्ही कधी ते असताना त्यांना नीट जपताय का..?

नक्कीच जपत असणार कारण जेवढं आपण आत्ता च्या काळात जगतो नं हा चालू क्षण, आत्ताचा क्षण हा असतो जगण्याचा. हा आत्ताचा क्षण निघून गेला की तो आठवणीतच राहतो.

जगण्यासाठी कोणतीही गोष्ट किंवा कोणत्याही व्यक्ति साठी आपल्याला काही व्यक्त करावयाचे असल्यास ते 'आत्ताच' या क्षणी केले पाहिजे. म्हणजेच मन मोकळे करायला पाहिजे, जगायला पाहिजे, त्यांना प्रेम द्यावयास पाहिजे. कारण ही वेळ, हा क्षण, हा दिवस निघून गेला की ते एक आठवण म्हणा किंवा स्वप्न म्हणून राहून जात...

हे समजा आणि जगायला शिकायला पाहिजे नक्कीच...

माझे बाबा खुप काही गोष्टी मिळविल्या त्यांनी... त्यांच्या कडुन आनंदी राहणे बिनधास्तपणे जगणे बरच काही शिकलो आम्ही त्यांच्याकडून. ईतरांना आपल्या बोलण्यातून हसवून लावत. ह्या सगळ्या गोष्टींच्या आठवणीन आजही ते माझ्या सोबतच आहेत.

आज छान मस्त केक बनवला असता मी, अजुन खुप काही, खुप छान आनंदी दिवस असता, जर आज बाबा असते......

हो मला माहीती आहे आजही त्यांच्या आठवणीत ते नेहमी माझ्या सोबत असतात. मला सुखावतात पण तरीही खुप कमी वाटते त्यांची.

आज आई आणि बाबां साठी त्यांच्या आयुष्यातला खास दिवस.... लग्नाचा वाढदिवस!

कोणत्याही नात्याची सुरवात ही नकळतच होते, नात्यात असलेल्या व्यक्ति मुळे त्यात गोडवा असतो, सतत एकमेकांचा साथ असतो असे हे नात असतं.. त्यातील एक जरी मागे सोडून गेला तर आयुष्य जस कोरड पडतं, पण हिम्मत, धाडसान पुढील मार्गक्रमना करणे भागच असते. माझ्या आई सारखे, ज्या माउलीन किती हालअपेष्टा भोगून बाबाच्या आठवणीत राहून आयुष्याच्या वाटेवर स्वतः सोबत आम्हा तीन भावंडांना सांभाळले पण यात जणू स्वतः ला विसरली, फार मोठे संकट आले होते, पण त्यातून तिने चांगल्या प्रकारे संयम बाळगून त्यावर मात केली आणि बाप्पा तर नेहमी सोबत होतेच आणि असतात आज तिने खुप सांभाळल तळहाताच्या फोडावाणी सर्व भावंडांना. बाबांची आठवण तर येतेच पण आम्ही नेहमी तुझ्या सोबत आहे, होतो आणी सदैव राहीन.तुझ्या चरणाशी नतमस्तक राहू. बाबा गेल्यापासूनतुच आमची आई व तुच आमचा बाबा झालीस.. अन् काहीच कमी पडू दिले नाहीस. आमच्यावर आभाळमाया केली. वटवृक्षाप्रमाणेसावली धरली. उन्हाचे चटकेतू सहन केलेस... आई थोर तुझे उपकार

❖



# अहंकार

लेखक
**शंकर कुंडलिक गोपाळे**
(नवी मुंबई)

व्यक्ती आपलं व्यक्तिगत व सामाजिक जीवन जगत असताना प्राप्त ज्ञान, बुद्धी, कौशल्य आणि कर्तृत्वाच्या जोरावर आपले अस्तित्व निर्माण करत असतो. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असताना व्यक्तिपरत्वे भिन्नता जाणवते आणि ती असतेच. ही भिन्नता बुद्धी, कौशल्य इ.अनेक गोष्टींमध्ये असते. त्यासोबत भिन्नता असते ती स्वभावामध्ये. आपला स्वभाव ही आपली एक विशेष ओळख असते; पण या स्वभावाला जर अहंकाराची झालर असेल तर तुम्ही कितीही ज्ञानी,दानी असाल त्याला किंमत राहत नाही. 'विद्या विनयन शोभते' हे सुवचन आम्हाला त्याची जाणीव करून देत असते.

माणसाने ज्ञानाचा, धनाचा, रूपाचा अथवा कशाचाही अहंकार करू नये. अहंकारामुळे माणूस माणसापासून दुरावतो. अहंकार माणसाला विनाशाकडे घेऊन जातो. अहंकारी माणूस दृष्टी असूनही आंधळा होतो आणि ज्ञान असूनही मध्ये मतीभ्रष्ट होतो. अहंकारामुळे रावणाचा नाश झाला. रावणासारखा तपस्वी, ज्ञानी आणि गर्भ श्रीमंत राजा दुसरा नाही; पण वाढत्या सामर्थ्याबरोबर त्याचा अहंकार वाढत गेला परिणामी त्याचा शेवट असा झाला. संस्कारामुळे माणूस जग जिंकू शकतो आणि ते जिंकलेलं जग अहंकारामुळे गमावू शकतो. संस्कारी माणूस नम्र असतो. तो स्वतः वाकण्यात धन्यता मानतो याऊलट अहंकारी माणूस दुसऱ्याला दाखवण्यात धन्यता मानतो.

चार वेदांचा सार सांगणारी अभंग गाथा लिहिणारे संत तुकाराम महाराज म्हणतात, ''आपुलिया बळे नाही मी बोलत/ सखा कृपावंत वाचा त्याची''/. किती तो नम्रपणा. अहं ची भावना व्यक्ती विकासात अडसर ठरते. भले तुमचे हात आकाशाला भिडू द्या पण त्याच वेळी तुमचे पाय जमिनीवर असू द्या. आपल्या सुसंस्कार आणि सुस्वभावातूनच माणूस माणसाच्या हृदयावर अधिराज्य गाजवू शकतो. सर्वांच्या मनात आदराचं स्थान मिळवू शकतो.

'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती' हे सुवचन आम्हाला अहंकार व नम्रपणा यातील फरक स्पष्ट करून देते. माणसाने भलेही खूप धन-वैभव मिळवावं पण सोबत दुसऱ्यांसाठी आदर, स्नेह, जिव्हाळा, आपुलकीसारखे भाव मनात जपले तर त्या धन-वैभवाला तो माणूस खऱ्या अर्थाने जगतो. याउलट श्रीमंतीचा अहंकार झालेला माणूस स्वभावाने गर्विष्ठ असतो. तो इतरांचा तिरस्कार करतो. अहंकारी माणसाला दुसऱ्याचं दुबळेपण व स्वतःच निराळेपण सांगण्याची भारी हौस असते. माणूस श्रीमंत असला काय नि गरीब असला काय शेवटी मातीचा देह हा मातीतच जाणार असतो.

थकलेल्या शिकलेल्या मनाने जर मंत्रमुग्ध करणारी बासरी ऐकली तर क्षणात मन प्रसन्न-प्रफुल्लित होऊन जाते. अशी ही बासरी बनवण्यासाठी जो बांबू लागतो तो विशिष्ट तिथी सोडून तोडला जातो. पंचमी, सप्तमी, अष्टमी, नवमी व दशमीला तोडला तर कीड लागते कारण यात 'मी' पणा आहे. 'मी' पणाच्या अहंकारातून कार्यनाश होतो आणि बासरी टिकत नाही असा समज आहे. ह्यातून खूप मोठी शिकवण मिळते. आपल्या योग सामर्थ्याच्या जोरावर शेकडो वर्षे जगणाऱ्या चांगदेवांना ही अहंकार झाला होता; पण शेवटी त्यांचा अहंकार लोप पावला. ह्याच अहंकाराविषयी बोलताना संत नामदेव महाराज म्हणतात की ''अहंकाराचा वारा न लागो राजसा माझ्या विष्णूदासा भाविकांसी''. अहंकाराला गाडून स्वभावश्रीमंत होऊन जगण्यात धन्यता आहे.

❖



# केपलर
## शोध नव्या जीवसृष्टीचा


**लेखक**

**राहुल बोर्डे**

**पुणे**


या या अंतहीन ब्रम्हांडात आपण एकटेच आहोत की अजूनही कुठे जीवसृष्टी आहे? या मानवाला पडलेल्या प्रश्नाचे अजूनही ठोस उत्तर प्राप्त झाले नाहीये. २० वे शतक हे वैज्ञानिक प्रगतीचे शतक होते. युरी गागारीनच्या रूपाने पहिला व्यक्ती अवकाशात पाठवणे, नील आर्मस्ट्राँगच्या रूपाने पहिले पाऊल चंद्रावर ठेवणे, मंगळावर रोवर बग्गी उतरवणे असे वैज्ञानिक प्रगतीचे अनेक टप्पे मागील शतकात यशस्वी झाले. २१ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत आपल्या सूर्यमालेतील आठ ग्रह तसेच त्यांच्या सर्व उपग्रहांचा अभ्यास नासा सारख्या अंतराळ संशोधन संस्थेने पूर्ण केला होता. या सर्व ग्रहांच्या अभ्यासातून जीवसृष्टीचाही शोध घेण्याचा प्रयत्न झाला. मंगळ ग्रहाचे वातावरण जीवसृष्टीला पोषक असल्याचे आजपर्यंत अनेक अंदाज वर्तवले गेले. मागील ३० वर्षात जीवसृष्टीची शक्यता पडताळून पाहण्यासाठी या ग्रहाचा सतत अभ्यास चालु आहे.

२००९ साली नासा या अमेरिकन अंतराळ संस्थेने वैज्ञानिक प्रगतीचे पुढचे पाऊल टाकण्यासाठी अजुन एक महत्त्वाचा निर्णय घेतला. हा निर्णय होता जीवसृष्टीची शक्यता पडताळून पाहण्यासाठी आपल्या सूर्यमाले बाहेरील ग्रहांचा अभ्यास करणे. यासाठी विश्वाचा अभ्यास करता येईल असा उच्च क्षमतेचा एक टेलिस्कोप बनवण्यात आला. या टेलिस्कोप वरील कॅमेरा ९६ मेगा पिक्सलचा होता. या टेलिस्कोपला नाव देण्यात आले केपलर. मुळात केपलर हे खगोलशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या एका जर्मन शास्त्रज्ञाचे नाव होते. या टेलिस्कोपचे ७ मार्च २००९ साली प्रक्षेपण करण्यात आले आणि अंतराळात हा टेलिस्कोप स्थापित करण्यात आला. या टेलिस्कोपचा मूळ उद्देश होता आपल्या सूर्यमाले बाहेरील आणी मिल्की वे या आपल्या आकाश गंगेतील ग्रहांचा अभ्यास करणे. अशा ग्रहांना एक्सो प्लॅनेट म्हणतात.

या टेलिस्कोपने २००९ ते २०१८ या नऊ वर्षाच्या काळात आपल्या सूर्यमाले बाहेरील साधारणतः २६६२ ग्रहांचा अभ्यास केला. या ग्रहांचा अभ्यास करण्यासाठी ट्रांझिट मेथडचा वापर करण्यात आला. ट्रांझिट मेथड म्हणजे एखाद्या तार्याच्या दिशेने टेलिस्कोप स्थापित करून त्या तार्याच्या प्रकाशाची तीव्रता तपासली जायची. आणि

तार्याच्या प्रकाशात अडथळा जाणवला किंवा प्रकाशाची तीव्रता कमी होताना जाणवली तर त्या ताऱ्याभोवती एखादा ग्रह फिरत आहे असे अनुमान काढले जात असे. या २६६२ ग्रहांपैकी अनेक ग्रह त्या ठराविक सूर्यमालेत ताऱ्या भोवती हेबीटेबल झोन मध्ये फिरत आहेत असे देखील लक्षात आले. हेबीटेबल झोन म्हणजे एखाद्या सूर्यमालेतील ग्रहाचे असे स्थान जिथे तापमान पाणी द्रवरूपात राहण्यास पोषक आहे. आपल्या सूर्यमालेत पृथ्वी आणि मंगळ हे दोन ग्रह हेबीटेबल झोन मध्ये सूर्याभोवती फिरत आहेत. म्हणूनच मंगळ ग्रहावर देखील जीवसृष्टीची शक्यता वारंवार तपासली जात आहे.

कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टीच्या उत्पत्तीसाठी सर्वात महत्त्वाचा घटक आहे पाण्याचे अस्तित्व. त्यातही पाणी द्रव स्वरूपात उपलब्ध असणे जास्त महत्त्वाचे. आणि हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्या ग्रहावरील तापमान पृथ्वीवरील तापमानास मिळते जुळते आहे. एखादा ग्रह ताऱ्याच्या खूपच जवळ असेल तर अति तापमानाने तेथे पाण्याची वाफ होऊ शकते. तसेच ग्रह खूप दूर असेल तर फारच कमी तापमानाने पाण्याचा बर्फ होऊ शकतो. म्हणूनच जीवसृष्टीची शक्यता पडताळून पाहायची असेल तर सूर्यमालेतील त्या ग्रहाचे स्थान हेबीटेबल झोन मध्ये असणे महत्त्वाचे आहे. पण एखादा ग्रह फक्त हेबीटेबल झोन मध्ये आहे म्हणजे लगेच जीवसृष्टीची निर्मिती होऊ शकते असे नाही. त्या ग्रहाची भूगर्भिय संरचना आणी वातावरण देखील पृथ्वीशि मिळते जुळते हवे.

केपलर टेलिस्कोपने आपल्या सूर्यमाले बाहेरील जेव्हा २६६२ ग्रहांचा अभ्यास केला तेव्हा यातील बरेचसे ग्रह हेबीटेबल झोन मध्ये असल्याचे निदर्शनास आले. मात्र जीवसृष्टीच्या निर्मितीसाठी सर्व निकष पूर्ण करतील अशा ग्रहांची संख्या साधारणतः १६ होती. यातील काही प्रमुख ग्रहांची नावे म्हणजे १६४९ सि, १८६ एफ, ४५२ बी, प्रोक्सीमा सेंचुरीयन बी. यापैकी १८६ एफ या ग्रहाला पृथ्वीचा भाऊ म्हणुन संबोधले जाते. हा ग्रह केपलर १८६ या सूर्यमालेत आहे आणी पृथ्वी पासून साधारणतः ५०० प्रकाश वर्ष दूर आहे. प्रकाश वर्ष हे प्रकाशाच्या गतीवरून अंतर मोजण्याचे साधन आहे. प्रकाश एक सेकंदाला ३ लाख किमी प्रवास करतो. जर आपण प्रकाशाच्या वेगाने प्रवास केला तर पृथ्वीवरून या ग्रहावर पोहोचण्यास ५०० वर्ष लागतील.

केपलर १८६ एफ हा ग्रह आकारमानाच्या बाबतीत पृथ्वीपेक्षा १.१ व्यासाने मोठा आहे. या ग्रहाचे वस्तुमान आणि गुरुत्वाकर्षण शक्ती ही पृथ्वी समानच आहे. हा ग्रह त्या सूर्यमालेतील ताऱ्यापासून ५.५ करोड किमी अंतरावर असून ताऱ्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास १३० दिवसाचा कालावधी घेतो. या सूर्यमालेतील तारा आपल्या सूर्यापेक्षा ६० टक्के कमी प्रकाशमान आहे त्यामुळे या ताऱ्यास रेड डार्क तारा म्हणले जाते. हा तारा कमी ऊर्जा देत असल्याने या ताऱ्याचे आयुष्य मात्र आपल्या सूर्या पेक्षाही जास्त आहे. १८६ एफ हा ग्रह त्या सूर्यमालेत पाचव्या स्थानी असून हेबीटेबल झोनमध्ये येतो. या ग्रहावर पडणारा ताऱ्याचा प्रकाश लाल रंगाचा आहे. यदाकदाचित या ग्रहावर जर झाडे किंवा वनस्पती असतील तर त्या लाल रंगाच्या असण्याची दाट शक्यता आहे. केपलर टेलिस्कोपने ज्या १६ ग्रहांवर जीवसृष्टीची शक्यता वर्तवली त्यामध्ये १८६ एफ हा सर्व निकष पूर्ण करण्याच्या बाबतीत प्रथम स्थानी असणारा एक्सो प्लॅनेट आहे.

आज पृथ्वीवर विकसित केलेल्या आणी सर्वोच्च गती प्राप्त करू शकेल अशा कोणत्याही तंत्रज्ञानाने या ग्रहापर्यंत आज घडीला पोहोचणे शक्य नाही. आपल्या सूर्यमालेच्या बाहेर आणी जीवसृष्टीची शक्यता आहे असा सर्वात जवळचा ग्रह म्हणजे प्रोक्सीमा सेंचुरीयन बी. हा ग्रह पृथ्वीपासून ४.५ प्रकाश वर्ष दूर आहे. पृथ्वीवर सर्वोत्तम गती प्राप्त केलेली स्पेस शिप होरायझन ने या ग्रहावर पोहोचण्यास साधारणतः ६५०० वर्ष लागतील. आजपर्यंत नासा संस्थेने प्रक्षेपित केलेल्या आणी आपल्या सूर्यमालेच्या बाहेर जाण्यात यश प्राप्त केले आहे असे वायजर किंवा होरायझन नावाने प्रसिद्ध आहेत अशा बोटावर मोजण्या एवढ्या स्पेस शिप आहेत. या स्पेस शिप भविष्यात एखाद्या एक्सो प्लॅनेट च्या सानिध्यात जातील की नाही हे आत्ताच सांगणे अवघड आहे.

केपलर टेलिस्कोपने ९ वर्षाच्या कार्यकाळात सूर्यमालेच्या बाहेरील आणि मिल्की वे या आपल्या आकाशगंगेतील ताऱ्यांचा आणि ग्रहांचा अभ्यास केला. मात्र हे प्रयत्न खरच पुरेसे आहेत का? कारण मनुष्याला पृथ्वीवरून किमान उघड्या डोळ्यांनी बघता येईल अशा विश्वाची व्याप्ती किमान ९२ अब्ज प्रकाश वर्ष आहे. जीवसृष्टीची शक्यता पडताळणारी प्राप्त झालेली माहिती आज प्राथमिक स्वरूपात उपलब्ध आहे. आज काढलेले निष्कर्ष कदाचित भविष्यात खरे देखील सिद्ध होतील मात्र आपल्याला अजून थोडी वाट बघावी लागेल. आजच्या निष्कर्षांना बळ देण्यासाठी वैज्ञानिक प्रगतीचे नव नवीन टप्पे देखील गाठावे लागतील. २०21 साली नासाने प्रक्षेपित केलेल्या जेम्स वेब या नव्या टेलिस्कोपने नवीन शोध लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. जसे आपण कोणाला तरी शोधत आहोत तसेच कोणीतरी आपल्याला देखील शोधत आहे का ही शक्यता देखील वैज्ञानिक कसोटीवर तपासून बघावी लागेल. ❖

# मोठा गूळ



लेखिका
**अनुराधा रत्नाकर उपासे**
मंगरूळ, ता. तुळजापूर, जि. उस्मनाबाद

नेवारीचा पहिला आठवडा होता म्हणजे इंग्रजी नव वर्षाची सुरुवात. सगळीकडे निसर्ग हिरवळीने नटलेला दिसत होता झाडे वेली फुलांनी भरल्या होत्या. वातावरण अगदी प्रसन्न होत. आणि बायका खूपच आनंदी होत्या. कारण त्यांच्या आवडीचा सण संक्रांत जवळ आला होता. त्यामुळे प्रत्येक स्त्री घर स्वच्छ करण्यात मग्न होती. भांडे घासणे, पडदे बदलणे, तोरण लावणे, सोफ्याचे कव्हर बदलणे, गालिचे स्वच्छ आहेत का पहाणे, अशी अनेक कामे करत होत्या जेणे करून घर नीटनेटके व सुशोभित दिसेल. हे करत असतानाच स्त्रीयांच्या मनात अनेक विचार घोळत होते, जसे की संक्रांतीसाठी साडी कसली घ्यायची, दागिने कुठले घालायचे, वानासाठी काय घ्यायचे. काहींनी तर ठेवणीतल्या रेशमी साड्या काढून इस्त्री करून ठेवल्याही होत्या. सर्वांना माहीतच आहे बायकांना आवरायला फिरायला किती आवडत ते. आणि संक्रांतीचे हळदीकुंकू चांगल महिनाभर चालत म्हणजे रथसप्तमीपर्यंत हो ना. आम्ही संक्रांतीच्या खरेदीला गेलो होतो.

आम्ही, म्हणजे मी शेजारच्या काकू माझी मैत्रीण सायली सारे मिळून बांगड्या, चुडे, तीळ गूळ, वानाचे सामान, सुगडे आणि छानशी एकएक काठपदराची साडीही घेऊन आलो. तुम्हाला माहीतच आहे कितीही साड्या असल्या तरी साडी घेण्याचा मोहच आवरत नाही बायकांना. झालं, संक्रांतीसाठी तिळाचे लाडू, तिळ गुळाच्या वड्या, हलवा बनवणे बायकांचे चालूच होते. संक्रांत सण उद्यावर आला होता. मुलांचा वेगळाच गोंधळ चालला होता, पतंग उडवणे तीळगूळ खाणे, खाण्यापेक्षा सांडणें जास्त झाल. संक्रांतीचा दिवस उजाडला, पहाटे पासूनच स्वयंपाकाची घाई, पुरणाचा स्वयंपाक म्हणजे वेळ लागतोच की भजे, पापड, कडी सारं किती प्रकार स्वयंपाक संपून ववसायला जायची तयारी झाली.. मी काकूंना आवाज दिला,

– आवरला का काकू ..

– हो

– सायलीला पण बरोबर घेऊन या

– बरं बरं... काकू म्हणाल्या

सायलीला अगोदर सांगितल होतच लवकर आवर म्हणून तिचा ही स्वयंपाक होत आला होता. काकूंनी तिला आवाज दिला.

– सायली!.. आटप लवकर पुन्हा मंदिरात गर्दी होते

– हो हो झालच... माझ सायली म्हणाली.

आज सर्व जणी छान तयार झाल्या होत्या मंदिरात तर रंगिबेरगी फुलपाखरे फिरतात अस भासत होते. रेशमी साड्या काय, बांगड्या काय, चुडा काय, केसात गजरे काय, सर्व बायका खूप सुंदर दिसत होत्या. सोबत मुलीही आईसोबत नटनं काय कमी, त्या ही सुंदर दिसत होत्या. मोगऱ्याच्या फुलांचा सुगंध सबंध मंदिरात घुमत होता. अगदी उत्साह ओसंडून वाहत होता. आनंदात व उत्साहात संक्रांत सण पार पडला. मस्त पूरण पोळीचे जेवण झाले. उद्या पासून हळदी कुंकू चालू... असेच एके दिवशी माझी मैत्रीण प्रिया अगदी जवळची.. तिचा फोन आला.

– आग किती दिवस झाले भेट नाही गाठ बोलण नाही.

– हो गं वेळच मिळाला नाही.

– जाऊ दे उद्या माझ्याकडे हळदी कुंकू आहे.

–ये आठवणीने; सोबत सायली व काकूला पण घेऊन ये

– उद्या नाही जमले तर वेळ मिळेल तेव्हा ये पण ये नक्की

– हो हो निश्चित येते बर

लगेच सायलीला विचारले

– उद्या जायच का ग प्रिया कडे थांब काकूला ही विचारू

तेव्हड्यात वहिनी आल्या भाजीची वाटी घेऊन

–काकूला विचारा बरं.. उद्या जायचं का? विचारून फोन करा

–हो सांगते

–सायली नको ग उद्या, पर्वा जाऊ

–शनिवार आहे मुलांनाही अर्धी शाळा असते आणि मुलांचे बाबा ही घरी असतात. मुलांना बाबांजवळ सोडून जाता येईल.

–बर; काकुलाही सांग.

–हो

सायलीला दोन मूलं एक मुलगा, एक मुलगी पार्थ पाच वर्षाचा व गार्गी सात वर्षाची दोघंही लहानच. काकूंना काही प्रॉब्लम नव्हता, काकुची मुले मोठी होती. सुना नातवंडे होती. माझी ही मुले तशी मोठी होती. शनिवारी जायच ठरले, झालं ठरले एकदाचे! सायलीने रात्रीच नवऱ्याला विचारले.

– आहो, मी उद्या हळदी कुंकवाला जायचे म्हणते.

–प्रिया कडे जाऊ का ?

–आगं जा की त्यातं विचारण्यासारख काय ?

–नाही ओ मुलांना घरी सोडून जावं म्हणते, खूप त्रास देतात.

–आगं जा बिनधास्त मी उद्या लवकर येणार आहे.

–घरी व मुलांनाही अर्धी शाळा आहे.

–मी घेईन मुलांची काळजी.

मिळाली परवानगी,

–लगेच सायलीने आमच्याकडे येऊन सांगितले

–हो उद्या नक्की जाऊ

–हो पण लवकर आटप घर लांब आहे यायला उशीर होईल.

झालं, सायली सकाळी लवकर उठली सकाळच काम आवरून मुलांच आवरला. मुलांच्या बाबांचं आवरलं स्वयंपाक केला, मुलांच्या आवडीची भाजी सगळं आवडीचं करून ठेवल. मुले शाळेत पाठवली, मुलांचे बाबाही ऑफीसला गेले. स्वयंपाक भांडे धुणे किचन साफ केलं मुलांना आवडणारे पदार्थ टेबलवर ठेवले. हे सर्व करता करता एक कसा वाजला तिला कळलेच नाही. आता स्वतःचे आवरायला घेतले. छानशी लाल रंगाची पैठणी नेसली. त्यावर शोभेसे दागिने घातले. हलकासा मेकअप केला आणि गजऱ्याची आठवण येताच तिला आठवलं, मी तिच्यासाठी गजरा बनवते म्हणून सांगितले होते. लगेच धावत माझ्याकडे आली.

–ताई केला का माझ्यासाठी गजरा, तुम्ही छान करता गठिचा फुले तोड्लेत का? का देऊ तोडून ?

– आग सकाळीच तोडलेत, फ्रीजमध्ये ठेवलेत, तू सगळं आवरून ये. तो पर्यंत बनवते पटापट आपल्याकडे फुलला काही कमी नाही. खूप बहर आलाय मोगऱ्याला नुसता सुगंध दरवळतो. पूर्ण सोसायटीत काकूंना व प्रियासाठी ही घेणार आहे.

–बरं आलेच दहा मिनिटात असे म्हणून ती गेली

– तेव्हड्यात काकूंनी आवाज दिला झालं का गं तुझ.

–हो हो आवरते लगेच मला वेळ लागत नाही आवरायला

मोगऱ्याचा सुगंध दरवळ त होता सर्वासाठी गजरे करून झाले मी ही पटापट आवरल तयार झाले तेवढ्यात काकू ही आल्या . कामामुळे मुलांनमुळे वेळच मिळत नाही हो किनई ग एकमे का कडे जायला हो नां ग खर आहे. आग सायली पण मुलांना का आणल नाहीस ग आग तुला तर माहीतच आहे की मु ले किती वैताग देतात व बसू पण देत नाहीत म्हणून मुद्दामच सोडून आले हे मग ते मग हे पाड ते पाड पळा पळ दंगा मस्ती मुलांचे बाबा ही होते घरी पाही दे की एक दिवस सांभाळून मु ल किती वैताग देतात ते म्हणून शनिवारी यायच ठरवल

–बर बर खा आता संपवा.

बोलत बोलत ईकडे टीव्ही बघता बघता एकदमच पार्थ रडू लागला.

–बाबा आई कधी येणार मला आईकडे जायचे

–आरे येईलच येव्हड्यात तुला काय पाहिजे सांग ला मी देतो आधी रडणे बंध कर

–बाबा मला गूळ पाहिजे

–हा त्येच्या एव्हड्च नां

–त्यात काय मी देतो थांब, आता वेळ पण खूप झालाय आधी दूध पी, तो पर्यंत

शोधून देतो गूळ मुलांना दूध देऊन गूळ कोणत्या डब्यात असेल याचा विचार करू लागला एक एक डबा काडला गूळ काही मिळेना

– तेव्हड्यात गार्गी म्हणाली बाबा गूळ वरच्या माळा वरच्या डब्यात आहे आई तेथूनच देते

– बर बेटा बघतो

माळ्यावरचा डबा काढतो मिळतो एकदाचा गूळ डब्यातला एक गुळाचा खडा घेऊन तो पार्थला देतो.

पार्थ – बाबा मला मोठ्ठा गूळ पाहिजे

परत डब्यातील सर्वात मोठ्ठा गुळाचा खडा तो पार्थला देतो. तरी तो मला मोठ्ठा गूळ म्हणून रडायला लागतो. कितीही समजावले तरी समजतच नाही. मोठ्ठा गूळ मोठ्ठा गूळ म्हणून मोठ मोठ्यांनी रडायला सुरुवात करतो. बाबा त्याला चॉकलेट देतात खेळणी देतात. टीव्हीवर कार्टून लाऊन देतात तरीही त्याच एकच मला मोठ्ठा..... गूळ.

शेवटी वैतागून पार्थला घेऊन किराणा दुकानात जातो चल तुला मोठ्ठा गूळ देतो. दुकानातली छोटी ढेप दाखवतो तरी त्याच एकच मला मोठा गूळ. आता मात्र तो चिडतो व रागावत दोन सटके देऊन घरी आणतो.

छान रेशमी साडी घातली होती छान दिसत होत्या भारदस्त

–सायली झालं माझं, झालं का तुमचं!

–हो झालं, काकू ही आल्यात!

–माझा गेरा

–आग हो हा घे

–किती छान बनवला ताई आणि किती सुगंधी फुले वाव

– ये मीच माळते तुझ्या केसात

–या काकू तुम्हालाही माळते; प्रियासाठी ही घेतला आहे

चला निघू.

सायलीच लक्ष मुलांच्या बाबांकडे होतं तेवढ्यात आलेच ते त्यांच्याकडे चावी दिली. मुले ही आत्ता येतील अस सांगून ती निघाली.

–ताई रिक्षानीच जाऊ म्हणजे वेळ लागणार नाही.

– हो घर थोड लांबच आहे

–चला पटपट चौकात रिक्षा मिळते

आम्ही चौकात गेलो रिक्षाला हात केला रिक्षात बसलो निघालो एकदाचे. इकडे मुलांचे बाबा मुलांची वाट पहात होते तेवढ्यात मुले आली.

मुले– बाबा तुम्ही, आई कुठे आहे.

– आई हळदी कुंकवाला गेली आहे.

–दप्तर ठेवा हात पाय धुवून या, काय पाहिजे ते मी देतो सांगा काय हव.

मुलांनी हात पाय धुतले

–बाबा आम्हाला खाऊ पाहिजे

–हो आईने ठेवलेला खाऊ देतो

–ये हुर्य

–ताईंच्या आवडीचा स्वयंपाक आहे. भेंडीची भाजी बरं भात तूप आणि शिरा पण आहे

–वाव

मुलांबरोबर ते पण जेवले. मुलांना टीव्ही लाऊन दिला व सोफ्यावर बसले.

–थोडा वेळ टीव्ही बघा मग होमवर्क करा.

–काय ओ बाबा उद्या रविवार आहे. उद्या करतो की होमवर्क.

–बरं बरं!

इकडे आम्ही प्रियाच्या घरी पोहोचलो. तिनेही घर आवरून सुशोभित केले होते. दारात छानशी रांगोळी काढली होती. टिपॉयवर सुंदर फ्लॉवरपॉट गालिचा टाकलेला कोपऱ्यात समई.

–आग किती सुंदर रांगोळी काढली अजून छंद आहे वाटत.

मी म्हणाले, तुला माहीत आहे की पण आता मोबाईलमुळे आणखी वाढली. ये पण खूपच सुंदर रंगसंगती सुध्दा खूप छान बस झाल कौतुक

–या आता आत बसा

आम्ही घरात गेलो खूप वेळ गप्पा झाल्या. बोलत बोलत तीनं नाश्ता बनवला, किती दिवसानी भेटलो. निव्वळ आईच्या वळणावर गेलास हट्टी नुसता. स्वतःशीच बडबडत घरी येतो पार्थ अजूनही मोठा गूळ म्हणूनच रडत असतो. तोंड नाक लाल बुंद झालेल असतं. आवाज घराच्या बाहेर येत असतो. तेवढ्यात आम्ही येतो पार्थ चा आवाज घराच्या बाहेर येत असतो. एक घर म्हणता म्हणता पाच सहा घर झालेली होती त्यामुळे बराच उशीर झालेला होता. सायलीच्या मनात मुलांनी त्रास तर दिला नसेल नां. हाच विचार घोळत असतो तर घरातून पार्थ चा रडण्याचा आवाज कानावर पडतो. पटकन सायली घरात जाते. पार्थ काय झाल बाबा रागावले का.

–हो

–अहो एक दिवस मुलाला गोडिने समजवता आले नाही

– आई मला मोठ्ठा गूळ पाहिजे

– हो बाळा देते

आगं किती समजवल तरी समजतच नाही. नुसत आपल मोठ्ठा गूळ एकच. मी त्याला दुकानात नेऊन मोठी गुळाची ढेप ही दाखवली तरी मोठ्ठा गूळ च म्हणतो नुसता हट्टी झालाय मुलकाचा

– बर बर मी बघते

पार्थ आईच्या गळ्याला येऊन पडतो. गप गप मी देते बाळाला माझ्या मोठ्ठा गूळ सायली डब्यातला एक गुळाचा खडा घेते व त्याचे दोन भाग करते एक मोठा व एक छोटा दोन्ही हातात दोन तुकडे घेते व पार्थला विचारते, तुला या हातातला छोटा पाहिजे की या हातातला मोठ्ठा पाहिजे. हा मोठ्ठा म्हणून गुळाचा खडा घेऊन पार्थ खेळायला पळतो सुध्दा. आपसूकच मुलाच्या बाबांच्या तोंडून शब्द बाहेर पडतात मुलांना आईच समजू जाण रे बाबा.

❖

# आदिवासी सभ्यता संवर्धन काळाची गरज



लेखक

**मारोती मोतीराम**

कुळसंगे. शेगांव

ती आहेच समस्त भारतीय मानवाच्या प्रागतिक जीवनाचे अधिष्ठान. तिच्या उदरात दडला आहे प्राचीन कालीन कित्येक पिढ्यांचा गौरवशाली इतिहास. तिनेच प्रवसला मानवी समाजरूपी विशाल जनसमुदाय. वैयक्तिक, सामाजिक जीवनातल्या रूढी परंपरा ह्या तिच्याच देणग्या आहेत. जीवनमूल्यानीं घडवत मढवत तिनेच दिले सांस्कृतिक जीवनाचे मानवाला दान.

कालचक्राच्या गतिमान फेऱ्यात सृष्टीच्या ऊन सावलीत परिपक्व फळं नि उमलत्या फुलांच्या मानवी पिढ्या गेल्या पुढे सरकत काळागणिक. जीवनाची पायवाट तुडवित. आदळ आपट होत, सावरत घडत आणि चालत राहिला मानवीय समाजपुरुष कालप्रवाहा सवे. ''पुढच्यास ठेच मागचा शहाणा'' च्या नियमाने करत अवलोकन स्वतःचे नि अवती भोवतीच्या परिस्थितीचे. जपले मानवी जीवनाच्या अस्तित्वाला. कालपरत्वे स्वतःत वर्तनीय बदल करत माणूस पिढी दरपिढी साधत गेला सांस्कृतिक जीवनाचा नि बौद्धिकतेचा विकास. आजचा सुसंस्कृत, अलौकिक बौद्धिकतेचा धनी असलेला माणूस गरुड झेप घेत भरारतो ऊंच अबंरी. स्वच्छंद मुक्तानंदे करतो विहंग विहार चारी दिशांनी. संथ समीरा लहरीने. तरीही जगतो प्राचीन सांस्कृतिक परंपरा. बाळसे, नवस, विवाहाचे सारेच सोपस्कर करतो सांस्कृतिक पारंपारिक पद्धतीने. मरणोपरांत विधिवत क्रियाक्रम प्राचीन पारंपारिक पद्धतीनेच पार पाडत करतो आतन्यविधी वा ऊत्तरक्रिया. अशा गड तटबंदीच्या भक्कम रूढी परंपरेचा वारसा दिला समस्त मानवाला आदिवासी सभ्यतेने. मानवी जीवनाच्या अशा कईक सांस्कृतिक परंपराची जननी आहे आदिवासी सभ्यता.

वर्धक्याने जर्जर झालेली ही प्राचीन सभ्यता पाहते आजच्या युवाशक्तीकडे आस्थेने. टिकविण्यास आपले अस्तित्व. हिरमुसल्याने पसरते पदर. पोक्त होत्या संध्येच्या उदरी

जन्मलेल्या वाढत्या वयाची निशा यावी यौवनाच्या भरात. बाष्पाने ओथंबलेल्या काळ्या कुट्ट घनासमान किर्र अंधारात काजव्याच्या लुकलुकत्या बुडत्या उजेडाने वृक्ष झुडूपांच्या भोवती घालत घिरट्या शोधते आसरा प्राचीन वैभवशाली आदिवासी सभ्यता. आजच्या संगणकीय तंत्रज्ञानाच्या युगात विद्युतलतेच्या चमचमत्या भौतिकी नेत्रदीप्त्या झगमगाटात घनदाट अरण्य वा डोंगर पायथ्याच्या आसऱ्याने कालौघाच्या वार्धक्याने मोजते आहे शेवटच्या घटका गौरवशाली प्राचीन आदिवासी सभ्यता. ही विषण्ण वस्तुस्थिती बेचैनीने व्यथित करते आजच्या आधुनिक जीवनशैलीच्या समस्त आदिवासिंना. अंतर्मुख करत भाग पाडते स्वमग्नतेने आत्मचिंतन करण्यास की, माझ्या महान प्राचीन सभ्यतेचे संवर्धन करणे ही आजच्या काळाची नितांत गरज आहे. सरकत्या काळागणिक संवर्धनाने तिची वाढ आणि विकास करणे ही सर्व प्रथम माझी प्राथमिकता आहे. ते माझे आद्य कर्तव्य आहे.

सभ्यता ह्या शब्दाची व्याप्ती अफाट नभागंनासारखी अपरिमित आहे. नभाच्या गहन पोकळीसारखा अनंत काळाचा ऐतिहासिक कालखंड असतो सभ्यतेला. तीचे अस्तित्व निर्मित होत नसते जाणीवपूर्वक. तीला नसते आधिभौतिक नियमांचे आयाम. ती आकारास येते अनाहुतपणे सृष्टीसारखी स्वयंमतेने. कालानुक्रमे नवं यौवनेच्या पोटऱ्यात येत्या वयाच्या अंग प्रत्यांगाच्या विकासाने विकसित होत असते सभ्यता... सरितेच्या सळसळाटाने. कलकलत्या धबधब्याच्या प्रवाह वेगाने... आहार विहार विचार व्यवहार अशा अनेकांगी जीवनरूपी अवयवाच्या वाढत्या वयाने ती होत असते पोक्त. स्वयंस्फूर्तीने लतेसारखी जाते स्फूरत. विशाल डेरेदार वृक्षाला फुटलेल्या नव्या पालव्याच्या जोमाने होते विकसित. पिढी दर पिढी दीर्घ काळ... अनंत पिढ्यांसाठी. पोळ, पाडे, बेडे, वस्ती, गावं नगर, शहराने... नि मांडते आपले ठाण. भाषा, पेहराव, कला, शिक्षण, व्यवहार, विनिमय पद्धती, उपजीविका साधनं, व्यवसाय, व्यापार अशा विविध जीवनशैलीच्या करागिरीने करते आपल्या अस्तित्वगड किल्ल्याच्या भक्कमतेची पायाभरणी.

काळाच्या पाठीवर कला कुसरीने कोरते आपल्या वैभवतेच्या अस्तित्वाची छाप. वैयक्तिक, सामाजिक जीवनात स्वतःचे सौम्याकर्षक वा उच्च प्रतीचे अधिष्ठान. गरुड पंखाने झेपावती विचारधारा. संपत्ती संचय करत सामाजिक ऐक्याचे राखते भान. समाजाप्रती आपुलकी, स्नेहभाव, औदार्य, आस्थेचा दृष्टिकोन. अशी सर्वांगीण दृष्ट्या प्रगत होत यौवनाच्या भरात येते सभ्यता. तिचीही होते मग सळसळत्या तारुण्याने भरभराट. वैवाहिक जीवनात पदार्पण करत भुरभुरत्या पंखाच्या चिमण्या पाखरांच्या गोतावळ्यात अडकत गुंतावे संसारिक आयुष्याच्या जाळ्यात ललनेने तशी ती स्वतःशि होत एकरूप नांदते दीर्घायुष्याने. ह्या अनंत तपाच्या कालखंडात तिने प्रदान केल्या असते असंख्य चाली रीती रूढी परंपरा मानवी समाजाला. ह्याच रूपाने जिवंत ठेवत असते मानवी जिवनमूल्यांना.

बदलत्या काळाच्या उदरातून डोकावती सभ्यता प्राचीनते गणिक असते वसुंधरेच्या जिवसृष्टी इतकी मौलिक. आदिवासी सभ्यता ही अशिच प्राचीन, सागरा सारखी गहन नि मौलिक आहे. ती वैदिक सभ्यते पेक्षाही आहे अनंत काळाच्या तपस्व्या सारखी प्राचीन. शेकडोहून अधिक हिरव्या गर्द वटवृक्षांच्या बनानीं, फांद्या, पारंब्यानीं विस्तारत आपल्या डेऱ्याने व्यापावा धरत्रीचा भूभाग अनेको प्रदेशी. तशी खंडप्राय भारतीय प्रदेशी विखूरली आहे इस्ततः ही आदिवासी सभ्यता.

सिंधू मोहेंजोदडो ह्या सभ्यता सुद्धा आदिवासी सभ्यतेच्या हक्काच्या वारसदार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सिंधू मोहेंजोदडो सभ्यतेच्या काल प्रवाही विचरण होते पर्णींचे म्हणजे आदिवासी परधानांचे. परंतु आदिवासी सभ्यता नाही कुपमंडूकी. ती आहे गहन सागर. महाभारत कालीन सम्राज्ञी गांधारी शतपुत्री मातेपेक्षा तपस्वी नि महान. तिच्या कुशित सामावले आहे शेकडोहून अधिक जीवनशैलीचे जथ्थे. भिल्ल, गोंड, खोंड, कोरकू, तडवी, मुंडा, संथाल, माडिया... असे कितीतरी सहाशेहूनही अधिक. विविध भाषिक विशालकायी जथ्थे विसावले आहेत भारताच्या विविध प्रदेशात वास्तव्याने. त्यात एकट्या महाराष्ट्रात

आहेत सत्तेचाळीस समुदाय.

आदिवासी सभ्यतेचा संबंध सिंधू मोहेंजोदडो सभ्यतेशी जोडते पुरातत्वीय ऐतिहासिक भौतिक, लिखित साधने. ह्या सभ्यतेच्या ऊत्खणनात मिळालेल्या अवशेष्यात जे तत्कालीन लिखित मुद्रा पुरावे मिळाले त्या पुराव्यावर एखाद्या वन्य प्राण्यांचे किंवा पाळीव कृषिपयोगी प्राण्यांचे, झाडांचे वा अन्य नैसर्गिक चित्रे दिसुन येतात. परंतु देवांच्या मुर्त्या, देवालयाचे चित्र कुठेही अंकित केलेले आढळून येत नाही. यावरून असे दिसुन येते की, सिंधू मोहेंजोदडो सभ्यतांचे आराध्य होते आदिवासी सभ्यते प्रमाणे वृक्ष, लता, प्राणी, पक्षी वगैरे... नदीकिनारी वृक्षांचे प्रतिबिंब दिसावे नदी पत्रात तसे सिंधू, मोहेंजोदडो संस्कृतीवर आदिवासी सभ्यतेची छाया दिसून येते. आदिवासी सभ्यते सारख्या सिंधू मोहेंजोदडो सभ्यता प्राकृतिक निसर्गपूजक होत्या असे मानायला काहीच हरकत नाही.

सिंधू मोहेंजोदडो सभ्यता होती प्रगतिक वैभवाच्या नेत्र दीपक शुभ्र हिमाच्छादित एव्हरेस्ट शिखरी. सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या होत्या विकसित. आजच्या आधुनिक काळाला सिंधू मोहेंजोदडोची देण आहे ती विहिरी नि स्वस्तिक चिन्हाची. त्यांचे तत्कालीन जीवन, राहणीमान, स्वच्छता नि टापटिप पणाने उंचावलेले होते. तत्कालीन समाजास अलंकाराभूषणे अवगत होते. स्त्रीया विविध प्रकारे केश सज्जा करत. गळयात मन्याच्या माळा नि कानात कर्णफुले परिधान करत. विशेषत्वाने त्या नूर सज्जता आदिवासी स्त्रियांसारखी करत. मध्य भाळी, चारे, गाल टील्यांकिनारी भुवयी धृवी, मध्य नासिका मुळी, हनुवटी अशा विविधांगी चंद्रकोराकृती, चुलाकारी वा बिंदूकारी गोंधन करत. आपल्या कायेला अधिकाधिक नटवून भिरभिरत्या नजरेच्या नेत्रांना आपल्या लावण्यांची भुरळ घालत. तत्कालीन नर्तीकांच्या उत्खणनात मिळालेल्या पाषाण, ब्रांझच्या मुर्त्या आदिवासी प्रगत सभ्यतेची बोलकी साक्ष देतात. उत्खणनात सापडलेल्या नर्तीकांच्या दंडात आदिवासी स्त्रियांसारख्या प्राण्यांच्या हाडाच्या वा धातूच्या जाडसर येरा (बाजूबंध) परिधान केलेल्या दिसतात. आदिवासी स्त्रियांच्या पेहरावाचा वारसा सिंधू मोहेंजोदडो सभ्यतेतील स्त्रियांनी चालवील्याची जाणीव उत्खणनातील प्राप्त स्त्री मुर्त्यांच्या अवशेषातून दिसुन येते. अलीकडील काळात भिल्ल, गोंड, कोलाम तर दुर्गम भागातील परधान ह्या आदिवासी स्त्रिया वरील प्रकारे साज सृगांर करत होत्या. शिंपल्या मुखी स्वाती नक्षत्राच्या जलधाराचे तुरळक पडावे जलबिंदू अशा अत्याल्प प्रमाणात आजही कुठे कुठे आढळून येते. ह्या शिवाय इतरत्र जिथे कुठे आदिवासी संस्कृतीतील परंपरेचे काळाच्या उदरात गहाळ झालेले मोती गवसता घ्यावे उचलून हावरेपणाने. वंशवेलीच्या आसक्तीने करावे जनत ह्या सामाजिक अमूल्य ठेव्याचे. सोपवावी धूरा संवर्धनाची भावी युवा पिढीच्या खांद्यावर. हीच आहे आजच्या काळाची नितांत गरज.

कोणत्याही सभ्यतेचा डोलारा उभा राहतो, तो भाषा, पेहराव, सामाजिक–संस्कृतीक चालीरीती आणि कला–शिक्षण. हे चार मुलाधार स्तंभ झेलतात शिरी कोणत्याही सभ्यतेचा दीर्घकाळ भार. भाषा नि पेहराव ह्या दोन बिंदूने सांधला असतो सभ्यतेच्या पाठीचा कणा. ज्याच्या बळावर उभी असते सभ्यता आपल्या अधिष्ठानाचे निशाण फडकवित दिमाखाने ऊंच अंबरी. परंतु मनुष्याचा विशाल सामाजिक समुदाय ज्या धाग्याने एकत्र बांधल्या गेला तो आहे भाषा.

भाषा ही मानवाला निसर्गाने दिलेली अमूल्य अनुपम भेट आहे. भाषेच्या माध्यमातून माणसा माणसाने संवाद साधत तो विचार भावना व्यक्त करू शकला. भिती पोटी संरक्षण, त्यासाठी आसाऱ्याची शोधाशोध, त्याची विचारपूस... अशा अनंत गरजेतून एकत्र आला मनुष्य. त्यातून विचारांची देवाण घेवाण, भावनांचे आदान प्रदान असा क्रमगत निर्मिला मानवी समाज...

मानवाच्या भाषिक विकासाशिवाय कोणताही समाज, संस्कृती वा सभ्यता विकसित होत नाही. प्राथमिक स्वरूपात भाषेचा विकास प्रागतोहासिक मानवासारखा बोली मध्येच होत असतो. आदिवासी गोंड परधानांची गोंडी भाषा आणि भिल्लांची भिल्लोरी किंवा भगोरी भाषा ह्या अशाच प्राचीन कालीन बोली भाषा होत्या नि आहेत. बऱ्याच वर्षाच्या कालावधीचा त्यांचा प्रवास

काट्याकुट्याच्या पायवाटेने साध्या भाद्या बोलीतच होत राहिला. पुढे चालुन सखल मैदानातील वहीवटीच्या परंपरागत राबत्या वाटेने चालत कित्येक वर्षाच्या कालावधीनंतर कासव चालीने गोंडी भाषेने केले लिपीचे स्वरूप धारण. तर भिल्लोरी वा भगोरी प्राचीन भाषा नियमित पृथ्वी प्रदक्षीनेने सालोनसाल बोलीतच अजुनही प्रवास करताहेत. गोंडी भाषाही तिची सख्खी बहीणच होती. परंतू विसाव्या शतकाच्या पूर्वाधात ती लिपिणे उजवली.

विसव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात गोंडी भाषीक व भाषा विश्लेषक मध्यप्रदेशी जिल्हा बालघाटचे साहित्यिक मुन्शी मंगलसिंह यांनी गोंडीला मुळाक्षरांनी लिपीबद्ध करून भाषेचा जीर्णोद्धारकेला. पुढे चालून अमरावती चांदुर रेल्वेचे भाषा शास्त्री व्यंकटेशजी आत्राम, नागपूरचे डॉ. मोतिरावेन कंगली यांनी ह्या लिपीबद्ध भाषेला प्रसिद्ध केले. ती गोंडी भाषिकांची लोकप्रिय भाषा असली तरी अजून पर्यंत सार्वत्रिक प्रसिद्धी नि घटनात्मक मान्यता मिळाली नाही. प्राचीन काळापासून अलीकडच्या काळापर्यंत ती बोलीच समजल्या जाते.

विद्यमान काळापर्यंत सिंधू मोहेंजोदडो सभ्यतेशिवाय इतर कोणत्याही सभ्यते बाबत भारतीय इतिहास निष्णांत वैद्य असावा पांडित्यात अज्ञानी अशेच होते. ह्या सभ्यतेच्या उत्खननात ज्या विविध प्रकारच्या वस्तु सापडल्या त्यातवर त्या सभ्यतेच्या भाषेचे सांकेतिक लिपीतील रेखाटन आढळले. ह्यावरून ती सभ्यता नि लिपी अति प्राचीन समजल्या जाते. परंतु गोंडी सभ्यता नि गोंडी भाषा सिंधू मोहेंजोदडो इतकीच प्राचीन किंबहुना त्यापेक्षाही अतिप्राचीन असण्याची शक्यता आहे. गोंडी सभ्यता नि भाषे विषयी असे बोलले जाते की, प्रथम मानवाची बोलण्याची भाषा गोंडीच होती. पारीकुपार लिंगो ह्यांनी सर्वप्रथम या भाषेचा विकास नि विस्तार केला. ही भाषा बोलीच होती. त्याच्या नंतर काळानुरूप ह्या भाषेचे स्वरूप बदलत गेले. यथावकाश लिखित स्वरूपही आले.

अतिप्राचीन काळाच्या गोंडवनात जन्मज लिपियुक्त गोंडी भाषेने एक समृद्ध राजभाषा म्हणून सत्ता उपभोगली. हैद्राबाद विश्वविद्यात्याने आदिलाबाद जिल्ह्यातील गुंजल येथील केलेल्या अलीकडच्या पांण्डूलीपी संशोधनात असे आढळून आले. तत्कालीन समाजात मोजके लोक सोडता बहुत्तेक लोकं अडाणी असल्याने कालौघात गोंडी भाषेचे लिखित पुरावे नष्ट झाले. भाषा तेवढी जनसान्यात बोलीतच राहिली. सहाजिकच त्या सभ्यतेची अधोगती झाली.

ह्या सर्व ऐतिहासिक घटनांचा सारासार विचार करता जी भाषा प्रगत ती सभ्यता प्रगत. हे सत्य नाकारता येणार नाही. वर्तमान काळात बऱ्याच प्रमाणात आदिवासी समाज सुशिक्षित होत चालला. परंतु खेदाची बाब आशि की, आपली भाषा संस्कृती विसरतात ते सुशिक्षितच.

कोणत्याही प्रमाण भाषेला विपुल करते ती बोली भाषा. अशिक्षित अडाणी लोकच बोलीभाषेचा वापर करत जिवंत ठेवते संस्कृती नि सामाजिक परंपरा. आज स्वतःला आधुनिक नि शुशिक्षित म्हणविणारे आपली भाषा नि संस्कृती विसरून युनानी भाषा नि जीवन शैलीचे आसक्त होत आपल्या प्राचीन सभ्यतेशी कृतघ्न होत चालले.

ज्या सिंधू मोहेंजोदडो संकेतिक लिपीचे वाचन आजवर कुणाला जमले नाही. ते वाचन केले नागपूर येथील डॉ.मोतिरावेन कंगाली आणि प्रकाश सलामे यांनी. कंगाली साहेब आणि सलामे साहेब हे गोंडी भाषा विश्लेषक आहेत. कंगाली साहेब यांचे मते सिंधू मोहेंजोदडोच्या सांकेतिक भाषा लिपीवर गोंडीभाषेचा प्रभाव दिसुन येतो. त्यांनी चारशेहून अधिक सांकेतिक लीपीचे अर्थपूर्ण गोंडीत भाषांतर केले. परंतु दुर्दैव असे की ह्या सांकेतिक भाषांतराला वैश्विक स्तरावर तर नाहीच पण देश पातळीवर सुद्धा मान्यता मिळाली नाही. आणि सध्या कंगाली साहेब हय्यातही नाही. त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य तडीस नेण्याचे कार्य प्रकाश सलामे सर करत आहे. त्यांच्या कार्याला हातभार लावून समस्त भारतीय आदिवासी बांधवांनी आपल्या आदिवासी परंपरा नि भाषेचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात करून आपल्या आदिवासी सभ्यतेचे जतन करत तिचे संवर्धन करणे ही आजच्या काळाची नितांत गरज आहे.

❖



# “ सुगंधी जादू ”

लेखक
**अश्विनी निलेश अतकरे**
मुंबई

**‘‘ नाहीं सुगंधाची लागत लावणी ।
लावावी ते मनीं शुद्ध होतां ’’**

संत तुकाराम महाराजांच्या या ओळीनुसार, सुगंध उत्पन्न करण्याकरता कोणत्याही प्रकारची पेरणी करावी लागत नाही. जीवनात रंग भरायचे असतील तर रंगांच्या सोबतीला आवश्यक असतो तो म्हणजे गंध.... सुगंध....

रोज पहाटे गणपतीच्या देवळासमोरून जातांना...माझी पावले आपसूकच हळुवार चालतात.... देवळातील तो फुलांचा गंध.... अगरबत्ती, धूप दीप यांचा सुगंध.... जणू मन आणि वातावरण अगदी प्रसन्न करण्याची जादूचं दिली आहे ईश्वराने या सुगंधाला.....

देवळासमोर फुले विकण्यासाठी बसलेली ती आजी.... तिच्यासमोर असलेल्या फुलांच्या राशी जणू तिचेही सौंदर्य खुलवितात.... फुलांच्या लहान मोठ्या पाकळ्यांप्रमाणे तिच्या हातावर, चेहऱ्यावर असलेल्या सुरकुत्या सुध्दा आपले मन हरवून टाकतात... तिच्या जवळ असलेला जाई, मोगरा तर....काय म्हणावा, त्याचा दिलदारपणा... अगदी त्याच्याकडे बघितले तरी आपला सुगंध देऊन मन प्रसन्न करतो...आणि जणू मला खुणावतो आहे की आजी सुगंध घ्यायचे पैसे नाही घेत... आपले मन तृप्त करून घे....

तुम्ही कधी तरी आपल्या घरूनचं पोटभर जेवण करून बाहेर निघालात तरी काकांच्या गाडी वरची भजी जिभेला डोहाळे लागल्याचे भासवितात... नको असताना सुध्दा आपली पावले नकळत खेचण्याची जादूची छडी जणू काकांच्या हाती लागली की काय असा प्रश्न निर्माण होतो....काय म्हणावे याला...

लहान असताना जेव्हा शाळा सुरू होण्याची चाहूल लागायची तेव्हा मिळालेल्या नविन गणवेशाचा सुगंध.... ... एवढेच नाही तर नविन आणलेल्या वह्यांचा, पुस्तकांचा सुगंध...अहाहा...तुम्हाला पण आठवलेत ना ते दिवस....मी तर तो ताजा ताजा सुगंध अनुभवण्यासाठी पुन्हा पुन्हा पुस्तके उघडायची आणि दोन्ही हातात घेऊन जपानी पंख्यासारखे चेहऱ्यासमोर घ्यायची...वर्षभर मी ती वह्या, पुस्तके हाताळणार नसेल त्याही पेक्षा कितीतरी वेळा ते नवीन असताना त्यांचा सुगंध मी अनुभवला...

उन्हाळ्याच्या उकाड्याचा जेव्हा कंटाळा येऊ लागतो तेव्हा... अलगद पावलांनी येणारा तो पाऊस.... प्रत्येकाच्या मनामध्ये असलेला.... फक्त मनामध्येचं नाही तर अलगद मनाच्या कोपऱ्यात आपले स्थान निर्माण करणारा तो पहिला पाऊस....याचे आगमन होते ना होते... रविमुळे अगदी रागावलेली ही भूमी अगदी सुखावून जाते...आणि ती जेव्हा आनंदी होते तेव्हा तिचा येणारा गंध... अहाहा...

लहान बाळाचे पावडर, साबण, तेल,औषधी यांचा सुगंध आल्यास, आपल्या लगेच लक्षात येते की इथे नक्कीचं बाळ आहे...मनामध्ये आनंद, प्रेम, वात्सल्य निर्माण करणारा हा सुगंध....

लाडू, करंज्या, शंकरपाळी, अनारसे...हो अगदी बरोबर ओळखले...मी दिवाळीतील या पदार्थांच्या सुगंधाबद्दलचं बोलतेय....काय म्हणता तुमच्या तोंडाला पाणी सुटले आहे... अगदी कोणत्याही पदार्थाचे नाव घ्यावे आणि त्याचा सुगंध आपल्याला आठवणार नाही हे शक्यचं नाही...किती अनोखे आहे ना हे सर्व...दिसत कुठेचं नाही पण सगळीकडे असल्याचा भास होतो... जाणवतो...खरोखर या निसर्गाचीचं ही किमया सारी...

पण फक्त निसर्गातील वस्तूंनाचं सुगंध आहे असे नाही बरं... तर...सुगंध आहे प्रेमाला... सुगंध आहे आपल्या वाणीला...सुगंध आहे आपल्या वागणुकीला... सुगंध आहे आपल्या कार्याला.... सुगंध आहे आपल्या माणुसकीला... म्हणूनच तर म्हणतात ना.... ‘‘चंदनाप्रमाणे झिजलात तर आपला ही सुगंध सगळीकडे दरवळेल....’’ हेचं संत तुकाराम महाराजांच्या वाणीतून म्हटले तर,

**‘‘चंदन तो चंदनपणें । सहज गुणेसंपन्न ।।१।।
वेधलिया धन्य जाती। भाग्यें होती सन्मुख ।।ध्रु.।।’’**

❖



# चादर ट्रेक!

लेखक-गिरीजाशंकर पोपळघट

तो दिवस उजाडलाच ज्या दिवसाची आम्ही अगदी आवर्जून वाट पाहत होतो..उत्कंठा ही खूप ताणली गेली होती.. समोर पांढरेशुभ्र हिम पर्वत आणि त्यामधून वाहणाऱ्या झंस्कार नदीवरील पांढरीशुभ्र हिमनगाची चादर डोळ्यांसमोर तरळू लागली होतीकारणही तसेच समोर पांढऱ्या शुभ्र रंगाची चादर तरळण्याजोगेच होतं.. कारण त्या ट्रेकचच नाव होतं चादर ट्रेक!

चद्दर किंवा चादर हा शब्द ऐकल्यापासूनच खरं तर त्याचा शोध सूरु झाला. या शब्दाची उत्पत्ती कशी झाली असेल? इथपासून त्याचा शोध घ्यायला आम्ही सुरुवात केली. हा ट्रेक कसा यशस्वी करता येईल यासाठी गुगल व वेगवेगळ्या ब्लॉगर आणि जुने अनुभवी ट्रेकर्स यांनी चद्दर ट्रेकवर लिहिलेले सगळे लेखन साहित्य धुंडाळले! त्यातून प्रकर्षाने एकच गोष्ट अधोरेखित करण्याजोगी होती ते म्हणजे तिथे असणाऱ्या उणे तापमानाला कसे तोंड द्यायचे हा. आमच्या पुढे ही पडलेला यक्ष प्रश्न सुद्धा तोच! त्या प्रश्नांची सोडूवनुक करण्यासाठी आम्हाला खूप जास्त मेहनत घ्यावी लागली खरि!

पडलेल्या प्रत्येक प्रश्नाला गुगलने बऱ्यापैकी उत्तर दिली पण काही प्रश्न असे होते की ज्याबद्दल प्रत्येक जण कमालिचा उत्सुक होता अशा महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल चर्चा करण्यासाठी अगदी सातासमूद्धा पलीकडून देवासम हेमराज धावला! आमचा प्राणप्रिय मित्र ! तो म्हणजे हा पट्ट्या खास अमेरिकेवरून केवळ ट्रेक साठी आलेला! ट्रेक करताना थंडीपासून बचावासाठी सगळ्यात महत्त्वाचे स्किईंग सुट आणि स्किंईंग गॉगल असतात, आणि याने तर चक्क सर्वांसाठी या वस्तूंची संपूर्ण बॅगच भरून आणण्याचे धाडस केलेले ही साधने बॅग भरून थेट विमानतळावर घेऊन येणारा हा अवलिया पट्टा खराखूरा ट्रेकवेडा असल्यामुळे आमच्या चमूत दांडगा उत्साह संचारला! असो.



चादर किंवा चद्दर हा लडाख मधील उंच असणारा हा भाग आहे !आपण जर गुगल केलं तर अतिशय टफट्रेक म्हणून या ट्रेकचा उल्लेख असल्याचं मी इथं आवर्जून नमूद करू इच्छितो. समुद्र सपाटीपासून साधारणता उंचावर म्हणजे जवळपास तब्बल ११,१०० फुट पेक्षाही जास्त उंचीवर आहे नयनर्रम्य व तितकेच धोकादायक असणारे हे ठिकाण.! ट्रेक म्हटलं की साधारणपणे उंच वर चढत जाणे असते मात्र याचं वैशिष्ट हेच की हा दोन्ही बाजूंच्या डोंगराच्या मधल्या दरीमध्ये गोठलेल्या नदीपात्रात उतरून करावा लागणारा असा ट्रेक आहे.

हा ट्रेक दहा दिवसाचा इतका नियोजित आणि तब्बल ६२ किलोमीटर इतका प्रदीर्घ! खरंतर समुद्रसपाटीपासून इतक्या उंचावरील ठिकाणी खोल नदीपात्रात जाणं म्हणजे दिवा स्वप्नच म्हणायचं! कारण हाडे गोठवनारी थंडी व निसरडी पायवाट या बरोबरच




आक्सिजनचा अभाव हे तिहेरी आव्हान व प्रत्येक पावलागणिक हिमनगाच्या चादरी वरती प्रवास करणं हे म्हणजे मोठं दिव्य पार पाडण्याजोगे आणि म्हणूनच यासाठी उत्सुकताही शिगेला गेलेली. आंम्ही जिंकण्यास सज्ज झाला.!

तो दिवस होता १६ जानेवारी २०१९ चा!

या दिवशी आम्ही सर्वजण तयार झालो आणि आमच्या विमान प्रवासाला सुरुवात झाली. आम्ही अगदी सर्वजण मनातली रुखरुख, मनाची घालमेल व स्वत:स सिद्ध करायची अनामिक ओढ आमच्या दहाही जणांच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्ट दिसत होती! या चमूतील प्रत्येक सदस्य अफलातून व उत्साहाचा सळसळता झराच ते सदस्य म्हणजे तानाजी पदमेरे, विजय कुंभार, सुनील लंबाते, प्रशांत पाटील, पराग महाजन, हेमराज गायधनी, दत्तात्रेय तेलंग, रवी कुमार देवरे, भाऊसाहेब आहेर व मी स्वता गिरीजाशंकर पोपळघट !

आम्ही दहा जण आमच्या मुंबई लेह प्रवासासाठी तयार झालो. ट्रेक कसा असेल? नेमकं कोणती आव्हाने येतील? त्या आव्हान्यासाठी आम्ही सज्ञ आहोत की नाही? अशा बऱ्याच प्रश्नांनी मनामध्ये काहूर माजलं होतं.

ट्रेकचा दिनांक निश्चित करताना दोन गोष्टी मनात पूर्व नियोजित होत्या पैकी आमच्यातील दोघांचे जन्मदिन साजरे करणे आणि पौर्णिमेच्या शितल चांदण्याने न्हाल्याने हिम अच्छादित पर्वत शिखरे व बर्फाची मनमोहक चादर कशी दिसते याची अनुभूती याची डोळा याची देह घेणे आणि या सर्व साक्षीने जन्मदिन साजरा करणे असा दुग्ध शर्करा योग जुळून आणण्यासाठी आम्ही मुद्दामहून हा ट्रेक १६ जानेवारी ते २६ जानेवारी असा आखण्याचा बेत ठरवला. या बेताप्रमाणेच सारं काही सुरळीत होईल का? यात कितपत यश येईल? या एक ना अनेक अशा प्रश्नांची उत्तर शोधता शोधता केव्हा लेहच्या विमानतळावर आमचं लँडिंग झालं हे कळालं देखील नाही!

लेह मध्ये उतरताच तिथला स्वच्छ, सुंदर, निसर्गरम्य असणारा अगदी मोरपंखी मनास पिसाऱ्यापरी नितळ पांढराशुभ्र असणारा परिसर बघून मुंबईसारख्या धकाधकीच्या आयुष्यातून अक्षरशः स्वर्गात उतरलो की काय असाच काही भास झाला. ट्रेकच्या आव्हाना बरोबरच त्या तिथले निसर्गरम्य सौंदर्याचे अनमोल क्षण डोळ्यात साचवणे हे ही तितकेच महत्त्वाचे.

आम्हाला घेण्यासाठी आमचा टूर गाईड त्याच्या सहकाऱ्यांसह सज्ञ होता.. बाहेर पडताच अंग थंडीने गोठल्यासारखं वाटू लागले, दात एकमेकांवर कडकडत होते, हाडे फोडणारी थंडी म्हणजे काय असते याचा प्रत्यय आलाट्रेकिंग बॅग मधील गरम कपडे काढून अंगावर चढवे पर्यंत बोटांची संवेदना संपली होती, कसेबसे गरम कपड्यांचे तीन थर घालून गाडीत बसलो व निवास व्यवस्थेच्या ठिकाणी पोहोचलो.. इतक्या प्रचंड थंडीत तेथील होटेल मधील कर्मचारी लिलया आमचं साहित्य वाहनातून उतरवून रूम मध्ये टाकत होते.त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह व मेहमान नवाजी मनाला भूरळ घालून गेली परंतू दुसरीकडे त्यांच्या खडतर जीवनाची ही जाणीव झाली. त्यांचा जीवन संघर्ष बघून मनाची चलबिचल झाली.

लेह मध्ये उतरल्यानंतर आमचा तीन दिवसाचा कालावधी ठरला होता आणि तो कालावधी म्हणजे ॲल्कामटायझेशन खरंतर हे म्हणजे वातावरणाशी समरूप होणे किंवा वातावरणाशी सहज मिळून मिसळून घेता येणे ही व्याख्या आहे साधारणतः याची !

तीन दिवसाने आमची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या वैद्यकीय





तपासण्यात एक वेगळा पेच निर्माण झाला तो हा की आमच्यापैकीच दोन सदस्यांचे रिपोर्ट ट्रेकसाठी प्रतीकुल ठरले मात्र आंम्ही तिथल्या असणाऱ्या संस्थेची अगदी मनधरणीचे करून त्यांना अनुभव व इतर केलेल्या ट्रेकचे दाखले देवून परवानगी मिळण्यात आम्हाला यश आलं. म्हणजे आमच्या ट्रेकचा पहिला टप्पा जो वैद्यकीय चाचणी पूर्ण करणे हा यशस्वीपणे पार पडला !

चादर ट्रेकची प्रत्यक्ष सुरुवात झाली. खरंतर झंस्कार नदी आणि सिंधू नदीचा प्रचंड संगम हा अतिशय देखणा व तितकाच जीवघेनाही वाटणारा! चादर ट्रेक म्हणजे हिवाळ्यात पाणी गोठल्यानंतर एकावर एक असे चादरीसम भाग तयार झालेले असतात. त्यामुळेच हे चादर ट्रेक नाव बहुदा पडले असावे. इथे तापमान ऊणे ३५ अंश इतके घसरलेले !

म्हणजे हाडे गोठवणाऱ्या थंडीने अक्षरशः जीव जातो की काय अशी परिस्थिती निर्माण होत होती. घट्ट झालेला बर्फ दोन्ही बाजूने जिकडे नजर खेळेल तिथप्पर्यंत पांढराशुभ्र चकाकणारा बर्फ चोहीकडे अक्षरशा बर्फच बर्फ दिसत होता.

प्रत्येक पावला गणित या निसर्गाच्या अमर्याद सौंदर्याची आम्ही सर्वजण अनुभूती घेत होतो. बर्फाला स्पर्श करणे, बर्फ अनुभवणं आणि बर्फ जगणं हे नेमकं काय असतं या चादर ट्रेकच्या निमित्ताने आम्हाला पाहता आलं. निसर्ग हा किती अफाट, अमर्याद व क्षितिजा पलीकडे ही अमर्याद विस्तीर्ण व नजरेत न भरणारा असा असून अहंकाराने भरलेला मानवी जीव किती 'किरकोळ' आहे याची जाणीव पहिल्यांदा होऊन गेली. प्रत्येक पावलागणित आम्हाला अडचणी तर येतच होत्या पण प्रत्येक पाऊल पुढे टाकणं हे तितकंच महत्त्वाचं होतं. या प्रवासात खबरदारी म्हणून आम्ही जो अभ्यास केला त्या अभ्यासात आपल्या शूजला बांधण्यात येणारे जे स्पाईक असतात त्या स्पाईक मुळे चादरीला इजा होऊन फाटू व नंतरच्या ट्रेकरसाठी ती सुस्थितीत राहणार नाही याला उत्तम पर्याय म्हणून शूज भोवती काथ्या गुंडाळण्याची भन्नाट आयडिया आम्ही शोधून काढली होती! ती आयडिया सुरुवातीला काम करत होती मात्र जसजसे पुढे जाईल तसतसे ही आयडिया ही कुचकामी ठरते की काय अशी भीती वाटत होती कारण उणे ३५ अंश इतक्या रक्त गोठवणाऱ्या थंडीत शूज भोवती गुंडाळलेल्या काथ्यावर जमा झालेले पाण्याचे थेंब हे चटकन स्फटिक रुपी बर्फात रूपांतरित होत होते व बर्फ तयार झालेल्या थेंबाने शूज घसरण्याची जास्त शक्यता होती. झालेही तसेच बर्फावरून घसरून पडल्यामुळे दोघांचे हात मोडले आणि त्यामुळेच ही आयडिया ही फोल ठरली प्रशांत आणि विजय एकाचा डावा आणि एकाचा उजवा हात मोडला असतानाही दोघांनी त्यांच्या वेदना चेहऱ्यावर दिसू न देता पुढील वाटचाल करत राहिले त्यांच्या या हिमतीमुळेच व दुसऱ्याच्या आनंदात आपल्या वेदनांची त्यांनी इतरांना जाणीव न होऊ दिल्यानेच आम्हाला पुढील वाटचाल करता आली hatsup up to them.

जसजसे एकेक पाऊल पुढे टाकत



गेलो व दिवस मावळ तिकडे झुकल्यानंतर या अद्भुत सौंदर्याचे साक्षीदार झालो. सूर्यनारायणाचे सोनेरी रूप, या पांढऱ्या शुभ्र मखमली पसरलेल्या बर्फांवर चकाकणारे प्रतिबिंब डोळ्यात साचवून घेतले. अंधाराने आपले साम्राज्य पसरविले आणि आम्ही ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होतो तो क्षण अवतरला हिम पर्वता मागून पौर्णिमेचा चंद्र हळूहळू असंमतात अवतीर्ण झाला आणि चंदेरी नदीपात्र त्यावरील प्रतिबिंब चंदेरी हिम पर्वत हा नजारा आजही डोळ्यासमोरून जात नाही आम्ही अनुभवलेली ती अतिशय रम्य रात्र होती.

दिवसभराच्या आलेल्या थकव्यामुळे बर्फावरच केव्हा पसरून गेलो याचे भान सुद्धा राहिले नाही. या निसर्गाच्या अमर्याद सौंदर्यापुढे शतशः नतमस्तक होऊन हे सौंदर्य अनुभवत व जगत पापण्या केव्हा मिटून गेल्या याचे भान ही राहिले नाही जमेल तसे जो तो आपापला झोपी गेला.

सकाळ झाल्यानंतर सर्वजण आवरून पुन्हा प्रवासास सुरुवात केली. काही अंतर जातो तोच एके ठिकाणी बर्फाची चादर फाटली होती. (बर्फाची चादर फाटणे म्हणजे बर्फातील भाग वितळून खड्डा पडून जलमग्न होऊन त्या ठिकाणी जीवास धोका निर्माण करणारी शक्यता असणे असा भाग) चादर फाटून



समोरच नदीपात्र जलमय झाल्याने आम्ही पर्वता शेजारून पुढे जाण्याचा मार्ग शोधत होतो एवढ्या वेळात एका मागोमाग एक चालणारे आम्ही एकत्र येऊन विचार विनिमय करत होतो एकाच ठिकाणी आठ-दहा लोकांच्या वजनामुळे त्या ठिकाणी चादर दुभंगली आणि आमच्यापैकी तिघेजण चादरीच्या पडलेल्या छिद्रात पडले चादर फाटलेल्या भागातून अक्षरशः तिघांचा हात सटकता सटकता वाचला रवींद्र, प्रशांत व सिद्धार्थ या तिघांना अगदी डोळ्याची पापणी लवते न लवते तोच वजनाने बर्फ खचून आत गडप होणार तोच त्यांचा हात घट्टपणे पकडता आला आणि त्या घट्ट पकडण्यामुळेच त्यांचा जीव वाचला ! होत्याचं नव्हतं होतं की काय ? या बाक्या प्रसंगाला अंगाचा थरकाप उडाला अक्षरशः इतक्या थंडीत देखील घाम फुटला कारण काही क्षण विलंब झाला असता तर फाटलेल्या चादरीमध्ये आमचे मित्र केव्हा गडप झाले असते! या भीतीने जीवाची काहीली झाली. पर्याय म्हणून पर्वताच्या कोपऱ्यातून मार्ग शोधत शोधत आम्ही वर जात असतानाच या घडलेल्या घटनेमुळे सर्वांची चांगलीच तारांबळ उडाली. पडलेल्या रवींद्र, प्रशांत, सिद्धार्थ या तिघांचेही कपडे पूर्णपणे ओले झाल्यामुळे अगदी थोड्या वेळात कपडे लाकडाच्या डफली सारखे घट्ट बनले व ते आम्हाला तिथेच टाकावे लागले. इतर सातही जणांनी आपापल्याकडे असणाऱ्या वेगळे कपड्यांमूळे त्यांची सोय झाली. प्रसंग जीवघेना आणि अंगावर काटा आणनारा असा घडला. या अनपेक्षित घटलेल्या जीवघेण्या प्रसंगामुळे आम्ही प्रत्येक पाऊल सावकाश सावकाश टाकतच पुढे प्रवासाला निघालो. दुसरा दिवस हा अशा अघटित विचार कल्पनांनी सुन्न करून गेला!

दुसऱ्या दिवशी आलेला हा प्रसंग डोळ्यासमोर जाता जात नव्हता. तो भीतीचा थरार आठवला तरी अंगावर काटा उभा राहत होता. प्रशांत, सिद्धार्थ, रवींद्र यांचा हात हात पकडण्याचा क्षण फाटलेली चादर गोंधळलेले सर्वजण .. जीव मुठीत घेऊन एकमेकांना आम्ही सावरलेले पुन्हा पुन्हा तेच सारे आठवत तिसऱ्या दिवसाच्या प्रवासाला सुरुवात केली.

तिसऱ्या दिवसाचा टप्पा होता नेरक टप्प्यापर्यंत जाणे. हा फ्रोजन वॉटर फॉल जवळचा शेवटचा टप्पा. या नेरक वॉटर फ्रोजन फॉल पर्यंत जाण्यासाठी आम्ही पेंग्विन चालीच्या प्रकाराची वेगळी स्टाईल गेल्या दिवसात विकसित केली होती. म्हणजे पाऊल न उचलताच पेंग्विन सारखी छोटी छोटी पावलांनी घसरत घसरत पुढे पुढे जाणे हा प्रकार आम्ही अवलंबला होता. या दिवशी आम्ही नेरक धबधब्या शेजारी मुक्काम करण्याचे नियोजिले होते परंतु नियतिला हे मान्य नसावे त्यामुळे वातावरणातील उष्णता वाढून वितळलेल्या बर्फाच्या पाण्यामुळे नदीपात्र बर्फाच्या चादरीवरून वाहू **(overflow)** लागले. नाईलाजास्तव आम्हाला मधेच थोडीशी जागा शोधून मुक्काम करावा लागला दुसरा दिवस अद्भुत आणि नयनरम्य असणार या आशेने आम्ही झोपी गेलो.

चौथ्या दिवशी आम्ही मुक्काम केलेल्या ठिकाणचे इतर ट्रेकर्स नदीचे रौद्ररूप पाहून परतीच्या प्रवासाला निघाले आमच्यापैकी काही जणांच्या मनात परत फिरावे तर काहीजणांच्या मनात फ्रोजन वॉटर फॉल पाहूनच परत जायचे हा निर्धार या दोलायमान स्थितीत इंडियन एअर फोर्सची टीम पुढे गेली आहे या बातमीने आमच्या चमूत उत्साह संचारला. आता काहीही करून ट्रेक पूर्ण करायचाच हा निर्धार पक्का झाला आणि आम्ही पुढे सरसावलो.

वेगवेगळ्या ठिकाणी फाटलेल्या चादरी मुळे प्रवास करणे प्रचंड अवघड होऊन बसले होते कारण फाटलेले चादरी




वर पाय ठेवणे देखील किंवा उभा राहणेही जीवाशी खेळ करण्यासारखे धोकादायक होते. तो प्रसंग टाळण्यासाठी आम्ही तीव्र चढ असणाऱ्या साधारणपणे ८० अंश एवढ्या चढावरती १ किलोमीटर वळसा घालून काही भाग आम्हाला पूर्ण करावा लागला. आमच्यासमोर एकच ध्येय डोळ्यासमोर दिसत होते ते म्हणजे नेरकला जाणे व तेथील गोठलेला धबधबा पाहणे हा शेवटचा टप्पा होता.

आणि आम्ही ज्या क्षणाची अगदी आतुरतेने वाट पाहत होतो जो क्षण आम्ही डोळ्यात साचवण्यासाठी प्रत्येक पाऊल पुढे पुढे टाकत इथपर्यंत प्रवास करत आलो होतो तो क्षण शेवटी आम्ही सर केलाच.. नेरकला आल्यानंतर जग जिंकल्याचा आनंद झाला. प्रत्येक पावलागणिक झेललेल्या यातना कुठल्या कुठे पळून गेल्या..ते देव जाणे! पाहिलेले स्वप्न सत्यात उतरले. प्रत्येक जण एकमेकाला आनंदाने टाळ्या देत होता (अगदी मोडलेले हात असूनही)आनंदाने टाळ्या वाजवत, उड्या मारत होतो. या सगळ्याच गोष्टीने अगदी आनंदाला पारावार उरला नाही. आपापल्या हातातील भारतीय ध्वज व बॅनर मोठ्या अभिमानाने डौलवून जो तो आनंद साजरा करत होता आणि आपण ही चढाई यशस्वीपणे पार केल्याचा गौरव मनी बाळगत होता. अभिमानाने छाती भरून येत होती आम्ही सर्वांनी हे साध्य करून दाखवल्याचं एक विजय पताका फडकवून आम्ही सर्वजण एकमेकाला अलिंगन देऊन तो विजय उत्सव मोठ्या धूम धडाक्यात साजरा करने चालू होते.

आमच्या दोन्ही मित्रांचा मोडलेला डावा हात आणि उजवा हात व त्याच्या होणाऱ्या यातना या दोन सदस्यांना हळूहळू जाणवू लागल्या. आनंदाच्या भरात दोन–तीन दिवसापासून मोडलेले हात गळ्यात टांगून प्रत्येक पाऊल पुढे पुढे टाकत केवळ टीम ला आत्मविश्वास यावा यासाठी आपलं दुःख झाकून ठेवून देखील एक एक पाऊल करत अंतिम ध्येय गाठण्याची किमया या दोन बहाद्दारांनी केली होती आता मात्र हाताला सूज आल्यामुळे हाताचे दुखणे वाढले होते. म्हणून त्याला तातडीच्या इलाजाची गरज वाटत होती. आमच्या प्रत्येक पावलागणित





आम्हा सर्व टीम मधील सदस्यांना जाणवून देणाऱ्या मित्रांवर आता मोडलेल्या हातावर काही इलाज करणे हे गरजेचे बनले. कारण वेळेत उपचार घेतला नाही तर हात सुजण्याची व तो कायमस्वरूपी निकामी होण्याची भीती जास्त होती! आम्ही लागलीच परत पाठीमागे फिरण्याचा निर्णय घेतला. जाण्यासाठी तब्बल साडेतीन दिवस इतका लागलेला वेळ हा परतीचा वेळ फक्त एका दिवसाच्या विक्रमी वेळेत आम्ही परतीचा प्रवास केला. इंडियन इयर्स फोर्सच्या विक्रमाची बरोबरी आम्ही केल्याचे आम्हाला समाधान आहे. आणि आम्ही पुन्हा बेस कॅम्पवर येऊन मोडलेला हातावर काही उपचार शोधता येईल का याचा शोध घेत होतो पण तिथे डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे आम्ही ताबडतोब निर्णय घेऊन आमचा मोर्चा हॉस्पिटलकडे वळवला! रात्री ८:३० च्या सूमारास सर्व पोचलो.या प्रचंड झालेल्या धावपळीत उजवा हात आणि डावा हात अशी हात मोडून घेतलेली व नियतीने घट्ट बांधलेली जोडगोळी आपल्या चेहऱ्यावर असणारा आनंद व उत्साह लपवू शकली नव्हती. आपल्या दुःखावर पांघरून घालून आपल्या टीममधील असणाऱ्या सर्वांचे यश हा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून



वाहत होता. त्यांची तिथे ट्रीटमेंट घेतल्यानंतर आम्ही संध्याकाळी शेवटच्या मुक्कामाला हॉटेल समोर मोठी शेकोटी पेटवून त्या भोवती फेर धरून आनंद साजरा केला आमच्या आनंदात तेथील कर्मचारीही सहभागी झाले त्यांनी लाईट व स्पीकरची व्यवस्था करून अजूनच रंगत आणली पुढच्याच दिवशी परतीच्या प्रवासाकडे वळालो.आयुष्यात अविस्मरणीय असणाऱ्या या ट्रॅकच्या प्रत्येक पावलानगणिक काही नवीन काहीतरी शिकलो. आयुष्य हा या ट्रेक सारखेच असते. म्हणजे सुख दुःखांच्या प्रत्येक उभ्या आडव्या रेशमी चादरीत विणलेला धाग्यांसारखे की जे आपण प्रत्येक पावलांनी असणारा दुःखाचा धागा दुर्लक्षित करून सुखाचा धागा शोधून आपल्या सगळ्यांसोबत मार्गक्रमन करून सदैव ऐकेक पाऊल टाकत राहणे व आपले विचार शुभ्र बर्फासारखे स्वच्छ व नितळआपला समूह सिद्धांत ही तोच एकमेकांसोबत आयुष्य जगणे हाच! हे सारे काही या ट्रेक मधून घेता आले.परतीच्या प्रवासात डोळ्यासमोर असणारा संपूर्ण पट जसाच्या तसा आजही उभा राहतो.!

**छायाचित्रे :-**

**श्री. तानाजी पदमेरे**

**श्री. विजय कुंभार**

# पहिले शब्दवेल साहित्य संमेलन २०20 ठाणे क्षणचित्रे



















# दुसरे शब्दवेल साहित्य संमेलन २०२१
# अमरावती क्षणचित्रे
























# माझा अनुभव

एक दिवस मी माझ्या आई बाबासोबत गावाला जात होते. गावाचे नाव काही मला आठवत नाही पण तेथे जाताना मला आलेला एक अनुभव मी तुम्हाला सांगते. गावाला जातांना आम्ही मोठ्या ऑटो मध्ये बसलो. तेथे आणखी काही माणसे होती. आमच्या सोबत पण ते छान बोलत होते.

आमच्यासमोर बसलेले दोघे शेंगदाण्याच्या शेंगातील दाणे खात होते. ते बघून मी पण आईला एक चॉकलेट मागितले आणि आईने ते मला दिले. चॉकलेट खाल्ल्यानंतर मी ते पॅकेट आईच्या बागेतील एका कप्प्यात ठेवले. मी खालेल्ल्या चॉकलेटचे रॅपर खाली न टाकता बॅग मध्ये ठेवले पण ही मोठी माणसे खालेल्या शेंगदाण्याची टरफल ऑटो मध्ये खाली टाकत आहेत हे बघून मी आई कडे बघत होते आणि आई माझ्याकडे. काही वेळ बघितल्यानंतर मी त्यांना म्हटले की तुम्ही ही टरफल खाली का टाकता, एखाद्या पिशवीमध्ये जमा करायची ना. मग मी आईला एक पिशवी मागितली आणि त्यांना दिली. आपण स्वच्छता ठेवणार नाही तर आपला भारत देश पण घाण होणार ना. ते सर्व माझ्याकडे बघू लागले. आईला म्हणाले हुशार आहे हो तुमची लेक. आता नाही करणार आम्ही कचरा..असे म्हणून ते कचरा मी दिलेल्या पिशवीमध्ये जमा करू लागले. मला पण काही शेंगा त्यांनी दिल्या पण मी नाही म्हणाले कारण मला त्यांचा राग आला होता.



**कु. ईश्वरी निलेश अतकरे**
**इयत्ता ८ वी, मुंबई**

# माझा लाडका भाऊ

भाऊ माझ्या छोटासा
दिसतो किती छान छान ।
दिसतो किती छान छान
हसतो किती छान ।। १।।

मी त्याला रोज रोज
गाणी शिकवते छान छान ।
गाणे शिकविते छान छान
गोष्टी सांगते छान ।। २ ।।

भाऊ माझा खोडकर
खोड्या करतो फार फार
खोड्या करतो फार फार
मग खातो आईचा मार ।।३।।

तरी माझा छोटासा भाऊ
मला आवडतो फार फार
आम्ही सर्व त्याचा
करतो लाड फार ।।४।।



**कु. श्रुतिका आशिष राऊत**
**वर्ग – ४ था**



# आवाजाचे गाणे

चिव चिव चिमणी
किलबिलते अंगणी
काव काव कावळा
ओरडतो बावळा





कुहू कुहू कोकिळा
बाळा लावते लळा
मिठू मिठू पोपट
करी सारखा वटवट

म्याव म्याव मांजर
नजर तिची दुधावर
गाईचे हंबरणे
कोंबड्याचे आरवणे





मोराची केकावली
वाघाची डरकाळी
हत्तीचा चित्कार
माकडाचा भुभु:कार

हंसाचा कलरव
भुंग्याचा गुंजारव
सिंहाची गर्जना
बेडकाचे डराव डराव...डराव डराव





मनिषा शिरटावले
सातारा





# असे असावे शेजारी

**(काऊ चिऊची गोष्ट नवीन स्वरुपात)**

एक होता काऊ
तो लागला गाऊ
त्याच कसलं गाणं
नुसतच ओरडणं

चिमनी होती बिचारी
घर तिचे शेजारी
चिऊचे होते लहान बाळं
झोपेचे होते त्याचे आबाळं

चिऊ काऊला जाऊन म्हणाली
माझ्या बाळाची झोप हरवली
काऊ दादा तू छान गातो
पण बाळांना माझ्या त्रास होतो

काऊ म्हणाला अगं.. चिऊताई
मी तर गातो छान अंगाई
तुझे बाळ झोपत नाही
त्याचे कारण वेगळेच काही

माझे घर शेणाचे
तुझे घर मेणाचे
माझ्या घरात हवा खेळते
तुझ्या घरात हवा कोंडते

आपण एक काम करूया
अदला-बदली घराची करूया
चिऊ विचार करु लागली
तिला त्याची गोष्ट पटली

केली घराची अदला-बदली
चिऊ चे बाळ छान झोपू लागली
मेणाच्या घरात काऊ गायचा
बाहेर आवाज नाही जायचा

असे असावे शेजारी
एकमेकास मदत करी
चिऊ चे बाळ छान झोपू लागली
काऊच्या गाण्याची हौस फिटली



**देवेंद्र शं. इंगळकर**



# तिसरे शब्दवेल साहित्य संमेलन २०२३ पुणे क्षणचित्रे


















भवतु सब्ब मंगलम्
**RAJDEEP**
**CO-OP. CREDIT SOCIETY LIMITED**
Reg. No. BOM/WHE/R.S.R./C.R./631/1987

# संचालक मंडळ
## २०२२ - २०२७

अध्यक्ष



श्री. जयप्रकाश ग. देशपांडे
(अप्पर राज्यकर आयुक्त) (निवृत्त)

उपाध्यक्ष



श्री. वाल्मिक वि. गुठे
(सदस्य राज्यकर न्यायाधिकरण) (निवृत्त)

सचिव



श्री. गजानन यु. खानंदे
(राज्यकर उपायुक्त)

खजिनदार



श्री. अशोक रा. सोरते
(राज्यकर उपायुक्त) (निवृत्त)

संचालक



श्री. सुभाष उ. एंगडे
(अप्पर राज्यकर आयुक्त)

संचालक



श्री. सुनिल ग. सांगळे
(राज्यकर सहआयुक्त) (निवृत्त)

संचालक



श्री. जनार्दन म. राउत
(राज्यकर सह आयुक्त)

संचालक



श्री. पराग दि. महाजन
(राज्यकर उपायुक्त)

संचालिका



श्रीमती अर्चना नि. पाटणे
(राज्यकर उपायुक्त)

संचालिका



श्रीमती अस्मिता गजभिये (पवनारकर)
(मनुष्यबळ अधिकारी)

संचालक



श्री. संजय जाधव
(राज्यकर सह आयुक्त)

संचालक



श्री. राजेंद्र कुऱ्हाडे
(राज्यकर उपायुक्त)

संचालक



श्री. सचिन केदारलिंगे
(राज्यकर सहाय्यक आयुक्त)

संचालक



श्री. प्रदिप रणपिसे
(राज्यकर उपायुक्त)

संचालक



श्री. मारुती रणदिवे
(राज्यकर उपायुक्त)

तज्ञ संचालक



श्री. विश्वेश्वर टेंभेकर
(राज्यकर निरीक्षक) (निवृत्त)

तज्ञ संचालक



श्री. सुनिल जगदाळे
(राज्यकर सहाय्यक आयुक्त)

मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. अनिल ब. कासुर्डे
मुख्य कार्यकारी अधिकारी

जाई फाउंडेशन मुंबई महा. ४९/२०२१ द्वारा

# शब्दवेल साहित्य मंच, मुंबई

मुख्य कार्यालय – जगद्निता, ४०४, साई पर्ल अपार्टमेंट, प्लॉट क्र. ए-१२१, करंजाडे, पनवेल ४१० २०३.
Email ID : shabdvelsaahityasamuh@gmail.com • Mob.: 7720945002 / 8652365573


**प्रविण ज. बोपुलकर**
(अध्यक्ष)


**अश्विनी निलेश अतकरे**
(सचिव)


**रामदास गायधने**
(सह-सचिव)


**रंजना गजानन कराळे**
(उपाध्यक्षा )


**शितल कृष्णकांत राऊत**
(उपाध्यक्षा)


**नरेंद्र लोणकर**
(व्यवस्थापक)


**प्रविण सोनोने**
(प्रमुख कार्यवाह)


**देवेंद्र इंगळकर**
(केंद्रिय संघटन प्रमुख)


**अमोल चरडे**
(अध्यक्ष-शब्दवेल युथ विंग )


**माधुरी साबळे**
(सचिव-शब्दवेल युथ विंग)


**अंजली ढमाळ**
(सन्मा. अधि. सल्लागार)


**आबासाहेब कडू**
(ज्येष्ठ कार्यकारिणी सल्लागार)


**विद्या बनाफर**
(ज्येष्ठ कार्यकारिणी सल्लागार)

# एम. के. रणदिवे



उपायुक्त (GST), मुंबई
तथा
जनसंवाद सचिव
महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ

साहित्य, संस्कृती, पर्यावरण आणि रोजगार निर्मिती अशा अनेकविध आघाड्यांवर यशस्वी व सक्षमपणे उभारल्याबद्दल सर्वप्रथम 'जाई फाउंडेशन'चे खूप सारे कौतुक ! जाई फाउंडेशन हे सतत मानवाचे कल्याण या उदात्त मूल्याच्या परीघाभोवती परिक्रमा करत असून या परिघात संपूर्ण मानवीजात 'सुजलाम सुफलाम' व 'कल्याणकारी' कशी राहील? या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीची धडपड अविरत चालूच असते. जाई फाउंडेशनने केलेल्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामाबद्दल त्यांचे खूप सारे कौतुकच ! खरंतर जाई फाउंडेशनने साहित्य, सांस्कृतिक, समाजकारण व रोजगार निर्मिती सारख्या कार्यातून विविध गोष्टी साध्य केल्या आहेत जसे की महिला वर्गाच्या हाताला काम व बचत प्रवृत्तीने 'सहकार्यातून सक्षमीकरण' साधण्याचे काम या फाउंडेशनने लिलया पार पाडले आहे ! या फाउंडेशनला मिळालेल्या आयएसओ ९००१:२०१५ या प्रमाणीकरणाबद्दल फाउंडेशनच्या सर्वच सदस्यांना मन:पूर्वक शुभेच्छा! या फाउंडेशन कडून संचालित असलेल्या शब्दवेल साहित्य समूहाने साहित्य क्षेत्रात आपला नावाला साजेल असा दबदबा निर्माण केला असून संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरही हा साहित्य प्रवाह प्रवाहित करण्यासाठीची त्यांचे अविरत प्रयत्न प्रशंसनीय आहेत! फाउंडेशनच्या विविध उपक्रमातून संपूर्ण मानव जातीचे हित साधले जावे व या मानवतेच्या कल्याणात अविरत कार्य करत असलेल्या या संस्थेला खूप साऱ्या शुभेच्छा देऊन वाचक मंडळींना दिवाळी सारख्या पवित्र सणाच्या खूप साऱ्या शुभेच्छा देत आहोत! धन्यवाद.